असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: "नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 निरसित करणे."

**मु.शी.**: "नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 निरसित करणे." या विषयावर माननीय मुख्यमंत्री यांचा वैधानिक प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु.......

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) कायदा संपूर्णपणे रद्द करुन मुंबईच्या विकासाची वाट उपलब्ध होईल, अशा पध्दतीने फार मोठी चर्चा व वादंग....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये कोरम नाही. सत्ताधारी पक्ष सतत कोरम पाळण्याबाबत टाळाटाळ करीत आहेत. युलएलसी कायदा रद्द करुन घेण्याची जबाबदारी त्यांची असतानाही सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. माननीय मुख्यमंत्री महोदय, सभागृहामध्ये उपस्थित आहेत, असे असतानाही सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. म्हणून हा सभागृहाचा अवमान नाही का ? विधान परिषद सभागृहामध्ये सदस्य म्हणून येण्यासाठी कशी लाईन लागलेली असते ? मग, त्यांनी याठिकाणी हजर राहू नये का ?

**उपसभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले भाषण सुरु करावे.

..2.....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नागरी कमाल जमीन धारणा कायदा रद्द करण्यासाठी खूप मोठी लॉबी, हितसंबंध महाराष्ट्रामध्ये आणि खास करुन मुंबई शहरामध्ये स्वत:चे राज्य करीत आहेत, अशाप्रकारचे चित्र निश्चितपणे दिसत आहे. याठिकाणी खोटया स्वरुपाचा आभास किंवा वैचारिक वादंग असे दाखविले जात आहे व असे सांगितले जात आहे की, मुंबईच्या विकासासाठी जर का निधी पाहिजे असेल तर हा कायदा रद्द करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु वस्तुथिती पाहिली तर पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यांमध्ये अजूनही हा कायदा अस्तित्वात आहे. याठिकाणी सांगितले जात आहे की, जे.एन.एन.यु.आर.एम., त्याच बरोबर नागरी क्षेत्रातील गरिबांच्या ज्या योजना आहेत त्या जर का पूर्ण व्हावयाच्या असतील तर त्यासाठी हा कायदा रद्द करणे आवश्यक आहे. यासंदर्भात मी सुरुवातीलाच स्पष्ट करते की, शिवसेना पक्षाचा हा कायदा रद्द करण्याला पूर्णपणे विरोध आहे. मला सांगितले पाहिजे की, मुंबई शहरातून वेगवेगळया माध्यमातून फार मोठयाप्रमाणात कोटयावधी रुपयांचा कर केंद्र शासनाला दिला जातो, परंतु मुंबई शहराच्या बाबतीत केंद्र सरकार सतत अन्याय करीत आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..........

खरं तर मुंबई शहरामध्ये सुध्दा 'इंडिया' आणि 'भारत' अशा स्वरुपाची जनतेमध्ये विभागणी झ ाालेली दिसते. यामध्ये मोठमोठया इमारती, तेथील सुरक्षितता, सांस्कृतिक वातावरण, आर्थिक क्षमता आणि दुस-या बाजूला शेकडो गरीब माणसे. काही वर्षापूर्वी त्यांना सरकारचा थोडा आधार मिळण्याची शक्यता होती. काही योजना प्रत्यक्षात आणत असतांना अडचण निर्माण झाली असली तरी काही प्रमाणात गरीब लोकांना घरे मिळण्याच्या दृष्टीकोनातून त्यांना त्यांची थोडी तरी अपेक्षा होती. गरीब लोकांच्या स्वप्नांना हरताळ फासण्याचे काम महाराष्ट्र शासन हा कायदा रद्द करुन करणार आहे की काय, अशी शंका निर्माण होते. महाराष्ट्राचा इतिहास बघितला तर स्पष्टपणे दिसते की, अनेक मुद्यांवर चळवळी झाल्या, आंदोलने झाली आहेत. त्यामध्ये सातत्याने नागरी सुविधांबाबत लोकांच्या तक्रारी राहिलेल्या आहेत. आता असे चित्र निर्माण केले जाते आहे की, हा कायदा रद्द केल्यामुळे इमारती मोठया प्रमाणात उभ्या राहतील. पण या इमारती कोण, कोणासाठी आणि कोणाच्या वापरासाठी उभारणार आहेत ? येथे जो माणूस काम करतो, शारीरिक श्रम किंवा बौद्धिक श्रम करणारा असेल, मध्यमवर्गीय असेल, ज्यांनी ही मुंबई घडवलेली आहे, येथील भूमिपुत्र आहे, त्याचबरोबर मुंबई शहराला ख-या अर्थाने जो आपली मानतो आहे, अशा लोकांना राहण्यासाठी जागा खरेदी करावयाची असेल तर सुयोग्य धोरण असणे अपेक्षित होते. ते नसल्यामुळे सातत्याने राजकीय इच्छाशक्ती कमी पडते आहे की काय, असा प्रश्न निर्माण होतो. मुंबई शहरामध्ये जे श्रीमंत येतात, जे सदनिका विकत घेण्याच्या परिस्थितीत आहेत त्यांच्यासाठी सुध्दा ज्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागतात त्याचा संपूर्णपणे ताण कोणावर पडत असेल तर तो मुंबई महानगरपालिकेवर पडतो. पाणी पुरवठयाच्या योजना, नागरी सुविधांचे प्रश्न, वाहतुकीचा प्रश्न, त्याचबरोबर अविकसित राज्यांमधून येणारे लोक, रुग्णालयांवर पडणारा भार, या बरोबरीने मुंबईची किर्ती, ही मुंबईची किर्तीच मुंबईला मारक ठरणार आहे की काय, अशी शंका निर्माण होते. दुसरीकडे हा कायदा रद्द करुन त्यामध्ये खतपाणी घालण्याचे काम शासनाकडून होणार आहे, याकडे देखील मी या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधत आहे. एक सांगितले जाते की, मुंबई शहराच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून राज्याला काही निधी मिळेल. हा निधी खरोखरच पुरेसा आहे काय ? ज्या प्रमाणात मुंबई शहरातून केंद्र सरकारकडे कर रुपाने निधी जातो आहे त्याप्रमाणात मुंबईला केंद्र शासनाकडून निधी मिळतो का ? आज आपण कुठलाही प्रकल्प



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे...........

अमलात आणावयाचा म्हटला तर जे निकष लावले जातात त्यामध्ये प्रशासकीय खर्च 20 टक्क्यांपर्यन्त किंवा कमीतकमी 10 टक्क्यांपर्यन्त असावा, असा आग्रह धरला जातो. दुर्देवाने आपण अनेक वेगवेगळया प्रकल्पांची भाषा करतो, इमारतींमध्ये येणा-या लोकांच्या सोयी-सुविधांबाबत बोलत असतो तेव्हा आपल्या डोळयासमोर कोण आहेत तर जगातील फायनान्शियल इन्स्टिटयूटस्. सातत्याने असे म्हटले जाते की, न्यूयॉर्क त्यानंतर सिंगापूर आणि त्याच्या बरोबरीने मुंबई शहर. म्हणून आपण आजही बघतो आहोत की, शेअर मार्केट आणि फायनान्शियल इन्स्टिटयूशनमध्ये मुंबई शहराचे नाव आहे ते सगळयामध्ये वर येत आहे. त्यांची अशी अपेक्षा आहे की, एका बाजूला आम्हाला इन्फ्रास्ट्रक्चर मिळाले पाहिजे. परंतु एका बाजूला नागरी सुविधा मिळत असतांना शहरामध्ये जर इतर समाजाला, इतर घटकांना राहण्याची सोय नसेल, पाण्यासारख्या गोष्टी, इतर सोयी-सुविधांसाठी, स्वच्छतागृहांसाठी त्यांना झगडावे लागत असेल तर संपूर्ण शहरामध्ये अशांतता निर्माण होते. अशा अशांततेमध्ये खरोखर कोणत्या फायनान्शियल इन्स्टिटयूशन काम करु शकतील किंवा कोणत्या प्रकारच्या नागरी सुविधा आपण लोकांना देऊ शकू याचा विचार करण्याची वेळ आली आहे. हा फक्त राजकारणाचा प्रश्न नाही. दूरदृष्टी ठेवून मुंबई शहराचा विचार केला तर आपण हा मुद्दा नक्कीच घेऊ शकतो की, कुठल्याही भागामध्ये गेलो तर सदनिकांचे भाव आकाशाला पोहोचलेले आहेत. शासनाकडे जी जमीन प्राप्त व्हावयास पाहिजे किंवा जी जमीन विकासासाठी मिळाली पाहिजे, ती जमीन प्रत्यक्षात मिळत नाही, असे चित्र निर्माण झाले आहे. मुंबई शहरावर, मुंबई महानगरपालिकेवर टीका करणे, ही सगळयात सोपी गोष्ट आहे. कुठल्याही क्षणी एखादे ड्रेनेज भरलेले असेल, पाण्याची नळाची तोटी चोरीला गेली असेल तर कुणीही हाच प्रश्न विचारतो आणि तो स्वाभाविकही आहे कारण ती तेथील नगरसेवकाची जबाबदारी असते. म्हणून कुणीही हा प्रश्न विचारतो, एखाद्या 'मिड-डे' सारख्या किंवा 'मुंबई मिरर' सारख्या इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये जणुकाही एखादा माणूस वाँटेड असावा, अशा पद्धतीने नगरसेवकांचा फोटो छापलेला असतो आणि हा तुमचा लोकप्रतिनिधी काहीच करीत नाही, असे चित्र निर्माण केले जाते. मुंबई महानगरपालिकेव्दारा राबविण्यात येणारे जे प्रकल्प आहेत त्या प्रकल्पांच्या नियोजनात सुध्दा कधीच खरोखर मुंबई किती वर्षांमध्ये, कशी वाढणार आहे, मुंबई

..3.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.........

शहराची वाढ झाल्यानंतर किती लोकसंख्या येणार आहे, या येणा-या लोकसंख्येवर कुठलेही नियंत्रण नाही आणि खासकरुन इतर प्रांतामधून येणारे लोक आहेत ते विविध स्तरावर निर्णयाच्या टप्प्यावर आहेत.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 09:55

डॉ.नीलम गो-हे ..........

केंद्रीय राज्य घटना म्हणा किंवा भारतामध्ये असणारे अनेक निर्बंध यामुळे इतर राज्यांमधून येणारे लोंढे रोखण्यासंदर्भात आपण कोणतीही उपाययोजना करीत नाही, अशा वेळी या पद्धतीचे निर्बंध उठविल्यामुळे इतर राज्यातील जे लोक येतील त्या राज्यातील लोकांचा विकासातील वाटा आपल्याला मिळत नाही. येथे जो पैसा निर्माण होतो तो याच राज्यामध्ये त्यांनी इन्व्हेस्ट करावा, असे देखील चित्र दिसत नाही. अगदी फिल्म इंडस्ट्रीचे जरी आपण चित्र बघितले तरी जो काही पैसा मिळतो तो सेवाभावी कामात गुंतवतील, असे होत नाही, तसेच अनेक कारखानदारांचा, उद्योगपतींचा रोख स्वत:च्या राज्याचा विकास करण्याकडे राहिलेला आहे. खरा प्रश्न असा निर्माण होतो की, या मुंबईला वाली कोण ? मुंबईला वाली कोण, याचे ज्यावेळी उत्तर द्यावे लागेल त्यावेळी मला आठवते की, ज्यावेळी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, आम्ही कोणत्याही प्रकारचे राजकारण होऊ देणार नाही. सदनामध्ये बोलत असतांना माननीय मुख्यमंत्री महोदयांनी वारंवार स्पष्ट केले आहे की, आम्ही केंद्र शासनाचा निधी आणू. आज आपण लोकमान्य टिळकांना अभिवादन करणार आहोत, एका अर्थाने अशा या ऐतिहासिक दिवशी या विषयावर आपण चर्चा करीत आहोत, असे मला वाटते. स्वातंत्र्याच्या काळामध्ये सुध्दा पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र यांचा एक दिशादर्शक राज्य म्हणून विचार होत होता. परंतु प्रत्यक्षात आपण चित्र बघतो की, पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेश या दोन राज्यांनी हा कायदा रद्द न करता देखील त्यांना जवाहरलाल नेहरु पुनर्निर्माण अभियान योजनेतील पैसे मिळालेले आहेत. गरिबांच्या विकासासाठी जो निधी मिळतो तो देखील त्यांना प्राप्त झालेला आहे आणि म्हणून आपल्या राज्यात हा कायदा रद्द झाल्यामुळे मुंबईकरांच्या विकासाच्या दिशा पल्लवीत होतील, असे म्हणावयास काही वाव नाही. शेवटी मला असे सांगावेसे वाटते की, ही जी संपूर्ण चर्चा, हा जो संपूर्ण वादंग आहे, आज आपण बघतो की, वेगवेगळया मार्गांनी कायद्यातून पळवाटा काढून येथील भूखंडाच्या व्यवहारांमध्ये आर्थिक व्यवहार करुन विकास केला जातो. आज आपण चित्र बघतो की, मुंबई शहरातील विकास कोणत्या दिशेने जाणार आहे यावर सुध्दा जे नियंत्रण आहे त्या नियंत्रणाचे सुत्रधार कळसुत्री बाहुल्यांप्रमाणे वेगळेच आहेत. हे जे सुत्रधार आहेत त्यांच्या मनामध्ये मुंबईतील स्थानिक लोकांच्या बाबतीत कोठेही सन्मान नाही. त्यांचे काही मानवी अधिकार आहेत, याबद्दलची जाणीवदेखील त्यांच्यामध्ये नाही आणि अशा वेळी शासनाची

..2...

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 09:55

डॉ.नीलम गो-हे ..........

राजकीय इच्छा शक्ती केंद्र शासनाशी बोलणी करतांना कमी पडते की काय अशी शंका वारंवार निर्माण होते. विधानसभा आणि विधानपरिषद ही दोन्ही सार्वभौम सभागृहे आहेत, असे आपण म्हणत असतांना देखील विधानपरिषदेत या विषयावर चर्चा होत असतांना मला मुद्दाम असे सांगावेसे वाटते की, कायदा रद्द झाल्यामुळे या शहरावर आर्थिक सम्राटांचे अनिर्बंध अभिराज्य चालणार आहे. ही बाब लक्षात घेऊ शासनाने जर जनतेला वा-यावर सोडले तर कोणत्या प्रकारचा निवारा जनतेला प्राप्त होईल याचा देखील विचार करण्याची वेळ आलेली आहे आणि केंद्र सरकारला देखील हे ठणकावून सांगण्याची वेळ आलेली आहे की, मुंबई शहराचे हीत साधण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही सर्व लोक काही बाबतीत तरी या शहराचे समाजकारण जपणार आहोत. कै.यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणत असत की, प्रत्येक पक्षाचे वेगवेगळे राजकारण असते. परंतु सर्वांचे मिळून काही समाजकारण असते. मला असे वाटते की, या कायद्यामध्ये फार मोठे राजकारण असले तरी सुध्दा सामान्य जनतेच्या समाजकारणाचा विचार करुन, त्यांच्या आर्थिक हितसंबंधांचा विचार करुन आणि खास करुन हा कायदा आल्यानंतर मुंबई महानगरपालिकेची जी स्थिती होणार आहे त्याचा विचार करणे गरजेचे आहे. आपण असे बघतो की, वेगवेगळया प्रकारच्या प्रवृत्ती राजकारणात आणि समाजकारणात असतात. त्यामध्ये काही लोक विरोध सहन करु शकतात, विरोध सहन करुन घेतात आणि काही प्रवृत्ती अशा असतात की, पाहिजे ते साध्य केल्याशिवाय रहात नाहीत. आपण दोन मुलांमधील प्रवृत्ती बघतो. एखाद्या मुलाला एखादे खेळणे मिळाले नाही तर आपल्याला ते कसे मिळविता येईल, आपल्याला परीक्षेत मार्क कसे मिळविता येतील यासाठी तो प्रयत्न करतो आणि एखादा मुलगा असा असतो की, तो पगती पुस्तकच फाडून टाकतो किंवा त्या खेळण्याचा चक्काचूर करुन टाकतो आणि मी जिंकलो, मी जिंकलो असे तो ओरडत असतो. अशा प्रवृत्ती देखील राजकारणामध्ये असतात आणि म्हणून खरा प्रश्न असा आहे की, आपण राजकारणामध्ये काही समन्वय, सुसंवाद करीत असतांना सर्वमतांनी, सर्व पक्षाच्या आमदारांनी हा कायदा रद्द करण्यासाठी ठामपणे विरोध केला पाहिजे, असे मला सांगावेसे वाटते आणि एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

जयभीम जय महाराष्ट्र.

--------

यानंतर श्री.गागरे .......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, यु.एल.सी. म्हणजे कमाल नागरी जमीन धारणा कायदा रद्द करण्यासंबंधी चर्चा येथे सुरु आहे. 1976 मध्ये हा कायदा मंजूर झाला आहे. या कायद्याचा हेतू 1971 च्या गरीबी हटाव नाऱ्यामध्ये होता. समाजवादी समाजरचना करण्यासाठी घटनेमध्ये काही शब्दांचा बदल करण्यात आलेला आहे. परंतु 25 वर्षात असे काय घडले आहे की हा कायदा रद्द करावा लागत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी एका वक्तव्यात असे म्हटले आहे की, हा कायदा रद्द केल्यामुळे मुंबई शहरातील जागांचे भाव साधारणत: 35 टक्के कमी होतील. त्यांचा अंदाज बरोबर असून हेतूही चांगला आहे. एखादा कायदा काळानुरुप कालबाहय झाला तर तो बदलायला काही हरकत नाही. परंतु त्या कायद्याचा मुळ उद्देश सफल का झाला नाही ? याचा आपण सखोलपणे विचार केलेला नाही. हा कायदा रद्द केला तर "रोगापेक्षा इलाज भयानक" अशी मुंबई शहराची परिस्थिती होऊन बसेल. या कायद्याचा मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद हया शहरांमध्ये परिणाम होणार आहे. 1925 मध्ये मुंबईमधील 60 टक्के जमीन वन आणि शेतीखाली होती. 1994 पर्यत ती  जमीन 30 टक्क्यांवर आली आहे. वारंवार कायदे करताना मुंबई बेट आहे हे आपण विसरलो तर पुढील 25 वर्षांनी भयानक परिस्थिती निर्माण होईल. मुंबईत एक इंचही जमीन आपण वापरु शकत नाही. मुंबई शहराच्या चारही बाजूने पाणी असल्याने घरबांधणीचा कोणताही विकास हा क्षितीजाला समांतर असा करु शकणार नाही. असा विकास करण्यासाठी आपल्याला आकाशाकडे जावे लागेल. आकाशाकडे जात असताना मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर या शहरांच्या परिस्थितीचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. मुंबई शहरातील जमीन 1974 पर्यत 30 टक्क्यावर आली आहे. मुंबईमध्ये 1925 ते 1994 या काळात खारफुटीचे जंगल 28 टक्के होते ते 18 टक्क्यावर आलेले आहे. 1980 ते 1995 पर्यत मुंबईमध्ये 12 टक्के सिमेंटच्या इमारती म्हणजे कॉंक्रीटीकरण होते, ते प्रमाण आज 52 टक्क्यावर गेलेले आहे. बिल्डरला किंवा विकासकांना मी चोर म्हणत नाही. समाजाचा एखादा  घटक समाजद्रोही असू शकतो. समाजाचा कोणताही एक घटक हा उध्दार करणारा आहे असे मी म्हणत नाही. देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सर्व घटकांचा उपयोग होतो. परंतु काही लोकांनी मुंबई, पुणे, नागपूर अशा शहरामध्ये याचा पूर्ण गैरफायदा करुन घेतला आहे. मुळात

.....2

PNG/ KGS/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण .....

शहराचा प्रादेशिक विकास आराखडा गुंडाळून ठेवण्यात आला आहे. प्रादेशिक विकास आराखडयात एक तत्व मान्य करण्यात आले होते की, मुंबई शहराची लोकसंख्या ही 70 लाखाच्या वर जाता कामा नये. त्या वेळी येथील उपलब्ध जागा लक्षात घेऊन तज्ञांनी व पर्यावरणवाद्यांनी हेच सांगितले होते. कारण मुंबई शहरामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यक ते रस्ते, बागा, मैदाने, पार्क अशा नागरी सुविधा मिळणे आवश्यक आहे. आज मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 35 लाख झालेली आहे. हा कायदा रद्द केल्यानंतर जी जमीन उपलब्ध होईल, त्यावर शासनाचे कोणत्याही प्रकारचे निर्बंध व अंकुश राहणार नाहीत. आपण लिबरलायझेशन व ग्लोबलायझेशनकडे जात आहोत. शासनाचे समाजावर नियंत्रण ठेवणाऱ्या घटकांवरील लक्ष हळूहळू निघून जावे या मताचा मी नाही. यावर शासनाचे नियंत्रण असणे अत्यंत आवश्यक आहे. मुंबई शहरात उद्योग, कार्यालय, व्यापारी संकुले किती प्रमाणात उभारावीत यासाठी काही अटी व निकष ठरविण्यात आले होते. मुंबई शहरातील गिरण्या बंद झाल्यानंतर शेकडो एकर जमीन उपलब्ध झाली आहे. या जमिनीसाठी प्रत्येकी 1/3 प्रमाणे कायदा करण्यात आला परंतु त्यामध्येही बदल करण्यात आला आहे. बदल करण्याचा हेतू चांगला असेल तर मी शंका घेणार नाही. कारण विकास करण्यासाठी जमीन दिली नाही तर विकास खुंटून जाईल. यामध्ये गिरण्यांची काही जमीन आहे. शासनाने यु.एल.सी. कायदा रद्द केला तर गरीबांना घरे बांधण्यासाठी व विकासासाठी काहीच जमीन शिल्लक राहणार नाही अशी भिती वाटते.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ....

तो मुद्दा घेऊन मी आपल्यासमोर बोलतो आहे. एक तृतियांश, एक तृतियांश, एक तृतियांश अशा प्रकारे गिरण्याच्या जमिनीचे वाटप व्हावे अशा प्रकारचा कायदा असतानाही त्यात बदल केला गेला आणि तेथे जे बांधकाम आहे, मग तेथे चारही बाजूला भिंती असल्यानंतर आतील बाजूस मोकळी जागा असली तरी ते बांधकाम समजण्यात आले. त्यामुळे त्या गिरण्यांच्या जमिनींचा 80 टक्के वापर हा गिरणी मालकांना करू देण्यात आला आणि केवळ 10-20 टक्के जुजबी जमीन म्हाडा आणि महानगरपालिकांच्या माध्यमातून शासनाच्या ताब्यात येईल अशा प्रकारे कौशल्याने कायद्यात बदल करून घेतला गेला. सभापती महोदय, यूएलसी कायदा रद्द केला गेल्यानंतर त्यासंबंधात माझ्या मनात एक प्रश्न निर्माण झालेला आहे त्याचे उत्तर आपण द्यावे अशी मी विनंती करतो. हा कायदा रद्द झाला तर मुंबईत आपल्या गृहनिर्माण मंडळाला, गृहनिर्माण खात्याला टाळे लावावे लागेल. मुंबईत तुम्ही एकही घर बांधू शकणार नाही, किंबहुना एक घर बांधण्यासाठी तुमच्याकडे जमीनच उरणार नाही. गिरण्यांच्या जमिनी तुम्ही कायद्यात बदल करून देत राहिला आहात, आरक्षित भूखंड तुम्ही देत राहिला आहात. शहरांमध्ये ज्या ठिकाणी रिझर्वेशन्स आहेत, मग ते गार्डनसाठी असेल, रस्ता रूंदीकरणासाठी असेल, वाहनतळासाठी असेल, खेळाच्या मैदानासाठी, रिक्रिएशनसाठी असेल तेथे तुमची कितीही इच्छा असली तरी ती तुम्ही करू शकत नाहीत. मग ती खाजगी जमीन असेल, सरकारी, निमसरकारी जमीन असेल या सर्वच जमिनींवरील 1995 पूर्वीचे जे काही बांधकाम असेल, विशेषतः झोपडपट्टी, त्या झोपडपट्टीला तुम्ही सरसकट मान्यता दिलेली आहे. त्यामुळे जोपर्यंत तुम्ही त्यांना पर्यायी जागा देत नाहीत, तो पर्यंत त्यांना तेथून हलवू नका असे शासनाचे धोरणही आहे आणि सामाजिक दृष्टीकोन म्हणून तसे ते असलेही पाहिजे. पण असे असले तरी त्यांच्या पुनर्वसनासाठी, त्यांच्यासाठी घरे बांधण्याकरिता तुमच्याकडे जमीन कोठे असणार आहे ? आज तुम्ही मुंबई महानगरपालिकेला आदेश देता की, हा अमुक अमुक प्लॉट तुम्ही डिरिझर्वेशन करा किंवा जेथे 'नो डेवलपमेंट झोन' असेल तेथे 'डेवलपमेंट झोन' करा. त्यावेळी तुम्ही काहीही विचार करीत नाही. थोडक्यात आपण या सगळ्या शहराचे भविष्यात वाटोळे करण्यासाठीच जणू बसला आहात. मुंबई शहरामध्ये एखादी जमीन तुम्हाला संपादित करावयाची असेल तर त्यासाठी त्या संबंधिताला 6 महिन्यांची नोटीस द्यावी लागते की, तुझी ही जमीन संपादित का करण्यात येऊ नये ? नंतर कौशल्याने ती नोटीस लॅप्स करण्यात येते. शेवटी त्याचे कारण तुम्ही असे देता की,

...... इ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

ती जमीन अनधिकृत बांधकामांनी व्यापलेली असल्याने ती ताब्यात घेऊन आपल्याला काहीही उपयोग होणार नाही. असे असेल तर मग तुम्ही तुमचे आताचे जे हौसिंग धोरण स्वीकारलेले आहे त्यामध्ये पृष्ठ क्रमांक 3.2 वर असे म्हटलेले आहे की, "... सार्वजनिक गृहनिर्माण आणि बेघरांसाठी गृहनिर्माण यासाठी आरक्षित असलेल्या जमिनी खाजगी सहभागाने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार विकसित करण्यात येतील. .." पण सभापती महोदय, तुमच्याकडे यासाठी कोठल्या जमिनी आहेत ? किंबहुना तुम्हाला तुमच्या 'म्हाडा'ला टाळे लावावे लागेल. तुमच्याकडे गृहनिर्माणासाठी जमिनी कोठे आहेत ? 1960 नंतर या मुंबई शहरामध्ये कन्नमवार नगर असेल, जवाहर नगर असेल अशी जी सगळी नगरे वा नागरी वसाहती आहेत त्या कामगारांसाठी, मध्यम वर्गीयांसाठी गृहनिर्माण मंडळामार्फत आपण निर्माण केल्या आहेत. म्हणजे त्या काळात काँग्रेसे सरकारने अजिबात काम केले नाही असे कोणीही म्हणणार नाही. त्यावेळच्या सरकारने कामगारांसाठी, मध्यम वर्गीयांसाठी घरे बांधली, काही चांगल्या योजना राबविल्या. मग काळाचौकी येथील अभ्युदय नगर असेल, वरळी येथील आदर्श नगर असेल., अशा प्रकारे मुंबई शहरातच नाही तर पुण्यामध्ये देखील काही घरे बांधली, निवासी वसाहती उभ्या केल्या. म्हणजे त्यावेळेस शासन हे गरीबांसाठी काही तरी करीत आहे असे निदान वातावरण तरी सामान्य माणसाच्या मनात निर्माण झाले होते. पण गेल्या 10-20 वर्षांमध्ये, 1990-95 नंतर मुंबईतील सगळ्या जमिनी आणि एकूणच मुंबईचा विकास हा तुम्ही धनिकांच्या हातात दिला आहे. आज मुंबई शहरामध्ये कोठला पोष्टमन, कोठला क्लर्क, कोठला टॅक्सी ड्रायव्हर, कोठला रिक्शॉ चालक, कोठला शिपाई, लिफ्टमन, फायरमन, वायरमन असेल वा गिरणी कामगार, डबेबाला कामगार, माथाडी कामगार असेल त्याला 1 बेड, किचन, हॉल असे छोटेसे घर घेऊ शकत नाही, यापुढेही घेऊ शकणार नाही. कारण आज मुंबईमध्ये कोठेही 20-25 लाखाच्या खाली असे घर नाही. मग तुम्ही 'आमचे राज्य गरीबांसाठी आहे, 'हमारे शासन का हाथ, गरीबों के साथ' असे म्हटल्यानंतर तुम्ही जरूर यूएलसी रद्द करा, पण ते करताना वा ते करण्यापूर्वी काही प्रश्नांची उत्तरे आपल्यालाच शोधावी लागतील. जसा एखादा माणूस आपला पगार घेतल्यानंतर आपल्या महिन्याच्या खर्चाचे प्लॅनिंग करतो, या पगारातील रकमेतून कसकसा खर्च आपल्याला करावयाचा आहे हे ठरवित असतो तसेच तुम्ही यूएलसी रद्द केल्यानंतर या सगळ्या जमिनी ज्यांच्याकडे होत्या त्यांना दिल्यानंतर, तुम्ही एक

...... इ 3 ...



KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 10:05

श्री.मधुकर चव्हाण .....

वेगळेच स्वप्न पहात आहात. पण स्वप्न पाहतानाही त्याबाबत "ड्रीम द इम्पॉसिबल ड्रीम" एवढेच तुम्ही लक्षात ठेवता, पण त्यापुढील ओळ तुम्ही लक्षात ठेवत नाही. ते वाक्य असे आहे की, 'ड्रीम द इम्पॉसिबल ड्रीम ॲण्ड ट्राईड अवर लेवल बेस्ट'. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... एफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

तुम्ही नेमका पुढचा भाग स्वीकारता, लोकांना स्वप्ने दाखविता. परंतु ती स्वप्ने साकार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे त्यासाठी तुमच्याकडे कोणती योजना आहे? त्यासाठी तुम्ही कोणती कल्पना केली आहे. तुमच्याकडे किती जमीन शिल्लक रहाणार आहे? आपल्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांने 4 वर्षापूर्वी गोदरेजच्या जमिनीपैकी 200 एकर जमीन ताब्यात घेऊन दिल्लीमध्ये असलेल्या प्रगती मैदानाच्या धर्तीवर एखादे मैदान तयार करावे अशातऱ्हेचा आग्रह केला होता. आपण त्याबाबत काहीही अंमलबजावणी केली नाही. आज मुंबई शहरामध्ये मैदान आहे काय? आज शिवाजी पार्क मैदान, आझाद मैदानाच्या ठिकाणी सुध्दा पर्यावरणवाद्यांमुळे राजकीय पक्षांना, हिंदूंच्या धार्मिक उत्सवाकरिता, मोठया मेळाव्याकरिता परवानगी दिली जात नाही. तसेच, राष्ट्रवादी कॉंग्रेस असो, कॉंग्रेस असो, शिवसेना असो, भाजप असो यापैकी कोणत्याही राजकीय पक्षांचे अधिवेशन घेण्याकरिता परवानगी दिली जात नाही. एखाद्या राजकीय पक्षाचे अखिल भारतीय अधिवेशन घेण्याचा निर्णय झाला आणि त्यानिमित्त देशभरामधून दोन लाख लोक येणार असतील तर त्यांची एक-दोन दिवस रहाण्याची व्यवस्था होईल याकरिता आपण पुणे, नागपूर, नाशिक इत्यादी शहरामध्ये व्यवस्था केली आहे काय? यु.एल.सी. कायदा रद्द केल्यानंतर तुम्ही त्यामध्ये अट घालणार काय? मुंबई शहरामध्ये 338 जणांकडे 15 हजार एकर जमीन आहे. मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 25 लाख आहे. या 338 जणांमध्ये काही मोठे जमीनदार आहेत. त्यापैकी गोदरज यांच्याकडे 2500 एकर जमीन आहे, बेहरामजी जिजिभॉय यांच्याकडे 600 एकर जमीन आहे, दिनशॉ ट्रस्टकडे 800 एकर जमीन आहे, एस्सेलवर्ल्ड यांच्याकडे 650 एकर जमीन आहे, ॲम्युझमेंट यांच्याकडे 300 एकर जमीन आहे. इतकी जमीन या मूठभर लोकांकडे आहे. गरीब लोकांकरिता हा चांगला कायदा असतांना सुध्दा आपण या कायद्याची वाट लावली. मुळात हा कायदा केल्यानंतर 1971 ते 1975 पर्यंत समाजवाद्यांनी तुम्हाला पछाडले होते. समाजवादी समाजरचना आणून आम्ही गरिबांसाठी सर्व करणार, सामान्य माणसांच्या घरांवर सोन्याची कौले चढविणार, त्याला चालायला गालिचा देणार, मागेल त्याला घर देणार, हाताला काम देणार आणि शेतीला पाणी देणार अशा अनेक घोषणा आपण केल्या होत्या, त्यामधील हा एक कायदा आहे. तुम्ही जे समाजवादी कायदे केले ते मार्क्सवाद्यांना उपयोगी पडले, ते कायदे समाजवाद्यांना उपयोगी पडले नाही. आपण बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यानंतर आपण किती गरिबांना कज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. मधुकर चव्हाण...

दिली? संजय गांधी निराधार योजना काढली त्यामध्ये सर्वांनी कर्जे बुडविली. आपण संस्थानिकांचे तनखे रद्द केले त्याबद्दल आम्ही त्यांची बाजू न घेता आपण घेतलेल्या निर्णयाला आम्ही पाठिंबा दिला. त्या शतपटीने हे संस्थानिक आपण वेगवेगळया माध्यमातून निर्माण केले. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, यु.एल.सी. कायदा रद्द झाला. तुमच्या म्हणण्याप्रमाणे यामध्ये असत्य आहे अशातला भाग नाही. जी जमीन उपलब्ध होईल त्यामध्ये स्पर्धा येईल. आणि त्यामधून घरे बांधली जातील. ती मुंबई शहरातील लोकांना मिळतील. आज मुंबई शहरामध्ये पाणी व पायाभूत सुविधा कमी आहेत. आज एखादी उंच इमारत बांधली तर त्या ठिकाणी आग लागल्यानंतर फायर फायटींगची व्यवस्था उपलब्ध नाही. काल आपण या ठिकाणी मुंबईतील वाहतुकीसंबंधी उल्लेख केला, तुम्ही डी.सी. रुलमध्ये दोन वर्षे बदल करीत नाही काय? तुम्ही धारावीला 4 चा एफ.एस.आय. देणार, धारावीकरिता आपण ग्लोबल टेंडर मागविले, 300 हेक्टर जमिनीपैकी 18 हेक्टर जमिनीमध्ये गरिबांना कोंबून टाकले. आणि उरलेल्या जमिनीकरिता 4 चा एफ.एस.आय. देणार आणि त्या नंतर त्या जमिनीवर आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या इमारती बांधल्या जाणार.. एखाद्या इमारतीमध्ये सुसज्ज 200 फ्लॅट असतील, त्यातील एका फ्लॅटची किंमत 2 कोटी,दीड कोटी किंवा 50 लाखाच्यावर असेल, तेथील प्रत्येक घरामधील लोकांकडे चार गाडया येणार. आज आपण यु.एल.सी. रद्द केल्यानंतर मोठया प्रमाणावर बांधकामे सुरु होतील. त्या बांधकामांना आपण कोठून पाणी देणार. त्यांच्या पायाभूत सुविधांचे काय? त्यांना रस्ते कोठून देणार? त्यांच्या सांडपाण्याची व्यवस्था कशी करणार? गटारातील पाणी वाहून जाण्याची व्यवस्था कशी करणार? त्यांच्या कार पार्किंगची कशी व्यवस्था करणार? त्यांच्या फूटपाथकरिता आणि त्यांच्या ॲम्युझमेंट पार्ककरिता काय व्यवस्था करणार? त्यांच्या नागरी सुविधांची काय व्यवस्था करणार? अशाप्रकारच्या अटी आपण घालणार आहात काय? तुम्ही 10 ओळींचा यु.एल.सी. रद्द करण्याचा ठराव आणता त्यावेळी त्याला पाठिंबा द्यायला काही हरकत नाही. परंतु जे प्रश्न निर्माण होतील त्यांची उत्तरे सुध्दा आपल्याला द्यावी लागतील. तुम्हाला जागतिक बँकेने कर्ज देतांना तुम्हाला अट घातली, इंटरनॅशनल मॉनिटर फंड किंवा जागतिक बँकेने तुम्हाला सांगितले की, मुंबईसाठी 40 हजार कोटींची गरज आहे. जागतिक बँक किंवा तुम्हाला मदत करणारी जगातील राष्ट्रे असतील,

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू...

किंवा संस्था असतील त्यांना आपल्या विकासाचे काही देणे-घेणे नाही. अमेरिकेला तर अजिबात देणे-घेणे नाही. या सगळ्यामध्ये अमेरिकेचा कंट्रोल आहे. तुमचा देश कर्जामध्ये कसा बुडेल, नागरिक अडचणीमध्ये कसे येतील, अनरेस कसा निर्माण होईल, असंतोष कसा निर्माण होईल, असंतोषातून ही विकसित राष्ट्रे दुबळी कशी होतील, तेथील शहरे नागरी विकासासाठी आपल्याकडे कशी येतील आणि मग आपण आयुष्यभर धनको कसे राहू, ते ऋणको कसे राहतील, याचाच ते विचार करतात. त्यांनी आपल्याला अट घातलेली आहे की, युएलसी कायदा रद्द करा. त्यांनी आपल्याला लाख अट घातली असेल. एखादा माणूस कर्ज घेतो, पठाणाचे देखील कर्ज घेतो, बँकेतून कर्ज घेतो, मित्राकडून कर्ज घेतो, पण पठाण कर्जाच्याबाबतीत सांगतो की, मुद्दल रहने दो जी, ब्याज दो. तसे ते युएलसीच्या माध्यमातून व्याज वसूल करतात, आपण मुद्दल कधीच देऊ शकत नाही. आपले मुद्दल हे गरिबांना नागरी सुखसोयी देण्यासाठी आहे. युएलसी कायदा रद्द केल्यानंतर आपण या संदर्भाने कोणत्या अटी घालणार आहात ? हे आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगणे आवश्यक आहे, असे मला वाटते. त्याचबरोबर बांधकामे सुरू झालेली आहेत. आज पुण्यामध्ये परिस्थिती काय आहे ? त्या ठिकाणी ट्राफिक जॅम होण्यासारखी परिस्थिती झालेली आहे. युएलसी कायदा रद्द केल्यानंतर बांधकामे होणार, गाड्या येणार, अशा परिस्थितीत आपण हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी देखील करू शकणार नाही. 15-20 वर्षाच्या ज्या टॅक्सीज असतील त्या रस्त्याच्या बाहेर काढू शकत नाही. आपण श्री.शरद राव यांच्या दबावाखाली राहून कायदे करत नाही. आपण भूमीपुत्रांना टॅक्सीचे लायसन्स द्या, मुंबईत, महाराष्ट्रात जन्माला आलेल्यांनाच लायसन्स द्या, त्यांचा येथील वास्तव्याचा दाखला घ्या. आज किती परप्रांतीय टॅक्सीचे मालक झालेले आहेत, ते टॅक्सी धंद्यामध्ये आहेत. त्यांनी किती घोळ घातलेला आहे, याची आपलयला माहिती आहे. "At the stroke of the pen".. लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी आपण हा कायदा रद्द कराल आणि दिल्लीच्या तख्ताला सलाम करून सांगाल की, आम्ही हा कायदा रद्द केला. मंत्री महोदय उत्तरामध्ये सांगतील की, श्री.राम जेठमलानी यांनी युएलसीचा कायदा रद्द केला. काल शासनानेच सांगितले की, हा कायदा उपयोगात येत नाही, या कायद्याची अमलबजावणी करण्यामध्ये अडचणी आहेत. सगळ्या राज्यांच्या अडचणी लक्षात घेऊन तो कायदा रद्द केलेला आहे. हे मान्य आहे. परंतु पश्चिम बंगाल सरकारने तो कायदा रद्द केलेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरू....

नाही. त्यांनी ठणकावून सांगितलेले आहे की, जवाहरलाल अर्बन रिन्युअल मिशनचे आम्हाला पैसे दिलेच पाहिजेत. त्यांना ही अट घातलेली नाही काय ? परंतु आपण सांगता की, जवाहरलाल अर्बन रिन्युअल मिशन योजना राबवत असताना, युएलसी कायदा रद्द करावा, अशी अट घातलेली आहे. ठीक आहे, महाराष्ट्राने मान्य केलेले आहे. महाराष्ट्र राज्य सगळेच मानते. महाराष्ट्र हा एकसंध देश मानत आलेला आहे. आमचे राज्य असो, युतीचे राज्य असो, केंद्राने फटकून वागावे, असे आपण काही केले नाही. अन्याय करणाऱ्या गोष्टी असल्या तरी केंद्राच्या आदेशाची अंमलबजावणी केली. कारण आपण एकसंध राहिले पाहिजे, असे आपल्याला वाटते. आपण एकसंध राहिलो नाही तर देश एकसंध रहाणार नाही. पश्चिम बंगालला हा कायदा रद्द केला नाही तर एक दमडी देखील देणार नाही असे केंद्रातील सरकार सांगू शकेल काय ? त्यांना आपण जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्युअल मिशनखाली पैसे देत आहोत. कारण ते तुम्हाला ब्लॅकमेल करतात. युपीए सरकारमध्ये ते एक भागीदार आहेत. त्यामुळे केंद्र सरकार त्यांच्यावर या कंडीशन घालू शकते काय ? ते अट घालू शकत नाहीत. तसे आपण केले तर आपल्याला भयानक प्रश्नांची उत्तरे या माध्यमातून द्यावी लागतील. मुळामध्ये जो कायदा आहे,त्यामधील काही भाग मी वाचून दाखविला, त्याचे मी पुन्हा रिपिटेशन करत नाही.

सभापती महोदय, आपण गृहनिर्माण योजना राबविलेल्या आहेत. आपण चलाखीने गिरणी मालकाचा फायदा करून दिलेला आहे. आपण एक तृतियांश, एक तृतियांश, एक तृतियांस जमीन देण्याचा कायदा केला. बांधकाम सोडून जी मोकळी जमीन असेल, त्याच्या एक तृतियांश, एक तृतियांश, एक तृतियांश जमीन द्यायची म्हणून गिरण्यांची सगळी मशिनरी हटविली. मालकांनी फक्त कंपाऊंड वॉल ठेवलेली आहे. तुम्ही त्या ठिकाणी बांधकाम आहे असे गृहित धरलेले आहे परंतु आत मोकळी जमीन ठेवलेली आहे, असे असून सुध्दा त्यांना त्या जमिनी दिलेल्या आहेत. त्यामधून आपल्याला काय मिळाले ? मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये गिरण्यांच्या जमिनी विकल्या त्यातून शासनाला एवढी एकर जमीन मिळाली, महानगरपालिकेला एवढी एकर जमीन मिळाली, म्हाडाला एवढी एकर जमीन मिळाली, त्यातून एवढी मैदाने होणार आहेत, त्यामधून एवढे रस्ते रूंद होणार आहेत, एवढे पार्क होणार आहेत. प्रगती मैदानासारखी मैदाने होणार आहेत. या जागेवर विकासाची एवढी कामे होणार आहेत, ते सांगावे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

म्हाडाला एवढी जमीन मिळाली त्यावर गरिबांची एवढी घरे होणार आहेत, त्यावर एम.आय.जी. ची एवढी घरे होणार आहेत. त्यावर एल.आय.जी.ची एवढी घरे होणार आहेत हे येथील लोकांना सांगावे. आपण सांगावे की, एवढी जमीन मिळाली आहे आणि शासन म्हणून हा कायदा रद्द केल्यानंतर हा आपला सगळा अधिकार गेला आहे आणि त्यांच्या जमिनी होत्या त्या त्यांना परत गेल्या तरी आमच्याकडे गरिबांसाठी, विकासासाठी भरपूर जमीन आहे, त्याची ही आकडेवारी आहे. हा सूर्य आणि हा जयद्रथ हे आकडेवारीनिशी आपण दाखवून द्यावे. मग या ठरावाला पाठिंबा द्यावयाचा की विरोध करावयाचा त्याचा निर्णय घेता येईल. मुळात आपला जो उद्देश आहे तो आपण सफल केला काय ? मी काल सांगितलेले पुन्हा रिपीट करतो. आपण राज्यकर्ते आहात. लोकांनी त्यांच्या कल्याणाची सूत्रे आपल्या हातामध्ये दिलेली आहेत. या ठिकाणी राजकारणाने प्रेरित होऊन आघात करण्यासाठी आम्ही एखादा शब्द आपल्याबद्दल बोललो तर तो शब्द झेलण्याची आपली ताकद असली पाहिजे. पण केवळ उत्तराला उत्तर देऊन आपण तोंड बंद कराल तर त्यातून तुमचे समाधान होईल, आमचा संताप होईल परंतु जनतेचा काही फायदा होणार नाही. त्यामुळे जनतेचा काय फायदा होईल हे आपण कोणतेही कायदे करीत असताना पाहिले पाहिजे. यामध्ये काय म्हटले होते आणि त्याचे नेमके असे का झाले याचे उत्तर द्यावे. तरच आम्ही आपल्याला पाठिंबा देऊ. उगाच आंधळ्यासारखा पाठिंबा देणार नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी महाराष्ट्राचा अहवाल दिला आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या जवळजवळ 10 कोटी झालेली आहे. आपल्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्रात 48 टक्के नागरीकरण झालेले आहे. देशाच्या नागरीकरणाचे प्रमाण 22 ते 27 टक्के आहे. महाराष्ट्र हे एकमेव प्रांत असे आहे की, ज्या ठिकाणी झपाट्याने शहरीकरण होत आहे. नगरविकास खात्यामध्ये बसून नुसते एफ.एस.आय. वाटू नका. शहराशी संबंधित असलेले हे खाते आहे. आजपासून 25 वर्षानंतर महाराष्ट्राचे नागरीकरण 55 ते 60 टक्के होणार आहे. गावातील माणूस पोट हातावर घेऊन शहरामध्ये का येतो ? मिळेल त्या ठिकाणी का राहतो ? झोपडी का बांधतो ? फूटपाथवर का झोपतो ? याचा कधी विचार केला आहे काय ? या ठिकाणी किती दाट लोकसंख्या होणार आहे,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण .....

शहराची लोकसंख्या किती वाढणार, याची आपण कधी आकडेवारी काढली काय ? आजपासून दहा वर्षापूर्वी पुण्याची लोकसंख्या किती होती ? आजपासून दहा वर्षापूर्वी नगरची लोकसंख्या किती होती ? आजपासून 10 वर्षापूर्वी नागपूरची लोकसंख्या किती होती ? ज्या 227 नगरपरिषदा आणि नगरपालिका आहेत त्या सगळ्यांचा जो हळूहळू विस्तार होत आहे त्याचा कधी विचार केला आहे काय ? हा कायदा रद्द केल्यानंतर त्यांचा किती फायदा होईल हे आम्हाला पटवून द्यावे. नगरपरिषदांचा किती फायदा होईल हे आम्हाला पटवून द्यावे. शहरीकरण होत गेल्यानंतर सगळ्या मागण्या वाढणार. लोक आपल्याकडे रस्ते रुंद करण्याची मागणी करणार. लोक आपल्याला गार्डन मागणार. लोक आपल्याला शाळा मागणार. लोक आपल्याला रस्ते मागणार. केवळ धनिकांच्या हातामध्ये ही मुंबई देऊ नका. ज्या गरिबांच्या नावाने आपण राज्य करता तो गरीब पोट हातावर घेऊन शहरात का येत आहे ? आपण या शहरीकरणाला त्याच्याशी जोडणार काय ? आपण यु.एल.सी. कायदा रद्द केल्यानंतर माझा पक्ष, माझे नेते जो निर्णय घेतील तो आपल्याला कळेलच. परंतु त्याचबरोबर आपण सगळे मिळून सामान्य माणसांसाठी निवडून आलेलो आहोत. आज हा कायदा रद्द झाल्यामुळे जी जमीन ज्यांना उपलब्ध होणार आहे, ज्यांची जमीन आहे त्यांच्याकडे जमीन जाणार आहे, त्यांना तुम्ही काही अटी घालणार आहात काय ? त्यांच्यावर काही निर्बंध घालणार आहात काय ? आपण समाजवादी समाजरचना केली. आपण सगळी धोरणे दिली, घटना बदलली, गरिबांसाठी सगळे केले. आपण गरिबांचे तर वाटोळे केलेच परंतु हे आपण मूठभर लोकांच्या हातामध्ये दिले. 338 लोकांकडे मुंबईतील हजारो हेक्टर जमीन होती. त्याच्याही पलीकडे आता फार मोठे लोक तयार झाले आहेत. गेल्या दहा वर्षापासून ज्यांना एफ.एस.आय. वाढवून दिला त्या मोठमोठ्या विकासकांनी आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या गगनचुंबी इमारती बांधल्या. त्यांची पोरंबाळं आकाशातील चांदण्यांबरोबर झिम्मा खेळतील आणि गरिबांची पोरं धारावीच्या गटाराच्या पाण्यातील खडे काढून सागरगोट्या खेळत बसतील. कायद्याची नीट अंमलबजावणी न केल्यामुळे ही विसंगत समजरचना त्या ठिकाणी तयार केली. या ठिकाणी हा कायदा रद्द केल्यानंतर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण ....

तुम्ही या गोष्टी गेली 25 वर्षे का केल्या नाहीत ? आपण आम्हाला सांगता की, तुमच्या सरकारने कायदा रद्द केला. तुम्ही केलेली घाण अधिक वाढू नये म्हणून त्या ठिकाणी आम्ही तो कायदा रद केला. कारण तुम्ही कायदे केल्यामुळे घाणच जास्त झाली. कोणत्याही कायद्याचा फायदा काही झ ाला नाही. तसे असेल तर सांगावे. जनतेच्या कल्याणासाठी केलेला कायदा...

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आज लोकमान्य टिळक पुण्यतिथी असल्याने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम सकाळी 10.30 आयोजित करण्यात आलेला आहे. सदरहू कार्यक्रमाला आपणाला उपस्थित राहाता यावे यासाठी मी सभागृहाची बैठक आता तहकूब करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचे भाषण सुरु असून ते ऑन लेग आहेत. सभागृहाची बैठक 11.00 वाजता पुन: भरेल.

(सकाळी 10.25 ते 11.00 वाजेपर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

----

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: "नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 निरसित करणे."

**मु.शी.**: "नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, 1976 निरसित करणे." या विषयावर माननीय मुख्यमंत्री यांचा वैधानिक प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु.......

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, हा कायदा ज्या वेळेस आपल्या राज्यात लागू केला होता त्यावेळी त्याचा हेतू अतिशय चांगला होता, परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी करणारे जे लोक होते, त्यांच्यामुळे या कायद्याचे तीन तेरा वाजलेले आहेत. मुळात या कायद्याचा हेतू काय होता त्याबाबत काल या ठिकाणी मी उल्लेख केला की,

"There has been a demand for imposing a ceiling on urban property also, especially, after the imposing of a ceiling on agricultural land by the State Governments. With the growth of population and increasing urbanization, a need for orderly development" हे शब्द त्याठिकाणी अधिक महत्वाचे आहेत. हा कायदा अंमलात आल्यानंतरही त्याची अंमलबजावणी राज्यात झाली नाही. ती अंमलबजावणी का झाली नाही ? याचे उत्तर शासनाने याठिकाणी दिले पाहिजे. ही जी जमीन आहे, ती जमीन हा कायदा मंजूर केल्यानंतर मुक्त होईल त्यानंतर त्या ठिकाणी ऑर्डरली डेव्हलपमेंट होईल की नाही ? यासाठी देखील आपण वेगळा कायदा किंवा एखादी वेगळी अशी नियमावली करणार आहात का ? याचे उत्तर शासनाला द्यावे लागणार आहे. "A need for orderly development of urban areas has also been felt. It is, therefore, considered necessary to take measures for exercising social control over the scarce resource of urban land with a view to ensuring its equitable





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.......

distribution amongst the various sections of society (particularly the poor) and also avoiding speculative transactions relating to land in urban agglomerations." हा मूळ कायदा 1976 साली ज्यावेळी आपल्या राज्यात अंमलात आला त्यावेळेला कायदा लागू करण्यामागे असलेल्या सर्व हेतूंचे आता काय झाले ? हा मला प्रश्न विचारावयाचा आहे. त्याचप्रमाणे हा कायदा रद्द करण्यासाठी आपल्याला केंद्रामध्ये सांगावे लागेल त्यावेळी आपल्याला आणखीही दोन तीन गोष्टी आहेत, त्या का झाल्या नाहीत ? याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. या ठिकाणी या कायद्याच्या माध्यमातून जी अतिरिक्त जमीन शासनाच्या ताब्यात आल्यानंतर त्या ठिकाणी त्याचा अंमल का झाला नाही ? हे देखील सांगावे लागेल. With a view to ensuring uniformity in approach Government of India addressed the State Governments in this regard; वगैरे वगैरे आणि त्याच्यानंतर जे महत्वाचे होते म्हणजे हा कायदा पास करतांना The Bill is intended to achieve the following objectives:

i) To prevent concentration of urban property in the hands of a few persons and speculation and profiteering therein;

ii) To bring about socialization of urban land in urban agglomerations to subserve the common good by ensuring its equitable distribution."

सभापती महोदय, त्या ठिकाणी हे सर्व झाले होते का ? ही जी अतिरिक्त जमीन आपल्या ताब्यात आली. काल येथे सुरुवातीला प्रस्ताव मांडतांना माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, शासनाला एकूण 16,776 हेक्टर जमीन या कायद्यामुळे अतिरिक्त मिळाली. आज एकूण 31 वर्ष झ ााली हा कायदा आपल्या राज्यामध्ये होता. आता दोन - तीन वर्षापूर्वी फक्त तो रद्द झालेला आहे, आमचे शासन सत्तेवर असतांना ते जाऊन आपले शासन राज्यात व केंद्रामध्ये सुध्दा आले. म्हणजे ज्यावेळेस काँग्रेस हेडेड गर्व्हनमेंट आले तसेच, येथेही आपले गर्व्हनमेंट आलेले आहे. आपण काल येथे उल्लेख केलेला आकडा आम्हाला नीट कळलेला नाही, तो असा

J - 3........



श्री.मधुकर चव्हाण......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, काल आपण या ठिकाणी चर्चेचा समारोप करतांना असे म्हटले होते की, संपादित केलेली 735 हेक्टर जमीन आहे आणि 740 हेक्टरमध्ये आपण योजना केल्या . आपण या ठिकाणी उपरोल्लेखित मुद्दा नीट एक्सप्लेन करुन सांगितले पाहिजे की, जर शासनाने 735 हेक्टर जमीन संपादित केली आणि योजना मात्र एकूण 740 हेक्टर जमीनीवर केल्या. मग शासनाने यामध्ये पाच हेक्टर जमीन जास्त संपादित केली होती का ? याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की, सुरुवातीला माननीय मंत्रिमहोदयांनी भाष्य करतांना सांगितले की, एकूण जमिनीपैकी फकत 5,563 हेक्टर जमीन संपादित केली परंतु 5048 हेक्टर जमीन त्या ठिकाणी संपादित झाली, याबाबत आम्हाला काहीही कळले नाही.

यानंतर श्री.कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

प्रत्यक्षात ताबा 4015 हेक्टरवर मिळाला. कायदा अंमलात आल्यानंतर ही जमीन संपादित केव्हा झाली आणि 5543 हेक्टर संपादित झाल्यानंतर बाकी सगळी संपादित न करण्याची कारणे काय ? प्रत्यक्षात ताबा 4015 हेक्टरवर मिळालेला आहे. महाराष्ट्रात गुंठेवारी सुरु झाली. प्रत्येकाला व्यक्तिगत जमीन असेल त्याला त्यामध्ये व्यवसाय करण्याची परवानगी आहे. कष्टाने,मेहनतीने आणि प्रामाणिकपणाने माणूस श्रीमंत होतो. व्यवसायावर कोणाचे बंधन असण्याचे कारण नाही. जिवो जीवस्य जीवनम्. जो अधिक धावेल,अधिक कष्ट करील आणि अधिक प्रामाणिकपणाने काम करील तो श्रीमंत होणारच. गुंठेवारीला शासनाने परवानगी दिली होती. या सर्व गोष्टींकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. या एकूण सगळया कालखंडामध्ये ज्या जमिनी ताब्यात आल्या त्या जमिनीवर गरिबांसाठी किती घरे बांधण्यात आली ? सर्वसामान्य माणसांचा विचार करुन किती घरकुले निर्माण करण्यात आली ? सर्वसामान्य माणसाला परवडतील अशी किती घरकुले निर्माण करण्यात आली ? गेल्या 10-20 वर्षामध्ये सरकारचे असे किती आदर्श गृहनिर्माण प्रकल्प यातून उभे राहिले ? हजारो एकर आणि शेकडो हेक्टर जमीन लीज होणार आहे. त्यावर शासन काही बंधने घालणार आहे किंवा नाही ? पूर्वी यासंबंधातील प्रकल्प मंजुरीसाठी मंत्रालयात जात होते. आता महानगरपालिका असेल किंवा अन्य यंत्रणा असतील त्यांच्याकडे प्रस्ताव जातील.

सभापती महोदय, आज मुंबईसारख्या शहराचा विचार केला तर उपनगरांची तर वाटच लागली आहे. खाडया बुजवून इमारती बांधल्या आहेत. तिवरांची कत्तल होत आहे. पाण्याचा निचरा होत नाही. पाणी पुरवठा होत नाही. सांडपाण्याची व्यवस्था नाही. हा कायदा रद्द केल्यानंतर ज्या जमिनी मुक्त होणार आहेत त्या उपनगरे आणि शहर यामध्ये होणार आहेत. बांधकाम करताना एफएसआयचा फायदा दिलेला आहे. धारावीमध्ये 4 चटईनिर्देशांक दिलेला आहे. 2.5 एफएसआय तेथे आवश्यक आहे. धारावीतील लोकांची मागणी आहे. युएलसी कायद्यातून जमीन मुक्त होणार आहे त्यावर बांधकाम होताना शासन एफएसआयबाबत अटी टाकणार आहे किंवा नाही ? त्याठिकाणी सध्या अस्तित्वात असलेला एफएसआय देणार किंवा नवीन एफएसआय देणार. Which ever is more. मोफत घरे बांधून देणारा बांधकाम व्यावसायिक पैसा खर्च करणार आहे.तो पैसा जो इमारतीमधून सेलेबल एफएसआय मिळणार आहे त्यातून वसूल करणार आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 11.05

श्री. मधुकर चव्हाण .....

नवीन घरांना2.5 एफएसआय मिळणार आहे. जगातील सगळे बिल्डर तुम्ही बोलविणार आहात. म्हाडाचे मुख्याधिकारी श्री. चहल साहेब म्हणतात मी खूप बिझी असतो. माझ्याकडे ऑस्ट्रेलिया,इंग्लंड,अमेरिका येथून लोक येत आहेत. बांधकाम व्यावसायिक यामध्ये बांधकाम करणार ते पैसा मिळविणार हा उद्देश ठेवून करणार. धारावीतील गरीब लोकांना त्याठिकाणी चांगली घरे मिळाली पाहिजेत. तसेच त्यांचा व्यवसाय एस्टॅब्लिश झाला पाहिजे. 4 एफएसआय कोणासाठी वापरणार आहात ? 4 एफएसआय दिला तर 225 चौ.मी.जागा दिली जाणार आहे त्याचे क्षेत्रफळ सुध्दा वाढविले पाहिजे. युएलसी कायद्यातून जमीन मुक्त झाल्यानंतर आणि कायदा रद्द झाल्यानंतर एफएसआयची अट घालणार काय असा माझा प्रश्न आहे. बांधकाम क्षेत्रातून मागणी येणार आहे. मुंबईचे सिंगापूर,बँकॉक करणार आहात. परंतु त्या शहरांमध्ये 11/12 एफएसआय दिला जातो. मोर नाचतो म्हणून लांडोरने नाचू नये. मोर नाचतो तेव्हा त्याचा पिसारा सुंदर दिसतो. त्यांच्याकडे कायदे आहेत त्याची अंमलबजावणी सुध्दा तितक्याच काटेकोरपणे केली जाते. तेथील इमारतींची उंची, त्याचा रंग कसा असावा याची अंमलबजावणी केली जाते. आपल्याकडे आपण कायदे करता आणि त्याची अंमलबजावणी होत नाही. कायदे पाळत नाहीत त्यांच्यावर सोडून देता. म्हणून माझा प्रश्न आहे की, युएलसी कायदा रद्द झाल्यावर एफएसआयची अट घालणार काय ? घरांची मागणी पूर्ण करण्यासाठी एफएसआय वाढविणार काय ? पायाभूत सुविधांचा विचार करता 1.33 एफएसआय आहे तो 1 करा.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.......

मुबलक जमीन उपलब्ध झाली की, घरे फार मोठ्या प्रमाणात बांधली जातील आणि त्यातून 35 टक्के भाव खाली येतील असे नाही. परवा शासनाने नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केले. त्यामध्ये शासनाने चांगले कलम अंतर्भूत केले आहे. बिल्टअप आणि सुपर बिल्टअप शासन मानणार नाही. कार्पेट एरिया रेडी रेकनरमध्ये गृहित धरला जाईल असे म्हटले आहे. चांगली योजना आहे. परंतु त्यातूनही पळवाट काढली जाईल. सुपर बिल्टअपचा आज एखाद्या भागामध्ये 4 हजार रुपये प्रति चौरस फूट दर असेल, त्याठिकाणी कार्पेटचा दर 10 हजार रुपये प्रति चौरस फूट केला जाईल. यामध्ये त्या विकासकाचे काय नुकसान होणार आहे? त्या गृहनिर्माण धोरणावर बोलताना आम्ही जरुर यावर प्रकाश टाकणार आहोत.

सभापती महोदय, ही अतिरिक्त जमीन उपलब्ध झाल्यानंतर मला असे वाटते की, शासन हे कल्याणकारी राज्य आहे, वेल्फेअर स्टेट आहे, असे असताना बांधकामाचे सर्व निकष बदलले. निकष जरुर बदलले पाहिजेत. आधुनिक सुख-सुविधांनी उपयुक्त अशी घरे बांधलीच पाहिजेत. परंतु अशी घरे बांधल्यानंतर गृहनिर्माण योजनेमध्ये शासनाने काही अटी घातलेल्या आहेत. अशी संकल्पना आहे की, एलआयजीची इतकी घरे बांधली पाहिजेत, एमआयजीची इतकी घरे बांधली पाहिजेत आणि एचआयजीची इतकी घरे बांधली पाहिजेत. ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणे जो तो अशी घरे घेईल. शासनाने कमीत कमी 225 चौ.फूटाची मर्यादा ठेवली आहे. काल मंत्रीमहोदयांनी उल्लेख केला की, जी मोकळी जमीन असेल त्यावर आम्ही कर घेऊ, टॅक्स घेऊ. उद्या जमीन मालक म्हणेल, मी टॅक्स भरण्यास तयार आहे. परंतु अशी अट आहे का? म्हाडामध्ये ज्याप्रमाणे अट आहे की, डेव्हलपमेंटसाठी एनओसी घेतली तर दोन वर्षात इमारत बांधली पाहिजे. परंतु ही अट पाळली जात नाही. याचा परिणाम असा झाला की, विकासकांनी एनओसी घेतली. रहिवासी ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहण्यास गेले आणि खितपत पडले. परंतु अद्याप इमारत बांधली नाही. प्रत्येकवेळी विकासक चुकतो असे नाही. काही वेळेला रहिवाशांचा हटवादीपणा देखील कारणीभूत ठरतो. म्हणून जी योजना शासन घरे बांधण्यासाठी राबविते तेव्हा काही नियमावली करणार आहात का? 100 एकर जमीन मिळाली, अमूक एकर जमीन मिळाली किंवा उद्या गोदरेज कंपनीची जमीन मोकळी झाली, 200 एकर जमीन मोकळी झाली तर शासन त्यांना अट लागू करणार का? 10 एकर जमिनीमध्ये रिक्रिएशन ग्राऊंड तयार करा, 5 एकर जमिनीमध्ये अमूक गोष्ट करा किंवा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.......

शासनाला काही जमीन उपयोगात आणता येणार आहे का? शासनाच्या ताब्यात काय राहणार आहे? असा कायदा करताना नियमावली केली पाहिजे. समांतर परंतु बंधनकारक न करता कायदा रद्द करुन माणसाला मोकळे सोडायचे आणि कुत्र्याच्या गळ्यात ज्याप्रमाणे 4 फूटाचा पट्टा असतो तो काढून त्याला मोकळे सोडण्याकरिता 100 फुटाची दोरी बांधून मोकळे सोडले असे म्हणायचे असा माझा उद्देश नाही. केवळ पैसा मिळवणे, मिळालेल्या जमिनीतून पैसा मिळवणे हाच उद्देश असतो. यामध्ये शासनाचे काही नियंत्रण राहणार नाही. ही जी जमीन मोकळी झाली त्यासंबंधी त्यांच्यावर अटी घालणे अत्यंत आवश्यक आहे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, 2000 साली शासनाचा निर्णय झाला होता. त्यावेळी श्री.रोहीदास पाटील हे गृहनिर्माण मंत्री होते. सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी पुण्याला भाषणात म्हटले होते की, कायदा रद्द झाला पाहिजे. श्री.रोहिदास पाटील यांनी सांगितले होते की, नाशिकला या कायद्यामधून मोकळे करा. एका मंत्र्याने सांगितले की, पुण्याला या कायद्यामधून मोकळे करा. दुसऱ्याने सांगितले की, 200 एकर जमीन घ्या आणि मी उल्लेख केल्याप्रमाणे प्रगती मैदानासारखे मैदान बांधा. केस टू केस निर्णय घ्या असे सांगण्यात आले. शासनाने का केले नाही? 7 वर्षानंतर हा कायदा का आणला? आमचे नाव सांगण्यात येते. आम्ही त्या काळात कायदा केला. आमचे शासन जाऊन आता 5-6 वर्षे झाली. परंतु तुमचा हेतू शुध्द नाही. हा कायदा रद्द करण्यापूर्वी शासनाला हवे ते सगळे झाले आहे. म्हणून आता हा कायदा आणला असे आहे का? शासनाचा हेतू काय आहे?

सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी काल सांगितले त्यावरच मी पुन्हा जोर देतो, त्याचा विचार करणे आवश्यक आहे. राज्यकर्ते म्हणून पुढच्या वेळी ती पाळी आमच्यावर येणार आहे तेव्हा आम्ही काळजी घेऊ. दोन वर्षे राहिली आहेत. सुमारे 227 नगरपालिका आहेत असे म्हणालात.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

महाराष्ट्रामध्ये काही महानगरपालिका आणि 227 नगरपालिका आहेत. सध्या शहरीकरण जोरात होत आहे. शहरीकरण जोरात होत असल्यामुळे लोकांना घरांची गरज लागणार आहे, लोकांना निवारा लागणार आहे, सर्वसामान्य माणसाला परवडेल असा निवारा लागणार आहे. युएलसी रद्द झाल्यानंतर, जमीन मोकळी झाल्यानंतर तुमच्या हातात काय धत्तुरा राहणार आहे का? तुम्ही सगळया जमिनी खाल्ल्या, भुखंड विकलेत, शहरामध्ये विकण्यासारखे तुम्ही काहीही शिल्लक ठेवले नाही. तुम्ही डोंगर, नद्या, नाले विकायला लागले आहात, मँग्रोज कापून जमिनी तयार करीत आहात, खाडया बुजवायला लागला आहात, तुम्ही काहीच शिल्लक ठेवलेले नाही. तुम्ही जर काही शिल्लक ठेवले नसेल, आणि शहरे वाढणार असतील तर तुमच्या धोरणाप्रमाणे तुम्ही शहरामध्ये कल्याणकारी योजना कशा राबविणार आहात ? महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण धोरण तुम्ही कसे राबविणार आहात ? घरांसाठी आपण कोठून जमिनी आणणार आहात? गरीबांना घरे कशी देणार आहात? एलआयजी, एमआयजीची घरे तुम्ही कशी बांधणार आहात? विकर सेक्शनसाठी तुम्ही काय करणार आहात? आपण घरांच्या सर्व योजना जवाहरलाल योजना, तमुकलाल योजना गांधी घराण्याच्या नावाने राबवून गरीबांची मते मिळवित आहात. या गरीबांना उल्लू बनवून मते घेत आहात. सत्तेचा मुकूट डोक्यावर ठेवण्यासाठी लोकांना फसवून त्यांची मते घेत आहात. त्यामुळे यासंदर्भातील सर्व माहिती येथे देण्याची आवश्यकता आहे. माझ्यामते जर आपण यासंदर्भातील नियमावली तया केली नाही तर गृहनिर्माण भवनाला टाळे मारावे लागेल. तुम्ही गरीब लोकांसाठी एक घर सुध्दा बांधू शकणार नाहीत. युएलसी ॲक्ट रद्द केल्यानंतर आमच्याकडे एवढी एवढी जमीन आहे, भविष्याचा वेध घेऊन शहरांचा विकास करण्यासाठी कठोरपणे विकासाच्या योजना राबविणार आहोत, डी.सी. रुलमध्ये बदल करणार आहोत. या सर्व गोष्टींचे उत्तर शासनाने देणे अत्यंत आवश्यक आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

-----------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदविधर) : सन्माननीय सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये युएलसी कायदा रद्द करण्याचा प्रस्ताव या ठिकाणी शासनाने मांडलेला आहे. युएलसी कायदा रद्द करण्याच्या प्रस्तावाला समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. हा कायदा तयार करण्यामागे उद्देश होता की, शहरी भागामध्ये ज्या एक्सेस जमिनी आहेत त्या जमिनी या कायद्यामुळे उपलब्ध होतील व त्या जमिनीचा उपयोग गरीब लोकांच्या कामासाठी करता येईल यासाठी आपण जिल्हाधिका-यांच्या कार्यालयातील जमिनी ताब्यात घेतल्या. जिल्हाधिका-यांच्या कार्यालयातील जमिनी आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी शासनाकडे काही यंत्रणा आहे काय ? जमिनीला कंपाऊंड वॉल टाकण्यासाठी आपल्याकडे काही पैसे आहेत काय ? काही नाही. फक्त सरप्लस जमिनी जाहीर झाल्या आणि ज्या जमिनी जाहीर झाल्या त्या जमिनीचे वाटप कसे झाले ? मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली युएलसी खाली येणा-या जमिनी वाटपाच्या संदर्भात एक समिती आहे. या समितीने आतापर्यंत काय कामे केली आहेत हे आपल्याला बघावे लागणार आहे. जे आमदार, खासदार, मंत्री आहेत त्यांनी आपल्या शिक्षण संस्थांकरिता जमिनी वाटून घेतल्या, म्हणजे तुम्ही जमिनी घेता गरींबांच्या नावाने आणि त्यातील अनेक जमिनी राज्यकर्त्यांनी स्वत:साठी वाटून घेतल्या. परवा मी वक्फ बोर्डाचा विषय मी सभागृहात उपस्थित केला होता. वक्फ बोर्डाला अर्बन लँड सिलींग ॲक्ट लागू होत नाही. 1995 चा वक्फ बोर्डाचा जो ॲक्ट आहे त्यामध्ये लिहिले आहे की, "नॉट विथ एनीथींग" म्हणजे यानंतर कुठल्याही राज्याच्या, चॅरीटी कमिशनरांचा कोणताही कायदा लागणार नाही. 1995 मध्ये पार्लमेंटने यासंदर्भातील कायदा पास केल्यानंतरही मधील काळात आपण काय केले ? आपण वक्फ बोर्डाच्या जमिनीला युएलसी ॲक्ट लावला, त्यांच्या एक्सेस जमिनी बाहेर काढल्या आणि त्या वाटून घेतल्या. ज्या उद्देशासाठी अर्बन लँड सिलींग ॲक्ट त्या काळात पास झाल्यानंतर आपण आपल्या ॲक्वीझीशनमध्ये ज्या जमिनी ताब्यात घेतल्या त्याची काय परिस्थिती आहे?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

या जमिनींवर अनेक ठिकाणी अनधिकृतपणे झोपड्या उभ्या राहिलेल्या आहेत. या जागांचे संरक्षण करण्यामध्ये या सरकारला पूर्णपणे अपयश आलेले आहे. सरकार कायदा करीत असेल आणि त्या कायद्यांतर्गत संपादित केलेली जमीन सांभाळण्याची कुवत नसेल तर जमिनी ताब्यात का घेत आहात ?

सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास काही गोष्टी आणतो. भारतीय घटनेची बांधिलकी गरीब माणसांशी आहे. आपल्या देशाला 1947 साली स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरु देशाचे पहिले पंतप्रधान झाले. पंडित जवाहरलाल नेहरु खूप मोठे नेते होते. ते उत्तम साहित्यिक होते, उत्तम कवी होते. त्यांच्या नेतृत्वातून आपणास बऱ्याच गोष्टी शिकता येतील. पंडित जवाहरलाल नेहरुंवर रशिया या साम्यवादी देशाचा प्रभाव होता. त्यावेळी तीन विचार अस्तित्वात होते. पहिला साम्यवाद, दुसरा समाजवाद आणि तिसरा पुंजीवाद. अमेरिका पुंजीवादाचे प्रतिक मानली गेली. रशिया आणि चीन साम्यवादी देश आहेत. आपल्या देशात समाजवाद विचारांची मंडळी मोठ्या प्रमाणावर आहेत. या सभागृहात देखील समाजवादी विचारांची मंडळी आहेत. या तीन विचारांपैकी पंडित जवाहरलाल नेहरु यांनी पूर्ण साम्यवाद नाही आणि पूर्ण समाजवाद नाही या असे दोघामधील मॉडेल या देशाकरिता स्वीकारले.

सभापती महोदय, गेल्या काही दिवसांपासून आर्थिक चिंतनाचा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. परंतु त्यांची उत्तरे मला मिळलेली नाहीत. 1947 पासून 2005 या कालखंडात या देशामध्ये पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग आणि गव्हर्मेंट अंडर टेकिंग स्थापन केले. औषधे करण्यासाठी हिंदुस्थान अॅन्टीबायोटीक, विमाने करण्यासाठी हिंदुस्थान एरोनॅटीक, बॉयलर, टर्बाईनसाठी भारत हेवी इलेक्ट्रीक, सिगारेट करण्यासाठी आयटीसी तसेच वर्तमानपत्रे काढण्यासाठी नेफानगरमध्ये कागदाचा कारखाना काढला. अशाप्रकारे सुईपासून निरोधच्या फुग्यापर्यंत सर्व क्षेत्रामध्ये सरकारने आपला संचार सुरु केला. यामध्ये 5 लाख 60 हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक झाली. परंतु त्यामध्ये 95 टक्के डेड गुंतवणूक झाली. सरकारने जर चांगल्या गोष्टींवर हे पैसे खर्च केले असते तर त्यांचा लोकांना निश्चितपणे फायदा मिळाला असता. लोकांना शुध्द पिण्याचे पाणी

..2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

मिळाले असते, चांगले रस्ते, पूल मिळाले असते. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाकरिता चांगले मार्केट, कोल्ड स्टोरेज मिळाले असते व त्यातून अनेक गावांचा विकास झाला असता. असे झाले असते तर आजची ही परिस्थिती निर्माण झाली नसती. आज वेळ आलेली आहे डाव्या विचार सरणीची, समाजवाद आणि पुरोगामी विचार सरणीची. मी भांडवली विचारांचा नाही. अमेरिकेच्या मुक्त अर्थव्यवस्थेचा समर्थक नाही. पण समाजवाद आणि साम्यवादाचे ढोंग घेऊन, त्या शब्दांचा वापर करुन गरिबांची मते घेणे याच्या विरोधात आहे. गरिबांना मदत केली पाहिजे हे आपले उद्दिष्ट आहे. प्रत्येक नागरिकाला रोटी, कपडा आणि मकान मिळाले पाहिजे. डाव्या विचारसरणीच्या प्रभावातून आणि समाजवादाच्या प्रभावातून यू.एल.सी. कायदा आणला. परंतु आतापर्यंत किती गरिबांसाठी घरे बांधली ? या कायद्याचा परिणाम काय झाला ? या कायद्यास विरोध न करता केस-टू-केस लक्ष्मी दर्शनाचा कार्यक्रम जोरात सुरु आहे. एस.आर.ए. आणि यू.एल.सी.चा केस-टू-केस विचार झाला पाहिजे. मी या विषयावर जीवन गौरवपट लिहिण्यास तयार आहे. मी विरोधी पक्षात असलो तरी मला माहिती आहे. मी फक्त एक टक्का बोललो आहे, नव्वद टक्के बोलत नाही. सर्वांकडून लुटण्याचे काम सुरु आहे. मी लहानपणीची गोष्ट सांगतो. मी लहान असताना नागपूरहून मुंबईला फोन केल्यास 65 रुपये खर्च येत होता. आता आम्ही एक रुपयामध्ये बोललो आहे. भाजीपाला विकणाऱ्याच्या हातात मोबाईल फोन आला. ही परिस्थिती या स्पर्धेमुळे आता निर्माण झालेली आहे. या स्पर्धेमुळे लोकांना स्वस्त किमतीमध्ये वस्तू मिळायला लागल्या आहेत. नागपूर-मुंबई विमान प्रवासासाठी चार-पाच हजार खर्च येत होता. आता तर 1300 रुपयांपर्यत विमान प्रवास करता येतो.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

आज एसी टू टायरच्या प्रवास खर्चात विमानाचा प्रवास होतो. विमानातून लोक येत आहेत, एस.टी.मध्ये ज्याप्रमाणे गर्दी होते, तशी गर्दी आज विमानामध्ये होत आहे. ज्यांना जमते ते जातात. त्याठिकाणी ते बिसलरीची बाटली, ज्यूस विकत घेतात. याबाबतीत आम्हाला काहीच घेणे देणे नाही. परंतु यातून जनता खुष होते, हे चांगले आहे. किंगफिशरची कंपनी डेक्कन,अथवा डेक्कनची किंगफिशर घेवो अथवा दोघांची कंपनी जेट घेवो किंवा त्या तिघांचीही वाट लागो, त्याच्याशी आपल्याला काहीही घेणे देणे नाही. आम्हाला 1300 रुपयांत यायला मिळते, यातून आम्ही खूष आहोत.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मी रस्ते आणि पुलांची कामे सुरु केली. त्यावेळी माननीय राणे साहेबांच्या मार्गदर्शनाची मला मदत झाली, तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.जोशी साहेबांनीही मदत केली. परंतु त्यावेळी माझ्यावर टीका करण्यात आली. सन्माननीय श्री.जयंत पाटील, श्री.आर.आर.पाटील यांनी त्यावेळी माझ्यावर टीका केली की, आपण महाराष्ट्र बीओटीवर चालविण्यास का देत नाही ? असे त्यावेळी विचारण्यात आले. अशाप्रकारचे उद्‌गार या हितचिंतकांचे होते. त्यावेळी मी म्हणालो की, आपल्याला जे बोलायचे असेल ते आपण बोलावे. परंतु मी कामांचा तडाखा सुरु केला. अर्थशास्त्राच्या भाषेत सांगावयाचे झाले तर रस्ते आणि पुलांचे खाजगीकरण झाले. ठाणे-भिवंडी बायपासपासून कामे सुरु झाली, एक्सप्रेस हायवे झाले, पूल झाले आणि महाराष्ट्रात जवळपास 8 हजार कोटी रुपयांची कामे झाली. त्या माध्यमातून महाराष्ट्राच्या बजेटमधील पैसे वाचले. सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुखांना मान्य करावे लागेल की, संभाजीनगर ते लातूर, संभाजीनगर ते बीड, संभाजीनगर ते नांदेड नॅशनल हायवेचे स्टॅंडर्ड रोड केले. माननीय शंकररावजी चव्हाण मुख्यमंत्री असताना 262 किलोमिटर नॅशनल हायवेचे स्टॅंडर्ड रोड मराठवाडयात झाले होते. परंतु मी मुंबईचे व इतर पैसे वाचवून मराठवाडयासारख्या मागासलेल्या भागात 780 किलोमिटरचे नॅशनल हायवेचे स्टॅंडर्डचे पक्के रोड बनवले. गोदाकाठच्या तीन जिल्हयांचा कार्यक्रम करुन त्याठिकाणी 1600 कोटी रुपयांचे रस्ते केले. गडचिरोली, मेळघाट येथे रस्ते केले. मुंबईच्या पुलामध्ये मी बजेट खर्च केले नाही म्हणूनच ही कामे मी करु शकलो. The inspiration behind the Private and Public Sector

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

Undertakings is to give more priority to the Rural and Agricultural Sectors of the Society.

आज कशासाठी आपण पांढरे हत्ती उभे केले ? महाराष्ट्रामध्ये राजाध्यक्ष कमिटी तयार झ ाली, त्यामध्ये किती रुपयांचे लॉसेस आहेत ? आम्हाला वीज एमएसईबी देवो अथवा फेमेएसईबी देवो, जे स्वस्तात वीज देतील त्यांकडून आमचा फायदा आहे. परंतु आपल्या कंपन्या लॉसमेकिंग करुन त्याची पॅनल्टी गरीब जनतेने का सहन करावी ? उद्या आपण 100 कंपन्यांना वीज जनरेट करु द्यावी. त्यामध्ये एक म्हणेल की, आमची वीज 3.30 पैशाने घ्या, दुसरा म्हणेल की, 5.60 पैशाने घ्या. आम्ही त्यांचे कार्ड लावू व स्वस्तात वीज घेऊ. यामध्ये ग्राहकांचा फायदा आहे. परंतु आपले करप्शन आणि रेटयापिझम, त्याचे लॉसेस व त्यावरील रेट आम्ही कशासाठी सहन करायचे ? आज वर्तमानस्थितीत देशाच्या अर्थकारणामध्ये नवीन विचार करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. मी एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असून माझ्या पक्षाबद्दल मी कटिबध्द आहे. परंतु याठिकाणी मी आपल्याला विचारपूर्वक सांगू इच्छितो की, अर्थशास्त्राच्या पुस्तकात लिहिलेल्या विचाराच्या आधारे 21 व्या शतकात जाणाऱ्या हिंदुस्थानचे अर्थकारण होऊ शकत नाही. अमेरिकेची कॉपी करावयाची नाही, रशियाची कॉपी करावयाची नाही. आज रशियाचा सत्यानाश झाला. चायनाचे काय झाले ? माननीय श्री.तावडे यांनी सांगितले की, माननीय श्री.वळसे-पाटील साहेबांनी चायनामध्ये जाऊन तेथील 18 हजार मेगावॅटचा प्रोजेक्ट पाहिला. चायना साम्यवादी देश आहे. मीही चीयनामध्ये गेलो होतो. चायनामध्ये सगळयात जास्त प्रमाणात इंडस्ट्री नॉन रेझिडेनशल चायनीज यांनी आणली. पांढ-या रंगाच्या आणि चपटया नाकाच्या लोकांना मंगोलिअन वंशज म्हणतात. ते इंडोनेशिया, मलेशिया, चायना, सिंगापूर या भागात आहेत. अमेरिकेमध्ये जे मंगोलिअन वंशज चायनीज व ज्यू चायनीज आहेत त्यांच्या ताब्यात आज अमेरिकेतील सगळी संपत्ती आहे. आपण म्हणतो की, आपल्याकडील संपत्ती व बिजनेस जसा गुजराथी व मारवाडयांच्या हातात आहे, त्याप्रमाणे अमेरिकेमध्ये या मंगोलिअन चायनीजची आणि ज्यू लोकांची इकॉनॉमी स्ट्रॉंग आहे, त्यांच्या हातात तेथील बिजनेस असून त्यांच्या हातात पैसा आहे. त्यांनी दणादण चायनामध्ये पैसे पाठवले व त्याठिकाणी एअरपोर्ट बनले. त्याठिकाणी पॉप्युलेशन ॲसेस झाली व त्या माध्यमातून श्रममूल्य कमी झाले आणि त्यामुळे प्रगती झाली.

नंतर श्री.रोझेकर....

SRR/ MAP/ SBT/ प्रथम श्री.पुरी......... 11:30

श्री.नितीन गडकरी.........

माननीय श्री सय्यद जामा जी, वेस्टर्न कोल फिल्ड के कामगारों के आप लीडर है. इस कंपनी को कोई आदमी 1400 रुपये में माल देता है, कोई आदमी 800 रुपये में माल देता है तो कंपनी 800 रुपये में देने वाले से ही माल खरीदेगी. उसी प्रकार से कोई कंपनी दूसरी कंपनी से डेढ़ गुना पगार कामगारों को देती होगी तो उसमें कामगारों का ही कल्याण है न ? सरकार चॅरिटी का काम क्यों करती है, यह मेरी समझ में नहीं आ रहा है. सरकार के नाम पर व्यर्थ खर्च हो रहा है. यह व्यर्थ खर्च क्यों होने दिया जा रहा है ?

सभापती महोदय, प्रामाणिकपणे सांगतो की, ज्या ठिकाणी सरकारचे हात लागतील तेथे सत्यानाश झाल्याशिवाय राहणार नाही. सरकारचे हात एवढे खराब आहेत.

"जहाँ जहॉ पांव पड़े संतन के
वहाँ वहाँ हुआ बंटाधार"

सभापति महोदय, सरकार का भी ऐसा ही हुआ. हे सत्य आहे. तुम्ही सीकॉम सुरु करा, मेल्ट्रॉन सुरु करा, त्याचे बारा वाजल्याशिवाय रहात नाहीत. महाराष्ट्र शासनाचे 90 कोटी भागभांडवल असणा-या सार्वजनिक उपक्रमांची अशीच वाट लागली आहे आणि करोडो रुपयांचे भागभांडवल खड्डयात गेले आहे. सरकारने कंट्रोल करुन डेव्हलपमेंट करण्यापेक्षा लोकांना वाव दिला पाहिजे. एवढयासाठी मी हे सांगतो आहे की, यामागील विचार समजला पाहिजे. मी नागपूरचा पालकमंत्री असतांना तेथे सिमेंट कॉंक्रिटच्या रोडचे काम सुरु केले होते. मागणी वाढल्यामुळे या कामासाठी लागणा-या गिट्टीचे भाव व्यापा-यांनी अडीच पट वाढविले, ब्लॅक मार्केटिंग सुरु झाले, माझ्याकडे तक्रार आल्यानंतर मी सर्वसंबंधितांची वाढलेल्या भावासंबंधी बैठक घेतली, परिस्थितीचा फायदा घेऊन ब्लॅक मार्केटिंग करु नका, भाव कमी करा, अशी विनंती केली. एक, दोन, तीन बैठका घेतल्या, भाव कमी करण्यास ते लोक तयार नव्हते. 158 नवीन लोक होती. मी त्यांना नंतर नुसते बोललो की, याद राखा, मी तची अशी स्थिती करीन की तुम्ही एक दिवस हीच गिट्टी हातात घेऊन रस्त्यावर फिरल्याशिवाय राहणार नाही. माझे शब्द त्यांना लागले. यावर तोडगा म्हणून मी 180 नवीन खाणी सुरु केल्या. त्यामुळे एवढे क्रशर तयार झाले की, प्रोडक्शन मोठया प्रमाणावर वाढले आणि गिट्टीचे भाव एकदम खाली आले. त्यामुळे मला असे सांगावयाचे आहे की, गव्हर्नमेंट कंट्रोल्ड इकॉनॉमी होऊ शकत नाही. कारण, आजच्या काळाचा

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

ग्रोथ रेट एवढा फास्ट आहे की, त्याच्याशी समांतर राहण्यासाठी तुम्ही त्यांच्यामध्येच भांडणे लावा, हजारो घरे बांधू द्या, अशी परिस्थिती निर्माण करा की, त्यांची घरे विकत घेण्यासाठी त्यांना गि-हाईक मिळणार नाही. असे केले तर आपोआप घरांच्या किमती कमी होतील. एकेकाळी 1000 रुपये असलेला भाव 100 रुपयांवर आला होता, असेच सरप्लस प्रोडक्शन होऊ द्या.

सभापती महोदय, माझ्या एका मित्रांचे उदाहरण मी येथे देणार आहे. त्यांचे नांव मी येथे घेणार नाही. त्यांची स्कूटरची इंडस्ट्री होती. आपल्याकडे पूर्वी अशी परिस्थिती होती की, लग्न ठरवावयाचे असेल तर बजाज स्कुटर देणार काय, अशी मागणी वरपक्षाकडून होत असे. ही स्कूटर स्पेशल कोटयामधून मिळविण्यासाठी आम्ही मुख्यमंत्र्यांकडे येत होतो. आमच्या कॉलेज जीवनात एखाद्याला लग्नात बजाज स्कुटर मिळाली तर आम्हाला त्याचे कोण अप्रुप होते. या स्कूटर कंपनीची अशी मोनोपॉली निर्माण झाली होती की, ही स्कूटर हवी असेल तर त्यासाठी जादा आकार, प्रिमियम द्यावा लागत होता. आता हिरो होंडा आली, कायनॅटिक आली, इतर कंपन्यांच्या गाडया आल्या आणि त्यामुळे आता बजाजला ट्रकवर 'हमारा बजाज' अशी जाहिरात करुन फिरावे लागत आहे. स्पर्धा निर्माण झाल्यावर ही कंपनी लाईनवर आली. फियाट गाडी स्पेशल कोटयातून मिळविण्यासाठी रांगा लागत होत्या. अशी परिस्थिती त्यावेळी होती. आज ही परिस्थिती बदलली आहे. ही नाही तर ती, ती नाही तर दुसरी, तू नहीं तो और सही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मी हे का सांगतो आहे तर तुम्ही जेवढे रिस्ट्रिक्शन्स आणाल, लायसेनसेस वाढवाल, तेवढे लिफाफे घेणारे वाढतील. खालचे लोक छोटे लिफाफे घेतात, वरचे लोक बॅगांनी घेतात, काम तेच असते. मंत्रालय म्हणजे लक्ष्मीचे सगळयात मोठे मंदिर आहे, त्याठिकाणी शंकराचा वास नाही, सरस्वतीचा वास नाही, फक्त लक्ष्मीदर्शन आहे. डेस्क ऑफीसरपासून ते कॅबिनेट मंत्र्यांपर्यन्त एकच सुरु आहे आणि ते म्हणजे 'लक्ष्मी दर्शन', हे सर्व जोरात सुरु आहे. म्हणून मला याबाबत सांगावयाचे आहे की यूएलसी कायदा अंतर्गत सरकारकडे जी जमीन आली आहे ती रिलिज करुन टाका, काय परिणाम होईल ? जेवढी जमीन रिलिज कराल तेवढी घरे बांधली जातील. 105 रुपयांना मिळणारी सिमेंटची बॅग आज 300 रुपये झाली आहे. पुन्हा त्यामध्ये महाराष्ट्र सरकारच्या वीज मंडळाकडून फुकट मिळालेली ॲश 22 टक्के एवढी असते. ख-या अर्थाने हे व्यापारी गुन्हेगार आहेत, त्यांना हुतात्मा चौकात उभे करुन फटके मारले पाहिजेत.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर .......... 11:35

श्री.नितीन गडकरी ........

सभापती महोदय, या लोकांना प्रतिकार केला पाहिजे, ते लोक गरिबांना लुटत आहेत. महाराष्ट्रात जो येईल त्याला जमीन फुकट. सिमेंटमध्ये अडीच टक्के राख मिसळली जाते. हे सर्व यांना माहित आहे. सभापती महोदय, शासनाने आज धोरण आखले पाहिजे, 25 सिमेंटचे कारखाने सुरु केले तर सिमेंटची एक बॅग 50 रुपयाला मिळेल, अशी व्यवस्था केली पाहिजे. त्यामुळे गरीबांचा फायदा होईल. ऐसी परिस्थिती निर्माण करो कि, सिमेंट कंपनीवाले सिमेंट की बोरी हाथ में लेकर घुमने चाहिए कि मेरा सिमेंट लीजिए.. सिमेंट कंपनीवाले हातात सिमेंट घेऊन फिरले पाहिजे. यामागे एक आर्थिक विचार आहे. आपल्याला पटो किंवा न पटो, महात्मा गांधी म्हणाले होते की, 75 टक्के लोकसंख्या खेडयात राहते आणि 25 टक्के लोकसंख्या शहरात राहते. आज काय स्थिती आहे ? माझी अशी माहिती आहे की, आज 50 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात आणि 50 टक्के लोक शहरात राहतात. मुंबई शहराला सूज आलेली आहे. खेडयापाडयातील लोक मुंबईमध्ये का येत आहेत ? 50 टक्के अर्बनायझेशन झालेले आहे. तुम्ही राबबिलेल्या आर्थिक धोरणामुळे 25 टक्के लोकसंख्या खेडयात आणि 75 टक्के लोकसंख्या शहरात, अशी परिस्थिती निर्माण झाली. तुम्ही लोकांना एकमेकाच्या छातीवर चढवा, राहण्यासाठी घर नाही, घर बांधण्यासाठी जागा नाही, तिन्ही बाजूने पाणी आहे. पाप्युलर पॉलिटीक्ससाठी हे चालले आहे. सन 2008 पर्यंत ज्यांना यायचे आहे त्यांनी यावे, सब के लिए खुला है मंदिर हमारा, बांगलादेशी आओ, पाकिस्तानी आओ, लो फुकट में मकान. वह आपको वोट दे रहा है ना. तुम्ही असेच जर करीत राहिलात तर हे शहर टिकणार नाही. कोठे जाणार आहोत आपण ? ही जी अर्बनायझेशनची सूज आली आहे त्याचे कारण असे आहे की, आपण ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष केलेले आहे. शेतक-याचा मालाला मातीची किंमत नाही. मुंबईमध्ये भांडी घासण्यासाठीच्या मातीचे पॅकेट 7 रुपये किलो मिळते आणि ज्वारीला 4 रुपये, 5 रुपये भाव मिळत नाही, अशी स्थिती आहे, ही आपली अर्थव्यवस्था आहे. रोजगार कसा निर्माण होणार आहे ? सरकारकडे जे सरप्लस बजेट आहे ते सर्व रुलर बजेट बनवा. मला वाईट वाटते, मुंबईच्या बाजूला रिलायन्सचा एस.ई.झेड. प्रकल्प येणार आहे. एस.ई.झेड. येण्यापूर्वी मी तिसरी मुंबई तयार करण्याबातचा मुद्दा मांडला होता.त्याचे हजारो लोक साक्षीदार आहेत. माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे साहेबांना सुध्दा याची कल्पना आहे. त्यावेळी मी असे सूचविले होते की, तिसरी मुंबई तयार करा. जमिनी विकून चार हजार कोटी रुपयांचा पुल बांधला असता, या जमिनी

..2...

श्री.नितीन गडकरी ........

विकून 1 लाख 40 हजार कोटी रुपयांचा फायदा झाला असता. फायदा झाल्यानंतर ते 1 लाख 40 हजार कोटी रुपये गडचिरोलीमध्ये खर्च करा, एटापल्लीत खर्च करा, अहेरीत खर्च करा, आदिवासींकरिता खर्च करा, ग्रामीण भागात रस्ते तयार करा, चांगल्या शाळा बांधा, चांगले दवाखाने द्या, शेतक-यांच्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करा, प्रोसिंग इंडस्ट्रीज तयार करा, प्रिकुलींग प्लँट, कोल्ड स्टोअरेज, गोडाऊन तयार करा, ग्रामीण भागामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर उभे करा. अमेरिकेमध्ये, इस्रायलमध्ये लोक आपल्या शेतातील एअर कंडीशन बंगल्यात राहतात आणि तेथून कॉम्प्युटर कंट्रोलिंगने पाणी कंट्रोल करतात. हे आपल्याला करता आले असते. परंतु आपण प्रायॉरिटी दिली नाही. माननीय श्री.राजेश टोपे साहेब तुमच्या नेत्यांनी परदेशातून 13 रुपये किलोने गहू आयात केला. जाणता राजा, शेतक-यांचा मसीहा. अटलबिहारी वाजपेयी आणि अडवाणी नावाचे शेतकरी तुम्ही ऐकलेले आहेत काय ? नाही. आम्ही शरद पवार यांच्या सारखे शेतकरीच ऐकलेले आहेत. त्यांनी शेतक-यांच्या कल्याणासाठी परदेशातून 13 रुपये किलोने गहू आयात केला. मिडीयामध्ये अशी चर्चा होत आहे की, क्रिकेटचे कोच कोण ? ऑस्ट्रेलियातून कोणी तरी गोरा माणूस क्रिकेटचा कोच म्हणून येतो. त्यावर चर्चा होते. मागच्या महिन्यात आमच्या यवतमाळ जिल्हयात शंभर शेतक-यांनी आत्महत्या केल्या. परंतु त्या आत्महत्या केलेल्या शेतक-यांचे सांतवन करण्यासाठी कोणीही येण्यास तयार नाही. माननीय पंतप्रधान आले, त्यावेळी संपूर्ण फोज तेथे आली. माननीय पंतप्रधान तेथे आले आणि हे निघून गेले. आमच्या गव्हाला साडेआठ रुपये किंमत आणि ऑस्ट्रेलियाहून आयात केलेला लाल गहू जो खाण्याच्या लायक नाही त्या गव्हाला 13 रुपये भाव. हे तुमचे धोरण ? सभापती महोदय, परिस्थिती अतिशय गंभीर आहे. राज्याच्या आणि देशाच्या आर्थिक धोरणाबद्दल पुन्हा एकदा चिंतन करुन धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. या धोरणामध्ये गरीब माणूस, आदिवासी, दलित, पडित, शोषीत, गरीब माणूस विकासाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. मुंबईच्या जनतेला सवलती द्यावयाच्या असतील तर खाजगीकरण करा. सोपी गोष्ट आहे. जेव्हा आम्ही मुंबईमध्ये उड्डाण पूल बांधले तेव्हा 26 वर्षाकरिता टोल वसूल करण्याचा अधिकार होता. आज 8 वर्षामध्येच पुलावर झालेला खर्च वसूल झाला आहे. 1800 कोटी रुपये कॉस्ट असणारे उड्डाण पूल एक हजार कोटी झाले, 800 कोटी रुपये वाचले. कर्ज फिटले.

यानंतर श्री.गागरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

जर 18 वर्ष हा टोल आपण सेक्युराईज केला तर त्या टोलच्या अगेंस्ट कोणतीही बँक शासनाला 15 दिवसात 5 हजार कोटी रुपये देईल. 5 हजार कोटीतून विकास करा आणि बांधकाम खात्याच्या बजेटमधून मुंबईत रस्ते न बांधता खेडयात बांधून गरीब माणसांना सेवा दिली पाहिजे. महाराष्ट्रातील गरीब, आदिवासी व शेतकऱ्यांकरिता हे केले पाहिजे. शासनाचे बजेट तेथे वापरले पाहिजे. मी माननीय आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावीत यांना विचारु इच्छितो की, याबाबत काय परिस्थिती आहे ? मुले कुपोषणामुळे मरत आहेत. मेळघाटच्या दवाखान्यात मी पाहिले की, तीन किलो वजन असलेल्या आदिवासीच्या मुलाला थर्मोकॉलच्या डब्यामध्ये ठेवले होते. तो मुलगा तडफडत होता. मला राज्यकर्त्यांची लाज वाटत आहे. मेळघाटमध्ये आदिवासींची मुले मरत आहे. त्याला सरकारी दवाखान्यात थर्मोकॉलच्या डब्यात ठेवले जाते परंतु त्या मुलांना ठेवण्याकरिता पुरेसे डबे उपलब्ध नाहीत. मोठमोठया हॉस्पीटलमध्ये श्रीमंत लोकांना सोयीसवलती उपलब्ध करुन दिल्या जातात. परंतु राजकारण, समाजकारण व अर्थकारणाचे उद्दिष्ट व धोरणे गरीब माणसाला केंद्रबिंदू मानून ठरविली पाहिजे. समाजवाद, साम्यवाद किंवा पुंजीवाद न करता गरीब माणसाचे हित हाच विचार समोर ठेवला पाहिजे. या आधारावर शासन यु.एल.सी. कायदा रद्द करीत आहे, ही चांगली बाब आहे. जमीन सांभाळण्याची ताकद शासनात नाही. तुमची औकात नाही हा शब्दप्रयोग करणे बरोबर वाटत नाही. माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे सभागृहात उपस्थित आहेत. मी पालकमंत्री असताना विधानभवनाच्या मागच्या बाजूला सरकारच्या जमिनीवर टेलीफोन निगमच्या बाजूला एक कॉर्नर होता. त्या जागेचे एका माणसाने खोटे कागदपत्रे तयार केले व तेथे चांगले हॉटेल सुरु केले. मी पालकमंत्री असताना त्याला पाचशे नोटीसा दिल्या. तो कोर्टात गेला व त्याला स्टे मिळाला. नंतरच्या काळात श्री.टी.चंद्रशेखर आले. कार्पोरेशनवाले आले व आता त्याचा सुपडा साफ झालेला आहे. काही लोकांनी खोटी कागदपत्रे करुन जमिनी त्यांच्या नावावर करुन घेतल्या व गहाण टाकल्या आहेत. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. फक्त लक्ष्मीदर्शनचा कार्यक्रम चालू आहे व भाषणामध्ये वेळोवेळी महात्मा फुले, राजर्षि शाहू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जात आहे. जमीन सांभाळण्याची पात्रता सरकारमध्ये

.....2

PNG/ KGS/ SBT/ MAP/ MAP/

श्री.नितीन गडकरी .....

नाही. गृहनिर्माण धोरणात शासनाने एक विचार समोर आणलेला असून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. मुंबईमध्ये जनतेसाठी 280 ते 285 स्क्वेअर फुटाचे गाळे बांधले पाहिजे. श्रीमती मृणाल गोरे याकरिता आग्रह धरीत आहेत. ज्यांच्याजवळ स्वत:ची जमीन किंवा घर नाही अशा लोकांकडून ॲफेडेव्हीट करुन घेऊन त्यांना घर द्या. धर वाटपामध्ये 10 टक्के वगैरे काही प्रकार ठेवण्याची आवश्यकता नाही. मी मंत्री असताना बऱ्याच लोकांना शिफारस पत्र दिले पण ही घरे कोणाला अलॉट होतात किंवा अलॉट होत नाही, हे समजत नाही. सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी दुसऱ्यांच्या नावावर फ्लॅट घेतले आहेत व 5 ते 10 लाख रुपये ऑन घेऊन दुसऱ्यांना विकले आहेत. त्याची नावे मी सभागृहात सांगू शकतो व मी व्यक्तीगत बोलण्याचे टाळत आहे. वकील, खेळाडू, साहित्यिक यांचे काही खरे नाही. कारण काही सुंदर नटयांना 4-4 घरे मिळाली आहेत.

सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, या कायद्यातून मोकळया होणाऱ्या जमिनीचे वाटप व विकास करताना महाराष्ट्रातील लँडलेस व होमलेस व्यक्तीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सरकारने विचार केला पाहिजे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MAP/SBT/KGS. श्री. गागरे नंतर --- 11:45

श्री. गडकरी .......

आणि यातून तुम्ही या जमिनी मोकळ्या केल्या. आपल्याला हे माहीत आहे की, कोणीही डेवलपमेंट थांबवत नाही. मुंबई महानगरपालिकेवर मोठा भार येतो म्हणून कोणी थांबले आहे का ? मुंबईत आज कोठेही रिकामी जागा आपल्याला दिसते आहे का ? ज्याप्रमाणे तरूण मुलगी लग्नाची झाली की, तिचे आईवडील चिंतेमध्ये असतात त्याप्रमाणेच याहीबाबतीत आहे. आमच्या नागपूरमध्ये अशा अनेक रिकाम्या जागा होत्या त्यांचे काय झाले ? याबाबतीत मी येथे कोणाचेही नाव घेत नाही. पण आजी, माजी मंत्र्यांनी करोडोच्या जमिनी घेतल्या आहेत आणि आता मीही त्यासाठी अप्लाय करणार आहे माननीय महसूल मंत्री श्री.राणे साहेबांकडे, त्यांनी मलाही अशी जमीन द्यावी, शिक्षण संस्थेसाठी म्हणून. अशा प्रकारे हजारो नव्हे करोडो रूपये किंमतीच्या जमिनी लोक घेऊन राहिले आहेत आणि हे सारे असेच चालू राहिले आहे व राहणार आहे. मग पाच लाख इंजिनिअरींगच्या प्रवेशासाठी द्यावे लागतात. आज महाराष्ट्रातील सर्वात चांगला धंदा जर कोणता असेल तर महात्मा फुलेंच्या आणि सावित्रीबाई फुलेंच्या स्वप्नपूर्तीचा जो कार्यक्रम महाराष्ट्रात सुरू आहे तो म्हणजे शिक्षणसंस्था काढून त्यातील प्रवेशासाठी 5 लाख, 10 लाख, 35 लाख, 45 लाख रूपये घ्यायचे. अगदी मंत्री देखील दुसऱ्या मंत्र्यांकडून पैसे घेतात. हे मला एका मंत्र्यानेच सांगितले आहे. सगळे काही ट्रान्स्फरंट. कोणतेही काम कोणा एकाकडे नाही. एकमेकांबरोबर सगळे सौदे बरोबर होत आहेत. अगदी आमदार, मंत्री वगैरे सगळे काही व्यवस्थित होत आहे. त्यात कोणीही कमी जास्त नाही. मग ते काम कोणते असो, बदल्यांचे असो वा ॲडमिशन्सचे असो. पण हे आमचे स्वप्न आहे काय ? बोलतो एक आणि करतो एक अशा प्रकारचे. सभापती महोदय, माझी एवढीच विनंती आहे की, शासनाच्या या प्रस्तावाचे स्वागत करताना मी माननीय राज्यमंत्री श्री.टोपे यांना एवढेच सांगू इच्छितो की, आपण हे सारे ओपन करीत आहात तर जरूर करा पण त्यामध्ये स्पर्धा होऊ द्यात. मात्र जो गरीब माणूस आहे त्याचे हित देखील यातून आपण साधून द्या. त्याला जास्तीत जास्त यातून कसे देता येईल, कसे आपण देऊ शकता याचाही विचार करा आणि त्याप्रमाणे कृती करा. आपण टेलिफोन ओपन केला म्हणूनच तर एक रूपयामध्ये कॉल करता येतो. विमाने ओपन केली म्हणूनच तर त्याची तिकिटे 10 टक्क्यांवर आली. जेथे स्पर्धा आली तेथे ग्राहकाचा फायदा आला. समाजवादाचे आणि साम्यवादाचे पुस्तक हे सांगत नाही. कार्ल मार्क्स सांगत नाही, लेनिन सांगत नाही, लोहियाजी सांगत नाहीत, महात्मा गांधी सांगत नाही की, दीनदयाळ उपाध्याय सांगत

...... एस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

नाहीत. पण स्पिरीट बरोबर होते. सर्व विचारवंतांचे स्पिरीट होते की, सर्वेपि सुखिन् सन्तु, सर्वे सन्तु निरायमय: म्हणजे सर्वांचे कल्याण झाले पाहिजे हे स्पिरिट होते. पण आम्ही त्या विचारांचे काय केले आहे ? आम्ही गणपतीची मूर्ती तयार करावयास गेलो आणि समाजवादाचा आणि साम्यवादाच्या गप्पा मारत गाढवाची मूर्ती तयार केली. आम्ही त्या लायकीचे नाही आहोत. म्हणून आता या संदर्भात ग्राऊंड लेव्हलवर ऑडिट करा. ग्राऊंड रिॲलिटी काय आहे ती समजून घेऊन आपण धोरण ठरवा. उशीर केला., केंद्रातील एनडीए सरकारमध्ये, ज्यामध्ये आमचे मित्रपक्ष देखील सरकारमध्ये होते. माझी त्यांना विनंती आहे की, त्या एनडीएच्या कॅबिनेटमध्ये आम्ही सर्वांनी मिळून हा निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयामध्ये तुम्ही देखील केंद्रात एक पार्टी आहात. म्हणून तुम्हाला देखील विनंती आहे. सभापती महोदय, मी टीका म्हणून बोलत नाही. मुंबईच्या गरीब माणसाचे हित तुम्ही जरूर मांडा, मुंबईतील मराठी माणसाला घर मिळाले पाहिजे म्हणूनही आपले विचार मांडा. त्यात काय सुधारणा करावयाची तेही मांडा. परंतु सरकारचा अंकुश जाऊन करप्शन कमी होणार असेल तर याबाबतीत या कायद्याचा सपोर्ट करा, समर्थन करा अशी विनंती मी या निमित्ताने करतो. सभापती महोदय, याची अमलबजावणी होत असताना आपले जे गृहनिर्माण धोरण आहे त्या धोरणामध्ये या लॅण्डचा उपयोग करीत असताना, यांना सँक्शन देत असताना, ते हॉस्पिटल्स सारखे व्हायला नको. बॉम्बे आणि हिंदूजा हॉस्पिटल्सना आपण सवलतीमध्ये जागा दिल्या, इतरही अनेक सवलती दिल्या आणि 5 टक्के खाटा गरीबांसाठी राखून ठेवण्यास सांगितले. आपले धर्मादाय आयुक्त मग त्याबाबत रिपोर्ट पाठवितात आणि तो आम्ही वाचतो. तेथे एक गरीब गेला की त्याला दरवाजाच्या बाहेर हाकलून देतात. असे या संदर्भात व्हायला नको. याच्या क्रियान्वयामध्ये गरीब माणसाचे हित कसे साधले जाईल, तुमच्या गृहनिर्माण धोरणात तुम्ही जे कबूल केले आहे, त्याचे पालन कसे होईल याचा मात्र तुम्ही जरूर विचार केला पाहिजे एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

****

....... एस 3 ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे एक सन्माननीय सदस्य आणि आमच्या विरोधी पक्षातील एक उमदे नेतृत्त्व असलेले श्री.नितीन गडकरी यांची या प्रस्तावाला समर्थन देत असताना यातील अनेक उणीवा आणि जाणीवा सांगितल्या. त्यांच्या भाषणाचा रोख हा हे होऊ नये असाच होता. कारण तिकडच्या बाजूला सगळे लक्ष्मीदर्शन कसे होते वगैरे त्यांनी सांगितले. तरीही एकंदरीत नाईलाज असतो, श्रेष्ठींच्या निर्णयानुसार काही वेळेस काही गोष्टी करणे भाग असते. तरीही त्यांनी काही चांगला सल्ला दिला आणि सांगितले की, या संबंधीचा निर्णय एनडीए सरकारने घेतला होता आणि त्यावेळेस आम्हीही त्या मंत्रिमंडळामध्ये होतो. तेव्हा हा जो सामुदायिक निर्णय झालेला आहे याची जाणीव ठेवून आम्ही याबाबत विचार करावा असेही त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे. सभापती महोदय, पटो वा न पटो, मान्य असो वा नसो, ...

( यानंतर श्री. सरफरे .....टी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ज्यावेळी खिचडी करुन पिकविली जाते त्यावेळी त्या ठिकाणी सर्वांना एकत्र रहावे लागते. त्यावेळी या प्रस्तावाला आमचा पाठिंबा होता की, विरोधही होता हा विषय गौण होता. मंत्रिमंडळाचा एखादा सार्वजनिक निर्णय असल्यानंतर त्यासंबंधी आतमध्ये कितीही चर्चा झाली असली तरी तो मंत्रिमंडळाचा निर्णय म्हणून बाहेर सांगावे लागते. परंतु बरे झाले. एकत्र राहिल्यानंतर एखादी गोष्ट पटत नसेल तर ती सुधारणे भाग असते. आम्ही एन.डी.ए. चे घटक असतांनाही माननीय राष्ट्रपतीं पदाच्या निवडणुकीच्यावेळी ती सुधारणा करुन दाखविली. स्वायत्तता कशी असते ती सांगितली, ती सांगण्याचा मी या ठिकाणी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, हा थोडा गंमतीदार विषय आहे. आपण गांधीटोपी आणि खादीचे कपडे घालणाऱ्या कॉंग्रेसचे परिवर्तन पहातो. चकचकीत आणि मस्त सिल्कच्या कपडयामध्ये वावरणारे परिवर्तन आपण पहातो. ते परिवर्तन या प्रस्तावामध्ये आहे. आज या ठिकाणी प्रस्ताव मांडून स्वर्गीय इंदिराजी गांधींना श्रध्दांजली वाहण्याचा अभिनव कार्यक्रम या सदनामध्ये आपण आणला त्याबद्दल कॉंग्रेसला धन्यवाद देतो. या प्रस्तावाची पूर्वपिठीका फार महत्वाची आहे.ती या सदनाच्या कार्यक्रम पत्रिकेवर आली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक असतांना आणि सभापतींच्या स्थानावर कै. वि.स. पागे असतांना हा प्रस्ताव या सदनामध्ये पारित झाला. कोणता प्रस्ताव पारित झ ााला? याबाबत या देशाला माहीत नव्हते आणि दिल्लीला सुध्दा स्वप्न पडले नव्हते. गोरगरिबांना घरे मिळण्याकरिता आणि धनदांडग्यांना सरळ करण्याकरिता, जमील ताब्यात घेण्याकरिता असे काहीतरी करावे असे या देशामध्ये कुणाला वाटले नव्हते. त्यावेळी समाजवादाचे हे हलके फुलके स्वप्न महाराष्ट्रातील त्यावेळच्या कर्तबगार राज्यकर्त्यांना पडले. आणि म्हणून घटनेच्या कलम 252 चा आधार घेतला. जरी देणे घेणे नसले तरी मला एखादी गोष्ट करावयाची आहे हे सांगण्यासाठी घटनेने काही गोष्टी करुन ठेवल्या आहेत. घटनेमध्ये जे शेडयूल्ड आहेत त्यानुसार ते प्रकरण असेल तरच तुम्हाला कायदा करता येतो. केंद्राने कोणता कायदा करावयाचा आणि राज्याने कोणता कायदा करावयाचा? याचे शेडयुल्ड दिले आहे. त्या व्यतिरिक्त आपल्याला कायदा करता येत नाही. ज्याप्रमाणे अंधश्रध्दा विधेयकाच्या बाबतीत आपल्याला हिंदूच्या विरुध्द कायदा करता येत नाही. कारण त्यासंबंधी घटनेच्या शेडयुल्डमध्ये तरतूद नाही. या शेडयुल्डमध्ये देशाची भाषा कोणती असावी? त्या सर्व भाषांमध्ये इंग्रजी भाषा नाही. घटनेमध्ये इंग्रजी भाषा नसली तरी आम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

इंग्रजीमध्ये लिहितो. ज्याप्रमाणे या घटनेमध्ये एखादी गोष्ट नसेल आणि एखादी गोष्ट सर्वसामान्य लोकांसाठी एखाद्या राज्याला करावयाची असेल तर घटनेच्या कलम 152(1) मध्ये म्हटले आहे. "दोन किंवा अधिक राज्यांच्या विधीमंडळांना अनुच्छेद 249 व 250 मध्ये तरतूद केली आहे, त्याखेरीज काही करावयाचे असेल तर त्यासंबंधी संसदेला राज्याकरिता कायदा करण्याचा अधिकार नाही. अशापैकी कोणत्याही बाबीचे राज्यामध्ये संसदेने कायद्याव्दारे विनियमन करणे इष्ट आहे असे दिसून आले, आणि त्या राज्याच्या विधीमंडळाच्या सर्व सभागृहांनी त्या आशयाचे ठराव पारित केले तद्नुसार त्या बाबीचे विनियमन करण्याचा संसदेने अधिनियम पारित करणे हे विधिसंमत होईल. आणि त्याप्रमाणे पारित झालेला कोणताही कायदा अशा राज्यांना जी राज्ये त्यांच्या विधीमंडळाच्या सभागृहांने किंवा दोन्ही सभागृहे असतील त्यापैकी प्रत्येक सभागृहाने तद्नंतर या संबंधात पारित केलेल्या ठरावाव्दारे तो कायदा अंगिकृत करील अशी अन्य कोणतीही गोष्ट राज्यांना लागू होईल." या कलमामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, तुम्हाला घटनेप्रमाणे करता येत नाही त्याकरिता देशातील दोन राज्यांनी अशाप्रकारचा ठराव केला तर त्या ठरावाची अंमलबजावणी करणारा कायदा निर्माण करण्यास केंद्राला अधिकार मिळेल. आणि केंद्राने असा कायदा केला तर ज्या दोन राज्यांनी शिफारस केलेला ठराव आहे त्या व्यतिरिक्त इतर राज्यांना लागू करण्याचा अधिकार प्राप्त होईल." अशाप्रकारे घटनेने दिलेल्या कलमांचा फायदा घेऊन आपण हे केले आहे. त्यावेळी फुले, आंबेडकर, शाहू हा विषय नव्हता तो आता जास्त आहे. माननीय कै. वसंतराव नाईक साहेबांनी.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे.... 11:55

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू.....

माननीय वसंतराव नाईक साहेबांनी 5 ऑक्टोबर 1971 रोजी ठराव मांडला की, "ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 252 च्या खंड (1) अनुसार, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक 5 ऑक्टोबर 1971 रोजी आणि महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक 7 ऑक्टोबर 1971 रोजी, नागरी स्थावर मालमत्तेवर कमाल मर्यादा लादणे आणि कमाल मर्यादेहून अधिक असणाऱ्या अशा मालमत्तेचे संपादन आणि त्याच्याशी संबंधित किंवा सहाय्यभूत व तद्नुषंगिक सर्व बाबी यांचे संसदेच्या अधिनियमाद्वारे महाराष्ट्र राज्यात विनियमन करण्यात यावे". म्हणजे धनदांडग्यांच्या जमिनी काढून त्यावर गोरगरिबांची घरे बांधता येतात का ? याबाबत चर्चा झाली, ती चर्चा फार विस्तृत आहे. चर्चेची कार्यवाही आपल्या विधिमंडळाच्या लायब्ररीमध्ये उपलब्ध आहे. ती चर्चा वाचण्यासारखी आहे. खादीधारी डाहो फोडून गरिबांच्या बाजूने बोलले. त्यांची भाषणे वाचल्यानंतर असे वाटते की, खरोखरच खऱ्याअर्थाने महात्मा गांधींचा पंचा नेसून ते आले असावेत आणि गरिबांकरिता आपले अश्रु ढाळत असावेत, अशाप्रकारची त्यांची भाषणे आहेत. त्यावेळी खादीधारी गरिबांच्या बाजूने बोलत होते. या 1971 च्या प्रस्तावाची अंमलबजावणी केंद्रामध्ये सन्मानित झाली नाही. केंद्रामध्ये गरिबी हटावचा नारा देशाच्या तत्कालीन आदरणीय पंतप्रधान इंदिराजी गांधी यांनी देऊन गरिबांसाठी 10 कलमी कार्यक्रम जाहीर केला. 1976 साली आणीबाणी असताना, त्या संदर्भाने श्रीमती इंदिराजींनी कायदा केला, तो पायदळी तुडवून मोकळा करण्यासाठी हातात हात का घालता ? असा प्रश्न उपस्थित होतो. सन्मानीय श्री.गडकरी साहेब, मी मान्यच करतो की, कॉंग्रेसने जे काम केले, त्याची तोडमोड करण्याचे आपण ठरविले असेल, ते आपण करावेच. म्हणूनच त्यावेळच्या एनडीऐ सरकारने केंद्रामध्ये असा कायदा केला असेल. कायदाच केलेला नाही तर त्यावेळचे अर्थमंत्री श्री.यशवंत सिन्हा यांनी महाराष्ट्राला तंबी दिलेली आहे. माझ्याकडे या संबंधातील कात्रण आहे. 2001 साली त्यावेळचे अर्थमंत्री श्री. सिन्हा साहेबांनी महाराष्ट्राला दम भरला.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मला निदर्शनास आणावयाचे आहे की, तीन राज्ये सोडून देशातील सर्व राज्यांनी कायदा रद्द करावा, अशी केंद्र सरकारकडे मागणी केली होती, म्हणून केंद्र सरकारने त्या राज्यांच्या मागणीकरिता तो निर्णय केला. कायदा रद्द करण्यास तीन राज्यांनी विरोध केलेला आहे.

2....



SKK/ KGS/ MAP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : दै. सकाळमध्ये आलेली बातमी आहे. बातमीच्या हेड लाईनमध्ये असे म्हटलेले आहे की, "नागरी कमाल धारणा कायदा आठवा..." केंद्रीय अर्थमंत्री श्री.यशवंत सिन्हा यांचा इशारा. इंदिरा गांधीनी निर्माण केले आणि काँग्रेसने देशामध्ये साम्राज्यवाद आणायचा, साम्यवाद आणायचा म्हणा..त्याला गोंडस नावे दिलेली आहेत. समाजवादाच्या निमित्ताने निर्माण झालेली धोरणे ही शेवटी शेंबडीच पोरे असतात.

प्रा.शरद पाटील : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी 'शेंबडी पोरे' असा उल्लेख केलेला आहे, तो रेकॉर्डवरून काढून टाकावा.

श्री.दिवाकर रावते : मी वाईट काही बोललो नाही.

प्रा.शरद पाटील : माझा त्याला आक्षेप आहे.

श्री. दिवाकर रावते : शेंबूड काढून टाकायचा असतो.

**उपसभापती** : ते शब्द रेकॉर्डवरून काढून टाकण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते: ती धोरणे कुपोषित असतात, केव्हाही मरणारी असतात. काँग्रेसने समाजवाद सोडला तरी समाजवादाचा अंश कोठेतरी या सभागृहात जागा आहे. सन्माननीय श्री.पाटील साहेब, धन्यवाद.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, हा कायदा त्यावेळी आणला. आपण हा कायदा केंद्र शासनाला करावयास लावला. हा कायदा सदनामध्ये आणत असताना आपण काय म्हटले आहे ? माझ्याकडे ते उद्दिष्ट इंग्रजीमध्ये उपलब्ध असल्यामुळे मला तसेच वाचावे लागणार आहे. त्यावेळी उद्देश व कारणामध्ये असे म्हटले आहे की, "There has been a demand for imposing a ceiling on urban property also, especially, after the imposing of a ceiling on agricultural land by the State Governments. With the growth of population and increasing urbanization, a need for orderly development of urban areas has also been felt. It is, therefore, considered necessary to take measures for exercising social control over the scarce resource of urban land with a view to ensuring its equitable distribution amongst the various sections of society (particularly the poor) and also avoiding speculative transactions relating to land in urban agglomerations.." हे उद्दिष्ट आपण मांडले. यामध्ये "Social control over the scarce resource" हा विषय आहे. पुढे असे म्हटले आहे की, " to prevent concentration of urban property in the hands of a few persons and speculation and profiteering therein;" हा जो मूळ उद्देश होता तो मान्य आहे. त्याकरिता कायदा आला. परंतु असे काय घडले की ज्यामुळे गेल्या 30 वर्षामध्ये मूळ उद्देशाची अंमलबजावणी सरकारने केली नाही ? हा ठराव मांडत असताना याबाबतीत आकडेवारी आली पाहिजे. हे आम्ही का करु शकलो नाही ? यामध्ये काय अडचणी आल्या ? यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, " to bring about socialization of urban land in urban agglomerations to subserve the common good by ensuring its equitable distribution." आपण ते केले का ? मुळात जमिनीच घेतल्या नाही तर कोणाला देण्याचा प्रश्नच आला नाही. पुढे असे म्हटले आहे की, " to discourage construction of luxury housing leading to conspicuous consumption of scarce building materials and to ensure the equtiable utlisation of such material; and " त्यानंतर पुढे असे म्हटले आहे की, "to secure

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री. दिवाकर रावते ....

orderly urbanisation." अशा प्रकारची उद्दिष्टे मांडत या सभागृहामध्ये वाजतगाजत हा कायदा केला. त्यावेळी या कायद्याची अनेक कलमे होती. त्याचाही उल्लेख आजच्या या ठरावामध्ये केलेला आहे. प्रश्न असा निर्माण झालेला आहे की, हा कायदा त्यावेळी कोठे कोठे लागू झाला ? महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात 1971 साली विचार मांडून या देशाला एक नेतृत्व दिले. सर्वसामान्य लोकांना शहरामध्ये घरकुल द्यावयाचे असेल तर धनदांडग्यांच्या जमिनी काढून त्या सर्वसामान्यांना वाटाव्यात अशा प्रकारचा कायदा करावा अशी केंद्र शासनाला विनंती केली. जेणेकरुन आम्हाला या शहरामध्ये सर्वसामान्य लोकांना घर देता येईल म्हणून आपण तशी विनंती केली. त्याप्रमाणे कायदा झाला. गरिबी हटाव पासून गरिबोंका हाथ पर्यंत आपण आलात. त्यावेळी स्व. इंदिराजी गांधी यांनी गरिबी हटावचा नारा देऊन या देशामध्ये पूर्ण बहुमत घेण्याचे सामर्थ्य दाखवले. आता हा कायदा मागे घेऊन गरिबांच्या कानफाटात मारण्याकरिता गरिबों का हाथ उभा राहिला आहे असे वाटावयास लागले आहे असे माझे ठाम मत आहे. म्हणजेच आम आदमी के साथ थाप.

सभापती महोदय, संविधानाच्या या तरतुदीचा वापर करुन कायदा आल्यानंतर आंध्र प्रदेश, गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, ओरिसा, पंजाब, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल या सगळ्या राज्यांनी हा कायदा स्वीकृत केला.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:05

(श्री. दिवाकर रावते...

याचा अर्थ महाराष्ट्राने देशाचे नेतृत्व केले. स्व. वसंतराव नाईक यांनी आणि त्यांच्या सहका-यांनी आणि त्यावेळच्या काँग्रेसने हा मूळ विचार 1971 साली या महाराष्ट्रामध्ये रुजविला. मग असे एकाएकी काय घडले की, तुम्हाला हा कायदा मागे घ्यावा असे वाटायला लागले ? सभापती महोदय, या कायद्याची जी उद्दिष्टे आहेत त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. सामाजिक निर्बंधाबरोबर जमीनधारकांना विशिष्ट अटींवर गृहनिर्माण कलम 21 अन्वये सूट देण्याची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आली होती. जमीनधारकाने आपल्या अतिरिक्त मोकळया जमिनीवर जर दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याची योजना सादर केली.... आता जे गृहनिर्माणाचे धोरण शासनानाने आणलेले आहे ते या कायद्यामध्ये अंतर्भूत आहे. सर्वसामान्य लोकांसाठी गृहनिर्माण धोरण आणलेले आहे असे जे आपण सांगत आहात त्याची चिरफाड आम्ही ते धोरण जेव्हा चर्चेला येईल त्यावेळी करु. या कायद्यामध्ये ही मूळ तरतूद आहे. तुम्हाला सर्वसामान्य लोकांना घरे देण्याचे जे अभिप्रेत आहे त्यासंबंधीची तरतूद या कायद्यामध्ये अंतर्भूत आहे. सामाजिक निर्बंधाबरोबर जमीनधारकांना विशिष्ट अटीवर गृहनिर्माण कलम 21 अन्वये सूट देण्याची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे. जमीनधारकाने आपल्या अतिरिक्त मोकळया जमिनीवर दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याची योजना सादर केली तर अशा जमीन मालकांची जमीन संपादन न करता दुर्बल घटकांच्या घर बांधणीकरिता जमीन सोडण्याचे धोरण शासनाने अंगिकारलेले आहे. संकल्पित योजनेखाली 80 चौ.मी. पेक्षा अधिक चटईक्षेत्राचे गाळे असता कामा नयेत. शिवाय 50 टक्के जमिनीवर 40 चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्रफळाचे गाळे असता कामा नयेत असे 1998 साली या कायद्यान्वये निश्चित करण्यात आले. सभापती महोदय, माझ्याकडे कितीही जमीन असली तरी या कायद्यान्वये मला जी जमीन मोकळी होते त्या व्यतिरिक्त अतिरिक्त जमीन मी सरकारकडे जमा करण्याऐवजी या नियमाचे पालन केले तर या शहरातील सामान्यांना, गोरगरिबांना जमीन मिळण्याची या कायद्यामध्ये तरतूद आहे. या कायद्यामध्ये तरतूद असताना हा कायदा तुम्ही कशासाठी निरसित करीत आहात याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तुम्ही जे धोरण स्वीकारले त्याबाबतीत कायद्यामध्ये तरतूद होती काय ? अतिरिक्त जमीन सोडण्यासाठी या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

कायद्यामध्ये कोणतीही तरतूद नाही. आता प्रत्येक वेळी मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या प्रमाणे लक्ष्मीदर्शन घडले असे म्हणणार नाही. त्यावेळी शासनाने त्यावेळच्या परिस्थितीनुसार कायद्यामध्ये अशी तरतूद करण्याचा प्रयत्न केला असेल. सभापती महोदय, कलम 21 अन्वये जमीनधारकांना कशाप्रकारे कायद्यात सूट द्यायची यासंबंधीचे अधिकार आणि त्यासंबंधी करायचे नियम हे केन्द्र सरकारच्या अखत्यारित मोडत होते. म्हणजे जर अतिरिक्त जमिनीकरिता सूट द्यावयाची असेल तर पुन्हा केन्द्राकडे जाऊन कायद्यामध्ये दुरुस्ती करावी लागत होती. आमचे सरकार हुशार. आमच्या सरकारने घटनेच्या आणखी एका कलमाचा फायदा घेतला. मघाशी मी कायद्यातील तरतूद आपणास वाचून दाखवली. .....अनाठायी सोसावा लागणारा त्रास, म्हणजे जमीन घेणे, त्यासंबंधीच्या तक्रारी, कोर्टकचे-या या सबबीखाली जमीनधारकांना सूट देण्याचा अधिकार राज्य शासनास प्राप्त झालेला आहे. त्याचा आधार घेऊन महाराष्ट्र शासनाने 1977साली 30, 50 व 80 चौ.मी. चटईक्षेत्रफळाच्या सदनिका बांधण्याची तयारी असणा-या जमीन मालकांना सूट देण्याचे धोरण स्वीकारले. म्हणजे केन्द्र सरकारच्या मूळ कायद्यामध्ये सुधारणा न करता ही सवलत निर्माण करुन मालकांना जमिनी प्रदान केल्या. आता या कायद्यातील तरतुदींचे पालन केले की नाही याच्या मेरिट व डिमेरिटमध्ये मी जात नाही. हे सर्व घडले. यातील महत्वाचा मुद्दा असा आहे की, या कायद्याची मोडतोड करुन केन्द्र सरकारचा अधिकार असताना देखील त्यामधूनही पळवाट काढून अतिरिक्त जमीन जर मूळ मालकांना त्यावर अमूक इतकी घरे बांधा अशी तरतूद करुन दिली तर त्या कायद्यामध्ये गोरगरिबांसाठी कळवळा असेल असा आमचा समज होता. त्या काद्यामध्ये आणखी एक तरतूद होती. माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला त्याबाबतीत खुलासा द्यावा. मी त्यावेळी त्या व्यवसायात होतो. कायद्याच्या कलम 21 नुसार ज्यांच्या अतिरिक्त जमिनीच्या योजना मंजूर झाल्या त्यांनी शासनास 90 रु. प्र.चौ.फूटाने सदनिका विकायच्या अशी अट घातली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर कु. खर्चे...

श्री.दिवाकर रावते......

गरिबांना ते परवडणारे होते. त्यानंतर 1985 मध्ये 135 रुपये प्रतिचौरस फुटाने सदनिका विकावयाच्या,अशी अट घातली गेली. एवढी सगळी व्यवस्था तुम्ही केल्यानंतरसुध्दा या कायद्याची अंमलबजावणी केली नाहीत. हे तर पाप केलच. शासनाने जर अशाप्रकारच्या सदनिका अतिरिक्त जमिनीतून उपलब्ध करुन मंत्रालयातील आमच्या कर्मचा-यांना त्या दिल्या असत्या तर फार बरे झाले असते,केवढी दिवाळी झाली असती त्यांची. जे आय.ए.एस. अधिकारी आहेत त्यांना तुम्ही मोठमोठे भूखंड उपलब्ध करुन देता त्यावर 2,000 स्क्वे.फु.चे फ्लॅट बांधून ते मौजमजा करतात आणि आपल्या डोक्यावर वरवंटा फिरवितात तुमच्या किंवा आमच्या राज्यकर्ते कोणतेही असले तरी. फाईलींच्या फाईलींचे ते वाटोळे करीत असतात. मंत्रालयातील साध्या शिपायाला सुध्दा जागा मिळतात का विचारा. तुम्ही कारकुनाचे तर सोडूनच द्या, ते डोंबिवलीवरुन सकाळी धापा टाकत येतात आणि संध्याकाळी धापा टाकत जातात. आयुष्य अर्धे करुन घेतलेले आहे मंत्रालयातील कर्मचा-यांनी. रोज किमान 10 ते 15 पेशंट दुपारच्या वेळी तिकडच्या दवाखान्यात केवळ चक्कर येते म्हणून ॲडमिट होतात, अशी परिस्थिती आहे. या मंत्रालयातील कर्मचा-यांना जागा मिळू शकल्या असत्या तेवढया जमिनींमध्ये. ते बाहेरचे गोरगरीब कोणी असतील ते जाऊ दे ते आले नाही आले, येतात नाही येतात. यासंदर्भात अतिरिक्त जमिनीवर असलेले किती कारखाने होते ? या प्रत्येक कारखान्याच्या जर दोन - दोन सोसायटया करुन त्यांना जागा दिल्या असत्या तर या कर्मचा-यांना त्यामध्ये जागा मिळाल्या असत्या या कायद्यामध्ये तशी तरतूद होती. मध्यमवर्गीयांना आपण त्या जागेवर सदनिका उपलब्ध देऊ शकत होतो. एल.आय.जी.,एम.आय.जी.मध्ये ज्या जागा अडकून आहेत, त्याऐवजी त्या जागांमध्ये आपण मध्यमवर्गीयांना सदनिका उपलब्ध करुन देऊ शकत होतो पण त्या देण्यात आलेल्या नाहीत. का दिल्या नाहीत ? मगाशी ते म्हणाले की, काही गाळे मिळाले परंतु ते मोठया लोकांना मिळाले. मोठया लोकांनी ते छोटे लोक आहेत असे दाखवून म्हणजे बेकायदेशीर,खोटे,अनाठायी,उत्पन्नाचे दाखले देऊन त्यांनी ते गाळे मिळविलेले आहेत. यासंदर्भामध्ये चार्ल्स कोरिया यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रसरकारने 1985 मध्ये राष्ट्रीय नागरी आयोगाचे गठन केले. या कायद्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भात आयोगाने 1997 पर्यंत आपल्या अंतिम अहवाल सादर केला नागरी जमीन कमाल धारणा कायदा आणि भाडे

X - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

नियंत्रण कायद्याच्या अनुषंगाने विशेष लक्ष केंद्रित केले होते. या संदर्भात सदर समितीने तौलनिक अभ्यास करुन वास्तविकतेच्या आधारावर काही मौलिक सूचना केल्या होत्या. त्या सूचनांमध्ये ठळक बाब अशी होती की, शहर विकासासाठी जमीन उपलब्ध व्हावी व त्यामुळे सर्वसामान्य सुविधांमध्ये वाढ व्हावी असा त्या सूचनांचा हेतू होता. यासाठी अर्बन लँड सिलिंग व रेग्यूलेशन ॲक्ट,1976 नागरी जमीन धारणाची तरतूद वैधानिक पुस्तकात समाविष्ट करणे आवश्यक आहे, तो सहजपणे अंमलात आला पाहिजे. आयोगाने खूप मौलिक सूचना केलेल्या आहेत, परंतु त्यापैकी मोजक्याच सूचना मी येथे नमूद करीन. या कायद्याचा अंतर्भाव वैधानिक पुस्तकात केला पाहिजे या सूचनेपेक्षाही ही अतिरक्त असलेली जमीन स्पष्टपणे शोधून काढून ती गॅझेटमध्ये प्रसिध्द केली पाहिजे व ती सरकारने ताब्यात घेतली पाहिजे. कमाल धारणेपक्षा अधिक जमीन नागरी विकासासाठी प्रामुख्याने नवीन घरांसाठी वापरली गेली पाहिजे. आपल्याकडे याकरिता एजन्सीस आहेत,म्हाडा आहे. म्हाडाने 2,000 कोटी रुपये शासनाला कर्ज दिलेले आहे आणि त्याचे व्याज शासन पुरवणी मागण्यांमधून देत आहे. गरीबांकरिता घरे बांधण्यासाठी चालविली जाणारी म्हाडा ही संस्था इकडे व्याजाने पैसे वाटप करीत आहे आणि गरीबांना घरे देण्याच्या संदर्भात खुळखुळाट आहे. पुरवणी मागणीमधून मी प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर आलेले नाही. म्हाडाला शासन व्याजाचे आठ कोटी रुपये देत आहे. शासनाने म्हाडाकडून किती कर्ज घेतले होते ? हे सांगा ना आम्हाला. या चार्ल्स कोरियाच्या अहवालामध्ये असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, शासनाकडे यासंदर्भात अधिकृत अशी संस्था उपलब्ध असतांनाही आपण हे काम केले नाही. यासंदर्भात या संस्थेने किंवा बिल्डरने काय केले ते आपण पाहिले नाही. अतिरिक्त जमीनी त्यांच्या ताब्यातच राहिल्या कमाल धारणेपेक्षा अतिरिक्त असलेली जमीन नागरी विकासासाठी आणि प्रामुख्याने नवीन घरांसाठी वापरली पाहिजे. मात्र ती जमीन मध्यमवर्गातील व कमी मिळकत असलेल्या उत्पन्नाच्या गटासाठी, दुर्बल घटकांच्या घर योजनांसाठी वापरली पाहिजे, अशी शिफारस होती. ही शिफारस हा अहवाल केंद्राकडे आल्यानंतर 1985 साली करण्यात आली.

यानंतर श्री.कानडे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची सकाळच्या सत्रातील कामकाजाची वेळ संपलेली आहे. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण सुरु आहे. या विषयावरील चर्चा माननीय सभापतींच्या अनुमतीने नंतर घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक आता 12.30 वा. सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 15 मिनिटांनी, 12.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

01-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) Z.1

SGB/ MAP/ KGS/ **स्थगितीनंतर** 12:30

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आज लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी आहे. त्यामुळे आज विधानभवनात त्यांच्या प्रतिमेचे पूजन झालेले आहे. त्याचबरोबर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचीही आज जयंती आहे. त्यांच्याही प्रतिमेचे पूजन व्हावयास पाहिजे होते. परंतु ते का झाले नाही याची मला कल्पना नाही. त्यांच्या प्रतिमेचे पूजन झाले नसेल तर विधानभवनात दोन्ही सभागृहाच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन केले पाहिजे अशी माझी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे साहेबांनी स्वर्गीय अण्णाभाऊ साठे यांची आज जयंती असल्यामुळे अण्णाभाऊ साठे यांचीही जयंती शासनाने साजरी करावयास पाहिजे होती असे सांगितले. खरे म्हणजे अण्णाभाऊ साठे यांनी तळागातील लोकांचे नेतृत्व केले होते. आज अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतीथी असा योग जुळून आलेला असल्यामुळे अण्णाभाऊ साठे यांची स्मृती म्हणून जयंती साजरी करावयास पाहिजे अशी मी सूचना करतो.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, आज अण्णाभाऊ साठे यांची जयंती असून आज दुपारी 3.00 वाजता त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार व त्यांच्या नावाने पुरस्कार वितरण सोहळयाचा कार्यक्रम शासनाने आयोजित केलेला आहे. आज लोकमान्य टिळकांची पुण्यतीथी आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचा योग 1 ऑगस्ट रोजी जुळून आलेला आहे. शासनाच्या वतीने नेहमी अण्णाभाऊ साठे यांचा कार्यक्रम घेतला जात असतो त्यामध्ये कधीही अपवाद केला जात नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शासनातर्फे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त पुष्पहार व पुरस्कार वितरण सोहळयाचा कार्यक्रम आयोजित केला असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

**सभापती** : विधीमंडळ सचिवालयाच्या माध्यमातून अशा पध्दतीचा जो विषय आणला तो विषय विधानमंडळाच्या समितीकडे नेला जाईल व या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली ती तपासून घेण्यात येईल व त्याबाबतीत काय करता येईल ते जरुर बघितले जाईल.

---------------------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सी.एस.नं.१९०६ रंगवाला कम्पाऊंड, भायखळा येथील अनधिकृत बांधकामाबाबत.**

**(१) * २९३४० श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सी.एस.नं.१९०६ रंगवाला कम्पाऊंड, भायखळा विभाग येथील मोकळ्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) या अनधिकृत बांधकामाबाबत तक्रार शासनाकडे दाखल करण्यात आली आहे काय, असल्यास यावर काय कारवाई करण्यात आली,
(३) सदर अनधिकृत बांधकामाविरोधात कारवाई करण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(४) सदर अनधिकृत बांधकाम केव्हापर्यंत निष्कषित करण्यात येईल व त्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता**: (१) सदर ठिकाणी अनधिकृत बांधकामे असल्याचे मुंबई महानगरपालिकेस आढळून आले आहे.
(२), (३) व (४) महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी आढळून आलेल्या २१ अनधिकृत बांधकामावर एम.आर.टी.पी. अधिनियमाच्या कलम ५३(१) अन्वये महानगरपालिकेने नोटीसा बजावून त्यातील १९ बांधकामे निष्कासित केली आहेत. उर्वरित २ बांधकामांची पाहणी करुन कायद्यातील तरतूदीनुसार महानगरपालिकेकडून योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, भायखळा येथे रंगवाला कम्पाऊंड येथील मोकळया जागेत जे अनाधिकृत बांधकाम झालेले आहे त्याचे फोटो माझ्याजवळ आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत. प्रश्न विचारल्यानंतर अनाधिकृत बांधकामे पाडण्याची कारवाई काही प्रमाणात झालेली आहे. २१ अनाधिकृत बांधकामापैकी १९ अनाधिकृत बांधकामे निष्कासित केलेली आहेत. त्यामुळे ही अनाधिकृत बांधकामे कधी पाडण्यात आलेली आहेत? तसेच या ठिकाणी जी अनाधिकृत बांधकामे आहेत ती गेल्या अनेक वर्षापूर्वीची आहेत. त्यामुळे अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात पहिल्यांदा कधी तक्रार करण्यात आली होती ? या ठिकाणी अनाधिकृत बांधकामे होऊ नये यासाठी ज्या अधिका-याकडे काम दिले होते त्या अधिका-याने ही अनाधिकृत बांधकामे न पाडता चालू ठेवली त्या संबंधित अधिका-याचे व अनाधिकृत बांधकाम व्यावसायिकाचे साटेलोटे असल्यामुळे त्या ठिकाणी अनाधिकृत बांधकामे झाली. अधिकारी आणि बांधकाम

...३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : २९३४० .........

श्री. विनोद तावडे....
व्यावसायिक यांच्यात साठगाठ असल्यामुळे अनेक जमिनी हडप केल्या जातात त्यामुळे पुढील काळात अशा प्रकारचे अनाधिकृत बांधकाम होणार नाही व अधिका-यांना धाक बसेल यासाठी संबंधित अधिका-यावर आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय,या ठिकाणी जे अनाधिकृत बांधकाम झाले त्यासंदर्भात पहिली नोटीस १३.१२.२००६ देण्यात आली होती. या ठिकाणी २१ अनाधिकृत बांधकामावर एम.आर.टी.पी.अधिनियमाच्या कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावून त्यातील १९ बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत. ही १९ बांधकाम जानेवारी ते मे, २००७ या काळात निष्कासित करण्यात आलेली आहेत. सदर अनाधिकृत बांधकामामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्याबाबत तपासणी करावी लागेल व त्याकाळात ज्या अधिका-याकडे या विभागाचे नियंत्रण ठेवण्याचे काम होते त्याची चौकशी चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, या ठिकाणी असलेल्या २१ अनाधिकृत बांधकामावर एम.आर.टी.पी.अधिनियमाच्या कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावून त्यातील १९ बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत. मानवतेच्या दृष्टीकोनातून झोंपडपट्टयांचे सोडून द्या.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ KGS/ पूर्वी श्री.जुन्नरे.... 12:40

ता.प्र.क्र.29340........

श्री.मधुकर चव्हाण........

जी कमर्शिअल बांधकामे आहेत, गोडावून्स आहेत ती निष्कासित केली जातील काय ? माननीय मुख्यमंत्र्यांनी असेही आदेश दिले होते की, अशात-हेची अनधिकृत बांधकामे होत असतील तर तेथील विभाग अधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. तेव्हा हे आदेश पुन्हा देण्यात येतील का ? तसेच उर्वरित दोन अनधिकृत बांधकामे केव्हा पाडणार आहात ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, उरलेली दोन बांधकामे न्याय प्रविष्ठ आहेत. या संदर्भात सिटी सिव्हील कोर्टामध्ये या महिन्यात म्हणजे दिनांक 7.8.2007 रोजी तारीख आहे. माननीय न्यायाधीश निर्णय देतील त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल. मी यापूर्वीच सांगितलेले आहे की, तेथील वॉर्ड ऑफीसर आणि पोलीस ऑफीसर हे खऱ्या अर्थाने जबाबदार आहेत. हे अनधिकृत बांधकाम कोणत्या अधिकाराच्या कार्यकाळात झाले त्या अधिकाऱ्यांशी चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ज्यावेळी एम.आर.टी.पी.खाली ॲक्शन घेता तेव्हा त्या संदर्भातील अधिकार पोलीस विभागाकडे जातात. एकदा एम.आर.टी.पी. कारवाई केल्यास लोक कोर्टात जातील आणि प्रकरण न्यायप्रविष्ट होईल ही गोष्ट लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी कोर्टात अगोदरच केव्हेट का दाखल केले नाही ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे तेथील अधिकाऱ्यांनी कोर्टात केव्हेट दाखल करण्याची काळजी घ्यावयास पाहिजे होती. एमआरटीपी अधिनियमाच्या कलम 53 (1) मध्ये लवकर निष्कासन करण्याची तरतूद आहे. तीच कार्यवाही आपण बी.एम.सी.च्या 351 खाली केल्यास त्यास 45 दिवस लागतात आणि त्यामध्ये प्रोसिजरल डिलेसुध्दा आहे. एमआरटीपीचे कलम 53 (1) हे शॉर्टकट आहे. हे देखील खरे आहे की, लोक कोर्टात जातात आणि अशा प्रकरणात काही प्रमाणात स्टे देखील मिळतो. तेव्हा या संदर्भात काळजी घेण्याच्या सूचना महानगरपालिकेला देण्यात येतील.

----------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बर्ड फ्लू मुळे नुकसान झालेल्या पुणे जिल्ह्यातील**
**पोल्ट्री धारकांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(2) * 33058 डॉ. एम. ए. अझिज , श्री. संजय दत्त , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली , श्री. शरद रणपिसे , श्री. चंद्रकांत रघुवंशी** : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात सन 2005-2006 मध्ये बर्ड फ्लू रोगामुळे नुकसान झालेल्या पुणे जिल्ह्यातील पोल्ट्री व्यावसायिकांना अद्याप पर्यंत रु. 22 कोटींच्या नुकसानाची भरपाई वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबतीत राज्यशासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, नुकसान भरपाई तातडीने देण्यात कोणती कार्यवाही केली आहे,
(4) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.अनिस अहमद यांच्याकरिता** : (1) पुणे जिल्ह्यातील पोल्ट्री व्यावसायिकांना नियमानुसार रु.15,63,93,523/- इतके अनुदान वाटप प्रत्यक्षात केले आहे.
(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यात पोल्ट्री व्यावसायिकांना 15 कोटी 63 लाख इतक्या रुपयांचे अनुदान वाटप केलेले आहे. प्रत्येक पोल्ट्रीधारकांना किती अनुदान देण्यात आले व केव्हा देण्यात आले ? अनुदानाचे जे वाटप करण्यात आले त्यामध्ये कोणते निकष लावण्यात आले ? तसेच जिल्हावार माहिती देण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नंदूरबार जिल्ह्यांमध्ये प्रथम बर्ल्ड फ्लूचा रोग आला. त्यानंतर जळगाव जिल्ह्यामध्ये बर्ल्ड फ्लू रोगाची लागण झाली. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यांतील पोल्ट्री व्यावसायिकांमध्ये हाहाकार उडाला. दिनांक 5.4.2006 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पोल्ट्री व्यावसायिकांना 80 कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय झाला. दिनांक 29.4.2006 रोजी 50 कोटी रुपये पोल्ट्री व्यावसायिकांना वितरीत करण्यात आले. सुरुवातीला प्रती पक्षी 20 रुपये साईज बघून देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यामध्ये कोंबड्या आणि अंडी कोणीही खात नव्हते त्यामुळे संपूर्ण पोल्ट्री व्यवसाय ठप्प झाला होता, त्यांची फार मोठ्या प्रमाणावर हानी झाली. पक्षी मरुन गेले होते, अंडी जागेवर नव्हती, म्हणून सरकारने 45 चौ.इंच आकाराच्या पिंजऱ्याला एक पक्षी लेअरचा आणि 80 चौ.इंच एक पक्षी बॉयलरचा अशा पध्दतीने

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33058........
श्री.हसन मुश्रीफ........

पिंजऱ्यांचे माप पाहून नुकसान भरपाई देण्याचे जाहीर केले. परंतु याचा फायदा मोठमोठे कॉन्ट्रक्टर घेत आहेत असे लक्षात आल्यानंतर दिनांक 20.6.2006 रोजी दुसरा निर्णय घेण्यात आला. बॉयलरला 500 ते 10000 पर्यंत 100 टक्के, 10000 ते 30000 पर्यंत 85 टक्के आणि 30000च्या वर 70 टक्के आणि लेअरला 500 ते 20000 पर्यंत 100 टक्के 20000 ते 40000 पर्यंत 85 टक्के आणि 40000 च्या वर 70 टक्के अशी मदत देण्याचे ठरविले. मग अशी ओरड सुरु झाली की, लहान पिल्ले हा लेअरचा भाग आहे, त्यानंतर ग्रोअर म्हणजे् मधली स्टेज याचा देखील विचार करुन मदत द्यावी अशी मागणी करण्यात आली. याचा विचार केल्यास यासाठी 6 कोटी 69 रुपये द्यावे लागतील. आपण या निधीची तरतूद केलेली नाही. आतापर्यंत 80 कोटी रुपयांचे वाटप झालेले आहे. अजून एकूण 22 कोटी रुपयोच वाटप व्हावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी जिल्ह्याची आकडेवारी देण्याबाबत प्रश्न विचारलेला आहे. या संदर्भातील माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ती पटलावर ठेवण्यात येईल. आपण अशापध्दतीने बर्ड फ्लूमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई दिलेली आहे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33058....

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, बर्ड फ्लूची सुरुवात नंदूरबार जिल्हयातून झाली. सुरुवातीला ज्या लोकांनी कोंबडया मारल्या, त्या नंतर रस्त्यावर फेकून देण्यात आल्या. त्यावेळी शासनाचे तिकडे लक्ष गेले व त्यानंतर बर्ड फ्लूचे नियम तपासून नुकसान भरपाई देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. फेब्रुवारी,2006 मध्ये शासनाने बर्ड फ्लू जाहीर केल्यानंतर जीवंत कोंबडया मारल्या. परंतु बर्ड फ्लू जाहीर होण्याच्या अगोदर ज्या लोकांनी कोंबडया मारल्या, त्या नंदूरबार जिल्हयातील लोकांना अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे त्यांना शासन किती दिवसात नुकसान भरपाई देणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, बर्ड फ्लूचा अनुभव शासनास नवीन होता. परदेशात बर्ड फ्लूचा रोग होता. परंतु तो आपल्याकडे नव्याने आल्यानंतर दिनांक 5.4.2006 रोजी यासंदर्भात मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले. परंतु अजूनही काही लोकांना नुकसान भरपाई मिळाली नसेल तर त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी आम्हाला भेटावे, त्यांच्याशी आम्ही चर्चा करु व ते तपासून पाहू.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, अगोदर ज्यांनी कोंबडया मारल्या, त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याबाबतीत आपण दिनांक 5.4.2006 रोजी निर्णय जाहीर केलेला आहे. फेब्रुवारी महिन्यात नंदूरबार जिल्हयांमध्ये बर्ड फ्लूची साथ आली होती व त्यासंदर्भात आपण पोल्ट्री व्यावसायिकांना नुकसान भरपाईही दिलेली असून त्याची आकडेवारी माझ्याकडे आहे. परंतु त्यातूनही काही जणांना नुकसान भरपाई मिळाली नसेल तर त्याबाबतीत आम्ही निश्चितपणे सन्माननीय सदस्यांशी चर्चा करु व हे तपासून घेऊ.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, गेल्यावर्षी बर्ड फ्लू झाल्यानंतर अजूनही काही पोल्ट्री व्यावसायिकांना सरकार पैसे देऊ शकले नाही, हे योग्य नाही. आता नव्याने यावर्षी बर्ड फ्लूची लागण झाली असल्यामुळे पोल्ट्री व्यावसायिकांमध्ये घबराट पसरलेली आहे, त्यामुळे याबाबतीत आपण काही भरीव तरतुदीच्या दृष्टीने शासन काही करणार आहे का ?

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33058....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता जी माहिती दिली, ती आता आमच्या अधिकाऱ्यांना अवगत झालेली आहे. मागच्या वर्षी बर्ड फ्लू झाल्यानंतर त्यासाठी 80 कोटी रुपये लागतील, असा आमचा अंदाज होता, परंतु 22 कोटी 16 लाख लागले. यासंदर्भात शासनाने अनेक चांगल्या सुधारणा केल्या व यासाठी निधी उपलब्ध करुन सगळयांना आपण नुकसान भरपाई देत आहोत.

श्री.साघर मेघे : सभापती महोदय, माझा याठिकाणी असा प्रश्न आहे की, चिक्स आणि ग्रोअरसंबंधी शासन किती दिवसांत पैशांचे वाटप करेल ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 22 कोटी रुपयांमध्येच 6 कोटींचा आणि 63 हजार रुपयांचा अंतर्भाव आहे. यासंदर्भातील निधीची तरतूद करण्याच्या दृष्टीने हिवाळी अधिवेशनामध्ये विचार करण्यात येईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, बर्ड फ्लू हा आता ग्लोबल फिनॉमिनल झाला असेल तर राज्यामध्ये तो भविष्यात पुन्हा होऊ नये किंवा आल्यास त्यासंदर्भात पोल्ट्री व्यावसायिकांना त्वरित मदत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कुठली उपाययोजना केलेली आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 4-5 राष्ट्रामध्ये बर्ड फ्लूचा रोग आहे. त्या देशांनी आपल्या राज्यास भेट दिलेली आहे. बर्ड फ्लूच्या बाबतीत आपण कसे सामोरे गेलो, याबाबतची त्यांनी पाहणी केलेली आहे. बर्ड फ्लूच्या बाबतीत आपण जो आदर्श निर्माण केलेला आहे, तो इतर देशातील लोक घेत आहेत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, बर्ड फ्लूमुळे पोल्ट्रीधारकांना जी नुकसान भरपाई देण्यात आली, त्यामध्ये अनेक बोगस पोल्ट्रीधारकांनाही नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. त्यामध्ये खोटे पंचनामे होऊन अनेकांनी पैसे घेतलेले आहेत. ठाणे जिल्हयामध्ये असे प्रकार झालेले आहेत. त्याबाबतीत मी शासनास निदर्शनासही आणून दिलेले आहे. त्यामुळे त्यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय ? व ज्या बोगस पोल्ट्रीधारकांना नुकसान भरपाई दिलेली आहे त्यांची आपण चौकशी करणार का ?

..3....

ता.प्र.क्र.33058....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, गेल्यावेळी यासंबंधीची चौकशी केली होती. अनेक लोकांकडून पैसे वसूलही करण्यात आलेले आहेत. परंतु आता सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, यामध्ये काही राहिले असेल तर आम्ही पुन्हा चौकशी करु.

--------

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य परिवहन महामंडळाच्या एस.टी. चालक भरतीत झालेला गैरव्यवहार**

**(३) * २९३९० श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. श्रीकांत जोशी , श्री. नितीन गडकरी , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , डॉ. वसंत पवार , श्री. जगन्नाथ शेवाळे , प्रा. फौजीया खान , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. सुरेश जेथलिया , श्री. अरविंद सावंत , श्री.परशुराम उपरकर , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. दिवाकर रावते :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २३ मे, २००७ रोजी वा त्या सुमारास राज्य परिवहन महामंडळातील औरंगाबाद, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि रत्नागिरी येथील अधिकाऱ्यांनी संगनमत करुन एस.टी. चालक भरतीत गैरव्यवहार केल्याचे उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच, सन २००४ मध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या सोलापूर विभागात झालेल्या नोकर भरतीमध्ये तेथील प्रादेशिक परिवहन विभाग नियंत्रण व अन्य अधिकाऱ्यांनी काही उमेदवारांचे गुण वाढवणे व त्यात फेरफार केल्याच्या तक्रारीनुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) औरंगाबाद वगळता सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि रत्नागिरी येथे अनियमितता झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले असून त्याबाबतीत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, चौकशी करण्यात आली.

(३) सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर व रत्नागिरसाठी नियुक्त केलेल्या प्रादेशिक छाननी समितीचे अध्यक्ष व सदस्य दोषी असल्याने यांचेवर संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, प्रश्नभाग दोनच्या उत्तरात असे म्हटले आहे की, चौकशी करण्यात आली आहे. माझे प्रश्न असे आहेत की, या चौकशीमध्ये काय आढळून आले आहे, गैरमार्गाने करण्यात आलेली भरती रद्द करुन नव्याने भरती प्रक्रिया राबविण्यात येईल काय, या गैरव्यवहाराने केलेल्या भरतीमध्ये एकूण किती पदे भरण्यात आली आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, एकूण पाच जिल्हयामध्ये असे प्रकार आढळून आले आहेत. या भरतीमध्ये ज्यांची निवड करण्यात आली होती ती रद्द करण्यात आली आहे. गैरव्यवहारातील 24 लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.29390 पुढे सुरु..........</u>**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गैरव्यवहार उघड झाला आहे, असे उत्तरात नमूद केले आहे. एकंदरीत गैरव्यवहार किती रकमेचा होता, किती उमेदवारांकडून, किती रक्कम घेण्यात आली, संबंधितांवर कोणत्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे व त्यांच्यावर कोणते गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, एकूण 24 लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत व त्यांच्यावर भा.दं.वि.कलम 465, 468, 471, 201, 34 आणि लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलम 13 (1) (ड) व 13 (2) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, किती रकमेचा गैरव्यवहार झाला आहे ? या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, परीक्षेच्या पेपरमध्ये खाडाखोड झाल्याची मुख्य तक्रार या गैरव्यवहारात आढळून आली आहे. नक्की किती रकमेचा गैरव्यवहार झाला, याबाबतची नोंद आता उपलब्ध नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून तसेच महामंडळाकडून या गैरव्यवहाराची चौकशी सुरु आहे. या चौकशीत जे आढळून येईल, त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, प्रश्नभाग तीनच्या उत्तरात असे म्हटले आहे की, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर व रत्नागिरीसाठी नियुक्त केलेल्या प्रादेशिक छाननी समितीचे अध्यक्ष व सदस्य दोषी असल्याने त्यांचेवर संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदर अध्यक्ष व सदस्य हे महामंडळाच्या सेवेत होते काय, असल्यास कोणत्या दर्जाचे अधिकारी/कर्मचारी होते, त्यांच्यावर विभागाने कोणती कारवाई केली आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, गैरव्यवहारातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांवर विभागीय चौकशी सुरु आहे. यामधील तीन कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून काही कर्मचा-यांच्या वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत. विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

..3.........



SRR/ MAP/ SBT/ 12:50

**ता.प्र.क्र.29390 पुढे सुरु..........**

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रश्न भाग एकच्या उत्तरात असे नमूद केले आहे की, औरंगाबाद वगळता सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि रत्नागिरी येथे अनियमितता झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले आहे. ज्यावेळी निरनिराळया जिल्हयांमध्ये अशाप्रकारचा गैरव्यवहार किंवा अनियमितता होते त्यावेळी एक प्रकारचे रॅकेट, आपमिसळ आहे, अशी शंका घेण्यास वाव असतो. विभागीय चौकशी सुरु केलेल्यांमध्ये कर्मचारी किती आहेत, अधिकारी किती आहेत व बाहेरील समिती सदस्य किंवा अध्यक्ष म्हणून नियुक्त केलेले किती आहेत, ते कोणत्या दर्जाचे आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, अधिका-यांनी गुणांमध्ये खाडाखोड केली आहे व त्यादृष्टीकोनातून त्यांच्यावर कारवाई केली आहे. हे सर्व राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी आहेत. श्री.पी.व्ही.देसाई, विभागीय नियंत्रक वगैरे अशी एकूण 24 नावे आहेत, ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हा गैरव्यवहार सन 2004 मध्ये झाला आहे व अद्याप विभागीय चौकशी सुरु आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी संबंधितांची नांवे पटलावर ठेवतो, असे सांगितले आहे. कंडक्टर, ड्रायव्हर यांनी काही गुन्हा केला तर त्यांना ताबडतोब निलंबित करण्यात येते. या प्रकरणी ज्या अधिका-यांनी गैरव्यवहार केला आहे ते अधिकारी अद्याप महामंडळाच्या सेवेत कार्यरत आहेत काय, असल्यास, या सर्व अधिका-यांना ताबडतोब निलंबित करण्यात येईल काय ?

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29390 .......

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, संबंधित कर्मचा-यांवर गुन्हा दाखल केलेला आहे. ॲन्टी करप्शन ब्युरोकडून या प्रकरणाची चौकशी सुरु आहे. 24 कर्मचा-यांपैकी तीन कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. उर्वरित 21 कर्मचा-यांची विभागीय चौकशी सुरु आहे. काही कर्मचा-यांची वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे. चौकशीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : माननीय मंत्री महोदय, या प्रकरणामध्ये जे कर्मचारी/अधिकारी गुंतलेले आहेत त्यांच्यावर कारवाई करीत असतांना आपण त्या कर्मचा-यांना/अधिका-यांना निलंबित करणार काय ? असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. या अनुषंगाने आपण योग्य असेल ते उत्तर द्यावे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, गुन्हा उघडकीस आलेला आहे. एस.टी. चालक पदाची परीक्षा घेतली जाते. परीक्षा झाल्यानंतर गुण दिले जातात. गुणांमध्ये खाडाखोड केल्याचे लक्षात आल्याबरोबर, तक्रार आल्याबरोबर ती परीक्षा आणि भरती आपण रद्द केलेली आहे. पुढील प्रकार टळावा यासाठी आपण ताबडतोब ॲक्शन घेतलेली आहे. छाननी समितीचे चेअरमन विभागीय नियंत्रक आहेत, ते त्या जिल्हयाचे प्रमुख असतात. त्यांच्या बरोबर इतर अधिकारीही आहेत. या प्रकरणी आपण विभागीय चौकशीचे आदेश दिलेले आहेत आणि पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविलेला आहे. ॲन्टी करप्शन ब्युरोकडून या प्रकरणाची चौकशी सुरु आहे. या प्रकरणामध्ये पैशांचा व्यवहार झालेला आहे काय, यासाठी आपण ही चौकशी ॲन्टी करप्श्न ब्युरोकडे दिलेली आहे. जे कर्मचारी/अधिकारी चौकशीमध्ये दोषी आढळून येतील त्याच्यावर ताबडतोब कारवाई केली जाईल. खाडाखोड झाल्याचे लक्षात आल्यानंतर ही परीक्षा रद्द करण्यात आलेली आहे. यामध्ये पैशांचा व्यवहार झालेला आहे किंवा नाही, हे जोपर्यंत स्पष्ट होत नाही तोपर्यंत या कर्मचाऱ्यांना निलंबित करणे अन्यायकारक होईल. म्हणून एस.टी. महामंडळाने या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्याचा निर्णय घेतला. चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29390 .......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय म्हणाले की, आम्ही तातडीने कार्यवाही करीत आहोत. सन 2004 मध्ये हे प्रकरण घडलेले आहे. हे खाते आपल्याकडे येऊन 8-10 महिने झालेले आहेत. मग तातडीने याचा अर्थ काय ? हे प्रकरण घडून तीन वर्षे पूर्ण झालेली आहेत. या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करुन चौकशी सुरु आहे. चौकशीमध्ये त्या अधिका-यांनी काय कबूल केले, किती रक्कम जमा केली, किती रुपयांचा गैरव्यवहार झाला, या प्रकरणात नेमके काय घडले ? हे आम्हाला कळले पाहिजे. तीन कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. कर्मचारी निलंबित झाल्यानंतर सुध्दा त्या कर्मचा-यावर कारवाई करता येते.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, तीन वर्षाचा कालखंड पूर्ण झालेला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या प्रकरणाची येत्या दोन महिन्यात चौकशी पूर्ण करु आणि जे दोष असतील त्यांच्यावर कारवाई करु.

----------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे महापालिकेकडे बनावट कागदपत्रे सादर करून हजारो मिटरचे टीडीआर घेऊन महापालिकेची केलेली फसवणुक**

**(4) * 31191 श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक 26482 ला दिनांक 21 मार्च, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे महापालिकेकडे बनावट कागदपत्रे सादर करून हजारो मिटरचे टीडीआर घेऊन महापालिकेची कोटयावधी रूपयांची फसवणुक केल्याप्रकरणी एका प्रकरणी कारवाई केल्यानंतर उर्वरित पाच प्रकरणी करण्यात येत असलेली कारवाई पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कारवाईचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच सदर प्रकरणी करण्यात येत असलेली कारवाई लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्न भाग (1) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) ते (3) पुणे महानगरपालिकेने विविध कारणासाठी संपादित केलेल्या क्षेत्राच्या मोबदल्यात देण्यात आलेल्या टी.डी.आर. प्रकरणापैकी 6 प्रकरणामध्ये डेक्कन जिमखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्या

1) गु.र.नं.579/05, 2) गु.र.नं.682/05, 3) गु.र.नं.638/05, 4) गु.र.नं.646/05, 5) गु.र.नं. 642/05, 6) गु.र.नं. 618/05 चा तपास शासनाचे गृह विभागाने ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचेकडे वर्ग केला आहे. सदर प्रकरणी त्या विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31191.....

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, टीडीआर फसवणूकीचे सहा गुन्हे पोलिसांनी नोंदविले आहे. किती चौरस मीटर टीडीआरची फसवणूक झालेली आहे ? ही सहा प्रकरणे कोणती आहेत ? ज्यांच्यावर कारवाई केलेली आहे त्या अधिकाऱ्यांची नावे व पदे कोणती आहेत.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सब्जेक्टीव्ह प्रश्न विचारला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, या प्रकरणामध्ये सहा गुन्हे नोंदविले आहेत. त्या प्रत्येक गुन्हयाची माहिती देता येईल. 36100 चौ.मी. उद्यानाचे आरक्षण, 3176 चौ.मी. विकास योजनेचे आरक्षण, 13117 चौ.मी. वॉटर ट्रिटमेंट प्लँटचे आरक्षण, 13500 चौ.मी. पार्क व रस्त्याचे आरक्षण, 853.20 चौ.मी. विकास योजनेतील रस्ता, 1541.66 चौ.मी. पंपींग स्टेशन व रस्ता यासाठी महानगरपालिकेने टी.डी.आर. मंजूर केलेला आहे. याबाबतची अधिक माहिती मी पटलावर ठेवणार आहे. पहिल्या गुन्हयाच्या संदर्भात 16 लोकांना अटक करण्यात आलेली असून त्यापैकी महानगरपालिकेचे 6 अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. गुन्हा क्र.682, 638, 646 मध्ये प्राथमिक चौकशी केली असून कोणीही दोषी आढळलेले नाही. गुन्हा क्र.618 मध्ये ग्रीन बेल्ट असल्याने जास्त टीडीआर देण्यात आलेला आहे. याबाबत अँटी करप्शन ब्युरोकडून तपास सुरु असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. गुन्हयामध्ये कोण आरोपी आहेत, याचा निर्णय अँटी करप्शन ब्युरोचे अधिकारी घेत आहेत. टीडीआर कमिटीमधील दोषी व्यक्तींवर निश्चित कारवाई केली जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. परंतु कोणत्या कलमाखाली गुन्हा नोंदविला आहे व आरोपींना कधी अटक केली आहे ? याची माहिती द्यावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आरोपीविरुध्द 420, 465, 467, 468, 471, 34 तसेच अँटी करप्शन ॲक्ट 13(1) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ही सर्व कलमे अजामीनपात्र आहेत का ? आरोपींवर आपण केंव्हा ॲक्शन घेतली आहे ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.31191.....

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, दिनांक 10.10.2005 रोजी गुन्हा दाखल झालेला आहे. त्यांना ताबडतोब अटक केली असून निलंबित केलेले आहे. सध्या चौकशी चालू असून चार्जशीट दाखल करण्याच्या सूचना संबंधित अँटी करप्शन ब्युरो कार्यालयास देण्यात येतील.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी स्पेशिफिक प्रश्न विचारला होता. या प्रकरणामध्ये कोणत्या हुद्दयाच्या अधिकाऱ्यांना अटक करण्यात आलेली आहे ? कारण टीडीआर कारकून देत नाही. टीडीआर प्रोसेसमध्ये आयुक्त फायनल सर्टीफिकेट देत असतात. त्यानंतर टीडीआरचे रोटेशन होते. या प्रकरणामध्ये कोणत्या पदावरील, कोणत्या अधिकाऱ्यांवर, कोणती कारवाई केलेली आहे ? हे महत्वाचे असल्याने व्यवस्थित सांगावे, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 31191 .....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रकरणी ज्या सहा अधिकाऱ्यांवर आपण कारवाई केलेली आहे, जे निलंबित आहेत, त्यांची नावे आणि हुद्दा मी येथे वाचून दाखवू शकतो. त्यांची नावे आणि हुद्दा असा आहे... 1) श्री.शिवाजी रामचंद्र कुमावत, तत्कालीन विशेष भूसंपादन अधिकारी,पुणे., 2) श्री.शिरीष यादव, तत्कालीन उपायुक्त, भूसंपादन व्यवस्थापन., 3) श्री.दीपक भालचंद्र कुलकर्णी, तत्कालीन सहा.अभियंता, भूमी प्रापण विभाग., 4) श्री.रविंद्र निवृत्ती थोरात, विधी सल्लागार., 5) श्री.दत्तात्रय भानुदास तांबारे, तत्कालीन कनिष्ठ अभियंता, भूमी प्रापण,पुणे मनपा., 6) श्री. मधुसूदन श्रीरंग येणकर, कनिष्ठ अभियंता, टीडीआर सेल, पुणे मनपा,पुणे. सभापती महोदय, ही जी टीडीआर समिती असते त्या समितीच्या सर्व लोकांना दोषी धरून त्यांच्यावर आपण निलंबनाची कारवाई करून चौकशी केली आहे. डीसीआर असतात त्यावर सह्या करण्याचे काम आयुक्त करतात परंतु तपासामध्ये जे दोषी आढळले अशांवरच गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आता हे अधिकारी कोठे आहेत ? कारण पुण्याचे लोक याला कंटाळले आहेत आणि शेवटी पुणे शहरामध्ये सत्तांतर झाले पण तरीही या लोकांना संरक्षण देण्याचे प्रयत्न चालूच आहेत. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, सध्या हे जे लोक आहेत त्यांचा भ्रष्टाचार केव्हा उघडकीस आला आहे आणि सध्या ते कोठे आहेत ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की, ऑक्टोबर 2005 मध्ये हा गुन्हा नोंदविला आहे, तेव्हा हा भ्रष्टाचार उघडकीस आला होता. आणि सध्या ते लोक घरी आहेत.

***

...... जीजी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.29419 व ता.प्र.क्र.30305 एकत्रित घेण्याबाबत .....**

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 5 वर असतेला ता.प्र.क्र.29419 आणि अनुक्रमांक 46 वर असलेला ता.प्र.क्र.30305 हे एकाच विषयावरील आहे. तरी आपण हे दोन्ही प्रश्न क्लब करून घेतले तर मी त्या दोन्ही प्रश्नांना उत्तरे देण्यास तयार आहे.

**सभापती** : ठीक आहे. प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 5 वर असलेला ता.प्र.क्र.29410 आणि अनुक्रमांक 46 वर असलेला ता.प्र.क्र.30305 हे दोन्ही प्रश्न क्लब करून एकत्रित चर्चेला घेण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी दोन्ही प्रश्नांना अनुलक्षून प्रश्न विचारण्यास हरकत नाही.

**राज्यात विशेषतः ठाणे, पुणे,औरंगाबाद, नाशिक, नागपूर येथील खाजगी तसेच विश्वस्त संस्थांच्या रुग्णालयात गरजू व गरीब रुग्णांवर मोफत उपचाराबाबत**

**(5) * 29419 श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक श्री. धनाजी साठे, श्री. चंद्रकांत रघुवंशी, श्री.सय्यद जामा, श्री. रमेश निकोसे, मेजर सुधीर सावंत** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात विशेषत: ठाणे, पुणे,औरंगाबाद, नाशिक, नागपूर येथील खाजगी तसेच विश्वस्त संस्थांच्या रुग्णालयात गरजू व गरीब रुग्णांवर मोफत उपचार केले जात नाहीत, ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व तद्नुषंगाने शासनाने संबंधित रुग्णालयांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीही कार्यवाही केला नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री.विलासराव देशमुख यांचेकरिता** : (1), (2), (3) व (4) राज्यातील विश्वस्त संस्थाच्या रुग्णालयात गरजू व गरीब रुग्णावर मोफत उपचार केले जात नसलेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 3132/2004 दाखल झालेली आहे. सदर याचिकेवरील मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 17.8.2006 च्या आदेशानुसार मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 च्या कलम 41 अ अ मधील तरतूदी नुसार गरीबांना मोफत अथवा सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार देणेबाबत धर्मादाय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीने तयार केलेल्या योजनेनुसार धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून राज्यातील विश्वस्त संस्थाच्या रुग्णालयाची तपासणी करण्यांत येत आहे.

आतापर्यंत तपासणी करण्यांत आलेल्या महाराष्ट्रातील विश्वस्त संस्थाच्या रुग्णालयात गरजू व गरीब रुग्णावर मोफत अथवा सवलतीच्या दराने उपचार केले जातात असे निरिक्षणांती आढळून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुश्रीफ (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 29419 ....

आले आहे. जी रुग्णालये वरील प्रमाणे गरिबांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देत नाही असे आढळून आले आहे, त्यांच्यावर धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून कारवाई करण्यात येत आहे.

**मुंबईतील मुंबई हॉस्पिटल, जसलोक, ब्रीच कॉंडी, हरकिसनदास, लीलावती, हिंदुजा या रुग्णालयांमधून गरीब रुग्णांना देण्यात येणाऱ्या मोफत उपचारांबाबत**

**(46) * 30305 श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री.सय्यद जामा , मेजर सुधीर सावंत , श्री. चंद्रकांत रघुवंशी** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईतील मुंबई हॉस्पिटल, जसलोक, ब्रीच कॉंडी, हरकिसनदास, लीलावती, हिंदुजा या रुग्णालयांमधून सन 2006-2007 या आर्थिक वर्षात एकूण किती गरीब रुग्णांवर कोणकोणत्या आजारांसाठी मोफत उपचार करण्यात आले आहेत,
(2) उपरोक्त रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना मोफत उपचार देण्यात येत नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(3) उपरोक्त रुग्णालयांपैकी गरीब रुग्णांना मोफत उपचार न देणाऱ्या रुग्णालयांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) सन 2005-2006 या आर्थिक वर्षात मुंबई रुग्णालयाने 22 गरीब रुग्णांवर, जसलोक रुग्णालयाने 943 गरीब रुग्णांवर, ब्रीच कॅण्डी रुग्णालयाने 704 गरीब रुग्णांवर, हरकिसनदास रुग्णालयाने 810 गरीब रुग्णांवर, लीलावती रुग्णालयांनी 42 गरीब रुग्णांवर व हिंन्दुजा रुग्णालयाने 748 गरीब रुग्णांवर अशाप्रकारे वरील सर्व रुग्णालयांमध्ये पुढील आजारांवर गरीब रुग्णांवर मोफत उपचार करण्यांत आले आहेत.

Cardiology, Chardiothoracic, Surgery, Neurology, Neuro Surgery, Medicine, Surgery, Orthopadics, ENT, Opthalmology, Gynaecology & Obstetrics, Nephrology, Urology, Paediatrics.
(2) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक 3132/2004 मध्ये दिनांक 17.8.2000 रोजीच्या आदेशाप्रमाणे तयार करण्यात आलेल्या योजनेनुसार उपरोक्त रुग्णालयांमध्ये सध्या गरीब रुग्णांना उपचार देण्यात येत आहेत.
(3) सदरहू रुग्णालयांबाबत अहवाल मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक 30.9.2007 पर्यंत सादर करावयाचा असून, सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, गोरगरीबांशी निगडित असा हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. विधीमंडळामध्ये या संदर्भात वेळोवेळी चर्चा झालेली आहे. सरकारचा हेतूही चांगला आहे मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, या सर्व सवलती कागदावरच आहेत. तेव्हा या संदर्भात माझा

....... जीजी 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त (पुढे चालू....) ता.प्र.क्र.29419 व 30305 .....

सूचनारूपी प्रश्न असा आहे की, किती विश्वस्त संस्थांच्या हॉस्पिटल्समध्ये किती खाटा गरजू गरीबांसाठी उपलब्ध आहेत याची माहिती सरकारने प्रसिद्ध केली पाहिजे. जेणे करून सामान्य माणसाला त्याची माहिती होऊ शकेल. तेव्हा अशी माहिती सरकार प्रसिद्ध करणार आहे काय ? तसेच अशी माहिती ऑन लाईनवर दिली जाणार काय ? आणि प्रत्येक हॉस्पिटलमध्ये मुख्य प्रवेशद्वाराजवळ ही माहिती लावण्यात येईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विश्वस्त संस्था अधिनियम 1950 च्या अ अ प्रमाणे शासनाकडून या संस्थांना, त्यांच्या रूग्णालयांसाठी सवलती दिल्या जातात. त्यामध्ये जमीन, एफएसआय इत्यादी सवलती आपण दिलेल्या आहेत. त्यासाठी शासनाने त्यांना अट एवढीच टाकली होती की, त्यांनी त्या रूग्णालयांतून 10 टक्के गरीब रूग्णांवर उपचार करावेत. परंतु प्रत्यक्षात ही रूग्णालये असे काम करीत नाहीत. म्हणून याबाबत जनहित याचिका कोर्टात दाखल केली गेली पण त्यावर काही तारखा झाल्या आणि वर्षभरामध्ये उच्च न्यायालयाने याबाबत माहिती घेतली तसेच धर्मादाय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आपण नेमली आणि त्यांनी यासाठी दोन टक्के रक्कम काढावी आणि त्यातून उपचार करावेत असे जे आहे त्याप्रमाणे होते आहे की नाही याची पाहणी केली. त्याबाबत आता 30 सप्टेंबरला कोर्टामध्ये ती माहिती सादर केली जाणार आहे. सध्या ही केस न्यायालयात आहे. ..

( यानंतर श्री. सरफरे ..... एचएच 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29419, 30305...

श्री. हसन मुश्रीफ...

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी ज्या रुग्णालयांचा उल्लेख केला त्याठिकाणी आता सुविधा दिल्या जात आहेत. त्या दवाखान्याबाहेर फलक लावला जात आहे, त्यांच्याकडे असलेल्या फंडापैकी किती रक्कम खर्च केली जाते याचे धर्मादाय आयुक्त मॉनिटरींग करीत आहेत. मुंबईमध्ये सर्व गरजू लोकांना या रुग्णालयांमध्ये मोफत उपचार मिळत आहेत यासंबंधीची माहिती प्राप्त झाली आहे.त्याचप्रमाणे या सभागृहातील माननीय सदस्यांची एक समिती गठीत करण्यात आली आहे. त्या समितीमार्फत या रुग्णालयांमध्ये गरीब, गरजू लोकांना उपचार मिळत आहेत की नाहीत, आणि शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी होत आहे की नाही याची पहाणी करण्यात येणार आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. त्याकरिता राज्य सरकारने समिती नेमली आहे. प्रश्न असा आहे की, आज ही रुग्णालये सुरु आहेत त्याकरिता शासनाने जमीन दिली आहे. त्याशिवाय या रुग्णालयांना शासनाकडून कोणकोणत्या सुविधा दिल्या जात आहेत. त्यांना आपण इलेक्ट्रिक मीटरच्या बिलामध्ये सवलती देता, पाण्यामध्ये सवलत देता याशिवाय कोणकोणत्या सवलती दिल्या जातात?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या रुग्णालयांना महानगरपालिकेतर्फे पिण्याचे पाणी कमर्शिअल दराने न देता रेसिडेन्शिअल दराने दिले जाते. त्याचप्रमाणे विजेच्या वापराबाबत सुध्दा रेसिडेन्शिअल दर लावला जातो. त्याचप्रमाणे नियमामध्ये बसत असेल तर एफ.एस.आय. वाढवून दिला जातो. शस्त्रक्रियेच्या साहित्यांवरील कस्टम डयुटी माफ करण्यात येते, ऑक्ट्रॉय माफ करण्यात येतो. त्याशिवाय 2 टक्के फंड सुध्दा माफ केला आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या रुग्णालयांना शासनातर्फे विविध प्रकारची सवलत दिली जाते असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. प्रश्न असा आहे की, महाराष्ट्रामधील किती रुग्णालयांमध्ये गरजू आणि गरीब लोकांना वैद्यकीय मदत मिळते याची आकडेवारी देण्यात येईल काय? तसेच, ज्या रुग्णालयांकडून गरिबांना मदत दिली जात नाही त्यांच्यावर कारवाई केली आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर मुंबईमधील प्रत्येक रुग्णालयांमध्ये गरिबांवर मोफत उपचार केले जातात. विशेषत: औरंगाबादमधील एका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29419, 30305...

श्री. हसन मुश्रीफ....

रुग्णालयाने गरिबांना मोफत उपचार करण्यास नकार दिल्यानंतर सह आयुक्तांनी त्यांना नोटिस दिल्याबरोबर त्यांनी मोफत उपचार देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे मोफत उपचार न देणारे कोणतेही रुग्णालय राज्यामध्ये राहिलेले नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, उत्तराच्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "जी रुग्णालये वरीलप्रमाणे गरिबांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देत नाहीत असे आढळून आले आहे, त्यांच्यावर धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून कारवाई करण्यात येत आहे". तेव्हा प्रश्न असा आहे की, यांसबंधी अनेक तक्रारी आल्यानंतर धर्मादाय आयुक्तांनी किती रुग्णालयांवर अशाप्रकारे कारवाई केली आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, औरंगाबाद येथे 9 रुग्णालयांमध्ये 2 टक्के फंडामधून गरिबांवर उपचार केले जात नव्हते, म्हणून त्यांना धर्मादाय आयुक्तांनी नोटिसा देऊन तात्काळ कारवाई सुरु केली. त्यानंतर ही रुग्णालये आपला फंड बाजूला काढून त्यामधून गरिबांवर उपचार करतात व तो धर्मादाय सहआयुक्तांना दाखवितात. धर्मादाय आयुक्तांनी "कलम 41 चा भंग केला असल्यामुळे आपण कलम 66 प्रमाणे गुन्हयास पात्र ठरत आहात. आपण 8 दिवसात माहिती न दिल्यास आपणावर कारवाई केली जाईल" अशाप्रकारची नोटिस दिली होती. त्यानंतर त्या रुग्णालयांनी गरिबांना मोफत उपचार देण्यास सुरुवात केली आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, धर्मादाय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली असून समितीने योजना तयार केली असल्याचे म्हटले आहे. तेव्हा प्रश्न असा आहे की, या समितीने कोणती योजना तयार केली आहे? तसेच, कलम 41 अ अ च्या तरतुदी व्यतिरिक्त आणखी तरतूद या योजनेमध्ये करण्यात आली आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, उच्च न्यायालय आणि धर्मादाय आयुक्त यांच्या संमतीने ही योजना तयार करण्यात आली. त्यामध्ये 2 टक्के फंडाचे मॉनिटरींग धर्मादाय आयुक्त यांच्यामार्फत होईल. तसेच, गरिबांवर मोफत उपचार होत आहेत की नाहीत याची तपासणी समिति करील. त्याचप्रमाणे या रुग्णालयांमध्ये गरिबांवर शस्त्रक्रिया केली जात नाही. शस्त्रक्रिया करण्यासाठी आणि औषधोपचारासाठी गरीब माणसे कोठून पैसे आणणार? त्याकरिता अशा गरीब रुग्णांकरिता काही खाटा राखीव ठेवण्यात याव्यात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29419,30305... (पुढे सुरू..

श्री.हसन मुश्रीफ (पुढे सुरू...

2 टक्के रक्कम बाजूला ठेवावी आणि त्यामधून गरिबांसाठी उपचार करावे, अशी योजना आहे. पुन्हा 30 तारखेला उच्च न्यायालयात जाणार आहोत. आम्ही काय करणार आहोत, याबाबत धर्मादाय आयुक्त त्या ठिकाणी सांगणार आहेत आणि त्यानंतर उच्च न्यायालय जी योजना सांगेल ती योजना राबविणार आहोत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधिमंडळाच्या अंदाज समितीसमोर धर्मादाय आयुक्तांना बोलावून त्यांची साक्ष घेण्यात आली होती. धर्मादाय आयुक्तांनी आमच्याकडे स्टाफ कमी असल्यामुळे आम्हाला या सगळ्या रुग्णालयांना भेटी देऊन, त्यांच्याकडून माहिती घेणे अडचणीचे आहे. हा विषय समितीच्या अहवालामध्ये येईल. खरे म्हणजे हे काम त्यांनी करायचे ते त्यांच्याकडून होत नाही. या ठिकाणी सांगण्यात येते की, या सर्व गोष्टींवर धर्मादाय आयुक्त लक्ष देतात. या विषयाच्या संबंधात धर्मादाय आयुक्तांना काही माहिती नव्हती. रुग्णालयांनी 10 टक्के कॉटस् गरीब रुग्णांसाठी राखीव ठेवावेत, असे बंधन आहे, त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी अमुक अमुक रुग्णालयांनी केली की नाही ? असा प्रश्न विचारला होता. परंतु त्यांना याची माहिती देखील नव्हती, ही वस्तुस्थिती आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे ? शासनाने किती कर्मचाऱ्यांचा स्टाफ दिलेला आहे ? त्यांची तक्रार योग्य आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : त्यांच्याकडे स्टाफ कमी आहे हे खरे आहे. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे हा विभाग आहे. या संबंधात निश्चितपणे धर्मादाय आयुक्तांशी चर्चा करून बराचसा अतिरिक्त स्टाफ आहे, त्यामधून त्या ठिकाणी स्टाफ वाढवून देऊ.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

**तारांकित प्रश्न क्रमांक : 31994**

(माननीय सदस्य अनुपस्थित)

--

श्री.मधुकर सरपोतदार : सन्मानीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे, परंतु ते अनुपस्थित आहेत, हे बरोबर नाही. यापूर्वीही ते अनुपस्थित राहिलेले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्यांनी असे गैरहजर रहाणे योग्य नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी मला पत्र दिलेले आहे. परवा देखील असा प्रकार झालेला आहे, तो योग्य नाही, अशी मी त्यांना जरूर सूचना देईन.

---

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नवी मुंबई शहरातील गटारे साफ-सफाई व दुरूस्ती कामे पूर्ण न झाल्याबाबत**

**(7) * 29482 श्री. रमेश निकोसे, श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. यशवंतराव गडाख** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नवी मुंबई महानगरपालिकेने शहरातील गटारे साफ-सफाई व दुरूस्ती कामे ठेकेदारांना दिली परंतू पावसाळयापूर्वी सदर गटारांची कामे फक्त 30 टक्के पुर्ण झाल्याने गेल्यावर्षी प्रमाणेच पाणी भरण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दि. 6 मे,2007 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, संबंधित ठेकेदार, गटारांची कामे व्यवस्थीत करीत नसल्याचे ही दिसून आले हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर ठेकेदारांना कामाची पुर्ण रक्कम दिली गेली असून सुध्दा फक्त 30 टक्के कामे झाली आहेत हे खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे,श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही,

(2) काही प्रमाणात कामे व्यवस्थीत नसल्याचे दिसून आले.

(3) हे खरे नाही,

(4) ज्या कंत्राटदाराकडील कामे 95% पर्यंत पूर्ण झालेली नव्हती, अशा कंत्राटदारांविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, चौथ्या उपप्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "ज्या कंत्राटदाराकडील कामे 95 टक्के पर्यन्त पूर्ण झालेली नव्हती, अशा कंत्राटदारांविरूध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे." त्यांना किती दंड केलेला आहे ? कंत्राटदारांना मदत करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

ता.प्र.क्र. 29482.....

श्री.राजेश टोपे : पावसाळ्यापूर्वी सफाईची काही कामे करून घेण्याकरिता कॉन्ट्रॅक्टरना कॉन्ट्रॅक्ट दिलेले असते. एकूण 81 कंत्राटदारांना काम देण्यात आले होते. त्या कामांचा 6 मे 2007 रोजी आढावा घेण्यात आला असता, त्यांनी 95 टक्के काम केले नाही, म्हणून त्यांना फाईन केलेला आहे. 1 लाख 61 हजार 700 इतकी दंडाची रक्कम जमा झालेली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सन्मानीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला, त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्या ठिकाणच्या गटारांमध्ये प्रचंड प्रमाणात कंजेशन निर्माण झालेले होते. जमिनीतून अस्वच्छ पाणी बाहेर पडत असते. ज्या कॉन्ट्रॅक्टरनी कामे केली नाहीत, त्यांना ब्लॅकलिस्ट केलेले आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्या म्हणतात, त्याप्रमाणे काही झालेले नाही. त्यांच्यावर महानगरपालिकेच्या आयुक्तांचे नियंत्रण असते. सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे तशी कारवाई करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी म्हटलेले आहे की, सर्वसामान्य नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे.

यानंतर श्री.बरवड........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 29482 .... श्री. रामनाथ मोते...

उत्तरामध्ये स्पष्टपणे मान्य केले आहे की, त्यांनी 95 टक्केपर्यंत कामे केलेली नव्हती. याचा अर्थ त्या लोकांनी महापालिकेची दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे त्यांना ब्लॅक लिस्ट करणे हा योग्य उपाय आहे. शासन त्यांना ब्लॅक लिस्ट करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, उत्तरामध्ये जे लिहिले आहे ते असे की, त्यांनी 100 टक्के जे काम करावयास पाहिजे त्यापैकी 95 टक्केपर्यंत काम केले असेल तर त्यांच्यावर कारवाई नाही. ज्यांनी 70-80 टक्के काम केले असेल त्यांच्या बाबतीत शेवटी मायनर पेनल्टी आणि मेजर पेनल्टी अशा दोन्ही गोष्टी असतात. त्यांना पेनल्टी लावून 1,61,700 रुपये दंड केलेला आहे. याउपर अशा पध्दतीची घटना घडली तर त्यांना निश्चितपणे ब्लॅक लिस्ट सुध्दा करण्यात येईल.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, 26 जुलैच्या महापुरानंतर मुंबईमध्ये आणि नवी मुंबईमध्ये अनेक ठिकाणी चांगले काम झालेले आहे याबद्दल दुमत नाही. कंत्राटदार असून सुध्दा काही ठिकाणी सखोल भाग असतो त्यामुळे अनेक वर्षापासून तक्रारी असूनही अनेक ठिकाणी तांत्रिक बाबींमुळे सफाईचे काम झालेले नाही असे होऊ शकते. हे काम पूर्ण करण्यासाठी सरकार काय करणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, नवी मुंबई महापालिकेमध्ये यासाठी 81 कंत्राटदार नेमलेले आहेत. हा काही एका कंत्राटदाराचा विषय नाही. छोटे छोटे पॉकेट्स तयार करुन त्यांना काम दिले जाते. त्यांनी काही ठराविक लोक सफाई कामगार म्हणून नेमले पाहिजेत असे बंधनकारक असते. प्रत्येक कामगाराला किती काम असले पाहिजे हे ॲग्रिमेंटमध्ये असते. या 81 कंत्राटदारांच्या माध्यमातून नवी मुंबई महापालिकेमध्ये साफसफाईचे काम केले जाते.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

**नवी मुंबईच्या निर्मितीसाठी पनवेल, उरण तालुक्यांतील तसेच ठाणे जिल्ह्यातील जमिनी संपादित केल्यामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(८) * ३२१३४ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : दिनांक २२ मार्च, २००७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २१ मार्च, २००६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक २६५४६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई निर्मितीसाठी सिडको मार्फत रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि उरण तालुक्यांतील तसेच ठाणे जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात भात पिकाखालील शेत जमीनी संपादित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्यांच्या जमीनी संपादित केल्या आहेत अशा कुटुंबियांना साडेबारा टक्के विकसीत भूखंडाचे वाटप करण्याबाबत राज्य शासन, सिडको आणि प्रकल्पग्रस्त यांच्यामध्ये करार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत किती प्रकल्पग्रस्तांना विकसीत भूखंड द्यावयाचे होते आणि त्यापैकी किती प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्ष भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे,

(४) प्रकल्पग्रस्तांच्या भातपिकाखाली जमीनी गेल्याने प्रकल्पग्रस्त कुटुंबियांचे उत्पन्न गेल्यामुळे प्रत्येक कुटुंबास किमान एक नोकरी देण्याबाबत शासनाने धोरण ठरविले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

(२) नवी मुंबई प्रकल्पासाठी जमीन संपादित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या संपादित जमिनीच्या साडेबारा टक्के विकसित जमिनीचे सिडकोने वाटप करण्याचे आदेश सन १९९० मध्ये निर्गमित केले आहेत.

(३) साडेबारा टक्के योजनेंतर्गत एकूण १८५३६ खातेदारांना जमिनीचे वाटप करायचे असून त्यापैकी ९३९४ खातेदारांना सिडकोने जमीन वाटप केले आहे.

(४) व (५) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोकरी देण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ७.१२.१९८१ अन्वये, नवी मुंबईतील सेवायोजन कार्यालयांना निदेश दिलेले आहेत.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, संपादित जमिनीच्या साडेबारा टक्के विकसित जमिनीचे सिडकोने वाटप करण्याचे आदेश सन 1990 मध्ये निर्गमित केले आहेत. गेल्या 17-18 वर्षामध्ये 18536 खातेदारांपैकी 9394 खातेदारांना जमिनीचे वाटप झालेले आहे. उर्वरित खातेदारांना साडेबारा टक्के विकसित जमिनीचे वाटप का झालेले नाही ? ते वाटप केव्हा करण्यात येणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

ता. प्र. क्र. 32134 ......

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, खातेदारनिहाय सांगण्यापेक्षा मी हेक्टरनिहाय माहिती सांगतो. शासनाने ही जी साडेबारा टक्केची योजना ठरविली त्या माध्यमातून त्या ठिकाणी एकूण 1005 हेक्टर जमिनीचे वाटप करावयाचे होते. त्यापैकी 486 हेक्टर जमिनीचे काम झालले आहे. 518 हेक्टरचे काम अजून शिल्लक आहे. आजपर्यंत उशीर झालेला आहे हे मी मान्य करीन परंतु सातत्याने मागच्या वर्षापासून साडेबारा टक्केचा जो लोड असतो त्यामध्ये अधिक जास्तीच्या पैशाची तरतूद करुन जमीन विकसित करण्याचे काम सिडकोच्या माध्यमातून चालू आहे. मी कालबद्द कार्यक्रम सांगेन की, या वर्षी म्हणजे 2007-08 मध्ये एकूण 200 हेक्टर जमिनीचे वाटप करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यापैकी 91 हेक्टर जमिनीचे वाटप केलेले आहे. म्हणजे या वर्षीचे 50 टक्के काम झालेले आहे. पुढचे 50 टक्के काम या वर्षाच्या शेवटपर्यंत करण्यात येईल. सन 2008-09 मध्ये म्हणजे डिसेंबर, 2009 पर्यंत उरलेल्या 318 हेक्टरचे वाटप करण्यात येईल. डिसेंबर, 2009 ही शेवटची तारीख राहील. या तारखेला साडेबारा टक्के जमिनीचे जे एकूण वाटप होणे बाकी आहे ते सगळे निश्चितपणे केले जाईल.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, नवी मुंबईतील प्रकलपांसाठी ज्या जमिनी संपादित केल्या गेल्या त्यातील बराच मोठा भाग न्हावा-शेवा या ठिकाणी संपादित करण्यात आला आहे. त्या ठिकाणी असे समजते की, अजून त्या लोकांना साडेबारा टक्के जमीन द्यावयाची आहे. त्यांचे पुनर्वसन करावयाचे आहे. त्यांना नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. त्या ठिकाणी ज्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्याचा मोठा भाग सेझसाठी रिलायन्सला देण्यात आला आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 32134.....

श्रीमती मंदा म्हात्रे : नवी मुंबईच्या विकासासाठी ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या होत्या त्या प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्यात येईल असे शासनाने परिपत्रक काढले होते. आता एका कुटुंबामध्ये जर चार-चार भाऊ असतील तर कोणाच्या मुलाला नोकरी द्यायची असा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा 7/12 उता-यावर ज्या ज्या भावंडांची नांवे लागलेली असतील त्यांच्या एका मुलाला नोकरी देण्यासंबंधी शासन निर्णय घेणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : 1981साली एक सर्क्युलर काढण्यात आले होते. त्याप्रमाणे लॅण्ड ॲक्विझिशन ऑफिसर हा ज्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत त्यांना पीएपी म्हणून डिक्लेअर करील. पीएपी म्हणून सर्टिफिकेट घेऊन संबंधित सोवायोजन कार्यालयामध्ये गेल्यानंतर जी.अे.डी.च्या नॉर्म्स प्रमाणे त्यांना नोक-या दिल्या जातात. पीएपीसाठी 5 टक्के जागा राखीव ठेवलेल्या आहेत.

श्री. रामनाथ मोते : प्रकल्पग्रस्तांना नोक-या देण्याच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 1981 साली परिपत्रक काढलेले असून सेवायोजन कार्यालयांना तसे आदेश दिलेले आहेत. सेवायोजन कार्यालय नोक-या देत नाही. ते जेथे व्हेकन्सीज असतील तेथे कॉल देते. तेव्हा प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोक-यांमध्ये सामावून घेण्यासाठी शासन अन्य काही उपाययोजना करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे त्याबाबतीत निश्चितपणे विचार करण्यात येईल.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भिवंडी येथील इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटलमध्ये**
**इंजेक्शनचा तुटवडा असल्याबाबत**

**(9) * 29538 श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , मेजर सुधीर सावंत** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) भिवंडी येथील इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटलमध्ये इंजेक्शनचा तुटवडा असल्याने तेथील रुग्णांचे अतोनात हाल होत असल्याचे दिनांक 3 जून, 2007 वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रुग्णांचे हाल न होण्याच्या दृष्टीने इंजेक्शन पुरवठा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) सदर बाब खरी नसल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : वस्तुस्थिती अशी आहे की, तेथे इंजेक्शनचा तुटवडा होता आणि त्याबाबत मी स्वत: आणि सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन आम्ही दोघे सबंधित डॉक्टरांशी बोललो आणि त्याबाबतीत पाठपुरावा केल्यानंतर ती त्रुटी दुरुस्त करण्यात आली. तेथील हॉस्पिटलमधील सोयी सुविधाबाबत, समस्या तसेच लोकांच्या अपेक्षांबाबतचे एक सूचनापत्र सन्माननीय सदस्य श्री.मुझ्फ्फर हुसेन आणि मी दिलेले आहे. तेव्हा त्या समस्यांचे निवारण करण्यासाठी माननीय मंत्रीमहोदय पुढाकार घेऊन एक बैठक बोलावतील काय ?

श्री. राजेश टोपे : होय.

---

(ता.प्र.क्र. 32941)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नवाबाग बंधारा ( उभा दांडा ) , ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग**
**या बंधाऱ्याचे अपूर्ण अवस्थेत असलेले काम**

**(११) * २९५७१ मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवाबाग बंधारा ( उभा दांडा ) ता. वेंर्गुला, जि. सिंधुदुर्ग या बंधाऱ्याचे काम २ वर्षापूर्वी सुरू होऊनही अद्यापही पूर्ण होऊ शकले नाही, तसेच मागील ६ महिन्यापासून सदर काम पूर्णत: ठप्प आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यासाठी त्वरित कार्यवाही करण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ५ एप्रिल, २००७ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच या बंधाऱ्याचे बांधणीचे काम चुकीच्या पध्दतीचे असून त्यामुळे दोन एकर जमिन तुटून जाणार आहे, याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी अर्ज, विनंत्या संबंधितांकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतीत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, कोणत्या स्वरूपाची कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड प्रीतमकुमार शेगावकर, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) नवाबाग येथील ७२० मीटर लांबीच्या धुप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामापैकी १०० मीटर काम पूर्ण झाले असून सद्य:स्थितीत पावसाळ्यामुळे काम बंद आहे.
सन २००७-२००८ मध्ये सदर कामासाठी रु.२५.०० लक्ष तरतूद उपलब्ध आहे.

(२) मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ५.६.२००७ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

मेजर सुधीर सावंत : कोकणातील संपूर्ण किनारपट्टीवर समुद्राच्या पाण्याचे अतिक्रमण होत असल्यामुळे त्या ठिकाणी फार मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत. नवाबाग येथे 720 मीटर धूप प्रतिबंधक बंधा-याचे काम मंजूर होऊन देखील ते गेल्या अनेक वर्षापासून पूर्ण झालेले नाही. खार लॅण्ड विभागामध्ये अधिकारी आणि टेक्निशियन्स नसल्यामुळे संपूर्ण यंत्रणा ठप्प झालेली आहे. तेव्हा अधिकारी आणि टेक्निशियन्स यांची व्यवस्था करण्यासाठी शासन काही उपाय योजना करणार आहे काय ?

....नंतर कु. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/ SBT प्रथम श्री.शिगम एम. ............. 13:30

ता.प्र.क्र. 29571..........

ॲड.प्रीतमकुमार शेगावंकर : सभापती महोदय,सदर बंधा-याचे काम दोन वर्षापूर्वी सुरु केलेले आहे. या बंधा-याकरिता सुमारे 25 लाखाची तरतूद आहे परंतु या बंधा-याकरिता आतापर्यंत 43,74,000रुपये खर्च आलेला आहे. सदर बंधा-याचे काम येत्या दोन वर्षांमध्य पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

01-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) LL - 2

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित,पुणे चा सन सन 2005-2006चा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महोदय,मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सन 2003 -2004 चा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महोदय,मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा सन 2001 - 2002 लेखापरीक्षा अहवाल,सन 2002 -2003 चा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल व सन 2003 -2004,2004-2005 व 2005-2006 या वर्षांचे पूरक लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : पूरक लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आलेले आहेत.

------

श्री.राजेश टोपे ( जलसंधारण राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ,औरंगाबाद चा सन 2000 - 2001, 2001- 2002, 2002 - 2003 व 2003 - 2004 चा अनुक्रमे पहिला,दुसरा,तिसरा,व चौथा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

डॉ.विजयकुमार गावित ( कामगार राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सन 1990 -1991 ते 2003 -2004 या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------



JPK/ MAP/ SBT प्रथम श्री.शिगम एम. ............. 13:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म.वि.प.नियम 259 अन्वये उपस्थित केलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.**

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : अंडरवर्ल्डचा छोटा राज्यन व त्याचा साथीदार डी.के.राव यांच्यातील पोलिसांनी रेकॉर्ड केलेल्या संभाषणातील गृह राज्यमंत्र्यांच्या नावाचा उल्लेख असल्याबाबत " या विषयाच्या अनुषंगाने श्री.पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी म.वि.प.नियम 259 अन्वये उपस्थित केलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी दिनांक 16 मार्च,2006 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आलेली आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा सातवा अनुपालन अहवाल सादर करणे.

श्री.विनोद तावडे ( समिती सदस्य ) : अध्यक्ष महाराज,लोकलेखा समितीचा सातवा अनुपालन अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करतो.

**सभापती** : लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्यात आला.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: सार्वजनिक उपक्रम समितीचा दहावा अहवाल सादर करणे.

श्री.मधुकर सरपोतदार ( समिती सदस्य ) : अध्यक्ष महाराज, सार्वजनिक उपक्रम समितीचा दहावा अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करतो. सभापती महोदय, यानिमित्ताने मला सभागृहास सांगावयाचे आहे की, सदर अहवाल हा वेगळया पध्दतीचा अहवाल आहे. या अहवालातील काही प्रमुख बाबी मी सरकारच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. हा अहवाल महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ,मर्यादित,खाजगी संस्थेला अनियमित वित्तीय सहाय्य,सुपरस्टार धमाका उत्पादनामधील अनियमितता,कामाची पूर्तता न करणे निधी इतरत्र वळविल्यामुळे महसूल निर्मिती करणा-या मत्तांचे बांधकाम अपूर्ण राहिले होते.या संदर्भातील हा अहवाल आहे. या अहवालामध्ये अनेक प्रकारच्या त्रूटी आणि भ्रष्टाचार आहे. आणि हा अहवाल सदनामध्ये अनेकवेळा तारांकित प्रश्नांच्या आणि विशेष उल्लेखाच्या माध्यमातून

**सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्यात आला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा विशेष अहवाल सादर करणे.

श्री. जगदीश गुप्ता (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा विशेष अहवाल सभागृहासमोर ठेवतो. हा विशेष अहवाल सभागृहास सादर करताना मला या अहवालातील महत्वाच्या 2/3 मुद्यांचा याठिकाणी आपल्या परवानगीने उल्लेख करावासा वाटतो. या अहवालात समितीने जी शिफारस केली आहे ती सभागृहाच्या समोर येणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, समितीने अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांच्या कार्यालयातील सेवेत असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या भरती,बढती,आरक्षण व अनुशेषाबाबत आढावा घेतला असताना अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांनी सभागृहाच्या या समितीला जी वागणूक दिली व जे वर्तन केले ती एक गंभीर बाब आहे. समितीला चुकीची व अपूर्ण माहिती देणे समितीची दिशाभूल करणे ही बाब समितीची व पर्यायाने सभागृहाच्या हक्कभंगाची बाब ठरु शकते. संसदीय लोकशाहीमध्ये संसदेला तसेच विधिमंडळ व विधिमंडळाच्या समित्यांना माहिती पुरविणे ही प्रशासनाची जबाबदारी व त्यांचे संविधानिक कर्तव्य आहे. संसदीय लोकशाहीमध्ये कार्यकारी प्रशासन हे विधिमंडळाला जबाबदार असते. असे असताना अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी समितीला चुकीची माहिती दिली. नोकरभरतीच्या वेळी अनेक प्रकारची अनियमितता त्यांनी केलेली आहे. यामध्ये घोटाळे झालेले आहेत. यासंदर्भात समितीला असे आढळून आले की, या अधिकाऱ्यांनी प्रश्नपत्रिका आणि उत्तर पत्रिका तयार करण्यासाठी व तपासण्यासाठी ज्या संस्थेची निवड केली त्याबाबतीत अवलंबिलेली कार्यपध्दती ही संपूर्णत: चुकीची व बेकायदेशीर आहे असे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. अंतिम निवड यादी नियमानुसार तयार करणे आवश्यक असताना मनमानी पध्दतीने अंतिम निवड यादी बेकायदेशीरपणे तयार केली. निवड यादी तयार झाल्यानंतर शासनाची परवानगी व मान्यता घेणे आवश्यक होते तशी कोणतीही कार्यपध्दती अवलंबिलेली आढळून आले नाही. भरती प्रक्रियेत जातीचे दाखले न पाहता कायद्याची अंमलबजावणी केलेली नाही. निवड यादी तयार करीत असताना प्रतिक्षासूची तयार न केल्यामुळे अनेक पदे रिक्त राहण्याची शक्यता आहे. अशा प्रकारच्या अनेक अनियमितता या भरती प्रक्रियेत झालेल्या समितीला आढळून आल्या आहेत.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता ....

माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आताच सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करताना आयएएस अधिकाऱ्याने ज्याप्रकारची वर्तणूक केली त्याचा उल्लेख सभागृहात केला. त्याच प्रकारची वर्तणूक अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी समितीसोबत केलेली आहे. त्याचप्रमाणे कामाच्या माध्यमातून आणि निवड प्रक्रियेच्या माध्यमातून अधिकाऱ्यांनी गैरवर्तणूक केलेली आहे. ही बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

**सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा विशेष अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

.....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा तेरावा अहवाल सादर करणे.

श्री. धोंडिराम राठोड (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा तेरावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा तेरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "शासन निर्णयाप्रमाणे मेंढपाळांना मोफत चराऊ पासेस दिले जातील असे आश्वासन मा.वनमंत्र्यांनी गत हिवाळी अधिवेशनात देऊनही अद्याप त्याची अंमलबजावणी झाली नसल्याने धनगर समाजातील मेंढपाळांवर केसेस करणे, त्यांच्या मेंढया जप्त करणे असे प्रकार सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी "नंदुरबार तालुक्यातील मजुरांना रोजगाराचे अमिष दाखवून आंध्रप्रदेशात बळजबरीने वेठबिगार म्हणून राबविण्यात येत असल्याचे दि. 31 जुलै 2007 रोजी उघडकीस येणे, या प्रकरणे चौकशी करुन संबंधित ठेकेदारास अटक करुन कठोर कारवाई करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

-------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**..........

यानंतर सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "कोयना प्रकल्पामुळे सातारा, रत्नागिरी जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांपैकी किमान हजार लोकांना अद्याप जमीन न दिल्याने स्थानिकांकडून सदर जमिनींवर अतिक्रमण होणे" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. परंतु हा विषय स्थगन प्रस्तावाचा होत नसल्याने मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असा मी निदेश देत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल पेढी प्रकल्पाच्या संदर्भात बैठक झाली. मी त्या अमरावती विभागातील एक सदस्य आहे. सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता हे देखील अमरावती शहराचे प्रतिनिधीत्व करतात. आम्हाला दोघांनाही या बैठकीचे निमंत्रण दिले नव्हते. त्या बैठकीत काय निर्णय झाले याची आम्हाला कल्पना नाही. आम्ही त्या विभागातील लोकप्रतिनिधी असताना आम्हाला बैठकीला बोलावणे आवश्यक होते. परंतु आम्हाला निमंत्रण न देणे ही बाब योग्य नाही.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझीही अशीच खंत आहे. मी त्या जिल्हयाचा लोकप्रतिनिधी आहे. मी या विषयावर नियम 93 ची सूचना मी दिली होती, लक्षवेधी सूचना दिली होती तरी सुध्दा मला त्या बैठकीला बोलावले नाही. मला का डावलले याची मला माहिती नाही. मला जी माहिती मिळाली त्यानुसार कालच्या बैठकीत 5 लोकांची समिती करण्याचा निर्णय ठरला असताना एक सदस्य समिती नियुक्त केली आहे अशी माहिती आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला का बोलावले नाही? ज्या बैठकीमध्ये 5 सदस्यांची समिती नियुक्त करण्याचा निर्णय झाला असताना एक सदस्य समिती नियुक्त करण्यात आली. बैठकीत ठरल्याप्रमाणे पेढी प्रकल्पासंबंधी जे आंदोलनकर्ते आहेत त्यांचे दोन सदस्य समितीमध्ये घेण्याचे ठरले होते. तरी देखील त्यांचा समितीमध्ये समावेश झालेला नाही. ही पध्दत असंतोष निर्माण करणारी आहे, लोकप्रतिनिधींचा अवमान करणारी आहे याकडे आपण गांभीर्याने लक्ष द्यावे एवढीच कळकळीची विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षेनेते आणि सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनी याठिकाणी जी व्यथा मांडली, त्या व्यथेशी मी स्वत: सहमत आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी बोलावणे आवश्यक होते. त्या जिल्हयाचे लोकप्रतिनिधी म्हणून सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनाही बोलावणे आवश्यक होते. या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.........

जी चर्चा उपस्थित केली होती त्या अनुषंगाने ज्या भगिनी उपोषण करीत होत्या, त्यांनी उपोषण सोडावे या अनुषंगाने माझ्या दालनामध्ये चर्चा झाली होती. त्या बैठकीमध्ये असे ठरले की, त्या भगिनींनी त्यांचे उपोषण सोडावे आणि त्यानंतर याठिकाणी अशी चर्चा व्हावी. याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, यापुढे ही नोंद घेण्यात येईल. कोणत्याही प्रकारच्या अशा चर्चेकरिता माननीय विरोधी पक्षनेते निश्चित येतील यादृष्टीने काळजी घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांच्याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, सन्माननीय श्री.माधवराव चितळे हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ञ आहेत, त्यांची एक सदस्य समिती नेमली आहे. त्या भागातील संघर्ष समितीचे किंवा अन्य जे प्रतिनिधी आहेत त्यात सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांच्याही अनुभवाचा कसा वापर करुन घेता येईल यादृष्टीने निश्चित विचार केला जाईल.

श्री.जगदीश गुप्ता : माझी माहिती अशी आहे की, त्या बैठकीमध्ये 5 सदस्यांची समिती करण्याचे ठरले व त्या समितीमध्ये आंदोलनकर्त्यांचे दोन प्रतिनिधी असणार आहेत.

श्री.दिवाकर रावते : कालच्या बैठकीमध्ये असे ठरले की, एक सदस्य समिती नेमली जाईल. मी ज्यावेळी आंदोलनकर्त्यांना भेटायला गेलो त्यावेळी त्यांनी अशी विनंती केली की, आमचे म्हणणे मांडण्याकरिता संधी दिली गेल्यास आम्ही आमचे म्हणणे मांडू. तेव्हा आंदोलनकर्त्यांचे दोन तज्ञ, शासनाचे दोन तज्ञ, ज्यांना धरण व्हावे असे वाटते त्यांचे दोन तज्ञ यांनी श्री.माधवराव चितळे यांच्यापुढे आपली बाजू मांडावी. समितीमध्ये दोन सदस्य घ्यावेत असे ठरलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनीही आपली बाजू मांडण्यास हरकत नाही.

**सभापती** : त्या समितीला ही सूचना जरुर केली जाईल, सन्माननीय सदस्य त्या विभागातील आहेत त्यांनाही समितीपुढे बाजू मांडण्यासाठी निमंत्रण देण्याची व्यवस्था करावी.

आजच्या इतर सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

--

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या निवेदनाबाबत**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय., मी 20 तारखेला नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्यासंदर्भात शासनाने तातडीने निवेदन करावे असे आपण शासनाला निदेश दिले होते. आता अधिवेशन संपत आले असून अधिवेशनाचा उद्याचा शेवटचा दिवस आहे. अद्यापही त्यासंदर्भात निवेदन आलेले नाही.

डॉ. नीलम गो-हे : आम्ही दिलेल्या सूचनेच्या संदर्भात निवेदन आलेले आहे हे निवेदन मी तसेच सन्माननीय सदस्य श्री. जेथलिया तसेच अरविंद सावंत यांच्या नावाने केले होते परंतु सदर निवेदनात विरोधीपक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांच्या नावाने निवेदन आलेले आमच्या नावाचा उल्लेखच करण्यात आलेला नाही. त्यामुळे आमचीही नावे त्यामध्ये यावीत अशी आमची विनंती राहील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाला होता त्यासंदर्भात आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता व त्या प्रस्तावासंदर्भात आपण आदेश दिले होते की, शासनाने याविषयासंदर्भात दोन दिवसात निवेदन करावे परंतु शासनातर्फे अजून निवेदन करण्यात आलेले नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या माहिती करिता सांगतो की, 93 च्या निवेदनाच्या संदर्भात मी जे सांगितले त्यापैकी अद्यापी 17 निवेदने यावयाची आहेत. या ठिकाणी सन्माननीय मंत्री श्री. गणेश नाईक साहेब उपस्थित आहेत त्यांना सांगतो की, उद्या अधिवेशन संपत असून अधिवेशन संपण्याच्या अगोदर या 17 निवेदने सभागृहात चर्चेकरिता येतील याबाबत संबंधित मंत्र्यांनाही सांगावे तसेच संसदीय कामकाज मंत्र्यांनाही सांगावे. तसेच 289 ची जी दोन निवेदने आहेत त्यापैकी एक सन्माननीय सदस्य श्री. कपल पाटील यांचे असून दुसरे निवेदन रामनाथ मोते साहेबांचे आहे. त्यामुळे ही निवेदने सुध्दा उद्या चर्चेला येतील यासंदर्भात व्यवस्था करावी.

श्री. गणेश नाईक : होय.

**विशेष उल्लेखाचे उत्तर न मिळाल्याबाबत**

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. गणेश नाईक सदनामध्ये उपस्थित आहेत. गेल्या अधिवेशनात सन्माननीय मंत्रीमहोदयांच्या खात्याच्या संदर्भातील एक विशेष

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

उल्लेखाची सूचना उपस्थित केली होती. अद्यापही या विशेष उल्लेखाचे उत्तर आलेले नाही. विशेष उल्लेख दिल्यानंतर शासनाकडून त्यास प्रतिसाद मिळत नाही हें दुर्दैव आहे. खरे म्हणजे यासंदर्भातील उत्तर एक महिन्याच्या आत सन्माननीय सदस्यांना मिळावयास पाहिजे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, नोंद घेण्यात आलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदयांना मी सांगू इच्छितो की, विशेष उल्लेख ही आपल्या नियमान्वये असणारी तरतूद आहे. ज्यावेळेस सदनात सन्माननीय सदस्य विशेष उल्लेख मांडतात त्यावेळेस एक महिन्याच्या आत संबंधित विभागाने त्या बाबतीत कोणती कार्यवाही केली याबाबतची प्रत सदस्यांना पाठवायची असते तसेच त्यासंदर्भातील एक प्रत विधीमंडळाला पाठवायची असते. ही बाब मंत्रीमहोदयांनी सर्व विभागाच्या मंत्र्यांना सांगावी.

श्री. गणेश नाईक : सर्व विभागांना यासंदर्भातील माहिती जाईल अशी व्यवस्था करतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, नियम 289 अन्वये मी आणि सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी एक प्रस्ताव दिला होता व त्यासंदर्भात चर्चा घेण्याचे आपण मान्य केले होते. त्यामुळे ही चर्चा केव्हा घेतली जाणार आहे?

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मांडलेली सूचना अतिशय महत्वाची आहे. परंतु तो विषय या अधिवेशनात चर्चेला येईल असे वाटत नाही. पुढच्या अधिवेशनात पहिल्या आठवडयात या विषयावर आपणास चर्चा करता येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महदेय : हिवाळी अधिवेशनात हा विषय येईल तेव्हा 11 वी चे प्रवेश संपतील तसेच सीबीएसई आणि आयसीएसईच्या संबंधातील हा विषय संपलेला असेल.

**सभापती** : या अधिवेशनात यावर चर्चा होऊ शकत नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, आम्ही दिलेल्या विषया संबंधी चर्चा मान्य झाली होती परंतु अद्यापी ते चर्चेला आलेले नाही. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

**सभापती** : शेवटच्या दिवशी यासंदर्भातील निवेदन निश्चित मिळतील.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी दिलेल्या विशेष उल्लेखाची उत्तरे आलेली नाहीत, उत्तरे आली तर बरे होईल.

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी मघाशी सांगितले आहे की, विशेष उल्लेखाची अद्यापी उत्तरे आली नसतील त्यांची उत्तरे आणि इतर कोणत्याही विशेष उल्लेखाची उत्तरे एक महिन्याच्या आत येतील याबाबत विधीमंडळाने काळजी घ्यावी.

---------------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : थाळी खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**मु. शी.** : थाळी खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, श्रीकांत जोशी वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, श्रीकांत जोशी यांनी "थाळी खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आम्ही जे मुद्दे नियम 93 च्या सूचनेमध्ये दिले होते त्या एक ही मुद्याचे उत्तर निवदेनामध्ये आलेले नाही. खरा मुद्दा असा आहे की, बाजारामध्ये 50 रुपयाला जी थाळी मिळत होती ती 100 च्या वर रक्कम देऊन खरेदी केलेली आहे. दुपटी-तिपटीच्या भावाने थाळी खरेदी केलेली आहे. परंतु त्याबाबत काहीच उल्लेख निवेदनामध्ये करण्यात आलेला नाही. आम्ही उपस्थित केलेल्या मुद्याचे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावे नाही तर हे निवेदन राखून ठेवावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, केंद्रशासनाने शालेय पोषण आहार करणा-या शाळांना भांडी घेण्यासाठी 9 कोटी रुपयांचा निधी वितरीत केला होता.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.जुन्नरे.... 13:50

श्री.हसन मुश्रीफ .............

हा निधी केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासनाकडे नोव्हेंबर महिन्यात आला. महाराष्ट्र शासनाने दिनांक 6.3.2007 रोजी अर्थसंकल्पीत केला. त्यानंतर दिनांक 9.3.2007 रोजी संचालकांना वितरीत केला. शासनाच्या आदेशामध्ये स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला होता की, संचालकांनी हा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावा, जिल्हाधिकाऱ्यांनी हा निधी गट शिक्षण अधिकाऱ्याकडे पाठवावा आणि गट शिक्षण अधिकाऱ्याने ग्राम समितीमध्ये माहिती घेऊन प्रत्येक शाळेला पाच हजार रुपये द्यावेत. यामध्ये वेळ गेला. अनेक ठिकाणी खरेदी करण्यात आलेली नाही. ( अडथळा ) केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या दर कराराप्रमाणे ही खरेदी करण्यात आलेली आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये जेवणाच्या थाळ्यांचे मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यात आली. फक्त थाळ्यांची खरेदी का करण्यात आली, बाकीचे साहित्य का खरेदी करण्यात आली नाही याबाबत चौकशीचे आदेश दिलेले आहेत. सर्व खरेदी शासनाच्या दर कराराप्रमाणे कराव्यात अशा शासनाच्या सूचना आहेत. या संदर्भातील मुद्दा विधानसभा सभागृहात उपस्थित झाला होता तेथेही या संदर्भात चौकशी करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खरे म्हणजे अमरावतीच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांनी थाळ्या खरेदी करण्यापूर्वी निविदा मागवावयास पाहिजे होत्या. मंत्रिमहोदयांनी येथे सांगितले की, हा निधी जिल्हाधिकाऱ्यांनी गट शिक्षण अधिकाऱ्याकडे आणि गट शिक्षण अधिकाऱ्यांनी ग्राम सभेमध्ये माहिती घेऊन प्रत्येक शाळेला 5 हजार रुपये द्यायचे. परंतु ही सर्व खरेदी जिल्हा लेव्हला झालेली आहे. नागपूरच्या वैद्य इंडस्ट्रीजकडून ही खरेदी करण्यात आली. जर जिल्हा लेव्हला टेंडर काढण्यात आले असते तर आपणास कमी दरात ही खरेदी करता आली असती. परंतु या प्रकरणात भ्रष्टाचार झालेला आहे. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी ही खरेदी केली त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा निधी संचालकांनी जिल्हाधिकाऱ्यांना आणि जिल्ह्यांनी हा निधी गट शिक्षण अधिकाऱ्यांकडे वितरीत करावयाचा होता. हा निधी 30 मार्च पूर्वी खर्च करावयाचा होता अन्यथा तो निधी लॅप्स झाला असता म्हणून ही खरेदी करण्यात आलेली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ .............

आहे. ( अडथळा ) दर कराराप्रमाणे खरेदी करु नये असा शासनाचा नियम नाही. दर कराराप्रमाणे ही खरेदी करण्यात आलेली आहे. मी या संदर्भात उद्योग संचालनालयाच्या अधिकाऱ्याशी बोललो आहे. या संदर्भात विधानसभेमध्ये सुध्दा लक्षवेधी मांडण्यात आली होती. ती मी राखून ठेवली होती. मी पुन्हा एकदा सांगतो की, शासनाच्या दर कराराप्रमाणे ही सर्व खरेदी करण्यात आलेली आहे. कारागृहामध्ये तयार केलेल्या वस्तुंचे जे दर असतात त्याप्रमाणे दर ठरविले जातात आणि ते दर इंडस्ट्री विभाग मान्य करतो. याठिकाणी फक्त थाळ्यांची खरेदी करण्यात आली. इतर चमजे, ग्लास, वाट्या वगैरे बाबींची खरेदी करण्यात आली नाही. जर लवकर खरेदी केली नसती तर तो निधी लॅप्स झाला असता. सभापती महोदय, आता केंद्र शासनाकडून 11 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. हा निधी गट शिक्षण विभागामार्फत खर्च करण्याचे आदेश देण्यात येतील.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, मार्च महिना जवळ आल्यामुळे घाई करण्यात आली. परंतु खरेदीची ऑर्डर दिनांक 1.8.2006 रोजी दिलेली आहे. याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, केंद्र शासनाच्या नियमांप्रमाणे शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जेवणासाठी फक्त थाळीच दिली जाते की चमचा, वाटी ग्लास असा सेट दिला जातो ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी सुरुवातीसच मान्य केले आहे की, हे जे नागपूर विभागातील 10-12 जिल्हयांमध्ये घडलेले आहे, त्याबाबतीत चौकशी करण्याचे आश्वासन मी अगोदरच दिलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या नियमानुसार शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जेवणासाठी थाळी, वाटी, चमचा, ग्लास असा सेट दिला पाहिजे, असा काही नियम आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या गाईडलाईनमध्ये असे काही म्हटलेले नाही. तेथील ग्राम शिक्षण समितीमध्ये काय घ्यावयाचे ते ठरते व त्याप्रमाणे खरेदी होते. तरीही मी मान्य केले आहे की, त्या शाळेची व अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ. शी.** : बुलढाणा जिल्हयातील भोरखेड मार्गावरील हौदात नवजात अर्भकांचे 7 मृतदेह आढळणे

**मु. शी.** : बुलढाणा जिल्हयातील भोरखेड मार्गावरील हौदात नवजात अर्भकांचे 7 मृतदेह आढळणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "बुलढाणा जिल्हयातील भोरखेड मार्गावरील हौदात नवजात अर्भकांचे 7 मृतदेह आढळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी जे निवेदन देण्यात आलेले आहे, त्यामध्ये विसंगती आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 23.7.2007 रोजी त्याठिकाणी चार गर्भभ्रूण उघडयावर टाकल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार सरपंच ग्रामपंचायत, भादोला यांनी पोलीस स्टेशन, बुलढाणा येथे कळविले असता पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन सकृतदर्शनी वाटणारे 4 गर्भभ्रूण ताब्यात घेऊन मेडीकल तपासणीसाठी निवासी वैद्यकीय अधीक्षक, सामान्य रुग्णालय, बुलढाणा यांच्याकडे पाठविले असता त्यांनी अभिप्राय दिला की, त्यामध्ये 1 पुरुषलींग, 1 स्त्रीलींग व 2 प्लासेन्टा असून हे सर्व गर्भभ्रूण 16 आठवडयांचे आहेत. जिल्हा शल्यचिकित्सक बुलढाणा यांचे अहवालानुसार 16 आठवडयांचे गर्भभ्रूण हे जैव वैद्यकीय घनकचऱ्यामध्ये मोडतात." एका बाजूला असे म्हटले असताना, त्याच्या खालच्या पॅरामध्ये असे म्हटले आहे की, "16 आठवडयांचे गर्भभ्रूण हे जिल्हा चिकित्सक, सामान्य रुग्णालय, बुलढाणा यांचे अहवालानुसार बायो मेडिकल वेस्टमध्ये येत असल्याने याबाबत गुन्हा नोंद नाही." एका बाजूला आपण मान्य करता आणि दुसऱ्या बाजूला आपण गुन्हा नोंद करत नाहीत, हे योग्य नाही. त्यामुळे या उत्तरामध्ये विसंगती आहे. सरपंचांनी तक्रार दाखल केल्यानंतर, पोलीस घटनास्थळी गेले व त्यांना त्याठिकाणी 4 गर्भभ्रूण सापडले. तरीही आपण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवत नाही, हे योग्य नाही. काल पुन्हा बुलढाण्यामध्ये दोन गर्भभ्रूण सापडलेले आहेत. रोज अशाप्रकारे गर्भभ्रूण सापडत आहेत. त्यामुळे याठिकाणी माझा प्रश्न आहे की, बुलढाण्यामध्ये आपण किती डॉक्टरांना किती गर्भपात करण्यास परवानगी दिलेली आहे ? तसेच याबाबतीत गुन्हा नोंद न होण्याची कारणे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयामध्ये शासनमान्य गर्भपात केंद्र म्हणून 18 हॉस्पीटलला परवानगी दिलेली आहे. त्यामध्ये 1 ते 12 आवठवडयाच्या आतील 133 आणि 12 ते 20 आठवडयाच्या आतील 28 अशाप्रकारे 161 भ्रूणांचे गर्भपात झालेले आहेत. तसेच, त्याठिकाणी सरपंचांनी तक्रार दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी गेले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सरपंचांनी तक्रार केल्यानंतर पोलीस स्टेशनच्या डायरीमध्ये तशी नोंद का करण्यात आली नाही ?

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सदर घटनेची सूचना मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी गेले.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, पोलिसांनी गुन्हयाची नोंद केलेली नाही. शेजारच्या सरपंचांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली की, चार बालकांची प्रेते पडली आहेत. या तक्रारीनुसार पोलीस घटनास्थळी गेले, ती प्रेते उचलली, पोस्टमार्टेमसाठी पाठविली. ही सर्व कार्यवाही पोलिसांनी केली आणि गुन्हयाची नोंद नाही, असे कसे म्हणता येईल. पोलीस स्टेशनमध्ये या गुन्हयाची नोंद का करण्यात आली नाही ? याचे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावे.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सरपंचानी तक्रार केल्यानंतर स्टेशन डायरीमध्ये क्रमांक 44 वर नोंद घेण्यात आली आहे. या तक्रारीची पोलिसांनी शहानिशा केली, भृणहत्या झ ाली का, याची प्राथमिक चौकशी करण्यासाठी शव जिल्हा शल्यचिकित्सकांकडे पाठविले. जी तक्रार सरपंचांनी केली ती फोनवर केली होती, त्यामुळे गुन्हा नोंदविलेला नाही, परंतु स्टेशन डायरीमध्ये नोंद घेण्यात आली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक, बुलढाणा यांनी 16 दिवसांचे भृण व ही भृण जैविक वेस्टमध्ये मोडतात, असे सांगितले आहे.

डॅा.नीलम गो-हे : सभापती महोदय, घनकच-याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही नगरपालिकेची असते. नगरपालिकेची ही जबाबदारी असतांना ही भृण शेतामध्ये टाकण्याची गरज काय होती ? त्या ठिकाणी कंत्राटदाराचा प्रश्नच येत नाही, कारण ही नगरपालिकेची जबाबदारी आहे. या घटनेमध्ये नगरपालिकेने कोणती कार्यवाही केली होती ? सभापती महोदय, हे सर्व प्रकरण संशयास्पद आहे, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. त्या ठिकाणी भृणहत्या परत परत होत आहेत, याचे कारण, मोठया प्रमाणावर स्त्री-गर्भ नको आहे. तीन महिन्यानंतरही गर्भपात केला जातो, ज्या भृणांचे आकार दिसतात, असे भृण परत परत उघडयावर सापडत आहेत. आठ-नऊ महिन्यांची बालके सापडलेली आहेत. त्यामुळे या सर्व प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, शाखा-अकोला आणि मेडिकल मॅनेजमेंट यांची मान्यता घेऊन भृण विल्हेवाटीसाठी कंत्राटदार नेमण्यात आला आहे. हे जे भृण सापडतात ते जैविक वेस्ट आहे. ते सुरक्षित ठिकाणी टाकले पाहिजे,

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिद्धाराम म्हेत्रे..........

त्यावर माती टाकली पाहिजे. परंतु, या प्रकरणी जे भृण सापडले ते उघडयावर होते व हे भृण 16 आठवडयांच्या आतील होते. यासंबंधी नक्की गुन्हा झाला आहे. पोलिसांमार्फत तपास सुरु आहे. त्या ठिकाणच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांनी जिल्हाधिका-यांना पत्र लिहून तालुका दंडाधिका-यांकडून या प्रकरणी चौकशी व्हावयास हवी, कारण जिल्हाधिकारी हे भृणहत्या दक्षता समितीचे अध्यक्ष असतात, असे कळविले आहे. जिल्हाधिका-यांचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. अकोला प्रदुषण मंडळाला जिल्हाधिका-यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत पत्र लिहिले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते तसेच सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या सर्व प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिका-यामार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या गंभीर प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.मार्फत झ ााली पाहिजे.

**उपसभापती** : असे प्रकार वारंवार होत असतील तर स्थानिक वरिष्ठ पोलीस अधिका-यांकडून चौकशी न करता सी.आय.डी.मार्फत चौकशी करावी, अशी जी मागणी करण्यात आली आहे मंत्रिमहोदयांनी मान्य करण्यास हरकत नाही.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना व आपली सूचना लक्षात घेऊन या सर्व प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.मार्फत केली जाईल.

----------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SRR/ MAP/ KGS/ 14:00

## <u>लक्षवेधी सूचना</u>

**पृ. शी**. : वाल्मी संस्थेतील कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन लागू करणे

**मु. शी**. : वाल्मी संस्थेतील कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन लागू करणे यासंबंधी सर्वश्री श्रीकांत जोशी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी यांच्या मातोश्री आजारी असल्यामुळे ते आज येऊ शकलेले नाहीत. कृपया, ही बाब लक्षात घेता ही लक्षवेधी सूचना व्यपगत करु नये, अशी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा पुढील अधिवेशनात घेण्यात येईल.

----------------

..4..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : थर्मलची राख सेंद्रीय खत म्हणून शेतक-यांच्या माथी मारणारे रॅकेट उघडकीस येणे

**मु. शी.** : थर्मलची राख सेंद्रीय खत म्हणून शेतक-यांच्या माथी मारणारे रॅकेट उघडकीस येणे यासंबंधी श्रीमती फौजिया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---------------

...5.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बुधवार, दि.1 ऑगस्ट 2007 रोजीच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत**

**उपसभापती** : सदरहू लक्षवेधी सूचनेवरील चर्चा पुढे ढकलावी, असे पत्र संबंधित मंत्रिमहोदयांनी पाठविले आहे. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा उद्या ठेवण्यात येईल.

---------------

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्र.6 बाबत.**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना या लक्षवेधी सूचनेचे निवेदन मिळालेले आहे काय ? कारण या लक्षवेधी सूचनेचे निवेदन माझ्याकडे आलले नाही.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, आम्हाला सुध्दा या लक्षवेधी सूचनेचे निवेदन मिळालेले नाही.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्र.6 चे निवेदन सन्माननीय सदस्यांना प्राप्त झालेले नसल्यामुळे आपण ही लक्षवेधी सूचना नंतर घेऊ. आता लक्षवेधी सूचना क्र.7 चर्चेला घेण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : प्रिमियर ऑटो लिमिटेड कंपनीच्या कामगारांना देय असलेल्या रकमा अजूनही न देणे.

**मु. शी.** : प्रिमियर ऑटो लिमिटेड कंपनीच्या कामगारांना देय असलेल्या रकमा अजूनही न देणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, धनाजी साठे, रमेश निकोसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"प्रिमियर ऑटो लिमिटेड या कंपनीचे कारखाने अनुक्रमे कुर्ला आणि डोंबिवली येथे असणे, सदर कंपनीच्या व्यवस्थापनाने कंपनी काही वर्षापूर्वी बंद करणे, मात्र डोंबिवलीच्या कारखान्यातील कामगारांना त्यांच्या देय असलेल्या रकमा अजूनही न देणे, कामगारांची पूर्णपणे देणी जोपर्यंत दिली जात नाही तोपर्यंत दोन्ही ठिकाणच्या जागा विक्रीस तसेच जागांच्या जागी इमारती बांधता येणार नाहीत अशी अट घातली असताना प्रत्यक्षात मात्र कुर्ला येथील कारखान्याच्या जागेत इमारतीचे बांधकाम चालू असणे, याबाबत कामगार संघटनेने मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना माहे मे, 2007 वा त्या सुमारास बांधकामास स्थगिती देण्याबाबत दिलेले निवेदन, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

..3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील हा अत्यंत महत्वाचा प्रलंबित प्रश्न असून वेळोवेळी या प्रश्नावर कामगारांतर्फे आंदोलने करुन सुध्दा कामगारांना न्याय मिळालेला नाही. मला सभागृहामध्ये मुद्दाम उल्लेख करावयाचा आहे की, कामगार मंत्री श्री.गणेश नाईक हे लोकप्रिय कामगार मंत्री आहेत. त्यांना या सर्व प्रश्नांची कल्पना आहे. सभागृहातर्फे मी माननीय कामगार मंत्र्यांना विनंती करतो की, या पार्श्वभूमीसंबंधी त्यांनी स्वत: लक्ष घालून त्या कामगारांना योग्य न्याय द्यावा. सभापती महोदय, कामगार विभागाच्या अवर सचिवांनी कामगार आयुक्तांना पत्र पाठविले की, विकासकावर कारवाई करण्यात यावी. कामगार आयुक्तांनी महापालिका आयुक्तांना तसे पत्र पाठविले आणि महापालिका आयुक्तांनी नगर विकास विभागाकडे पत्र पाठविले. आज देखील तेथे बांधकाम सुरु आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शासनाचे असे धोरण आहे की, थकबाकीदार कारखाने असतील तर त्या कारखान्याच्या जमिनीचा विकास करण्यास शासन परवानगी देत नाही. परंतु या धोरणाची कडक अंमलबजावणी होतांना दिसत नाही. विधानसभेचे सदस्य श्री.हरिश्चंद्र पाटील, काही कामगार नेते आणि मी स्वत: त्या ठिकाणी सुरु असलेले बांधकाम बघून आलो होतो. शासन या बांधकामास आज त्वरित स्थगिती देणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, प्रिमियर ऑटोमोबाईल लिमिटेड ही कंपनी मुंबईतील कुर्ला येथे स्थापना झालेली आहे. या कंपनीच्या उत्पादनाचा विस्तार पाहता या कंपनीने ठाणे जिल्हयातील डोंबिवली, मानपाडा येथे दुसरा प्रकल्प सुरु केला. कालांतराने प्रिमियर ऑटोमोबाईल कंपनीने फ्रान्सच्या मे.ऑटोमोबाईल प्युजो लिमिटेड या कंपनीशी भागीदारी करार करुन कंपनीतील कामगारांची सेवा मे.पाल प्युजो लिमिटेडकडे वर्ग केली. कामगारांची सेवा मे.पाल प्युजो लिमिटेडकडे वर्ग करतांना त्या कामगारांची सुरुवातीची सेवा डिस्कन्टीन्यु झाली नाही. कुर्ला आणि मानपाडा येथील कंपनीचे व्यवस्थापन एकच आहेत. त्यांचे अकाऊंट एकच आहे. त्यांचे संचालकही एकच आहेत.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक .....

किंबहुना त्यांच्या जमिनीच्या मालकीचे रेकॉर्डसुध्दा एकच आहे. कुर्ला येथील कामगारांची सर्व देणी व्यवस्थापनाने दिलेली आहेत. मानपाडा येथील बंद पडलेल्या कंपनीतील कामगारांना वेतन, ग्रॅच्युईटी व पी.एफ. न दिल्यामुळे कामगार खात्याने कंपनीस क्लिअरन्स सर्टीफिकेट देण्याचे नाकारले आहे. मानपाडा, डोंबिवली कामगार संघर्ष समिती यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन सादर केले असून प्रिमियर ऑटोमोबाईल कुर्ला येथील कंपनीच्या मूळ जागेवर सुरु असलेल्या बांधकामास स्थगिती आदेश देण्यात यावेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सदरील बांधकाम थांबविण्याची त्यांना सूचना केलेली आहे. याबाबतचे पहिले पत्र दिले होते त्याची फाईल हरविल्याची माहिती कामगार आयुक्तांनी दिली होती. कामगार नेत्यांनी असे म्हटले आहे की, आयुक्तांनी बांधकाम थांबविण्याचे आदेश देऊनसुध्दा कंपनीने बांधकाम न थांबविल्याने कायद्याची पायमल्ली होत आहे. शासनाने आश्वासन दिले आहे की, जोपर्यंत कामगारांना देणी दिली जात नाही तोपर्यंत कोणत्याही विकासकास बांधकाम परवानगी दिली जाणार नाही. माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड व इतर सदस्यांना याबाबतची अधिक माहिती हवी असल्यास मिळू शकेल. हे प्रकरण माझ्याकडे आल्यानंतर मी गांभीर्याने घेतले असून महानगरपालिका आयुक्तांमार्फत पुन्हा स्मरणपत्र देण्यास सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितले आहे की, येथील काम थांबलेले नाही. असे असेल तर महानगरपालिका आयुक्तामार्फत पुन्हा स्मरणपत्र देऊन काम थांबविले जाईल व  काम न थांबल्यास संबंधितांवर अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

**पृ.शी.** : नागपूर व अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष.

**मु.शी.** : नागपूर व अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी सर्वश्री.गिरीष गांधी, डॉ.एन.पी.हिराणी, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गिरीष गांधी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"नागपूर व अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेकडे शासनाचे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष, दिनांक १८ डिंसेबर,२००३ रोजी "नागपूर एकात्मिक रस्ते विकास योजनेसाठी जादाचा ३५ कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्र्यांनी सभागृहात घोषित करुन सदर निधी १५ दिवसात देण्याचे आश्वासन देणे, त्याचप्रमाणे संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी दिनांक १८ मार्च,२००५ रोजी सभागृहात आश्वासन देऊनही हा निधी उपलब्ध न होणे, अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेचा भाग असलेल्या अमरावती शहराच्या पश्चिम बाजूने जाणाऱ्या राष्ट्रिय महामार्गाचा वळणरस्ता बडनेरा-नरखेड रेल्वे लाईनला ९/९६१ कि.मी मध्ये छेदून जात असणे, त्याठिकाणी सदर रेल्वे मार्गावर उड्डाण पुलाच्या कामाला सुरुवात न होणे, त्यामुळे या वळणरस्त्यावर झालेला १५ ते २० कोटी रुपयांचा खर्च वाया जाण्याची निर्माण झालेली शक्यता, दोन महिन्याचा आत सदर प्रस्ताव रेल्वेकडे पाठविण्यात येईल" असे मंत्री महोदयांनी दिनांक ३१ मे,२००४ रोजी सभागृहात आश्वासन देऊनसुध्दा शासनाने प्रस्ताव रेल्वेकडे न पाठविणे, याबाबत शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष व त्यामुळे जनमानसांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष गांधी : सभापती महोदय, लक्षवेधीच्या लेखी निवेदनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरातून तीन प्रश्न उपस्थित होत आहेत. या सभागृहामध्ये दिनांक 18 डिसेंबर 2003 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊनसुध्दा या कामासाठी निधी उपलब्ध झ ाालेला नाही. दुसरा प्रश्न असा आहे की, सार्वजनिक बांधकाम खात्याने येथे उड्डाणपूल आवश्यक आहे असा रिपोर्ट सुरुवातीस दिला होता आणि आता म्हटले आहे की, हया पुलाचे काम करणे अनावश्यक वाटते. माझा तिसरा प्रश्न आहे की, माननीय केंद्रीय रेल्वे मंत्री आणि अर्थमंत्री यांच्यावर विभागाच्या वतीने दबाव आणण्यासाठी व वजन खर्ची् करण्यामध्ये आपण कमी पडत आहोत की काय ? या गोष्टीचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा. माननीय मुख्यमंत्र्यांनी या कामासाठी मान्य केलेला निधी त्वरीत देण्यासाठी कालमर्यादा निश्चित करुन त्याबाबत वक्तव्य करावे अशी मी विनंती करतो.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांनी तीन प्रश्न विचारले आहेत. निधीबाबत मी वस्तुस्थिती सांगू इच्छितो की, विदर्भ विकास पॅकेज जानेवारी 2005 मध्ये जाहीर झाले होते. त्यामध्ये नागपूर व अमरावती आर.डी.बी.साठी निधी जाहीर केला होता. तसे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. त्यापैकी अमरावती आर.डी.बी. चे 25 कोटी रुपये मिळाले असून नागपूर आर.डी.बी. चे 35 कोटी रुपये मिळणे बाकी आहे. ही रक्कम मिळण्यासाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा चालू आहे. माननीय सदस्यांनी रेल्वे उड्डाणपुलाबद्दल विचारले आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, आर.डी.बी.च्या मूळ नकाशामध्ये हा उड्डाणपूल नव्हता. यावर चर्चा करण्यासाठी महानगरपालिकेलाही निमंत्रित करण्यात आले होते. रेल्वे उड्डाणपूल करण्याचे ठरले तर त्यासाठी निधी लागणार होता. महानगरपालिकेनेही सहकार्य करावे अशी त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु अमरावती महानगरपालिकेने सदरचा निधी उपलब्ध करुन देण्यास असमर्थता दर्शविली आहे. जोपर्यत रेल्वे उड्डाणपुलासाठी निधी उपलब्ध होत नाही, तोपर्यत हे काम करता येणार नाही, एवढेच मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, नागपूर आणि अमरावतीचा हा प्रश्न आहे. त्यातील नागपूरचा प्रश्न मी प्रथमत: घेतो. कारण याबाबत येथे जे उत्तर दिले गेले आहे त्यातून या सभागृहाचा अवमान होतो आहे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी याच सभागृहामध्ये स्पष्ट शब्दात जाहीर केले होते की, नागपूरसाठी 35 कोटी रूपये आणि अमरावतीसाठी 25 कोटी रूपयांचा निधी दिला जाईल. असे असतानाही यांनी गेल्या दोन वर्षामध्ये याबाबत काहीच केले नाही. दोन वर्षानंतर हा प्रश्न आला असता मंत्र्यांकडून उत्तर देण्यात आले की, 15 दिवसात आम्ही नागपूरसाठीचे 35 कोटी आणि अमरावतीसाठीचे 15 कोटी देऊ. सभापती महोदय, अमरावतीसाठीचे 15 कोटी दिले परंतु नागपूरसाठीचे 35 कोटी दिले नाहीत हे आक्षेपार्ह आहे. तेव्हा आता तरी आठ नाही निदान 15 दिवसात तरी आपण ही रक्कम नागपूरसाठी उपलब्ध करून द्यावी. नाही तरी दोन वर्षापूर्वी आपण '15 दिवसात देऊ' असे सांगितले होते. आताही आपण तसेच म्हणणार असाल तर मग माननीय मुख्यमंत्री जे काही येथे सांगतात त्याला काही अर्थच नाही आणि मंत्री महोदय सांगतात त्यालाही अर्थ नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी दोन वर्षापूर्वी यासंबंधात प्रश्न विचारला होता की, या बजेटमध्ये देता म्हणता आहात पण बजेट तर उद्या-परवाच आहे. त्यावर मंत्र्यांनी उत्तर दिले की, या बजेटमध्ये नाही तर पुरवणी मागण्यांद्वारा ही रक्कम मंजूर करून घेतली जाईल आणि म्हणूनच निश्चितपणे 15 दिवसात हा निधी दिला जाईल. तेव्हा नागपूरसाठीचे 35 कोटी रूपये 15 दिवसाच्या आत दिले जातील का ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, नागपूरसाठी 35 कोटी रूपये देण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केले होते हे खरे आहे. तेव्हा लवकरात लवकर हा निधी ....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, 'लवकरात लवकर' असे म्हणून चालणार नाही. आम्हाला निश्चित कालावधी सांगितला गेला पाहिजे. म्हणजे असा प्रकार केवळ विदर्भाच्याच माथ्यावर आपण करणार का ? ही गोष्ट अत्यंत आक्षेपार्ह आहे. सभापती महोदय, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट शब्दात जाहीर केले आहे, वाटल्यास मंत्री महोदयांना याला 'नाही' म्हणावे. पण आम्ही या सभागृहाची थट्टा होऊ देणार नाही. आपण पहिली बाब पूर्ण करता. पण मग मुख्यमंत्र्यांनी ठामपणे येथे सांगितले होते की, हा भाग फार मोठ्या अनुशेषामध्ये आहे म्हणून मंत्रिमंडळाने नागपूर व अमरावतीसाठी विशेष निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. तर मग हा विशेष निधी कोणता आहे ? 18 डिसेंबर 2003 ला या सभागृहामध्ये मुख्यमंत्र्यांनी हे जाहीर केले होते

...... यूयू 2 ...

प्रा. बी. टी. देशमुख ......

आणि आजपर्यात ते आश्वासन पूर्ण होत नाही असा हा विशेष निधी आहे का ? सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपल्याला आज हा निधी देणे वा याबाबत उत्तर देणे शक्य होत नसेल तर तसे सांगावे, वाटल्यास उद्या उत्तर देतो म्हणूनही आपण सांगू शकता. सभापती महोदय, मग आम्ही हे सारे येथे ऐकायचे कशासाठी ? तेव्हा हा निधी 15 दिवसाच्या आत आपण दिला पाहिजे, तसा तो दिला जाईल का ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, विदर्भ विकासाच्या बाबीमध्ये याचा समावेश होता आणि म्हणूनच मुख्यमंत्र्यांनी हे कबूल केले होते. तेव्हा नागपूरसाठीचा 35 कोटी रूपयांचा निधी एक महिन्यामध्ये दिला जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील मंत्र्यांनी एक महिन्याच्या आत रेल्वेचे नकाशे पाठवू म्हणून सांगितले होते. आता रेल्वेचे नकाशे पाठविण्यास पैसे नाहीत असे कृपा करून मंत्र्यांनी म्हणू नये. सभापती महोदय, या सभागृहामध्ये मंत्र्यांकडून 31 मे 2004 ला स्पष्टपणे आश्वासन दिले होते आणि ते आश्वासन आम्ही या लक्षवेधी सूचनेमध्ये कोट केलेले आहे. यात पैशाचा प्रश्न नाही. दिलेले आश्वासन पूर्ण तुम्ही केले पाहिजे. रेल्वेचे नकाशे पाठविण्याचीच केवळ गोष्ट आहे आणि याबाबत सभागृहामध्ये पश्चिम महाराष्ट्राचे असलेले मंत्री श्री.विक्रमसिंह पाटणकर यांनी एक महिन्यात पाठविण्यात येतील असे सांगितले होते. तेव्हा आता तुम्ही ते दोन महिन्यांमध्ये तरी पाठविणार का ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, ज्या रेल्वे उड्डाण पुलाबद्दल सन्माननीय सदय आग्रह धरीत आहेत तो मूळ आराखड्यामध्ये समाविष्ट नव्हता. तरीसुद्धा त्या ठिकाणी रेल्वे लाईन वरून पूल बांधावयाचा की लेव्हल क्रॉसिंग करावयाचे ....

( यानंतर श्री. सरफरे ..... व्हीव्ही 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी आपल्याला फोटो दाखवितो, कॅसेट दाखवितो, प्रेस कॉन्फरन्सचा वृत्तांत दाखवितो. या गावाच्या बाहेर तुम्ही जाहीर केले त्याविषयी मी बोलत नाही. माझे स्पष्ट म्हणणे आहे की, आपण एक महिन्यात किंवा दोन महिन्यात...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मूळ आराखडा आयआरडीपी, अमरावतीचा केला होता त्यामध्ये उड्डाण पूलाचा समावेश नाही. तरीसुध्दा माननीय सदस्यांचा फार आग्रह आहे. आमची अशी मागणी होती की, त्याठिकाणी उड्डाण पूल न करता लेव्हल कॉसिंग करावे. परंतु माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, त्याठिकाणी लेव्हल क्रॉसिंग न करता आरओपी करावे. आरओपी करण्यासाठी अंदाजपत्रक आणि प्रकल्प सल्लागारासाठी प्रोजेक्ट मॅनेजिंग कन्सल्टन्सीची नेमणूक 7 जूनला केली आहे. आणि त्यांना प्रकल्पाचे संपूर्ण नकाशे व आराखडा तयार करण्यास सांगितले आहे. त्यांच्याकडून दीड ते दोन महिन्यात आराखडा आल्यानंतर ते रेल्वे डिपार्टमेंटकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येईल.

प्रा. बी. टी. देशमुख : मंत्रिमहोदयांनी कन्सल्टंटचे उत्तर 9 वेळा दिले आहे...

उपसभापती : मंत्रिमहोदयांनी कन्सल्टंट नेमण्यात आला असून दोन महिन्यात आराखडा मिळेल असे सांगितले आहे.

प्रा. बी. टी.देशमुख : सभापती महोदय, माझा प्रश्न पूर्ण झाल्यानंतर आपण मला मदत केली तर आनंद होईल. आपण कन्सल्टंटबाबत पाच-सहा वेळा सांगितले. त्याबाबत आपण पॉझिटीव्ह उत्तर दिले असल्यामुळे मी पुन्हा ते उगाळत नाही. माझे एकच म्हणणे आहे की, रेल्वे मॅन गेट देत नाही. त्यांचे पत्र माझ्याकडे असून मी ते आता वाचून दाखवित नाही. याचे कारण तुम्ही नकाशे पाठविण्याबाबत कबूल केले आहे. प्रश्न असा आहे की, कन्सल्टंटकडून आराखडा तयार करुन घेऊन हा प्रस्ताव किती दिवसात रेल्वेकडे पाठविण्यात येईल?

श्री.अनिल देशमुख : श्री. एस. एन. भोगे नावाचे कन्सल्टंट नेमले आहेत. त्यांनी एक ते दीड महिन्यामध्ये संपूर्ण नकाशे देण्याचे कबूल केले आहे. त्यांच्याकडून सरकारकडे नकाशे आल्यानंतर दोन महिन्याच्या आतमध्ये संपूर्ण नकाशे रेल्वे डिपार्टमेंटकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : चंद्रपूर जिल्हयातील कोळश्यांच्या खाणीमुळे तेथील जनतेला होत असलेला प्रदूषणाचा त्रास.

मु. शी : चंद्रपूर जिल्हयातील कोळश्यांच्या खाणीमुळे तेथील जनतेला होत असलेला प्रदूषणाचा त्रास यासंबंधी सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, संजय दत्त, सुधाकर गणगणे,रमेश निकोसे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चंद्रपूर जिल्ह्यात अंबुजा सिमेंट, माणिक गड सिंमेट, अल्ट्राटेक सिमेंट ए.सी.सी सिमेंट इत्यादी सिमेंटचे ४ मोठे उद्योग असणे, तसेच थर्मल पावर हॉऊस, चंद्रपूर सिध्दावली आर्यन ओव्हर गोपाणी आर्यन ओव्हर, ताडाली गेरस आर्यन ओव्हर घुग्धुस एलाइडस्टील व चंद्रपूर जिल्ह्यातील वेस्टर्न कोलफिल्ड मनिकगड स्टेशन गुप्ता आर्यन ओव्हर, चंद्रपूर माजरी, बल्हारपूर, घुग्धुस येथील ओपन कास्ट, इत्यादी खाणी असणे, कोळश्यांच्या खाणीमुळे जनतेला प्रदुषणामुळे अनेक प्रकारचे रोग होणे, नदीच्या पात्रात कोळश्यांच्या खाणीतून बाहेर टाकले जाणारे मातीचे ढिगारे टाकले जात असल्यामुळे मागील जुलै,२००६ मध्ये जोरदार अतिवृष्टी झाल्याने महापूर येऊन त्यामुळे पावसाचे पाणी लोकांच्या शेतात, गावात तसेच शहरात शिरत असणे यामुळे जनतेचे व शासकीय संपत्तीचे नुकसान होत असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील जनतेच्या जिवीताला धोका निर्माण होणे व काही प्रमाणात लोकांची जिवीतहानी होणे, याबाबत शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन सर्व कंपन्यांनी प्रदूषण न करण्याबाबत सूचना देण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली व करावयाची तातडीची कारवाई व उपाययोजना "

श्री. गणेश नाईक ( पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, सभापती महोदय, विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळमध्ये वणी आणि नागपूर जिल्हयामध्ये उमरेड येथील कोल माईन्स केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहेत. येथील कोळशाच्या खाणी अंडरग्राऊंड आहेत. कोल बेअरींग ॲक्टप्रमाणे त्यामधील कोळसा काढल्यानंतर त्यामध्ये रेती भरावी लागते. एकदा कोळशाच्या खाणीमधून कोळसा काढून झाल्यानंतर त्या जमिनीची लेव्हल केली जाते ती पुन्हा खोदली जात नाही. अशी जमीन तेथील कास्तकारांना परत दिली पाहिजे. चंद्रपूर जिल्हयामध्ये वणी तालुक्यात 37 कोळशाच्या खाणी आहेत. त्या कोळशाच्या खाणीमधून कोळसा काढल्यानंतर त्याठिकाणी मातीचा ढिगारा तयार होतो. पावसाळयामध्ये त्या ढिगाऱ्यामधील माती तेथील नदी आणि नाल्यांमध्ये जाते.त्यामुळे त्या गावामध्ये येणारा पूर हा नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे. अशाप्रकारे जुलै 2006 रोजी त्या ठिकाणी पूर आल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या भागाला भेट दिली होती. त्या जिल्हयामध्ये अंबुजा सिमेंट, माणिक गड सिमेंट, अल्ट्राटेक सिमेंट, ए.सी.सी. सिमेंट इत्यादी सिमेंटचे मोठे उद्योग आहेत. त्या कारखान्यामधून मोठया प्रमाणावर प्रदूषण होते. आपल्या पर्यावरण विभागाचे अधिकारी त्या कारखान्यांना भेट देतात त्यावेळी प्रदूषण नियंत्रण पंखे सुरु केली जातात. आणि अधिकारी गेल्यानंतर ते पंखे बंद करण्यात येतात. परवाच्या दिवशी वर्तमानपत्रामध्ये एका घडलेल्या दुर्घटनेची बातमी छापून आली आहे ती मी आपणाकडे पाठविते. तेथील एका कोळशाच्या खाणीमध्ये रेती भरली नसल्यामुळे त्याठिकाणी मोठा खड्डा राहिल्यामुळे माठी दुर्घटना घडली असती. याबाबत शासन दखल घेणार आहे की नाही? प्रदूषणामुळे तेथील लोकांना शारिरीक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामध्ये काही लोकांना श्वसनाचा त्रास होत आहे तर काही लोकांना कॅन्सर, आणि हृदरोगाचा त्रास होत आहे, काही लोकांचे डोळे जाणे असे प्रकार होत आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरे (पुढे सुरू....

या बाबतीमध्ये शासन याबाबतीत लक्ष घालणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये ए.सी.सी.सिमेंट, अंबुजा सिमेंट, माणिक गड सिमेंट अल्ट्राटेक सिमेंट इत्यादी चार मोठे उद्योग आहेत. यामुळे निश्चितपणे त्या ठिकाणी प्रदूषण होते ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत सर्व उद्योगाच्या व्यवस्थापनांना पाण्याचे प्रदूषण नियंत्रित करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यांनी तशाप्रकारची योजना तयार केलेली आहे. सिमेंट उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी इलेक्ट्रो स्पेशिफिक स्पेशोमिटर यंत्रणा बसविलेली आहे. त्या सर्वांकडून बँक गॅरंटी घेतलेली आहे. मोठमोठ्या उद्योगांनी कायद्याचा भंग केला तर त्यांच्यावर केसेस घालण्यात येतात. एक गोष्ट निश्चित आहे की, यापूर्वीच्या कालखंडामध्ये मोठयाप्रमाणात हवेचे प्रदूषण होत होते. परंतु गेल्या 7-8-10 वर्षामध्ये आमुलाग्र बदल झालेला आहे. हवेचे प्रदूषण कमी प्रमाणात होत आहे. ते प्रदूषण देखील कायम स्वरूपात नियंत्रित करण्याच्यादृष्टीने शासन वारंवार बैठका घेत असते. त्याचबरोबर समित्याही गठीत केलेल्या आहेत. त्या ठिकाणचे अधिकारी या सर्व गोष्टींवर बारकाईने नजर ठेवून आहेत.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : यापूर्वी जूनमध्ये एक बैठक झालेली होती. ज्यावेळेस अधिकारी किंवा कोणी याबाबतची पहाणी करण्यास जातात, त्यावेळेस त्या कंपन्या पंखे चालू करतात. या पंख्याच्या संबंधातील विजेचे मिटर हे त्यांच्या कंपनीमध्ये असते. ते मीटर स्वतंत्र खांबावर बसवावेत. म्हणजे किती वेळ पंखे चालले, यासाठी किती युनिट खर्च पडले हे पहाता येईल. यापूर्वी रोज 100 युनिट खर्ची होत असेल तर नव्याने स्वतंत्र लावलेल्या मिटरवर रोज 100 मीटर युनिट होते काय? याची तपासणी करता येईल. त्यांना आज एका दिवसाला एक ते दोन लाखाचे विजेचे बील येते, ते आपल्याला पडताळून पहाता येईल. कोणी अधिकारी गेले तरच त्या ठिकाणचे पंखे चालू करतात नंतर ते बंद ठेवतात. अगोदरच चंद्रपूर, गडचिरोली येथील नक्षलवादामुळे तथील लोक त्रस्त आहेत, त्यामध्ये अशाप्रकारचे प्रदूषण होत असेल तर ते योग्य नाही. प्रत्येक वेळेला आश्वासन दिले जाते, पण पुढे काही होत नाही. याबाबत काय उपाययोजना करणार आहात ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक : दिनांक 29, 30 मे 2007 रोजी राज्य परिवहन मंत्री महोदयांनी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला, तेव्हा त्यांनी कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधाने बैठक घेतलेली होती. त्या बैठकीमध्ये प्रदूषण नियंत्रणाच्या अनुषंगाने ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आलेला आहे, त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी चालू आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. त्या ठिकाणी पंखे लावण्यास सांगितले, त्याप्रमाणे त्यांनी पंखे लावलेले आहे. कोणी चौकशीसाठी गेले, तरच तेथील पंखे चालू केले जातात आणि एरव्ही ते बंद ठेवतात. त्यांना रोजचे एक-दीड लाख रुपये बील येत असेल तर मुंबईमध्ये जसे फायर फायटिंगची यंत्रणा इमारतीमध्ये लावण्यात येते व ती यंत्रणा जरी त्यांनी वापरली नाही तरी त्यांना फीक्स रक्कम आकारली जाते. त्याप्रमाणे याबाबतीत सुध्दा त्यांनी अमुक इतकी रक्कम भरली पाहिजे, अशाप्रकारचे बंधन घालण्याबाबत विचार करणार आहात काय ?

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी केलेली सूचना अतिशय योग्य आहे. खरोखर 12 तासामध्ये अमुक इतके युनिट वापरत असतील त्याप्रमाणे महिन्याचे कॅलक्युलेशन करून फिक्स रक्कम आकारली तर त्यांची यंत्रणा कार्यान्वित राहील आणि त्यांचा वीज वाचविण्याचा प्रयत्न थांबेल.

---

यानंतर श्री.बरवड.....

**लक्षवेधी सूचना क्रमांक 8 बाबत**

**उपसभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक 8 वर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, ॲड. अनिल परब यांनी दिलेली लक्षवेधी सूचना आहे. परंतु संबंधित खात्याचे माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत. आज ज्या लक्षवेधी सूचना पुकारल्या परंतु माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नव्हते त्या लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येतील. आता माननीय मंत्रिमहोदय सभागृहात आले तरी आज यानंतर लक्षवेधी सूचना घेतल्या जाणार नाहीत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यामध्ये सन्माननीय सदस्यांचा काय दोष आहे ?

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना दोष दिलेला नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उद्या आजच्या आणि उद्याच्या बऱ्याच लक्षवेधी सूचना येतील.

**उपसभापती** : आपण परवा पहाटेपर्यंत बसू.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सोलापूर जिल्ह्यात शासनमान्य दराने विक्री होणाऱ्या रॉकेलचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार होणे

**मु. शी.** : सोलापूर जिल्ह्यात शासनमान्य दराने विक्री होणाऱ्या रॉकेलचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार होणे यासंबंधी सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, संयज दत्त, रमेश निकोसे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

---

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ. शी.** : ठाणे जिल्ह्यात रोजगार हमी योजनेतून जेट्रोफा लागवडीचे कमी करण्यात आलेले उद्दिष्ट

**मु. शी.** : ठाणे जिल्ह्यात रोजगार हमी योजनेतून जेट्रोफा लागवडीचे कमी करण्यात आलेले उद्दिष्ट याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" रोजगार हमी योजनेतून जेट्रोफा लागवड कार्यक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यास चालू 2007-08 वर्षी 2000 हेक्टरचे उद्दिष्ट मे, 2007 वा त्यासुमारास देण्यात आले होते. मात्र जुलै, 2007 महिन्यात अचानक त्यात बदल करुन त्यामधून 700 हेक्टरचे उद्दिष्ट कमी करण्यात आले आहे. परिणामी ठाणे जिल्ह्यातील कुपोषितग्रस्त भागातील लाभधारक शेतकरी, आदिवासी शेतकरी, अल्प भूधारक शेतकरी यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण पसरले आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, पंतप्रधान रोजगार हमी योजना, तसेच राज्यातील रोजगार हमी योजना अशा अनेक योजना अलीकडे राबविण्यात येत आहेत. मात्र ठाणे जिल्ह्यातील जेट्रोफाचे उद्दिष्ट कमी करण्यात आले आहे याबाबत जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण पसरले आहे. तरी याबाबत शासनाने दखल घेऊन या अधिवेशनादरम्यान याबाबतची भूमिका स्पष्ट करुन पूर्ववत 2000 हेक्टरचे उद्दिष्ट देऊन या पावसाळ्यात लागवड करण्याबाबतचे आदेश शासनाने ठाणे जिल्हा प्रशासनाला देण्याची आवश्यकता आहे. या सार्वजनिकदृष्ट्या अत्यंत महत्वाच्या विषयावर मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

-------

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ग्रामीण भागात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने खांबावर केबल टाकण्यास बंदी केल्यामुळे केबल धारकांचा व्यवसाय धोक्यात येणे.

**मु. शी.** : ग्रामीण भागात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने खांबावर केबल टाकण्यास बंदी केल्यामुळे केबल धारकांचा व्यवसाय धोक्यात येणे याबाबत श्री. धोंडीराम राठोड, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. धोंडीराम राठोड ( नामनियुक्त ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" राज्यातील ग्रामीण भागात ठिकठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विद्युत खांबावर केबल टाकून केबलधारक व्यवसाय करीत असतात परंतु विद्युत मंडळ या केबल धारकांना विद्युत खांबावर टाकलेली केबल टाकण्यास बंदी करुन ती काढत असल्यामुळे केबल धारकांचा व्यवसाय धोक्यात आलेला आहे. परंतु ठाणे जिल्ह्यात मात्र महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ या केबल धारकांकडून प्रत्येक पोलला (खांबाला ) 50 रुपये याप्रमाणे भाडे आकारुन खांबावर केबल टाकण्यास ठाणे महापालिकेने ठराव करुन परवानगी दिलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यातील ग्रामीण भागातही नगरपालिकांनी ठराव करुन प्रत्येक खांबाला योग्य भाडे आकारुन केबल धारकांना खांबावर केबल टाकण्यास परवानगी द्यावी. यामुळे केबल धारकांचा व्यवसाय होऊन शासनाचा महसूलही वाढण्यास मदत होईल. हा विषय महत्वाचा असल्याने मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे."

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

**पृ. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्रशिक्षणार्थींना मानधन, प्रवास व दैनिक भत्ता न मिळणे.

**मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्रशिक्षणार्थींना मानधन, प्रवास व दैनिक भत्ता न मिळणे याबाबत श्री. व्ही. यू. डायगव्हाणे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे ( नागपूर विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" चंद्रपूर जिल्ह्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता 7वी व 8 वी ला शिकविणाऱ्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण व इतर विषयाचे प्रशिक्षण दिनांक 14.10.2006 ते 19.10.2006 दरम्यान आयोजित केले होते. या प्रशिक्षणात सहभागी 169 प्रशिक्षणार्थी व 9 तज्ज्ञ मार्गदर्शक यांना देय असणारे मानधन, प्रवास व दैनिक भत्ता, सादिल खर्च नियमाप्रमाणे दिलेले नसल्याच्या अनेक तक्रारी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने संबंधित अधिकाऱ्यांकडे केल्या आहेत. दैनदिन चहापान, अल्पोपहार व इतर सुविधा दिल्या नाहीत. जिल्हा शिक्षणाधिकारी व त्यांचे सहकाऱ्यांनी या प्रकरणात मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाली असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, जि. चंद्रपूर या संघटनेने दिनांक 19.10.2006 ला दुपारी 2.00 ते 6.00 वाजेपर्यंत शिक्षण अधिकारी, चंद्रपूर यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. लोकप्रतिनिधी व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी यांनी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेशी मार्च, 2007 व 7 जुलै, 2007 रोजी चर्चा करुनही देय असलेली बाकी अद्यापही दिली नाही. ेकउपरोक्त प्रकरणी व सर्व शिक्षा अभियानांतर्गत योजनांमध्ये झालेल्या आर्थिक अनियमिततेची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 14:35

**पृ. शी.** : सातबारावर झालेल्या फेराची नोंद संगणकात तलाठ्याकडून केली जात नसणे

**मु. शी.** : सातबारावर झालेल्या फेराची नोंद संगणकात तलाठ्याकडून केली जात नसणे याबाबत प्रा. फौजीया खान, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : मा□□य सदस्य प्रा. फौजीया खान यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. फौजीया खान (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडते.

"राज्यात संगणकीय सातबाराऐवजी हस्तलिखित सातबाराचा मोठ्या प्रमाणावर होत असलेला वापर, या सातबारावर झालेल्या फेराची नोंद संगणकात तलाठ्याकडून केली जात नसणे, यामध्ये मोठया प्रमाणावर होत असलेले गैरप्रकार, राज्य शासनाने लाखो रुपये खर्च करुन जिल्ह्याच्या ठिकाणासह तालुकास्तरावर संगणकीय सातबाराची व्यवस्था केलेली असणे, हे सातबारा सेतू सुविधा केंद्रातून खातेदारांना देण्यात येणे, तलाठ्यांना आपल्या तलाठी सज्जातील शेतक-यांच्या झालेल्या सौद्याची अथवा इतर माहिती पंधरा दिवसात तहसील कार्यालयात येऊन नोंद करणे आवश्यक असणे, संगणकावर काम करण्यासाठी तलाठ्यांना प्रशिक्षणही देण्यात येत असणे, परंतु तलाठी याकडे करीत असलेले दुर्लक्ष, परिणामीस पूर्वीची नोंद असलेला सातबारा सेतू सुविधा केंद्राकडून दिला जात असणे, यातून गैरप्रकार झाल्याचे अनेक ठिकाणी उघडकीस येत असणे, संगणकीय सातबाराशिवाय हस्तलिखित सातबाराही खरेदी खत वाटणीपत्रासाठी मागविण्यात येत असल्याने शेतक-यांना दुप्पट किंमत मोजावी लागत असणे, पणिामी शेतक-यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना वाढीस लागणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका यासंबंधी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कल्याण, जि.ठाणे येथील काळू नदीवरील पूल वाहून जाणे

**मु. शी.** : कल्याण, जि.ठाणे येथील काळू नदीवरील पूल वाहून जाणे याबाबत श्री. संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.संजय केळकर यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"कल्याण (जि. ठाणे) जवळ असणा-या वासुंद्री पंचक्रोशीतील जनतेस काळू नदीवर मे, 2005 मध्ये पूल मिळाला होता. सदर पुलामुळे टिटवाळा परिसरातील दहा-बारा गावांना आधार मिळून ते केवळ 15 मिनिटात टिटवाळयाला पोहोचायचे. परंतु जुलै, 2005च्या अतिवृष्टीमध्ये सदर पूल वाहून गेल्याने रहिवाश्यांची पुनश्च पहिल्या सारखी पायपीट सुरु झाली आहे. त्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना रस्ताच नसल्याने रेल्वे मार्गातून मार्ग काढून पायपीट करीत शाळेत जावे लागणे, यामुळे एका विद्यार्थ्यांस रेल्वेचा धक्का लागून तो कोमात जाणे आदी भयानक दुर्घटना घडलेल्या असणे, परिसरातील ग्रामस्थांना वाहून गेलेल्या पुलाच्या जागी नवीन पूल होणार किंवा नाही, की होडीच्याच प्रवासाने जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागणार अशी साधार भीती वाटणे, सदरची बाब अतिशय गंभीर असून नवीन पुलाच्या बांधणीची तातडीची गरज असल्याने सदर बाब विशेष उल्लेखाद्वारे सभागृहाच्या निदर्शनास आणित आहे, तरी कृपया कार्यवाही व्हावी, ही विनंती.

----

..3..



MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 14:35

**पृ. शी.** : ग्रँट  वैद्यकीय महाविद्यालयातील कॉपी प्रकरणी कारवाई न होणे

**मु. शी.** : ग्रँट  वैद्यकीय महाविद्यालयातील कॉपी प्रकरणी कारवाई न होणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी ए□ विशेष उल्ले□ाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचाा मांडतो.

"ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या कॉपी केलेल्या प्रबंधाचा प्रश्न या सभागृहात अनेकदा गाजला, अनेक वेळा प्रश्नोत्तरे झाली, या प्रकरणी विद्यार्थी  डिबार्ड झाले. पण अजूनही ह्या सर्व प्रकरणाच्या मुळाशी असलेले डॉ. चित्तरंजन पुरंदरे यांना मात्र राज्य शासनाने डॉ. नगराळे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून त्यांनी केलेल्या शिफारशींना वाटाण्याच्या अक्षता लावून डॉ. पुरंदरे यांचा राजीनामा चौकशी सुरु असतानाच पास केला गेला, हे राज्य शासनाचे पाप आहे. आजपर्यन्त हा अहवाल मात्र गुलदस्त्यातच आहे. यावर मुख्य सचिव        डॉ. डी.के.शंकरन यांनी दिनांक 24.4.2007 रोजीच्या पत्राने कार्यवाहीबरोबरच फौजदारी कार्यवाही सुध्दा आवश्यक आहे असे नमूद केले आहे,  त्याचे काय झाले ? या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

सभापती महोदय, हा कॉपी केलेल्या प्रबंधाचा प्रश्न सभागृहात गाजला. अनेक प्रश्न या सबंधात उपस्थित झाले, अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून देखील हा प्रश्न या ठिकाणी मांडण्यात आला होता. या प्रकरणी 5 विद्यार्थी डिबार झाले. परंतु या प्रकरणाच्या मुळाशी असलेले        डॉ. चित्तरंजन पुरंदरे यांना मात्र राज्य शासनाने डॉ. नगराळे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून त्या समितीने केलेल्या  शिफारशींना वाटाण्याच्या  अक्षता लावल्या  आणि डॉ. पुरंदरे यांना

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



(डॉ. दीपक सावंत...)

पदमुक्त केले. चौकशी चालू असताना अशा प्रकारे त्यांना पदमुक्त करणे हे योग्य नाही. या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे. तत्कालीन मुख्य सचिव डॉ. डी.के.शंकरन यांनी आपल्या अहवालामध्ये असे म्हटलेले आहे की, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयाच्या संबंधित विभाग प्रमुखांनी सर्व पुराव्यानिशी लेखी तक्रार केली होती. त्या तक्रारीवर प्रथम तीन डॉक्टरांच्या समितीने प्राथमिक चौकशी करुन डॉ. पुरंदरे, डॉ. जोशी व डॉ. लोपेझ हे दोषी आहेत. त्यानंतर सह संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सखोल चौकशी करुन दुस-या चौकशीतही त्यांनी या सर्व डॉक्टरांना दोषी धरले आहे. अहवालामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, विद्यार्थी ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रत्यक्ष काम करीत नसतानाही त्यांनी परीक्षेला बसण्याची पात्रता पूर्ण करता यावी म्हणून अनुभवाची खोटी प्रमाणपत्रे देणे हे गंभीर स्वरुपाचे आरोप असून प्रशासकीय कार्यवाहीबरोबरच फौजदारी कार्यवाही सुध्दा आवश्यक आहे. विशेषतः डॉक्टरीसारख्या पेशामध्ये स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा गैरफायदा घेवून या डॉक्टरांनी केलेली कृती पूर्णपणे अक्षम्य आहे. सभापती महोदय, अनेकदा मागणी करुन देखील आम्हाला अहवाल मिळालेला नाही. हा अहवाल आम्हाला केव्हा मिळेल ? तसेच या प्रकरणी दोषींवर केव्हा कारवाई करण्यात येईल ? मुख्य सचिवांनी दिलेल्या अहवालानुसार कारवाई केली जाणार आहे की नाही या प्रश्नांची उत्तर शासनाने द्यावीत अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

--

.....नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे येथील टाटा यझाकी कंपनीमधील महिला कामगारांवर होणारे अत्याचार.

**मु.शी.**: पुणे येथील टाटा यझाकी कंपनीमधील महिला कामगारांवर होणारे अत्याचार. याबाबत डॉ.नीलम गो-हे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"पुणे वाघोली-राहू रोड, केसनंद,पुणे-7 येथील टाटा यझाकी ही टाटा व जपानी कंपनीची संयुक्त कंपनी असून सदर कंपनीमध्ये टाटा यझाकी कामगार युनियन, ही मान्यता प्राप्त कामगार संघटना असून, सदर युनियनमध्ये तेथील कामगार सभासद आहेत. टाटा यझाकी कंपनीमधील महिला कामगारांची तेथील अधिकारी छेडछाड करीत असून, त्यांना अवमानित करण्यात येणे, गरोदर स्त्रियांना मुद्दाम जाणीवपूर्वक अवजड कामे देणे, कामगारांना धमक्या देणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याची धमक्या देण्यात येणे, त्यांना ओव्हरटाईम न देता जादा काम करुन घेणे. कामगारांना पाणी पिण्यासही न सोडणे, अशाप्रकारे कामगारांच्या विशेषत: महिला कामगारांचा तेथील व्यवस्थापन करीत असलेला छळ व अत्याचार, टाटा यझाकीमधील टाटा संस्कृती पूर्ण नष्ट झाली असून, तेथील कामगारांच्या मागण्या नाकारण्यात येणे व त्यांचा छळ करणे ही बाब गंभीर असून सदर कंपनीतील कामगारांवरील अत्याचाराची चौकशी करुन तेथील अत्याचार बंद करण्याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या कंपनीमधील महिला परवाच मला येऊन भेटून गेल्या तेव्हा त्यांनी सांगितले की, या कंपनीतील गर्भवती महिला कामगारांवर वेदनादायक अत्याचार केले जातात आणि म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, याबाबतीत आपण लक्ष घालण्याची गरज आहे. सदर कंपनीतील महिलांनी असेही सांगितले की, सदर अत्याचारांचा मुंडन करुन निषेध करण्याशिवाय त्यांच्याजवळ अन्य कोणताही मार्ग शिल्लक राहिलेला नाही.

**उपसभापती** : महिला कामगारांवर जर अशाप्रकारचे अत्याचार होत असतील तर पुणे पोलीस अधीक्षकांना ताबडतोबीने सक्त सूचना पाठवा कारण त्यांच्या कार्यकक्षेतील ही बाब आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

यासंदर्भात ताबडतोब चौकशी करुन त्याच्या रीतसर कारवाईचा अहवाल येत्या सात-आठ दिवसांमध्ये शासनाला सादर करण्यात यावा. यासंदर्भामध्ये पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविल्या आहेत का ? नसल्यास, ताबडतोबीने त्या नोंदविण्यात याव्यात. पुणे येथील पोलीस अधीक्षकांनी ताबडतोबीने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सात-आठ दिवसांच्या आत केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्यात यावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, याप्रकरणी एकूण 10 महिला कामगारांचे गर्भपात झालेले आहेत.

श्री.सुनील तटकरे : होय.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, धन्यवाद.

-----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकणातील औद्योगिक वसाहतीमधील कामगारांचे सुरक्षा व आरोग्य

**मु.शी.**: कोकणातील औद्योगिक वसाहतीमधील कामगारांचे सुरक्षा व आरोग्य याबाबत श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" कोकणातील ठाणे - रायगड आणि रत्नागिरी या जिल्हयांत अनेक औद्योगिक वसाहतींतून हजारोच्या संख्येने लहान कारखाने आहेत. त्यामध्ये काम करणा-या कामगारांची सुरक्षा व आरोग्य उत्तम राखले जाते की नाही हे पाहण्याची जबाबदारी राज्य शासनाच्या औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयावर आहे. कोकण विभागासाठी एका सहसंचालकाचीही नियुक्ती केलेली आहे. या संचालनालयाने कामगारांची सुरक्षा आणि आरोग्य यासाठी सरकारने केलेल्या नियमांचे कारखानदारांकडून पालन होते किंवा नाही यावर लक्ष ठेवणे अपेक्षित आहे. तसेच, प्रत्येक कारखान्यातील प्रकल्पांची रचना आणि कार्यपध्दती या बाबीही याच संचालनालयाच्या अधिकार क्षेत्रात येतात. परंतु या संचालनालयाकडून ही जबाबदारी नीट पार पाडली जात नसल्याने अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. कोकणपट्टीत सर्वाधिक रासायनिक कारखाने आहेत. या सर्व औद्योगिक वसाहतींमध्ये लहान मोठया आगींमुळे कारखानदारीला फटका बसत असला तरीही त्या ठिकाणी अग्निशमक दलांची कायमस्वरुपी सोय नाही. अनेक कारखान्यांमध्ये रसायने टँकरमध्ये रिकामे करतांना किंवा ज्वलनशील रसायनांचा हवेशी आलेल्या संपर्कामुळे तसेच धातू किंवा तत्सम पदार्थांच्या घर्षणाने निर्माण झालेल्या उष्णतेमुळे आगी लागल्याची उदाहरणे आहेत. असे असूनही बहुतांश कारखान्यात कामगारांना रसायने हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जात नाही. अपघात झाला तर कोणत्या उपाययोनजा करायच्या याचेही त्यांना ज्ञान नसते. बहुतेक कारखान्यांमध्ये कामगारांसाठी दर्जेदार व पुरेशी सुरक्षा साधने नाहीत. कारखान्यांकडून कामगारांची सुरक्षितता आणि आरोग्य याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे कारखान्यातील अपघातांमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. अनेक अपघातांची पोलीस अन्य कायदेशीर संस्थेकडे नोंद केली जात नाही. अपघातांची कायदेशीर नोंद न झाल्याने अनेकदा अपघातग्रस्त कामगाराला नुकसान भरपाईपासून

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

वंचित व्हावे लागते. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे वतीने राज्य, जिल्हा ते तालुका पातळीपर्यंत आपत्कालीन व्यवस्थापन समित्या स्थापन केल्या जातात. या समित्यांमध्ये रासायनिक कारखान्यांचे प्रतिनिधी, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था, एम.आय.डी.सी. चे अधिकारी, लोकप्रतिनिधी पत्रकार आदींचा समावेश असतो. या समित्यांनी कारखान्यातील सुरक्षा व्यवस्थेचा व इतर परिस्थितीचा वेळोवेळी आढावा घेऊन औद्योगिक दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सुचवाव्यात, असे शासनाला अपेक्षित आहे. परंतु संबंधित संचालनालयाकडून या समित्यांच्या बैठकाच फारशा आयोजिल्या जात नाहीत. त्यादृष्टीने सरकारचा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागा हा कामगारांना वरदान तर ठरलेला नाहीच, पण तो कारखानदारांनाही एक डोकेदुखी ठरलेला आहे. त्यामुळे या विभागाच्या कामाच्या पध्दतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करु इच्छितो.

------

यानंतर श्री. कानडे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वा. पुन: भरेल.

( 2.48 ते 3.15 मध्यंतर )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>मध्यंतरानंतर</u>**

**<u>(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)</u>**

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 16 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

--------

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

पृ.शी. मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी ( सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO. V OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.)**

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 5- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकाची पार्श्वभूमी मी थोडक्यात सांगू इच्छितो. कल्याण, डोंबिवली महानगरपालिकेमध्ये झालेल्या अनाधिकृत बांधकामांच्या संदर्भात तपासणी करण्यासाठी काकोडकर समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या काकोडकर समितीचा अहवाल शासनाने स्वीकारला असून त्यात काही महत्वाच्या शिफारसी केलेल्या आहेत. अनाधिकृत इमारतीच्या संदर्भातील विषय सगळयांसाठी महत्वाचा झालेला आहे. अनाधिकृत बांधकामाचा विषय हा सर्वसामान्य लोकांचा महत्वाचा आणि जिव्हाळयाचा विषय आहे. मग भिवंडी महानगरपालिका असो किंवा आपली उल्हासनगर महानगरपालिका असो किंवा नगरपालिका असो या ठिकाणी अनाधिकृत

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभातपती श्री. रामनाथ मोते)**

श्री. राजेश टोपे ......

बांधकामे होऊ नयेत यासाठी हा विषय महत्वाचा विषय आहे. अनाधिकृत बांधकामाचा विषय हा सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आणि जिव्हाळयाचा विषय आहे. काकोडकर समितीने कल्याण-डोंबिवली या ठिकाणच्या अनाधिकृत बांधकामाच्या यासंदर्भात अहवाल दिलेला असून त्यांनी काही महत्वाच्या शिफारसी देखील केलेल्या आहेत. समितीच्या शिफारसींच्या अनुषंगाने हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. ज्या अनाधिकृत इमारती किंवा बांधकामे आहेत त्यांच्याकडून सुध्दा प्रॉपर्टी टॅक्स वसूल केला जात असतो. अनिाधकृत आणि अधिकृत बांधकामांना समान न्याय देणे हा या विधेयकाचा महत्वाचा विषय आहे. खरे म्हणजे कायद्यातील तरतुदीनुसार अनाधिकृत बांधकामे तोडलीच पाहिजेत, ही कायद्यातील मुख्य तरतूद आहे. अनाधिकृत इमारतींना टॅक्स माफ करणे हा या ठिकाणी विषय नाही. एमआरटीपी ॲक्टच्या 53 (1) नुसार 15 दिवसांची नोटीस देऊन अनाधिकृत बांधकामे पोलिसांची मदत घेऊन आपण ताबडतोब तोडू शकतो किंवा कारवाई करु शकतो. बीपीएमसी व बीएमसीच्या व नगरपालिकेच्या कायद्यात अशा प्रकारची तरतूद आहे. मी जबाबदारीने या ठिकाणी सांगू इच्छितो की, ठाणे नगरपालिका क्षेत्रात अनाधिकृत बांधकामांची संख्या खूप मोठया प्रमाणात आहे. या ठिकाणी तर जवळपास 70 टक्के बांधकामे अनाधिकृत आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

01-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3D-1

AJIT/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.जुन्नरे......... 15:30

श्री.राजेश टोपे...........

जी अनधिकृत बांधकामे वा इमारती आहेत त्यांच्याकडून प्रॉपर्टी टॅक्स घेतला जातो त्याच्या दुप्पट दंड लावायचा. याठिकाणी दंड लावणे याचा अर्थ, अनधिकृत बांधकामे वा इमारती रेग्युलराईज करण्याचा शासनाचा मानस आहे असा नाही. हेतू एवढाच आहे की, ज्यांनी चूक केली त्यांनी दंड भरलाच पाहिजे. चूक करणारा आणि न करणारा यांना समान पध्दतीची वागणूक देणे बरोबर नाही. अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे अपेक्षित आहे. बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे असतील तर कधी कधी मानवतेच्या दृष्टीकोनातून आपण निष्कासित करण्याची कारवाई करु शकत नाही. परंतु कोणत्याही परिस्थितीत अनधिकृत बांधकाम नियमित नियमित होणार नाही किंवा अनधिकृत बांधकामे असल्यास त्याबाबत कारवाई करण्याबाबत जी तरतूद आहे त्यास कुठेही बांधा न येता शास्ती लावण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. थोडक्यात जी अनधिकृत बांधकामे आहेत त्यांना दुप्पट प्रॉपर्टी टॅक्स लावण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. ही सुधारणा नगरपालिका कायद्यातील 189 (अ) मध्ये अंतर्भूत करीत आहोत. नागपूर महानगरपालिका अधिनियमात कलम 282 (अ) समाविष्ट करीत आहोत. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मध्ये 267 (अ) हा क्लॉज समाविष्ट करीत आहोत. आपण बी.एम.सी.ॲक्टमध्ये ही दुरुस्ती केलेली नाही. कारण मुंबई महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांना रेटेबल पध्दतीने प्रॉपर्टी टॅक्स आकारतो. पण ही पध्दत बदलून कॅपिटल व्हॅल्यू बेसवर प्रॉपर्टी टॅक्स आकारण्यासंबंधीचे विधेयक आणलेले आहे. परंतु सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे सोपविले आहे. या विधेयकामुळे टॅक्सेशनची पध्दत बदलणार आहे. रेटेबल व्हॅल्यू वरुन कॅपिटल व्हॅल्यू बेसवर टॅक्स आकारला जाणार आहे. यामध्ये सुध्दा अनधिकृत बांधकामांवर शास्ती असावी अशी तरतूद आहे. हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे विचारार्थ असल्यामुळे बी.एम.सी. ॲक्टचा समावेश या कायद्यात केलेला नाही. या कायद्यामध्ये दोन महानगरपालिकांच्या अधिनियमांचा समावेश आहे. बीपीएमसी ॲक्ट एनएमसी ॲक्टमध्ये हा नवीन क्लॉज समाविष्ट करण्यात येणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.राजेश टोपे...........

सभापती महोदय, जी अनधिकृत बांधकामे आहेत ती डिस्करेज केली पाहिजेत. अशा बांधकामांना प्रोत्साहन मिळता कामा नये. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याची वाईड पब्लिसिटी करण्याची आवश्यकता आहे. अनेक सन्माननीय सदस्यांचे मत आहे की, एखाद्या बिल्डरने वा विकासकाने इमारत बांधली आणि थर्ड पार्टी म्हणून खरेदीदाराने ती विकत घेतली तर त्यामध्ये खरेदीदाराची काय चूक आहे ? त्याने अशाप्रकारचा दुप्पट टॅक्स का भरावा ? त्यांना काही माहिती नव्हती अशाप्रकारची चर्चा केली जाते. माझे स्पष्ट मत आहे की, अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणी लोकांनी गुंतवणूक करु नये. अनधिकृत इमारतींना दुप्पट प्रॉपर्टी टॅक्स घेतला जातो याची वाईड पब्लिसिटी झाली पाहिजे. अशी पब्लिसिटी झाल्यानंतर अनधिकृत सदनिका खरेदी करण्यास आळा बसू शकेल. अधिकृतपणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अनधिकृतपणाला डिस्करेज करण्याच्या हेतूने हे विधेयक आणलेले आहे.

सभापती महोदय, मी सभागृहास एक केस कोट करु इच्छितो.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ....

अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात कुलू-मनाली येथील एक केस सुप्रीम कोर्टात गेल्यानंतर सुप्रीम कोर्टाने त्याबाबतीत असे सांगितले की, "ॲक्वायर विदाऊट कॉम्पेनसेशन." अशा ज्या अनधिकृत इमारती आहेत, त्या सरकारने स्वत:कडे कोणत्याही कॉम्पेनसेशनशिवाय जमा करुन घेतल्या पाहिजेत, अशाप्रकारचा निर्णय अनधिकृत इमारतीच्या बाबतीत सुप्रीम कोर्टाने घेतलेला आहे. त्यामुळे काकोडकर समितीच्या शिफारशींच्या माध्यमातून हे विधेयक याठिकाणी मांडण्यात आलेले असून त्यास सभागृहाने मंजुरी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा प्रस्ताव आहे, त्यांनी तो मांडावा.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 5 -"मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2007 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 19 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे," असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न आणि विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीच्या प्रस्तावावर एकत्रित चर्चा होईल.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कालपर्यंत विधेयक मांडल्यानंतर असे वाटत होते की, शासनाला जनहिताची काळजी आहे. परंतु सध्यातरी हे सगळे आलबेल चालू आहे, असे मला वाटते. राज्यामध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले असून त्यासंबंधी आपण गेंडयाच्या कातडीने सामोरे गेलो तरी हे सरकार काहीही करु शकत नाही. निवडणुकीत लोक आपल्याला निवडून देतात. प्रश्न अस्तित्वात असूनही आपण निवडून कसे येतो, हा प्रश्न आमच्यासमोर आहे. या सरकारची मानसिकता बिघडलेली आहे, असे माझे ठाम मत बनले आहे. या विधेयकाच्या माध्यमातून माझ्या मनात भीती निर्माण झालेली आहे. बेकायदेशीर काहीही करा, परंतु शास्ती म्हणून अमुक अमुक भरा, असे या विधेयकात आहे. आम्हाला संधी मिळेल तेव्हा आम्ही सरकारची बेकायदेशीर कामे बाहेर काढू. मागे गावठी दारु पिऊन 79 लोक मेल्यानंतर याठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी राणा भीमदेवी थाटात सांगितले की, आता महाराष्ट्रात एक थेंबही गावठी दारु मिळणार नाही, ती पूर्णपणे आम्ही बंद करु. परंतु प्रत्यक्षात काहीही झाले नाही. याप्रमाणे आपण आता बढाया मारल्या. माननीय गृहमंत्री म्हणाले की, दारु बंद करतो, ती काही अंशी बंदही झाली, परंतु पुढच्याच अधिवेशनात अर्थसंकल्पीय भाषणामध्ये माननीय वित्त मंत्र्यांनी मोठया अभिमानाने सांगितले की, गावठी दारु बंद झाल्यामुळे आता अधिकृत दारुचा सेल वाढल्यामुळे 600 कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा झाले. त्यामुळेच आपली मानसिकता बिघडलेली आहे, असे मी मघाशी म्हणालो.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

गावठी दारु बंद झाल्यामुळे व अधिकृत दारुची विक्री वाढल्यामुळे शासनाच्या तिजोरीत 600 कोटी रुपये जमा झाले, असे भाषणात सांगितले. यामध्ये कौतुक कसले आहे हो ? हे सर्व रेकॉर्डवर आहे. कशा-कशाचे बिल्ले तुम्ही छातीवर लावता ? लोकांनी दारु पिऊन शासनाच्या तिजोरीत भर पडली. हे झाले कौतुक. लेडिज बार बंद झाल्यामुळे बारबालांचे प्रकरण बंद केले, असे माननीय उपमुख्यमंत्री म्हणतात. लेडिज बार बंद झाले, बारबालांना बंदी घातली, फक्त पंचतारांकित हॉटेल्स सोडून, असा कायदा झाला. माननीय श्री.प्रमोद नवलकर हे या सभागृहाचे सन्माननीय सदस्य असतांना आणि त्यावेळी हे विधेयक चर्चेला आले असतांना त्यांनी चर्चेत असे सांगितले होते की, "तुम्ही काय करीत आहात, तुम्हाला कोर्टातून हाकलून लावतील, अशा प्रकारचा कायदा केला तर कोर्टात तो टिकणार नाही, इकडे बारबाला चालणार नाहीत, तिकडे चालतील, असे करु नका." "नाही आम्ही केलेला कायदा टिकेल, अभ्यासपूर्ण कायदा केलेला आहे, एवढया सॉलिसिटरना बोलाविले, तज्ज्ञांना बोलाविले, त्यांची मते घेतली आणि कायदा तयार केला, त्यामुळे तो टिकेल," असे त्यावेळी उत्तराच्या भाषणात माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले होते. पाहिजे तर रेकॉर्ड काढून बघा. अशा प्रकारे ज्येष्ठ सदस्य, श्री.प्रमोद नवलकर यांच्या अनुभवाला त्यांनी आव्हान दिले. काय झाले ? तो कायदा कोसळला. आता दूरचित्रवाणीवर आठवडयातून एकदा तरी धाड टाकून बारबालांना पकडल्याचे दाखविले जाते. कारण, आता आहे तर सांभाळले पाहिजे. बेकायदेशीर बांधकाम होते तर शास्ती केली पाहिजे. बेकायदेशीर बांधकाम तोडून टाकण्याची कायद्यात तरतूद असतांना शास्ती करुन त्यांना सांभाळण्याची गरज काय ? बारबाला जातात तर जाऊ द्या, कारण ते बेकायदेशीर आहे. त्यांना जर पकडले तर मग संबंधितांवर रोजच्या रोज दुप्पट शास्ती लावा, कारण ते कायदेशीर नाही, बेकायदेशीर आहे. पण तेथे शासनाचे हात तोकडे आहेत, तेथपर्यन्त शासन पोहोचू शकत नाही. जे जे अनधिकृत आहे, बेकायदेशीर आहे, ते थांबवायचे म्हटले तर कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता आमच्याकडे सामर्थ्य नाही आणि ते येईपर्यन्त थांबायचे असेल तर हे चालू राहणार आहे. मग जे चालू आहे ते अयोग्य आहे, हे सांगितले पाहिजे. आणि शास्ती करुन सांगायचे की, तुम्ही हे करता तर दुप्पट

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

दंड भरा. अशा पद्धतीकरिता माझ्याकडे जे शब्द आहेत ते सभागृहात मी वापरु शकत नाही, ते फार जहाल शब्द आहेत. आपण काय आणत आहात, कशासाठी आणत आहात ? सभापती महोदय, आज आपण सभापतींच्या आसनावर बसला आहात. उल्हासनगरच्या अनधिकृत बांधकामाबाबतचा विषय ज्यावेळी सभागृहात चर्चेला आला होता त्यावेळी आपण जे भाषण केले त्याबद्दल मी तुमच्या जागेवर येऊन तुम्हाला दाद दिली होती. आपण ज्या पद्धतीने उल्हासनगरची व्यथा मांडली होती, ती दाद देण्यासारखीच होती. उल्हासनगर येथे 900 अनधिकृत इमारती आहेत...झोपडया नव्हे...इमारती आहेत, जनाची नाही तर मनाची काही तुमच्याकडे असेल तर आपण काय करता ते कळलेच पाहिजे. राज्यकर्त्याला आपला धाक आणि दरारा ठेवावयाचा असेल तर एक तरी कारवाई अशी दणदणीत करुन दाखवा की, या राज्यात असे प्रकार चालत नाहीत, असा मेसेज गेला पाहिजे. परंतु, हे सगळेच चालते असे दाखविण्यासाठी अशी विधेयके सदनात घेऊन येता, खरोखरच शासनाची मानसिकता तपासली पाहिजे, अशी परिस्थिती आपण निर्माण करुन ठेवली आहे. तुम्ही काय करता ? उच्च न्यायालयाने आदेश देऊन सुध्दा तुम्हाला उल्हासनगरमध्ये काही करता आले नाही. ते करता आले नाही म्हणून तुम्ही काय केले ? तर कायदाच बदलला. काँग्रेसवाल्यांचे एक बरे आहे, जे करता येत नाही, त्यासाठी ते कायदाच बदलून टाकतात.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...........

सुप्रिम कोर्टाने शहाबानू प्रकरणात निर्णय दिल्यानंतर केंद्र शासनाने कायदाच बदलून टाकला. काय चालले आहे ? सुप्रिम कोर्टाने आदेश दिले की, 900 बिल्डींग तोडण्यात याव्यात. परतु शासनाने सभागृहामध्ये कायदा बदलला. त्याप्रमामाणे शासनाने जिल्हाधिका-यांना आदेश दिला. अनधिकृत बांधकाम अधिकृत करुन घेण्यासाठी त्यांना आठ महिन्यांची मुदत देण्यात आली. ठीक आहे, कारण हा जनतेचा प्रश्न आहे. मानवतेच्या दृष्टीकोनातून शासनाने कायद्यात बदल केला. कारण हजारो कुटुंबांचा तो प्रश्न होता. कोणताही राज्यकर्ता असला तरी तो त्यादृष्टीने विचार करेल. हजारो कुटुंबांना का उद्ध्वस्त करता, त्यांचा काय दोष होता. परंतु एवढया मोठया प्रमाणात बेकायदेशीर बांधकाम होत असतांना तुम्ही कोठे होतात ? सभापती महोदय, इमारत बांधतांना रस्त्यांवरील दिवे सुध्दा इमारतीच्या मधून घेतले जातात. ओपन स्पेसच्या बाहेर येऊन रस्त्यावर बांधकाम कले जाते तर मग या खांबांचे काय ? इमारतीच्या आत असे खांब आहेत ना ? अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम असतांना सरकारने काय केले, सरकारने कायदा बदलला. कायदा बदलल्यानंतर त्यांना अनधिकृत बांधकाम अधिकृत करुन घेण्यासाठी 9-10 महिन्यांची मुदत देण्यात आली होती. त्या मुदतीमध्ये त्यातील 5 टक्के लोक सुध्दा पैसे भरण्यास पुढे आले नाहीत. डबल पैसे भरुन बांधकाम अधिकृत करुन घेण्यासाठी लोक पुढे आले नाहीत. हायकोर्टाचे आदेश अंमलात आणण्याची कोणतीही शक्यता नाही. अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी शासनाकडे यंत्रणा नाही, शासनाकडे मनुष्यबळ नाही ? शासनाची मानसिकता नाही, म्हणून शासनाने कायदा बदलला. तो कायदा आम्ही सभागृहात स्वीकारला. त्या कायद्याला आम्ही एकमताने पाठिंबा दिला, कारण हजारो कुटुंबांचा प्रश्न होता. काय झाले त्याचे ? ज्यावेळी आपण झुंडशाहीला मान्यता देतो, त्यावेळी ती आपल्या डोक्यावर स्वार होते. सभापती महोदय, आपण त्या भागातील लोकप्रतिनिधी आहात. त्यावेळी तुम्ही या विषयावर सभागृहामध्ये तळमळीने बालला होतात. ते लोक पैसे भरण्यास तयार नाहीत. हायकोर्टाचा आदेशही गेला, केलेला कायदाही अंमलात येत नाही आणि आपण ती बांधकामे तोडूही शकत नाही. अशा प्रकारे जर शासन अनधिकृत बांधकाम करणा-यांसमोर गुडघे टेकत असेल तर

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...........

हे सरकार आहे काय ? महाराष्ट्रामध्ये कोठेही बेकायदेशीर बांधकाम करा आणि डबल पैसे भरुन राहा, असे हे विधेयक आहे. मला कळत नाही की, ही कसली मानसिकता आहे ? हे लुळेपांगळे सरकार आहे.

संभाजीनगरला रस्ता तयार करीत असतांना त्या रस्त्यामध्ये कब्रस्तानचा काही भाग आला. ज्यावेळी आपण मयताला जातो त्यावेळी तेथील विधी आटोपल्यानंतर आपण हात-पाय धुवून तेथून बाहेर पडतो. आपल्याकडे तशी पद्धत आहे. संभाजीनगरला रस्ता तयार करीत असतांना ती हात-पाय धुण्याची जागा रस्त्याच्या मध्ये येत होती. तेथील लोक म्हणाले की, येथे आमची मस्जीद आहे. ज्यांची हयात संभाजीनगरमध्ये गेली त्या गोविंदभाई श्रॉफ यांनी असे स्टेटमेंट दिली की, ही जागा हात-पाय धुण्याची जागा आहे, मी संभाजीनगरमध्ये राहिलेलो आहे. त्यानंतर ते प्रकरण हायकोर्टामध्ये गेले. ते प्रकरण हायकोर्टामध्ये सुनावणीला आले. या प्रकरणावर हायकोर्टाने तीन वेळा आदेश दिले की, हे बांधकाम तोडून टाकावे.

यानंतर श्री.गागरे .......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

हे कसले सरकार आहे ? सरकारची कीव येत आहे. एका समाजाच्या भावनेचा प्रश्न असल्याने तेथे मस्जीद नसताना मस्जीद असल्याचे सांगितले जात आहे. तेथ्ील रस्ता रुंदीकरणामध्ये सहा पदरी रस्त्याऐवजी पाच पदरी रस्ता झालेला आहे. शासनाने प्रस्ताव दिलेला आहे की, या रस्त्याचा सहावा पदर फ्लायओव्हर तयार करुन त्या मस्जीदच्या वरुन काढला जाईल. परंतु रस्ता रुंदीकरण करताना मस्जीदच्या आजूबाजूला असलेल्या सर्व लोकांची दुकाने तोडली गेलेली आहेत. मात्र नसलेली मस्जीद आहे असे म्हटल्यावर शासनाचे हातपाय गळाले आहेत. आजही तुम्ही तेथे जाऊन पाहू शकता. हायकोर्टाने याबाबत अजून काही आदेश दिलेले नाहीत. शासनाने तेथे फ्लायओव्हर बांधण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. किती लुळेपांगळे सरकार आहे ? मला सरकारची कीव येते.

सभापती महोदय, बेकायदेशीर बांधकामे पाडणे हे शासनाचे व नगरपालिकेचे कर्तव्य आहे. परंतु बेकायदेशीर बांधकाम तोडले जात नाही. कोणामध्ये कमतरता आहे ? बेकायदेशीर बांधकामे तोडण्याची हिंमत शासनाकडे दिसत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबईबाबतच्या चर्चेमध्ये सांगितले होते की, बेकायदेशीर बांधकाम असलेल्या विभागातील वार्ड ऑफिसर व पोलीस ऑफिसरला निलंबित करण्यात येईल. परंतु आतापर्यंत एकाही अधिकाऱ्याला निलंबित केलेले नाही. सकाळी माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी याबाबत प्रश्न मांडला होता. माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी उत्तर दिलेले आहे की, 20 पैकी 18 बांधकामे तोडली असून दोन बांधकामे लवकरच तोडण्यात येतील. परंतु या बांधकामास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याना निलंबित केले तर त्याला बाणेदारपणा म्हणता येईल. आज लोकमान्य टिळकांची जयंती साजरी करताना, त्यांच्या प्रतिमेस हार घालताना, नैतिकता असेल तर हार घातले पाहिजेत असे माझे मत आहे. शासन संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणार आहे असे फक्त आश्वासनामध्ये सांगितले जात आहे. परंतु कायद्याचे उल्लंघन होत असताना हलबलपणे सर्व पहात आहेत. सरकार कसे चालले आहे ? लोकांना तुम्ही कोणता संदेश देत आहात ? दारु विक्रीतून जास्त उत्पन्न झालेले आहे, याचा आनंद मानणारे हे सरकार आहे. मी मंत्रिमंडळामध्ये असताना दारुविक्रीपासून उत्पन्न वाढविण्याचा प्रस्ताव आला होता, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी हा प्रस्ताव तात्काळ फेटाळून

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते.....

लावला होता. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की, महाराष्ट्रावर कितीही कर्ज झाले तर दारुविक्रीतून उत्पन्न वाढविण्याकरिता कोणताही प्रस्ताव स्वीकारणार नाही. सरकारला नैतिकता असावी लागते. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण ग्रामीण भागामध्ये जातो तेव्हा पाहतो की, गरीब माणसाचा स्वाभिमानही महत्वाचा असतो. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या त्यांच्या स्वाभिमानातून झालेल्या आहेत. कारण त्या शेतकऱ्यांच्या दारावर नोटीस आलेली आहे. त्यांच्या दारावर वसुलीकरिता अधिकारी आल्यामुळे त्याला वाटते की, लेकराबाळांना कसे तोंड दाखवावे. त्यातून आलेल्या विपण्णवस्थेमुळे त्यांचा स्वाभीमान दुखावला जात आहे. तो एकवेळ उपाशी राहिला तरी बाहेर बोलणार नाही परंतु भरल्या पोटाचा शेतकरी मिशाला तूप लावून बोलतो. अशा गरीब माणसाचा स्वाभिमान दुखावला जाऊन तो आत्महत्या करीत आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता सांगितले आहे की, काकोडकर समितीच्या शिफारशीनुसार आम्ही हे विधेयक आणले आहे. ही कशी शिफारस आहे ? एकाच विषयावर दोन विभिन्न कार्यवाही होऊ शकत नाही. एकीकडे तुम्ही अनाधिकृत बांधकामावर दंड आकारुन ते नियमित करीत आहात, दुसरी बाजू पाहिली तर अनाधिकृत बांधकामे तोडली जात नाहीत. यावर दोन विभिन्न प्रकारे कार्यवाही होऊ शकत नाही. त्यावर एकच कारवाई होऊ शकते, ती म्हणजे अनाधिकृत बांधकामे तोडून टाकण्यात यावीत. याबाबत मी माननीय मंत्री महोदयांना विनंती केलेली आहे. यावर बऱ्याच गोष्टी बोलता येतील व दाखविता येतील. कारण त्या रोजच्या वर्तमानपत्रात छापून येत आहे. हे विधेयक तुम्हाला मंजूर करुन पाहिजे असेल तर मंजूर करुन देऊ शकतो.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

हायकोर्टाने आदेश दिला की, मुंबईकडे येणारी जी पाण्याची पाईपलाईन आहे ती झोपडपट्टीपासून मुक्त करा. त्याला दोन वर्षे झाली. पण मग तेथील एक तरी झोपडी काढली गेली आहे का ? या सरकारकडून त्याबाबत कोणतीही कारवाई झालेली नाही. या सरकारच्या प्रवृत्तीमध्येच नपुंसकता भरलेली आहे. हे सरकार हायकोर्टाला, सुप्रीम कोर्टालादेखील मग जुमानत नाही. त्यांचे आदेश पाळत नाही. आजपर्यंत त्या पाईप लाईन सभोवतालची एक झोपडीदेखील काढली नाही. ती केव्हा काढता याचा कार्यक्रम द्या म्हणून सरकारला कोर्टाने सांगितले पण तो कार्यक्रम देखील सरकार देत नाही. परंतु दुसरीकडे हे विधेयक मात्र काढते की, आम्ही ही अनधिकृत बांधकामे रेग्युलर करतो आहोत, त्यासाठी तुम्ही दुप्पट पैसे द्या आणि तेथे रहा. जेव्हा आम्हाला फुरसत मिळेल तेव्हा आम्ही अतिक्रमणे तोडू. आता महापालिकेला केव्हा फुरसत असते हे आम्ही महापालिकेत काम केल्याने चांगलेच अनुभवले आहे. आमचा डेमॉलेशन स्क्वाड अतिक्रमणे तोडण्यासाठी, अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी निघतो, त्याच्याबरोबर महापालिकेचे एएमसी, डीएमसी वगैरे अधिकारी वर्ग असतो. ते डेमॉलिशनचा सारा कार्यक्रम सरकारकडे म्हणजे पोलिसांकडे पाठवितात, जेणे करून त्यावेळी त्यांना पोलीस संरक्षण उपलब्ध करून दिले जावे. तर अतिक्रमणे तोडण्यासाठी हे स्क्वाड तयार होऊन निघाल्यानंतर, त्यांच्या गाड्या महापालिकेच्या कार्यालयाकडून निघाल्यानंतर एक एक फोन येतो की, तुम्हाला यासाठी पोलीस बंदोबस्त मिळणार नाही. मग सारी कारवाई ठप्प होऊन जाते. हे रोजचे चित्र आम्ही पाहिलेले आहे आणि पाहतो आहोत. आता तर मुंबई या शासनाच्या हाताबाहेर गेलेली आहे. झोपडपट्ट्या वाट्टेल तशा वाढल्या आणि त्या मग 1990, 1995 आणि नंतर 2000 पर्यंतच्या अशा पद्धतीने अधिकृत केल्या गेल्या. आम्ही म्हणतो की, आमच्या हाती सत्ता होती म्हणून आम्ही 1995 पर्यंतच्या झोपड्या अधिकृत केल्या. नंतर सत्ता तुमच्या हाती आली की लगेच तुम्ही देखील 2000 पर्यंतच्या झोपड्या अधिकृत केल्या. म्हणजे ज्याच्या हाती ससा तो पारधी. ठीक आहे. 2000 पर्यंतच्या झोपड्या तुम्ही अधिकृत केल्या तर मग त्यानंतरची एक तरी झोपडी तुम्ही पाडली आहे का ? उलट मुंबईमध्ये लोंढे चालूच आहेत. त्याची चिंता आम्हाला मोठी आहे. आज मुंबईमध्ये 27 लाख बांगला देशा असेच रहात आहेत. हे मी सांगत नाही तर राज्यसभेमध्ये केंद्रीय गृहमंत्र्यांनी उत्तर देताना लेखी स्वरूपात रेकॉर्डवर ही माहिती दिली आहे. म्हणजे केवढा मोठा मानवी बॉम्ब घेऊन ही मुंबई जगते आहे याचा आपण विचार केला आहे का ?

....... 3आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

27 लाख बांगला देशी लोक या मुंबइमध्ये अनधिकृतपणे रहात आहेत असे आमचे केंद्रीय गृहमंत्री रेकॉर्डवर सांगत आहेत पण तरीही या सरकारला त्याचे काहीही नाही. वस्तुत: राज्य सरकारने बांगला देशी लोकांच्या या 25 हजार झोपड्या बुलडोझर लावून पाडल्या असत्या तर असे काय मोठे झाले असते ? पण आपण काहीही केले नाही. या बांगला देशी नागरिकांबद्दल या सरकारला इतके प्रेम का आहे ? आता आपल्याच देशातील कोणी अल्पसंख्यांक अशा प्रकारे रहात असते तर आम्ही समजू शकलो असतो, की ते नाही म्हटले तरी आमचेच देशबांधव आहेत. त्यासाठी आम्ही त्यांना सहन करू शकतो. पण मग या बांगला देशी नागरिकांबद्दल आपले धोरण काय आहे ? लोकसभेमध्ये, राज्यसभेमध्ये उत्तर आल्यानंतर ही तुमची अशी अगतिकता, निर्णयाची नपुंसकता आहे हे समजून येते, उघड होते. या कोणत्याच बाबतीत सरकारची ठाम अशी मानसिकता नाही. उलट बेकायदेशीर गोष्टींना कायद्यात रूपांतरित करण्यासाठी विधीमंडळामध्ये येण्याची हिम्मत हे सरकार दाखविते आणि वर त्यावर चकाचक करून ते पोरगं आमच्यापुढे हे सरकार ठेवते, म्हणते की, हे अनौरस बालक असले तरी सांभाळण्यासाठी तुमच्याकडे देत आहे. पण अगोदरच त्या पोराचे आई-बाप कोण आहेत ते तरी पहा. कशासाठी आपण हे बेकायदेशीर सांभाळायचे ? म्हणून या संदर्भात अगोदरच एक विधेयक आपण आणले आहे आणि त्याच्या उद्दिष्टामध्ये म्हटल् आहे ... आणि त्या समितीवर मी स्वत:च आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ....3जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

"अवैध बांधकामावर शास्ती बसविण्याकरिता तरतूद करण्यासाठी राज्यात लागू असलेल्या नगरपालिका कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी काकोडकर समितीची शिफारस शासनाने स्वीकारलेली आहे. त्या शिफारशीनुसार मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, 2006 हे महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आलेले आहे. हे विधेयक राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीसमोर प्रलंबित आहे." मुंबईच्या संदर्भातील जे विषय असतात ते सर्व महाराष्ट्राला लागू असतात. मुंबई महानगरपालिका कायद्यामध्ये सुधारणा केल्यानंतर ती सुधारणा राज्यातील इतर महानगरपालिका आणि नगरपालिकांसाठी होते. हे विधेयक संयुक्त समितीकडे असून त्यांच्याकडून अजून त्यावर निर्णय व्हावयाचा आहे. तर मग हे विधेयक आता आपण कशासाठी सभागृहापुढे आणले? एका समितीपुढे या विधेयकावरील निर्णय लोंबकळत पडला असतांना दुसरा निर्णय आपण सभागृहामध्ये घेणार काय? तो निर्णय उलट लागला तर? मी आपल्या माहितीसाठी माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी मांडलेला मुद्दा सांगतो. मुंबईमधील ज्या इमारतींना ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाले नाही ती इमारत बेकायदेशीर ठरते. अशा इमारतींकडून दीड पट असेसमेंट घेण्यात येते आणि त्या इमारतीला ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाल्यानंतर ती सुधारीत होते. तशाप्रकारची कायद्यामध्ये तरतूद आहे. तेव्हा या संदर्भातील हा विषय विधीमंडळाच्या संयुक्त समितीकडे चर्चेला आहे आणि दुसरा विषय आता सभागृहामध्ये आला आहे. याठिकाणी म्हटले आहे की, "अशी शास्ती बसविणे व ती वसूल करणे याचा अर्थ, असे अवैध बांधकाम किंवा पुर्नबांधकाम, ते अवैधरीत्या अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी विनियमित करण्यात आले आहे असा लावता येणार नाही". एक म्हणजे या मुंबई शहराच्या जागेवर जे काही स्ट्रक्चर उभे राहील त्याचे असेसमेंट करण्याचा पूर्ण अधिकार महानगरपालिकेला आहे. वीजेच्या बिलाच्या बाबतीत असो किंवा महानगरपालिकेच्या बिलाच्या बाबतीत असो त्याठिकाणी कायद्याचा वापर केला आहे. ते बिल कधीपासून अस्तित्वात आले याचे वर्ष त्या ठिकाणी छापलेले असते. ते करण्यासाठी याचा उपयोग होत नसेल तर ते सांगण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. प्रश्न असा निर्माण होतो की, आज गावा-गावामध्ये बेकायदेशीर बांधकामे होत आहेत. अशा बांधकामांना महानगरपालिका किंवा नगरपालिकेची परवानगी घेण्याची गरज नाही. अगोदर बांधावयाचे आणि नंतर अमूक एवढे पैसे भरुन तडजोड करावयाची. ही पध्दत अवैध आणि अयोग्य आहे. माझी

DGS/

श्री. दिवाकर रावते...

मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, मुंबई महानगरपालिकेचा निर्णय येईल तोपर्यंत आपण ही बाब तहकूब ठेवली पाहिजे. ही तरतूद केव्हापासून अंमलात आणणार याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. आपण फक्त कायदा संमत करावा, त्याची अंमलबजावणी कधी करावयाची हे आम्ही ठरवू. याचा अर्थ असा की, मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात जो निर्णय होईल तो नंतर अंमलात येईल. त्या ठिकाणी निर्णय झाला नाही तर तो अंमलात आणला पाहिजे असे नाही. आणि जर तुम्हाला तो अंमलात आणावयाचा नाही तर तो कागदावर कशासाठी उतरविता? तो अंमलात न आणल्यामुळे बांधकामांना ऊत येणार आहे. आज तुमच्याकडे गटारे साफ करावयास, कचरा उचलावयास माणसे नाहीत अशी महानगरपालिका आणि नगरपालिकेची अवस्था आहे.मोठया प्रमाणावर तोडफोड झ ााल्यानंतर आपण माणसे कोठून आणणार? उल्हासनगर आपल्या ऊरावर आले आहे, त्याठिकाणी आपल्याला काही करता येत नाही. ग्रामीण भागात महानगरपालिका व नगरपालिकेच्या ठिकाणी सर्व नगरसेवक काय करतील ते सांगता येत नाही.

(यांनतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू.....

नगरसेवक निवडून येण्यासाठी एकेका मतासाठी पाच-पाच, दहा-दहा हजार रुपये खर्च करून त्या ठिकाणी हैदोस घालतील. ते लोकशाही विकायला काढतील. अशाप्रकारे गावातील गल्ल्यातील लोक ताब्यात घ्यायला जात असतील तर ते वाईट आहे, म्हणून मी या बिलाला विरोध करतो. अशा तरतुदी करणारे विधेयक संमत करणे अनैतिक, अवैध आहे असे माझे ठाम मत आहे. याच विषयासंबंधीचे एक विधेयक चिकित्सा समितीकडे आहे. माझी विनंती आहे की, बहुमताच्या जोरावर हे अनैतिक विधेयक पास करत असाल तर त्याबाबतीत आमच्या प्रतिक्रिया कडवट आहेत, आमचा त्यास विरोध आहे. याच विषयाशी संबंधीत असलेले विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे आहे, अशा परिस्थितीत दोन विधेयक करता येत नाहीत, मला या विधेयकाला नाईलाजाने प्रस्ताव द्यावा लागत आहे. तातडीचा भाग म्हणून मी उपसूचना दिलेली आहे. ती मान्य करून 18 सन्माननीय सदस्यांची समिती गठित केली जाईल. परंतु एकाच विषयासाठी दोन समित्या निर्माण करता येत नाहीत. हे विधेयक त्या विधेयकाला जोडता येत नाही, अशाप्रकारची कायदेशीर बाब निर्माण झालेली आहे. माझी विनंती आहे की, हे विधेयक आपण कशासाठी आणतो आहोत, त्याची कारणमिमांसा नाही. विधेयकामध्ये कालावधी नाही, काय करायचे हे माहीत नाही. महाराष्ट्रामध्ये वेगळा मेसेज जाईल. ग्रामीण भागामध्ये नगरशेठ आहेत, जेथे म्हणून लुटता येईल तेथे लुटण्याचे काम करतील. आज आपण उच्च माध्यमिक 50 शाळा अनुदानित मंजूर केलेल्या आहेत. त्यामध्ये 25 राष्ट्रवादीला आणि 25 काँग्रेसला अशी वाटणी झालेली आहे. त्यांचे रेट काय आहेत, ते सांगू काय ? अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही असे म्हणून रोजगार हमी योजना चालू आहे. आम्हा विरोधी पक्षाला आता सावध रहावे लागणार आहे. जेथे कोठे हात मारला जाईल तेथे त्यांना पकडले पाहिजे. सन्माननीय राज्यमंत्री महोदयांची ती प्रवृत्ती नाही. दुर्दैवाने त्यांच्याकडे तो विभाग असल्यामुळे हे विधेयक त्यांना मांडणे भाग आहे. त्यांच्या प्रवृत्तीमध्ये हे बसणारे नाही. सज्जन माणसाला बदनाम करण्यासाठी सरकारने सांगितलेले आहे. हे बील मंजूर झाल्यानंतरही त्याच्या अंमलबजाणीच्या बाबतीत काय काय करायचे याची माहिती नाही. याची अंमलबजावणी केव्हा करणार आहे ? कोणत्या तारखेपासून निर्णय घेणार, याची माहिती नाही. तुमचा कन्स्पेप्ट असेल की, वसुली होत असेल, तिजोरी भरत असेल तर रेग्युलराईज करा. सभापती महोदय, या विधेयकासाठी या क्षणी दोन समित्या करता येत नाहीत हे माहीत असताना देखील मला प्रस्ताव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू.....

मांडावा लागला. माझी विनंती आहे की, शासनाने सगळे समजून घ्यावे. शहाण्याला शब्दाचा मार म्हणतात तसे समजावे. मुंबई महानगरपालिकेचे विधेयक चिकित्सा समितीकडे आहे, त्या समितीचा निर्णय झाल्यानंतर हे विधेयक आणावे. चिकित्सा समितीने ते विधेयक मंजूर केले तर आपल्याला हे विधेयक आणण्याची आवश्यकता भासणार नाही. परंतु तरीही आपण याबाबतीत निर्णय केला तर आम्हाला आमचे सत्व जोपासावे लागेल, त्यास विरोध करावा लागेल. आम्हाला दोन तोंडांनी बोलता येत नाही. आम्ही काही गांढुळ खत निर्माण करत नाही. माझी नम्र विनंती आहे की, याबाबतीत कायदेशीर वैधानिक परिस्थिती लक्षात घेऊन, हे विधेयक तहकूब करावे. अन्यथा आम्हाला आमचा विरोध कायम ठेवावा लागेल, एवढीच विनंती करून माझे दोन शब्द संपवितो जयहिंद, जय महाराष्ट्र.

--

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अतिशय विस्तृत असे भाष्य केलेले आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. टोपे साहेब हे अभ्यासू आणि अतिशय जबाबदारीने बोलणारे आहेत. आपण पूर्ण बिल वाचले असते तर आपल्या लक्षात आले असते. कदाचित या बिलाच्या विरोधात कोणी हायकोर्टात गेले तर काय होईल ? हे बिल घटनेच्या विरोधी आहे. कोणत्याही कायदेमंडळाला बेकायदेशीर कायदा करता येत नाही. इतक्या सगळ्या गोष्टींचे स्पष्टीकरण या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी दिलेले आहे. पृष्ठ क्रमांक 4 वर जे लिहिले आहे त्यामध्ये काय म्हटले आहे ? आपल्या विधी खात्यामध्ये कायद्याची पदवी घेतलेले लोक आहेत की, दुसऱ्या खात्यातील लोकांचे प्रमोशन करुन त्यांना आणून त्यांच्या हातामध्ये हे काम दिले आहे ? यामध्ये पृष्ठ क्रमांक 4 वर असे म्हटले आहे की, "परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे यांचा, असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही-मग असा कालावधी कितीही असो." "मग असा कालावधी कितीही असो" याचा अर्थ काय आहे ? उल्हासनगर असेल, कल्याण असेल त्याबाबतीत मर्यादित निर्णय दिला होता. आपण मर्यादित स्वरुपात ते करणे आवश्यक आहे. मी आपल्याला स्मरण करुन देऊ इच्छितो. श्री. म. वा. देसाई हे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त होते. त्यावेळी काही नव्या इमारती मुंबईमध्ये झाल्या होत्या. त्यावेळी त्या ठिकाणी जी गॅलरी असेल ती एफ.एस.आय.मध्ये धरली जात नव्हती. अनेक लोकांनी गॅलरी बंद करुन टाकली. त्या सगळ्यांना नोटिसेस दिल्या. त्यावेळी मुंबईतील लाखो गॅलऱ्या तोडणार काय असा प्रश्न आला. डिस्क्रिशनरी पॉवर ही नियमित नसते. अधिकाधिक लोकांच्या कल्याणासाठी प्रचलित कायद्याच्या विरोधामध्ये एखादा नियमबाह्य निर्णय घ्यावयाचा असेल तर त्यावर आय.ए.एस. अधिकारी किंवा संबंधित अधिकारी लिहितात की, ही माझी विशेष बाब भविष्यात कोट करण्यात येऊ नये. श्री. डी. एम. सुखथनकर मुंबई महापालिकेचे आयुक्त झाले. एखादी विशेष बाब करीत असताना सुध्दा त्या ठिकाणी विशिष्ट माणसाला, विशिष्ट व्यक्तीला किंवा समुहाला फायदा होईल, बाकीच्या समुहाचे नुकसान होणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री. मधुकर चव्हाण .....

नाही यासाठी ती बाब केली जाते. मुंबईमध्ये अलेक्झांड्रा सिनेमा थिएटरच्या नाक्यावर युसुफ पटेल यांनी इमारत बांधली होती. ती इमारत 10-20 वर्षे पडून होती. हाजीअलीला अशीच इमारत पडून होती. त्यांना एफ.एस.आय. जास्तीचा वापरल्यामुळे वरचे बेकायदेशीर मजले हायकोर्टाने तोडून टाकले. हा कायदा केला तर सन्माननीय सदस्य श्री. रावते म्हणाले त्याप्रमाणे सगळे लोक म्हणतील की, दोन मजले, तीन मजले बांधा. मग या कायद्याचा दुरुपयोग करुन ते तुमच्या अधिकाऱ्यांना पाकीट देतील आणि दबाव आणतील. अधिकारीच त्यांना सांगतील की, या कायद्याचा आधार घेऊन अर्ज करा की, आमच्यावर कारवाई होईपर्यंत अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत दंड भरतो. तोपर्यंत 10-15-20 वर्षे ते तसेच चालत राहील. आपण हा काय कायदा आणत आहात ? मुंबईच नव्हे तर सगळ्या शहरांमध्ये आपण बेकायदेशीर कायदा अंमलात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. पृष्ठ क्रमांक 2 वर शेवटी असे म्हटले आहे की, "पोट-कलम (1) अन्वये देय असलेली शास्ती.." या ठिकाणी शास्ती ऐवजी दंड म्हणावे. आपण कठीण शब्द वापरु नका. शास्तीची रक्कम आपण स्वस्त करुन टाकली आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "पोट-कलम (1) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारित करण्यात व गोळा करण्यात येईल." डोके ठिकाणावर आहे की नाही ? मुळात मालमत्ता कर हा अधिकृत प्रॉपर्टीवर वसूल केला जातो, बेकायदेशीर प्रॉपर्टीवर वसूल केला जात नाही. बेकायदेशीर गोष्टींवर दंड केला जातो. हा कर कसा असेल ? कर हा कायदेशीर असतो. जो दंड आम्ही गोळा करणार त्याला जणू काही कर गोळा केला, प्रॉपर्टी टॅक्स गोळा केला असे समजू. ज्यांनी असे लिहिले त्यांचे डोके ठिकाणावर आहे काय ? हा शब्द या ठिकाणी कसा उपयोगात आणू शकता ? हे कायदेमंडळ आहे. शेवटच्या दिवशी बिल आणावयाचे आणि लवकर मंजूर करा, बाहेर बसा वगैरे सांगण्यात येईल. आपण अशी घाई करु नका. आपण उल्हासनगर, कल्याण या ठिकाणी संरक्षण दिलेले आहे. मी सगळ्या शब्दांची पुनरावृत्ती करीत नाही. यानंतरच्या अडीच तासाच्या प्रस्तावात आपल्या बेकायदेशीर कृत्यांवर प्रकाश टाकणारे अनेक मुद्दे आहेत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 16:15

(श्री. मधुकर चव्हाण....)

या विधेयकाच्या पान क्रमांक दोन वर जे लिहिलेले आहे त्यामधील पहिला शब्द हा बेकायदेशीर आहे. म्हणून हा घटनेच्या चौकटीमध्ये बसणारा कायदा नाही. फण्डामेण्टल राईटस् याचा अर्थ बेबंदशाही नाही. वाटेल ते करावे असे नाही. या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, "कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध न आणता,... यामध्ये बाधा येईल. बेकायदेशीर बांधकाम केले असेल तर जे महापालिकेचे नियम असतील त्याबाबतीत तो कोर्टामध्ये रिलिफ घेईल. बेकायदेशीर बांधकाम करणा-या माणसाला नोटीस दिल्यानंतर त्याबाबतीत एका वर्षाच्या आत निपटारा करु असे येथे म्हटलेले नाही. सभापती महोदय, ट्रान्झीट कॅम्पमध्ये बेकायदेशीरपणे राहाणा-या लोकांनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे स्टे घेतलेला असून अशी प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. हा कायदा मंजूर केला तर हाहाकार माजेल. लालबाग, परळ मध्ये 10 बाय 10 च्या खोलीमध्ये राहाणा-या गरीब माणसाने जर पोटमाळा बांधला तर त्याला महानगरपालिकेच्या कायद्यानुसार नोटीस देऊन त्याच्या नाकी नऊ आणले जाते. त्याला कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले जात नाही. या कायद्यामुळे भयानक प्रकार होतील. बेकायदेशीर गोष्टी करुन त्याबाबतीत दंड भरला जाईल. कायद्याचे रक्षण करणा-यांनी चांगले कायदे बनविले पाहिजेत. कायदा चांगला असेल तर न्यायाधीश प्रभावीपणे न्याय देऊ शकतो. संजय दत्त याने न्यायाधीशापुढे सांगितले होते की, मला माझ्या मुलीला आणि माझ्या गरोदर बहिणीला भेटायचे आहे त्यामुळे मला सरेण्डर होण्यासाठी दोन दिवसांची सवलत द्यावी. परंतु न्यायाधीशांनी त्याला सवलत दिली नाही. न्यायाधीशांनी सांगितले की, मी चुकीचा पायंडा पाडणार नाही. मला तशी सवलत देण्यास नियम अलाऊ करीत नाही. न्यायाधीशाच्या खुर्चीत बसलेल्या न्यायाधीशालासुध्दा बेकायदेशीर गोष्टीला मान्यता देण्याचे अधिकार घटनेने दिलेले नाहीत. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असले तरी सुध्दा त्यांन असे अधिकार नाहीत. आपण बेकायदेशीर गोष्टींना मान्यता देणारा कायदा करीत आहात. कोणाच्या दबावाखाली हा कायदा केला जात आहे ? मी माननीय मंत्री महोदयांच्या हेतू बद्दल अजिबात शंका घेत नाही. 22-25 मजल्यांच्या उंच इमारतीवर 7-8 बेकायदेशीररीत्या बांधलेले मजले दंड भरुन रेग्युलराईज करण्यासाठी हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 16:15

(श्री. मधुकर चव्हाण...

कायदा करावा असा बिल्डरांचा तुमच्यावर दबाव आहे काय ? बेकायदेशीर काम करायला माणूस केव्हा धजतो ? ज्याची बुध्दी ठिकाणावर आहे, ज्यांचा हेतू शुध्द आहे तो बेकायदेशीर काम करणार नाही. परंतु ज्याचा हेतू शुध्द नसेल तो मात्र बेकायदेशीर काम करील. इथे तुम्ही कायदाच बेकायदेशीर आणित आहात. विधयेकाच्या पान क्रमांक 4वर असे म्हटलेले आहे की, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचा किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचा आणि त्याखाली केलेले नियम किंवा उपविधी यांचा भंग करुन नगरपरिषद अथवा केंद्र किंवा राज्य शासन, अथवा अशा कोणत्याही शासनाने स्थापन केलेले कोणतेही वैधानिक महामंडळ किंवा संघटना किंवा कंपनी यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी भाडेपट्टयाने दिलेल्या कोणत्याही जमिनीवर,..." सगळं तुमचं चांग भलं. काय चालवले आहे ? आता तर मध्यमवर्गीयांना महानगरपालिके तर्फे किंवा शासना तर्फे भूखंड देण्यात येत नाही. पूर्वी मुंबई महानगरपालिकेतील किंवा मंत्रालयातील 10-12 लिपिक महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे किंवा मुख्यमंत्र्यांकडे गेले की ते त्यांना एखादा भूखंड द्यायचे. मग क्लार्क वगैरे तत्सम लोक पैसे गोळा करुन बँकेत भरायचे. येथे जर बेकायदेशीर बांधकाम केले तर त्याबाबतीत दंडात्मक कारवाई करुन निर्णय लागे पर्यन्त त्यांना रेग्युलराईज करणार किंवा अभय देणार. म्हाडाचे जे प्रकल्प आहेत त्या ठिकाणी बेकायदेशीर बांधकाम केले असेल तर त्यांना दंड भरायला सांगून कारवाई पूर्ण होईपर्यन्त तेथे राहावयास सांगणार. सभापती महोदय, हे काय चालवले आहे ? माझी अशी विनंती आहे की, महाराष्ट्राला हे कळू द्या की, विरोधी पक्षाने चुकीच्या गोष्टी निदर्शनास आणून दिल्यामुळे शासनाने हे विधेयक मागे घेतलेले आहे.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.........

यामध्ये तुमच्या मनाचा मोठेपणा दिसेल. नाही तर मग संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवा आणि ते क्लब करा मागचे 72 क्रमांकाचे विधेयक एकत्र क्लब करा. त्यादृष्टीने तेथे निर्णय घ्या. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेतलेला आहे. शेवटी माननीय मंत्रिमहोदयांना एकच सांगू इच्छितो की, निदानपक्षी आपण येथे अनेक गोष्टींची चर्चा करतो आणि येथे ब-याच वेळेस असेही म्हटले जाते की," सगळे निर्णय न्यायालय घेणार का ? न्यायालय राज्य चालविणार का ? विधीमंडळ स्वतंत्र आणि मोठे आहे. आपण कायदे करणारे मोठे आहोत." मान्य आहे. पण न्यायालय या विधिमंडळाच्या कामकाजात का इंटरफियर करते ? का छोटया छोटया बाबतीमध्ये न्यायालय तुमच्यावर ताशेरे ओढते ? कायदे करणारे जर बेकायदेशीर कृत्य करावयाला लागले तर सामान्य माणसे देखील अनेक बाबतीत जनहित याचिका दाखल करतात. पूर्वी जनहित याचिका वर्षातून किंवा दोन वर्षातून अशा क्वचित दाखल केल्या जात होत्या. परंतु आजकाल जो उठतो तो जनहित याचिका दाखल करतो कोर्टदेखील सर्रास जनहित याचिका ॲडमिट करुन घेते कारण आपण जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी समाजासाठी आवश्यक असलेले कायदे करीत नाहीत. किंवा केलेल्या कायद्याचे बंधन पाळत नाही. कायद्याची अंमलबजावणी सुध्दा व्यवस्थित केली जात नाही. शेवटी एकच सांगतो आपण कायदे कशासाठी करतो ? जनतेच्या हितासाठी आणि एखाद्या कायद्यामध्ये तो अपुरा असेल तर त्यात सुधारणा करण्यासाठी तसेच त्या कायद्याचा उद्देश किंवा हेतू साध्य होण्यासाठीच आपण असा कायदा करतो. परंतु अशा कायद्यामध्ये त्रूटी राहिलेली असेल, त्याची व्यापकता कमी असेल, त्याचे क्षितीज वाढवावयाचे असेल, कायद्याच्या चौकटीत अधिक लोकांना सामावून घ्यावयाचे असेल त्या अनुषंगाने असा सुधारणा करणारा कायदा निर्माण झाला तर त्याचा हेतू साध्य करण्यासाठी शुध्द करण्यासाठी व त्यातील त्रुटी जर भरुन काढून अशा कायद्यामध्ये सुधारणा करतो. मध्यंतरीच्या काळामध्ये डॉ.राजेंद्र शिंगणे साहेबांनी असा कायदा आणला की, त्या कायद्याच्या आधारे विभागीय आयुक्तांना खटल्यांच्या संदर्भात अधिकार देण्याबाबतचा निर्णय घेतला होता. आम्ही मान्य करतो की, जेवढे डिसेंट्रलायजेशन होणार किंवा निर्णय घेण्याची प्रक्रिया लोकांच्या हातात जाईल तेवढा त्यांना न्याय लगेच मिळेल. परंतु बेकायदेशीर कृत्य करणा-या लोकांना अभय देत राहिलो तर ते सगळया शहरांची वाट लावून टाकतील. तुम्हाला रोड वाईडनिंगसाठी जागा

3N - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण......

मिळणार नाही अनेक ठिकाणी एखादी इमारत असते मध्ये रोड वाईडनिंग करणारी जी यंत्रणा असते त्याच्या विरोधात ती व्यक्ती कोर्टात गेलेली असते. तेवढीच जागा रोड वाईडनिंग करण्याची राहिलेली असते तुम्ही सांगता दंड भरा, आम्ही तुमची केस 10 वर्ष चालू ठेवतो. यासाठी या कायद्याचा तो आधार घेईल व कोर्टात जाईल. म्हणून सदर विधेयक आपण संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी मी या माध्यमातून शासनाला विनंती करतो व माझे दोन शब्द संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





JPK/ KGS/ MAP प्रथम श्री.शिगम एम. ............ 16:20

श्री.मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय,सन 2007 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 5 हे महाराष्ट्र शासनाने या सदनामध्ये चर्चेकरिता आणलेले आहे. सदर विधेयक हे विधानपरिषदेचे आहे. ते मंजूर करण्यासाठी या सदनामध्ये मांडलेले आहे. बेकायदेशीर बांधकामांना कसे कायदेशीर करावयाचे याचे मार्गदर्शन सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी आज या ठिकाणी केले. मला आपल्याला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, मुंबई शहरामध्ये जवळजवळ 65 लाख लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. या झ ोपडपट्टयांमध्ये राहणा-या लोकांकडून आपण मालमत्ता कर घेतो का ? घेत असला तर सांगा आम्ही तो वसूल करु. मग असा मालमत्ता कर कोणाकडून वसूल केला जातो ? त्याची पण अधिक माहिती आपण सभागृहाला दिली तर बरे होईल. हे विधेयक ज्ञानी लोकांनी आणले की अज्ञानी लोकांनी आणले ? हे सुध्दा याठिकाणी कळण्याची आवश्यकता आहे. आपण कायद्यामध्ये दुरुस्ती करतो, त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी नवीन कायदा आणतो ही सुधारणा म्हणावयाची की तडजोड म्हणावयाची याचा खुलासा आपण याठिकाणी केला तर बरे होईल. ही तडजोड आपण कोणाबरोबर करतो. कायद्याप्रमाणे वागणा-या नागरिकांना डावलून आपण बेकायदेशीर कृत्ये करणा-या लोकांना मालमत्ता कर डबल करुन त्यांना जागा देणार आहात का ? या संपूर्ण विधेयकामध्ये जे शब्दप्रयोग केलेले आहेत ते अतिशय भयानक आहेत म्हणजे त्याच्यावर कधी कारवाई होईल याचा कुठेही उल्लेख नाही.

यानंतर श्री.कानडे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

बेकायदेशीर बांधकामे आम्ही काढून टाकू तोपर्यंत ही व्यवस्था आहे असा कोठेही उल्लेख यामध्ये केलेला नाही. हे विधेयक मांडताना कमीत कमी कायद्याचा आदर करणाऱ्यांना तरी जनतेची काळजी वाटली काय ? शासनाकडे करांच्या माध्यमातून कायदेशीर लोकांकडून -किती पैसा येतो आणि बेकायदेशीर लोकांकडून किती पैसा येतो याचा विचार केला आहे काय ? कायदेशीर नागरिक विविध माध्यमातून कर रुपाने पैसा भरतात. हा पैसा किती येतो याचा शोध घ्या. या देशात आणि राज्यात विविध कायदे आहेत या कायद्यांच्या माध्यमातून शासनाच्या तिजोरीत किती पैसा येतो याचा आढावा घ्या. या मुंबई शहरामध्ये ६५ लाख लोक झोपडयांतून राहतात. पुणे शहर असो अथवा नागपूर शहर असो याठिकाणी सुध्दा झोपडपट्टया आहेत. ठाणे शहरात तर प्रचंड संख्येने झोपडया आहेत. ठाणे जिल्हयातच नव्हे तर जेथे जेथे म्हणून महानगरपालिकांची क्षेत्रे आहेत तेथे जास्तीत जास्त अनधिकृत बांधकामे आहेत. या सर्व अनधिकृत बांधकामांना सरकार संरक्षण देण्यासाठी बसले आहे काय ? कायदेशीर जमीन विकत घेऊन सगळे सोपस्कार करुन बांधकाम केल्यानंतर त्याच्यातून मिळकत प्राप्त होते अशा लोकांना संरक्षण देण्यासाठी शासन आहे की कोणासाठी काम करीत आहे याचा विचार करा. माननीय सदस्य श्री. रावते यांनी आपल्या भाषणात याविषयाबाबत अनेक मुद्दे उपस्थित केले. या विधेयकावर शासकीय पक्षाच्या वतीने अजूनपर्यंत एकही सन्माननीय सदस्य बोलला नाही. आपण कायदे बनवण्यासाठी येथे बसलो आहोत. आतापर्यंत सन्माननीय सदस्य श्री. रावते बोलले त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण बोलले आणि आता मी बोलण्यासाठी उभा आहे. सत्ताधारी पक्षाकडून एकही माननीय सदस्य बोलू इच्छित नाही असे दिसते. नुसती बिले सभागृहात मांडायची आणि होयचे बहुमत आहे असे म्हणून ती पास करावयाची. विधानपरिषदेसारख्या वरिष्ठ सभागृहामध्ये जेथे प्रत्येक गोष्टीचा कीस काढला जातो त्याठिकाणी या विषयावर साधकबाधक चर्चा होणे आवश्यक आहे. कोणते शब्द चुकीचे आहेत आणि काय बदल करणे आवश्यक आहे कशा पध्दतीने परिवर्तन व्हावयाला पाहिजे याची साधकबाधक चर्चा क्लॉज टू क्लॉज चर्चा व्हावयाला पाहिजे. विधेयक मांडण्याच्या पाठीमागे कोणता उद्देश आहे ते पाहणे अत्यंत महत्वाचे आहे. हे विधेयक पास केल्यानंतर त्याचे परिणाम काय होणार आहेत याचाही विचार केला पाहिजे. उल्हासनगरमध्ये काय झाले याची सर्वांना कल्पना आहेच. या शहरातील १०० बेकायदेशीर बांधकामे पाडण्याचे हायकोर्टाने आदेश दिले.

.....२



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

कालबध्द कार्यक्रम त्यासाठी तयार करण्यात आला आणि त्यानंतर शहरातील सर्व जनता अस्वस्थ झाली. शेवटी शासनाने पर्याय काढून बांधकामे अधिकृत केली. त्याची ही पुढील आवृत्ती आहे. कल्याण-डोंबिवली येथे सुध्दा असेच प्रकार होत आहेत. मुंबई शहरातच नव्हे तर पुणे,नागपूर,रत्नागिरी अशा सर्व शहरांमधून अनधिकृत बांधकामे आहेत.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 16:30

श्री.मधुकर सरपोतदार......

सभापती महोदय, मी परवा देखील सभागृहात ज्या गोष्टीचा उल्लेख केला होता, तीच गोष्ट पुन्हा याठिकाणी उद्धृत करु इच्छितो. आमच्या भागातील गोविंद टॉवर ही इमारत 3 ऑगस्ट, 1998 रोजी कोसळली. त्याच दिवशी लोकसभेमध्ये बांगला देशी नागरिकांच्या प्रश्नासंबंधी उपस्थित झ ालेल्या प्रस्तावावर बोलत असताना मला ही बातमी कळली की, गोविंद टॉवर इमारत कोसळली असून त्यात 36 माणसे मृत्यूमुखी पडली आहेत. मंत्रीमहोदय, गोविंद टॉवरचा इतिहास आपल्याला माहित आहे का? अनधिकृत बांधकामाबद्दल बोलत असताना त्या इमारतीमधील दोन मजले अनधिकृत होते, 20 हजार गॅलन क्षमतेची पाण्याची टाकी त्या इमारतीवर बसविण्यात आली होती. ही इमारत एक दिवस कोसळेल याची शक्यता असल्यामुळेच मी महानगरपालिकेच्या वेगवेगळया तीन उपआयुक्तांना या इमारतीमध्ये प्रत्यक्ष घटनास्थळी भेटीला बोलावून दाखवून दिले होते. या इमारतीच्या 7 मजल्यांवर पायी नेऊन दाखविले होते. वरचे दोन मजले बेकायदेशीर असून भिंतीतून पाणी गळत आहे, वरच्या मजल्याच्या सिलिंगमधून तळमजल्यापर्यंत पाणी झिरपते आहे, त्यामुळे ही इमारत कधीही कोसळेल हे महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दाखवून दिले होते. शेवटी बळी कोणाचे गेले? महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे बळी गेले का? त्या ठिकाणी जे रहात होते त्यांचे बळी गेले. लहान मुले, वयस्कर मंडळी जे स्वत:चे जीव वाचवू शकले नाहीत, ते बळी पडले. तोच प्रकार बोरीवली येथे घडला.

सभापती महोदय, शासन अनधिकृत बांधकामांना मालमत्ता कर लागू करीत आहे. तो कर दुप्पट केला किंवा दहा पट केला तरी परिस्थितीत बदल होणार आहे का? हा महत्वाचा प्रश्न आहे. शासनाचे कर्तव्य काय आहे? शासन कशासाठी आहे? "शासन" हा शब्द कशासाठी वापरला याचा कधी शासनाने विचार केला आहे का? ज्यावेळी कायद्यामध्ये सुधारणा करु पाहता त्यावेळी शासन नावाची यंत्रणा जिवंत आहे, जर चुकीची पावले उचलली तर आपल्याला जाब विचारणारी यंत्रणा अस्तित्वात आहे अशा प्रकारची भावना सर्वसाधारण जनतेमध्ये असावयास पाहिजे. तो दरारा शासनाने निर्माण केला आहे का? मी आज सकाळी सभागृहात घडलेली घटना सांगतो. सकाळी 9.45 वाजता सभागृहामध्ये प्रस्तावावर चर्चा सुरु झाली. महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये उपस्थित झाले. सभागृहाला आश्चर्य वाटेल, माननीय मुख्यमंत्री सभागृहात बसले त्यावेळी सत्ताधारी पक्षाकडून एकमेव सदस्य उपस्थित होते आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय

..2..

श्री.मधुकर सरपोतदार......

सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे उपस्थित होत्या. त्या पाठोपाठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते सभागृहात उपस्थित झाले. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी सभागृहात उपस्थित होतात, त्यावेळी त्यांच्या पाठिमागे पाहिले तर सभागृहामध्ये पाच सदस्य नाहीत, दहा सदस्य असू शकत नाहीत. पण त्यांच्या केबिनबाहेर मात्र लोकांची झुंड असते. ही काय शोकांतिका आहे? शासनाकडे, राज्यकर्त्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन किती झपाट्याने बदलत चालला आहे, याचा विचार कधी गांभीर्याने केला जातो का? ही जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस पक्ष या दोघांची आहे. दोन्ही पक्षांनी मिळून त्यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली आहे. त्यांची प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी दोन्ही पक्षांची आहे. शासनामध्ये सहभाग, शासनाकडून फायदे सगळेच घेतात. मंत्रीपद सगळ्यांना हवे असते. परंतु प्रतिष्ठा कोणाला सांभाळायला नको. अशीच परिस्थिती या विधेयकाबाबतची आहे. या विधेयकामध्ये शासनाने सुरुवातीलाच म्हटले आहे की, "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1950, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948, महाराष्ट्र नगरपरिषदा व नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक". ही सुधारणा आहे का? हा माझा पहिला प्रश्न आहे. या कायद्याच्या माध्यमातून बेकायदेशीर कामातून शासन फक्त मालमत्ता कर दुप्पट घेणार आहे. याला सुधारणा मानता का? सुधारणा ती होऊ शकते, जी अनधिकृत बांधकामे असू शकतील ती तीन महिन्यात पाडून टाकण्याची तरतूद असेल तर ती एका महिन्यात कशी दूर करता येतील, याला सुधारणा म्हणतात. उद्या एखाद्याने चोरी केली, दरोडा घातला, त्याने त्यात सुधारणा करावयाची म्हणजे त्याला माफ करायचे आणि ज्याच्याकडे पैसे नव्हते, त्याने चोरी केली, त्याला कशाप्रकारे शिक्षा द्यायची याचा विचार म्हणजे त्याला सुधारणा म्हणता, यादृष्टीनेच हे विधेयक आणले आहे. शासनाने पहिल्या परिच्छेदात म्हटले आहे की, "अनधिकृत बांधकामांचा तपास करण्यासाठी नेमलेल्या काकोडकर समितीने इतर गोष्टींबरोबरच अनधिकृत बांधकामांवर शास्ती बसविण्याकरिता तरतूद करण्यासाठी राज्यात लागू असलेल्या नगरपालिका कायद्यामध्ये सुधारणा करण्याची शिफारस केलेली आहे."

(नंतर श्री.जुन्नरे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

सुधारणा म्हणजे काय? आपण सुधारणा कशाला म्हणतो हा माझ्या समोर प्रश्न उभा राहिलेला आहे. त्यामुळे सुधारणेचा माननीय मंत्रीमहोदयांनी अर्थ सांगणे आवश्यक आहे. समजा माझ्या घरात उत्पन्नाची साधने नाही म्हणून मी दुस-याचा खिसा कापला आणि घरात पैसे आणले म्हणजे त्याला सुधारणा म्हणावयाची काय? सुधारणेचा अर्थ असा आहे की, अस्तित्वात असणारे जे कायदे आहेत त्यामध्ये आणखी सुधारणा करुन परिणामकारक रित्या कायदा कसा राबविता येईल याचा विचार करणे याला सुधारणा म्हणतात. आपण या ठिकाणी जी सुधारणा केलेली आहे ती सुधारणा नसून अधोगती आहे. शासनाने या ठिकाणी अधोगतीचे विधेयक मांडलेले आहे. काल मला आपण विचारले होते की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते येईपर्यंत आपण थांबावयाचे का तर त्यावेळी मी आपल्याला सांगितले होते की, सन्माननीय सदस्यांनी सुधारणा सुचविलेली असल्यामुळे त्यांना प्रथम बोलण्याची संधी द्यावी व त्यानंतर या बिलावर मी माझे विचार मी व्यक्त करेन असे सांगितले होते. आपण विधेयकामध्ये म्हटले आहे की, "हे विधेयक, 2006( 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 72, महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आलेले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समिती समोर प्रलंबित आहे. उक्त विधेयकाच्या खंड 14 द्वारे, जो कोणी अवैधरीत्या कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे बांधकाम किंवा पुनर्बांधकाम करील तो, अशा अवैध बांधकामाच्या संबंधात, त्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधाकम म्हणून राहील तोपर्यंत, प्रत्येक वर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती देण्यास पात्र असे." या ठिकाणी आपण "दंड" शब्द न वापरता "शास्ती" शब्द वापरलेला आहे. त्यामुळे या शास्तीचा अर्थ काय? जर या विधेयकाच्या संदर्भात कोणी कोर्टात गेले तर या विधेयकामध्ये जे शब्द वापरलेले आहेत ते शासनाच्या अंगाशी येणार आहेत. त्यामुळे या ठिकाणी "शास्ती" शब्दाचा अर्थ सांगणे आवश्क आहे. विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे की, "सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 72 याच्या खंड 14 द्वारे, मंबई महानगरपालिका अधिनियमात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केलेल्या, कलम 152 (अ) च्या धर्तीवर, राज्यातील इतर महानगरपालिका व नगर परिषदा यांच्या क्षेत्रातील अवैध बांधकामावर शास्ती बसविण्याकरिता, मुंबई

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये तशाच तरतुदी समाविष्ट करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. या विधेयकाच्या अनुषंगाने तरतुदी कराव्यात परंतु सुधारणा करु नये असे शासनाचे मत आहे. त्यामुळे या ठिकाणी ज्या सुधारणा आणलेल्या आहेत त्याला आपण सुधारणा म्हणू शकत नाही. उत्पन्न घेण्यासाठी आपण सुधारणा करता, परंतु कायद्याची तुम्ही अधोगती करीत आहात हे आपण विसरत आहात. विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 2 वरील दुस-या परिच्छेदात असे म्हटले आहे की, "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 याच्या कलम 267 नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल " असे म्हटले आहे परंतु हे कधी अंमलात येईल याचा खुलासा केलेला नाही. त्यामुळे हे विधेयक कशासाठी संमत करावयाचे? ज्या विधेयकाची अंमलबजावणीच करावयाची नाही, किंवा करावयाची असेल तर केव्हा करावयाची याची माहिती स्पष्ट नाही. त्यामुळे हे विधेयक आपण येथे कशासाठी मांडीत आहात? खरे म्हणजे या ठिकाणी क्लॉज बाय क्लॉज चर्चा व्हावयास पाहिजे परंतु मुळात: या विधेयकात सुधारणाच नाही, ही विधेयकाची अधोगती आहे त्यामुळे कायद्याचा आपण धज्जा उडविला आहे असे आम्ही म्हटले तर ते अतिशयोक्ती होणार नाही. मी काल आणि आज सुध्दा बोललो आहे की, विधेयकाच्या संदर्भात आपल्याकडे जे कायदेशीर तज्ञ आहेत, जे लोक विधेयकाचा मसुदा बनवतात, ड्राफट् बनवतात त्यांनी सुध्दा यांसदर्भात काही सुध्दा विचार करु नये? कोणत्या कायद्याच्या कसोटीवर हे बील टिकू शकेल किंवा दुस-या बाजूने असे म्हणू या की, या विधेयकाच्या आधाराने त्यांना कायद्याने संरक्षण मिळेल व ज्यांनी अनाधिकृत बांधकामे बांधलेली आहेत त्यांनी डबल मालमत्ता कर भरला तर ती अधिकृत होण्याची शक्यता आहे. आपण उल्हासनगरमधील सर्व अनाधिकृत बांधकामे अधिकृत केलेली आहेतच ना. या ठिकाणी दंड लावण्यात आला होता परंतु या ठिकाणी अनाधिकृत बांधकाम केलेल्या लोकांनी काहीही दंड भरलेला नाही. आपण इमारती अधिकृत केल्या परंतु त्यासंदर्भात आपण कोणावरही कारवाई करु शकला नाहीत. कल्याण-डोंबिवलीचा सुध्दा आपण सर्व्हे केलेला आहे. कल्याण-डोंबिवली येथे सुध्दा अनेक बांधकामे अनाधिकृत आहे हे आपल्याला दिसून आलेले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

पण आपण काही करु शकत नाही. हे प्रत्येक विभागामध्ये चालू आहे. पंचायत समिती, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका या क्षेत्रांमध्ये प्रचंड प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. ही अनधिकृत बांधकामे होण्याची कारणे म्हणजे शासनाने केलेले दुर्लक्ष हे आहे. अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची शासनाची इच्छाशक्ती नाही. मी सभागृहास मुंबईतील उदाहरण देतो. मुंबई शहरामध्ये एक अनधिकृत बांधकाम झालेले आहे. गेली चार वर्षे मी ही बाब महानगरपालिकेच्या आणि शासनाच्या निदर्शनास आणत आहे. पूर्ण बिल्डींग उभी राहिलेली आहे. आर.सी.सी.स्ट्रक्शन उभे राहिले आहे. त्याठिकाणी पाण्याची सोय नाही. इतर कोणत्याही सुविधांची सोय नाही. असे असतानाही महानगरपालिकेचे अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. महानगरपालिकेचे अधिकारी त्याठिकाणी जाण्यास घाबरतात आणि ही गोष्ट एका अतिरिक्त आयुक्तांनी माननीय राज्यमंत्र्यांसमोर सांगितलेली आहे. हे मंत्रिमहोदयदेखील मान्य करतील. ती बिल्डींग दाऊद मियाची आहे. एका गँगस्टरची आहे. अनधिकृत बांधकामांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देणार नाही असे शासनाने ठामपणे सांगावयास पाहिजे. अशी जी अनधिकृत बांधकामे असतात त्यामध्ये आमदार, खासदार, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष, पंचायत समितीचे अध्यक्ष आणखी कोणाचे-ना-कोणाचे तरी हितसंबंध असतात.

सभापती महोदय, पृष्ठ 2 वर नमूद करण्यात आले आहे की, " पोट कलम (1) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्धारित करण्यात व गोळा करण्यात येईल." याचा अर्थ काय होतो याचा कोणी विचार केला की नाही ? पैसा गोळा करण्याचे खूप मार्ग आहेत. दारुच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पैसे मिळू शकतील. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हा विषय मांडलेला आहे. मंत्रिमंडळातील एका नेत्याने, मी त्यांचे नाव सांगतो श्री.गणेश नाईक यांनी दारुची दुकाने काढावीत असे सांगितले. महात्मा गांधी की जय ! दारुच्या बाटलीवर महात्मा गांधीजींचे चित्र छापले जात नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय एक अभ्यासू मंत्री आहेत. आम्ही कौतुक करावे याचा अर्थ त्यांनी बिघडावे असा नाही. आजच्या लोकशाहीमध्ये, पक्षाच्या संघर्षामध्ये कोण काही बोलला तरी अमूक अमूक असा बोलत होता आणि नेमका त्याचा उलटा अर्थ काढण्यात येतो. काल मला एका व्यक्तीने सांगितले की, आपण सभागृहात यु.एल.सी.वर चर्चा करीत आहोत आणि बाहेर माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय सदस्य श्री.गोपीनाथ मुंडे लॉबीमध्ये वीस मिनिटे चर्चा करीत होते. अशा पुड्या सोडणारे लोक पुष्कळ आहेत. राजकारणामध्ये गंदगी जास्त आहे, स्वच्छता खूप कमी आहे. स्वच्छ कपड्यांनी, स्वच्छ मनाने, स्वच्छ विचाराने, स्वच्छ उद्देशाने कारवाई करण्यासाठी येणारी माणसे खूप कमी आहेत हे आपले दुर्दैव ाहे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

सभापती महोदय, काल जो यूलसीचा कायदा मांडला, त्यावर मी जरुर बोलणार आहे. तो प्रस्ताव कधी चर्चेला येतो, याची मला माहिती नाही. आज रात्रभर सभागृहात बसायचे की काय याबाबतही मला माहिती नाही. माननीय सभापतींचा आदेश काय आहे, याची मला माहिती नाही. यूएलसी कायद्यावर भरपूर चर्चा झाली पाहिजे, कारण तो अतिशय महत्वाचा प्रस्ताव आहे. या विधेयकामध्येही अनेक गोष्टी महत्वाच्या आहेत. विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 4 वरील कलम 4 (ड) च्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "...ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल," आपण येथे प्रत्येक ठिकाणी "मालमत्ता कर" हा शब्द वापरलेला आहे. मालमत्ता कर म्हणजे इक्व्हेलंट असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे तो मालमत्ता करच धरला जाईल. यामधून दोन इंटरपिटीशन निघतात. यातून अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन द्या, असाही अर्थ निघतो. आज महाराष्ट्रामध्ये व विशेषत: मुंबई शहरामध्ये अनधिकृत बांधकामे अनेक ठिकाणी झ ाालेली आहेत. कोणाचीही मान्यता नसताना आज राज्यामध्ये अनेक ठिकाणी इमारती उभ्या आहेत. त्याचे कारण असे की, आज शासन नावाची संस्था राज्यामध्ये अस्तित्वात आहे, याची जाणीवच कोणाला राहिलेली नाही. आज शासनाचे कोणते प्रकार चालू आहेत, याची मला माहिती नाही. मागच्या आठवडयात वक्फ बोर्डाचा विषय सभागृहामध्ये आला. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री वेगळे बोलले व माननीय मंत्रिमहोदय वेगळे बोलले. कदाचित यामध्ये माननीय मंत्रिमहोदयांची बाजू बरोबर असेल अथवा माननीय मुख्यमंत्र्यांची बाजू बरोबर असेल, याची मला कल्पना नाही. परंतु याठिकाणी प्रत्येकाची स्वत:ची अशी एक बाजू आहे. असे विषय सभागृहामध्ये आल्यानंतर त्यावेळी सगळे संकेत बोलतात. त्यामुळे यादृष्टीने अशा गोष्टींकडे पाहण्याची आवश्यकता आहे. विधेयकामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे यांचा, असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी किती असो." माननीय मंत्रिमहोदय, आपण एक तरी अनधिकृत बांधकाम

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

काढल्याचे उदाहरण द्यावे. माननीय मंत्रिमहोदय, सकाळी आपण याबाबतीतील आपली भूमिका स्पष्ट केली. यासंदर्भात मी आपले अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकांत सिंह यांना सांगितले की, मी आपल्या बरोबर येण्यास तयार आहे, आपण माझ्याबरोबर या. त्यावेळी त्यांनी सांगितले की, तो सेन्सिटीव्ह एरिया असल्यामुळे मी त्याठिकाणी येणार नाही. ते आज येथे बसलेले आहेत. माननीय मंत्रिमहोदय अशी जर माणसे आज अधिकारी पदावर असतील तर आपण कारवाईची अपेक्षा कशी काय करु शकता ? अशी माणसे शासनामध्ये मोठयाप्रमाणात आहेत. स्वत:चा स्वार्थ व पैसा कमाविण्यासाठी आज ते अधिकारी पदावर बसलेले आहेत. त्यांच्या भ्रष्टाचारांचे प्रश्न सभागृहामध्ये मोठया प्रमाणात रोज येतात. आजच्या अंतिम आठवडा प्रस्तावाचा विषयही भ्रष्टाचाराचाच आहे. आज प्रत्येक वर्तमानपत्रात जास्तीत जास्त बातम्या हया भ्रष्टाचाराच्या, अपघाताच्या, अतिरेक्यांच्या, बलात्काराच्या असतात. इतर कोणत्याही बातम्या पहावयास मिळत नाहीत. आज त्यातल्या त्यात फक्त दोनच बातम्या चांगल्या छापून आलेल्या आहेत. एक म्हणजे, आपण कधी नव्हे तो इंग्लडबरोबर क्रिकेटमध्ये जिंकल्याची व दुसरी म्हणजे न्या.कोदे यांनी योग्य न्याय दिल्याची बातमी छापून आलेली आहे. यामध्ये व्यक्ती महत्वाचा नाही. त्यांनी याबाबतीत बरोबर न्याय्य भूमिका घेतलेली आहे. त्यांनी बरोबर वर्मावर बोट ठेऊन, न्याय दिलेला आहे. अशाप्रकारे दोन बातम्या आजच्या वर्तमानपत्रात चांगल्या छापून आलेल्या आहेत. नाही तर दररोज पहिल्या पेजवर भ्रष्टाचाराच्या बातम्या छापून येतात.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.......

सभापती महोदय, या विधेयकासंबंधी माझे असे मत आहे की, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी सूचना केल्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेसंबंधीचे विधेयक आणि हे विधेयक क्लब करुन, एखादा प्रस्ताव पारीत करुन, जी संयुक्त चिकित्सा समिती नेमली आहे, त्या समितीसमोर ठेवावे, दोन्ही विधेयकांचा एकत्रित अभ्यास करुन अहवाल प्राप्त करुन घ्यावा आणि त्यानंतर ही दोन्ही विधेयके सभागृहात पारीत करण्यासाठी येऊ शकतात किंवा कसे, आपल्या नियमात तशी तरतूद आहे का, असे होऊ शकते का, यासंबंधी मंत्रीमहोदयांनी माननीय सभापतींशी चर्चा करावी आणि निर्णय घ्यावा. हा निर्णय घेणे निश्चितपणे उचित होईल. घाईगर्दीमध्ये बेकायदेशीर कृत्य कायदेशीर करण्याचा प्रयत्न कृपया करु नये, कारण हे एल.सी.बिल आहे. एवढी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

----------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी या बिलाच्या संदर्भात माझे मनोगत मांडतांना या बिलातील पहिल्या शब्दावर अगोदर बोलणार आहे. बिलाचे इंग्रजी भाषांतर देण्याची प्रथा सुरु केली आहे. या बिलाच्या सुरुवातीलाच असे म्हटले आहे की, "A Bill further to amend the Bombay Provincial Municipal Corporations Act" 'बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन'चे नामांतर 'मुंबई महानगरपालिका' असे झाले, परंतु येथे अजूनही 'बॉम्बे' असा शब्दप्रयोग करण्यात येतो. ही एक प्रकारची कीड आहे, विकृत मानसिकता आहे. या बिलाच्या संदर्भातील इंग्रजी भाषांतर माझ्याकडे आहे. मराठीतील प्रतीवर देखील 'बॉम्बे' असाच शब्दप्रयोग केलेला आहे. हे विधेयक मंजूर करण्यापूर्वी यासंबंधी सुधारणा करावी, अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, बिल ज्या उद्देशाने आणले आहे त्यामधून काही साध्य होईल, चांगले होईल, असे म्हणता येणार नाही, कदाचित साध्य होईल पण चांगले होईल, असे म्हणता येणार नाही. बिलाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी आपली मते मांडली आहेत. मी गेल्या दहा वर्षांपासून या सभागृहाचा सदस्य आहे. पहिल्या वर्षात मांडलेले मुद्दे दहा वर्षांनंतर सुध्दा तसेच मांडावे लागत आहेत, किंबहुना परिस्थिती अधिक खालावत गेल्याचे चित्र समोर येते आहे. हा कायदा राज्यातील सर्व महापालिकांसाठी लागू आहे. मुंबई पन्नास वर्षे डोळयाखालून पाहिली. पन्नास वर्षांपूर्वीची मुंबई, बालपणात पाहिलेली मुंबई अजूनही डोळयासमोर आहे. हा कायदा तुम्ही मुंबई शहराला लागू करणार नाही, असे कुठेही बिलात दिलेले नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी माझ्या प्रास्ताविक भाषणात मुंबई महानगरपालिकेला हा कायदा लागू होणार नाही, हे स्पष्ट केले आहे. मुंबई वगळून इतर महापालिकांना हा कायदा लागू आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या बिलात याचा कुठेही उल्लेख नाही, यासाठी माननीय मंत्रीमहोदयांना आपल्या भाषणात खुलासा करावा लागला आहे. हा कायदा अवैध बांधकामावर शास्ती बसविण्याकरिता तरतूद करण्यासाठी राज्यात लागू असलेल्या नगरपालिका कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची काकोडकर समितीची शिफारस शासनाने स्वीकारली आहे.

..3.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत........

त्यानुसार मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, 2006 महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आले आहे. हे विधेयक राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीसमोर ठेवले आहे. हे विधेयक संयुक्त समितीसमोर ठेवले असतांना त्याच विषयावरील अधिक काही भाग, व्याप्ती वाढवित असल्यामुळे हे विधेयक देखील संयुक्त चिकित्सा समितीसमोर जावयास हवे, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, या बिलातील शब्दरचना देखील गोंधळाची आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जे वाचले ते कॉंट्रॅडिक्टरी आहे. जाणुनबुजून मी यामधील विरोधाभास कसा आहे ते सांगू इच्छितो. बिलातील कलम 189 (अ) मधील (ड) परिच्छेदात असे नमूद केले आहे की, "कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यन्त अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यन्त दरवर्षी अशा इमारतींवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल."

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .........

कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, म्हणजे केलेल्या बांधकामासाठी तुम्ही हे करीत आहात काय ? नक्की काय आहे, हे सभागृहाला कळले पाहिजे. तुम्ही केलेल्या बांधकामावर शास्ती बसविणार आहात की होणा-या बांधकामावर शास्ती बसविणार आहात ? सन 1995 पूर्वीच्या झोपडया शासनाने नियमित केल्या. ज्यांच्याकडे पुरावा असेल त्याप्रमाणे त्यांच्या झोपडया नियमित केल्या. येथे तुम्ही असे म्हणता की, बांधकाम करील, म्हणजे बांधकाम करा आणि शास्ती भरा, बांधकाम करील हा भविष्यवेधक शब्द आहे. बांधकाम करील त्याला तुम्ही नियमित कराल, म्हणजे आधीच उल्हास त्यात अजून फाल्गुन मास. या विधेयकातील विरोधाभास करणारे वक्तव्य असे आहे की, "असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असे पर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी कितीही असो." सभापती महोदय, हे द्विअर्थी आहे. यातील गर्भीत अर्थ असा आहे की, आज ना उद्या हे बांधकाम रेग्युलराईज केले जाईल. मग कशासाठी घाबरयचे ? दुर्दैव असे आहे की, कोणत्या अधिका-यांच्या डोक्यात अशा भन्नाट कल्पना येतात. ज्याला पाहिजे तसा अर्थ त्यांनी लावावा आणि पाहिजे तसे पळत सुटावे. आपण असा कायदा करीत आहोत की, जो पुनर्बांधकाम करील तो असे सांगेल की, कशासाठी महानगरपालिकेकडे परवानगी मागायची ? तो सांगेल की, असा कायदा आहे. त्याने जर डबल पैसे भरले तर तुम्ही ते बांधकाम तोडणार नाही. शासनाचा धाक, दरारा असावयास पाहिजे. शासनकर्ते या शब्दात दुःशासनाला शासन होईल, अशा प्रकारचा अर्थ आहे. तुम्ही काहीही करा, येथे आम्ही तुमच्यासाठीच बसलेलो आहोत. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, फक्त मतांसाठी चाललेला हा चांगुलपणा आहे. या विधेयकामध्ये पनर्बांधकामाचे वर्गीकरण करण्यात आलेले नाही. कोणते बांधकाम करणार ? इमारत बांधणार की झ ोपडी बांधणार ? तुम्ही झोपडयांना कशी शास्ती लावणार ? कोणी तरी येतो आणि रेल्वे लाईनच्या बाजूला झोपडी उभी करतो, पत्र्याची शेड उभी करुन कारखाना काढतो. इमारतीचे बांधकाम, म्हणजे पुन्हा शब्दांची पळवाट. तुम्ही शास्ती कोणाकडून घेणार ? इमारत

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .........

बांधणारा असे सांगेल की, आम्ही इमारत थोडीच बांधली, आम्ही तर झोपडी बांधली. सभापती महोदय, इमारत या शब्दाची व्याख्या काय आहे ? ती व्याख्या कोणत्या सालची आहे ? शासनाने जे विधेयक आणलेले आहे ते हास्यास्पद विधेयक आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी या विधेयकातील प्रत्येक कलमावर सखोल चर्चा केलेली आहे.

यानंतर श्री.गागरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

यापूर्वी झालेल्या अनाधिकृत बांधकामाचे काय करायचे ? नवीन होणारा कायदा भविष्यात जी बांधकामे होतील त्यांच्यासाठी लागू आहे. सभापती महोदय, या विधेयकामध्ये अनेक हास्यास्पद गोष्टी आहेत. हे विधेयक असेच राहिले तर शासनाला काहीच कळत नाही असे लोक म्हणतील व आम्हाला अडाणी म्हणतील. या विधेयकावर माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार व श्री.दिवाकर रावते हे सखोल बोलले असल्यामुळे या विषयावर मी अधिक बोलत नाही. त्यांनी विनंती केली आहे की, हे विधेयक चिकीत्सा समितीकडे पाठविण्यात यावे. या विधेयकाचा पोस्टमार्टेम करुन चिकीत्सा समितीकडून आम्हाला हे विधेयक जीवंत आणावयाचे आहे. या विधेयकाची उद्दिष्टये चांगली आहेत परंतु मार्ग योग्य नाही, हा मार्ग बदलण्याची गरज आहे. म्हणून हे विधेयक चिकीत्सा समितीकडे पाठवावे, अशी मी विनंती करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



01-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3V-2

PNG/ SBT/ MAP/

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) :सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 5 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 यावर मी बोलू इच्छितो.

विधेयकातील उद्देश आणि कारणामध्ये लिहिले आहे की, "कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाचा तपास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या काकोडकर समितीने, अनधिकृत बांधकामावर शास्ती बसविण्याकरिता तरतूद करण्यासाठी राज्यात लागू असलेल्या नगरपालिका कायद्यामध्ये सुधारणा करण्याची शिफारस केलेली आहे" सभापती महोदय, याचा अर्थ काय आहे. It is a blank permission व Clean chit दिलेली आहे. अनधिकृत बांधकाम करण्यासाठी पैसे भरावेत व अनधिकृत बांधकाम करावे असा याचा अर्थ आहे, असे मी समजतो. माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे या विधेयकावर विश्लेषणात्मक बोलले आहेत. आपण नेहमी म्हणतो की, अनाधिकृत बांधकाम करणाऱ्यावर खटले दाखल केले पाहिजेत. संबंधित वार्ड ऑफिसरला जबाबदार धरले पाहिजे. आजपर्यत किती वार्ड ऑफिसरवर कारवाई केलेली आहे ? माझ्या माहितीप्रमाणे एकाही वार्ड ऑफिसरवर कारवाई केलेली नाही. अनधिकृत बांधकाम करणाऱ्यावर काहीही कारवाई झालेली नाही. परंतु शासन या विधेयकाद्वारे सांगत आहे की, अनाधिकृत बांधकाम करा, शास्ती भरा व ते बांधकाम नियमित करुन घ्या, अशा प्रकारचा अर्थ निघत आहे. हा Double standard game असून केवळ शब्दछल आहे. यातून अनेक वैविध्यपूर्ण अर्थ निघू शकतात. या विधेयकाची संज्ञा कोठपर्यत मर्यादीत आहे हे मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. अनधिकृत बांधकामे व शास्ती या विषयाची संज्ञा कोठपर्यत मर्यादीत आहे ? याला कोण जबाबदार आहे ? त्यांच्यावर कोणती कारवाई होणार आहे ? यातील शब्दाचा अर्थ काय आहे ? विधेयकाच्या उद्देश आणि कारणामध्ये कोठेही दिसत नाही. अवैध बांधकामाबद्दल माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले आहे तसेच झोपडया व अनेक गोष्टी नियमित होऊ शकतात हे सांगितले आहे. या विधेयकात म्हटले आहे की, "परंतु असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही-मग असा कालावधी कितीही असो". या पर्टीक्युलर परिच्छेदावर मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे. यातून नेमका कोणता अर्थ ध्वनीत करावयाचा आहे ते मंत्री महोदयांनी सांगावे. कोणत्याही कालावधीसाठी कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे याचा अर्थ असावा असे मला वाटते.

यानंतर श्री.सुंबरे.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

"ते अवैधरीत्या अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी विनियमित करण्यात आले आहे" याचा अर्थ काय? आणि जर ते अवैध किंवा पुर्नबांधकाम असेल, एखादी इमारत पाडून त्या जागी नवीन इमारत बांधली तर ती पुर्नबांधकामाची व्याख्या होते काय? विनियमित झाले म्हणजे रेगुलराईज झाले असा मला अर्थ सांगण्यात आला. असा अन्वयार्थ लावला जाणार नाही तर मग कोणत्याही कालावधीसाठी हा शब्दप्रयोग वापरण्याचे कारण काय? याठिकाणी आपण कालावधी निश्चित केला असता तर बरे झाले असते. या विधेयकाच्या कलम 189 अ मध्ये "या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेता किंवा अशा परवानगीसोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करुन आपल्या जमिनीवर" असा शब्दप्रयोग केला आहे. याचा अर्थ असा की तुम्ही परवानगी न घेता बांधकाम करा आणि नंतर शास्ती भरुन ते रेगुलराईज करुन घ्या असा मी समजतो. माझी आपणास विनंती आहे की, अवैध बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यांना आपण मोकळे सोडत आहात याची मला भीती वाटते. त्यामुळे या विधेयकामध्ये असलेल्या त्रुटी अनेक माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितल्या आहेत. त्या दूर करुन हे विधेयक आपल्याला परिपूर्ण करावयाचे असेल तर आपल्याला हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्याशिवाय पर्याय नाही असे माझे स्पष्ट मत आहे. मंत्रिमहोदयांनी या सर्व मुद्दयांबाबत खुलासा केला तर बरे होईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अनेक माननीय सदस्यांनी या विधेयकावरील आपले विचार याठिकाणी व्यक्त केले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, मधुकर सरपोतदार, अरविंद साळवी, दीपक सावंत यांनी आपले मौलिक विचार व्यक्त केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या विधेयकामध्ये काही गोष्टी स्पष्ट झाल्या नसतील म्हणून माननीय सदस्यांनी त्या संदर्भात वक्तव्य केले आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी कलम 189 अ च्या संदर्भात जी शंका व्यक्त केली आहे, त्या संदर्भात सांगू इच्छितो की, याठिकाणी अ, ब, क व ड परिच्छेदामध्ये अनधिकृत बांधकामांची व्याख्या दिलेली आहे. उदा. श्री. राजेश टोपे यांनी आपल्या भूखंडावर परवानगी न घेता बांधकाम केले असेल तर ते अनधिकृत बांधकाम आहे. महानगरपालिका आणि नगरपालिकेमध्ये एम.आर.टी.पी. डी.सी.आर. असतो त्यामध्ये बांधकाम कसे केले पाहिजे, त्याठिकाणी 1 एफ.एस.आय. असेल तर त्यामध्ये सेट बॅक किती असला पाहिजे, त्याठिकाणी व्हेंटिलेशन, लाईट वगैरे गोष्टींचे व्हेरिफिकेशन केले पाहिजे. नाही तर इमारतीला खेटून भिंत बांधली गेली तर त्या ठिकाणी लाईट येणार नाही, व्हेंटिलेशन होणार नाही. त्याकरिता एम.आर.टी.पी. डी.सी.आर. बनविण्यात आले आहेत. त्यांचा भंग होता कामा नये. अशाप्रकारची अनधिकृत बांधकामाची व्याख्या या ठिकाणी देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यभरामध्ये एम.आर.टी.पी. डी.सी.आर. चा भंग करुन अनधिकृत बांधकाम केले असेल, त्या ठिकाणी एक ऐवजी दोन किंवा तीन चा एफ.एस.आय. वापरुन जास्तीचे बांधकाम केले असेल तर ते बांधकाम अनधिकृत बांधकामाच्या व्याख्येमध्ये येते.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी अनधिकृत बांधकामाच्या व्याख्येचा चुकीचा अर्थ लावला जात आहे . याठिकाणी असे म्हटले आहे की, "अशा इमारतींवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्त्ी भरण्यास पात्र असेल". It is not the defination of illegal construction.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव अनधिकृत बांधकामे करतांना केला आहे याची व्याख्या अ, ब, क व ड मध्ये दिलेली आहे. तेव्हा अगोदर माझे भाषण पूर्ण करु द्यावे. त्यानंतर माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचे जेवढे प्रश्न असतील त्या सर्वांची उत्तरे दिली जातील. आणि जर त्यांच्या प्रश्नाची मी समाधानकारक उत्तरे देऊ शकलो नाही तर हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविले जाईल हे मी जबाबदारीने सांगतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (पुढे सुरू..

मला जरूर सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याची मनापासून इच्छा आहे, तो विषय नाही. अनधिकृत बांधकाम करणाऱ्या कोणावर शास्ती लावली जाते त्याची व्याख्या मी सांगितले. अनधिकृत बाधकाम म्हणजे काय? या संदर्भातील सगळया गोष्टी सांगितलेल्या आहेत. कल्याण-डोंबिवली येथील अनधिकृत बांधकामे आपण रेग्युलराईज करायला निघालो आहोत काय ? असे अनेक सन्माननीय सदस्यांना वाटते. तशी ती अजिबात रेग्यलराईज होत नाहीत. विधेयकामध्ये अतिशय स्पष्ट म्हटलेले आहे. कोणी कोर्टात गेले, काही झाले तरी सुध्दा आपण दंड आकारतो आहे. याचा अर्थ असा होत नाही की, बांधकाम नियमित झाले, अधिकृत झाले. सन्मानीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की उद्देश आणि कारणांमध्ये याचा उल्लेख केलेला नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, परिच्छेद दोनमधील सातव्या ओळीमध्ये म्हटलेले आहे की, " अशा अवैध बांधकामाच्या संबंधात, त्याच्याविरूद्ध दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांाकाम जोपर्यन्त अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यन्त, प्रत्येक वर्षी अशा इमारतींवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती देण्यात पात्र असेल " याचा अर्थ एकच आहे की, मी विधेयक मांडत असताना माझ्या प्रास्ताविकामध्ये सांगितलेले आहे. या ठिकाणी अनधिकृत बांधकाम केले तर ते पाडले पाहिजे, असे कायद्यामध्ये आहे. अशाप्रकारचे दोन कायदे आहेत, की त्या कायद्याच्या अनुषंगाने ते बांधकाम पाडता येते. बीएमसी कायद्याचा उल्लेख करत नाही. कारण त्यांचा यामध्ये काही संबंध येत नाही. आज 22 महानगरपालिकांपैकी मुंबई महानगरपालिका वगळता इतर 21 महानगरपालिकांना बीपीएमसी ॲक्ट लागू आहे. नागरपूरसाठी नागपूर महानगरपालिका ॲक्ट आहे. या सगळ्या अधिनियमांमध्ये अनधिकृत बांधकाम पाडण्याच्या तरतुदी आहेत. या विधेयकामुळे त्या तरतुदींना कोठेही बाधा येईल, असे अजिबात होणार नाही. म्हणून ज्या तरतुदी आहेत, त्या तरतुदीच्या अनुषंगाने कारवाई करता येईल, अशीच आजची जी सुधारणा आणलेली आहे. त्यामुळे कोणीतरी दुप्पट दंड भरला म्हणजे त्याचे बांधकाम पूर्ण नियमित झाले असा अर्थ अजिबात होत नाही. त्यामुळे त्यांनी चूक केली तरी त्याला काही शासन नको काय ? असा सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचा आहे. त्यांनी चूक केली तरी त्याचे बांधकाम तसेच ठेवणार काय ? समान साईजची इमारत असेल, किंवा बांधकाम असेल आणि त्यामध्ये काही उल्लंघन झालेले असेल, तर जो चूक करतो त्याला शास्ती करायला नको काय ? दंड करायला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.राजेश टोपे (पुढे सुरु....

नको काय ?...... (अडथळा)... सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. नंतर मी सन्मानीय सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतो.

श्री.दिवाकर रावते : आपण जे काही बोलला ते शासनाने राजिनामा द्यावा अशा पध्दतीचे बोलला. आपण असे म्हणाला की, ज्यांनी काही चूक केली त्याला दंड लावायला नको काय ? जो बेकायदेशीर बांधकाम करतो ते तोडून टाकणे, नष्ट करणें, ही कायद्यामध्येच तरतूद आहे. असे असताना ज्यांनी चूक केली त्याला दंड करायला नको काय ? असे कसे सांगता ? बेकायदेशीर बांधकाम असेल तर ते तोडले जाईल, ही कायद्यामध्ये तरतूद आहे. माननीय मंत्री महोदय आपण सकाळी मोठ्या ताकदीने बोलत होता. त्याबाबत मलाही आनंद वाटत होता. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री महोदय म्हणाले की, 351 प्रमाणे महापालिकेने नोटीस दिली तर कारवाई करू. तसे नाही एमआरटीपीमध्ये ताबडतोब अनधिकृत बांधकाम तोडता येते. एमआरटीपी तोड डालो, 351 रोक डालो. आपली तोड डालोची ताकद सकाळी होती आणि आता रोक डालो, कशासाठी म्हणत आहात ? आपण आपल्याच कायद्याच्या विरोधामध्ये बोलत आहात. माननीय मंत्री महोदयांनी कृपाकरून समजून घ्यावे. तसा कायदा आम्हाला आणता येत नाही असे आपण बोलता, म्हणून अशाप्रकारचा दंड लावतो. परंतु मुळात दंडाची शास्ती आहेच. बेकायदेशीर बांधकाम तोडणे हीच शास्ती आहे. मुळात दंड आहेच, शास्ती आहेच, बेकायदेशीर बांधकाम तोडणे, हाच त्यातील भाग आहे. या ठिकाणी 'कालावधी' असा शब्द वापरलेला आहे. -मग असा कालावधी कितीही असो. आपण सर्वांनी मिळून प्रश्न दिलेला आहे. त्याला आपण सर्वजण पापी आहोत. 1976 ची झोपडपट्टी नियमित केली, 1980 च्या झोपड्या नियमित केल्या, त्यानंतर 1995 च्या झोपड्या नियमित केल्या. आता आपण 2000 च्या झोपड्या नियमित करायला निघालेलो आहोत. लोकांमध्ये असा संदेश गेलेला आहे की, आपण अनधिकृत बांधकाम करा, हे लोकप्रतिनिधी पागल आहेत, हे आज ना उद्या मतासाठी आपल्यामागे हात धुवून धावतात, आपल्याला हे लोक सांभाळणारच आहेत. हा संदेश लोकांपर्यन्त गेलेला आहे. आपण पैसे डबल भरा, असे सांगून कन्फर्म करत आहात. तेव्हा जो काही दंड आहे, शास्ती आहे, ती बरोबर नाही असे सांगत आहात, म्हणून हे करत आहोत....

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

असा त्याचा अर्थ आहे. आपण चांगला शब्द वापरला. ज्याने चूक केली त्याला दंड झाला पाहिजे. ज्याने चूक केली त्यासाठी दंड आहे परंतु करीत नाही. ते करता येत नाही म्हणून हे करीत आहात.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांचा पूर्ण आदर ठेऊन विनंती करु इच्छितो. आम्हालाही अभिप्रेत आहे की, अनधिकृत इमारती तोडल्या पाहिजेत, अनधिकृत बांधकामे तोडली पाहिजेत. मी राजकीय भाषण करु इच्छित नाही. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, ज्यांची ज्यांची राज्ये या राज्यात येऊन गेली त्यामध्ये कोणाच्या काळामध्ये किती बांधकामे तोडली याचा हिशेब पाहिला तर, मानवतावादी दृष्टीकोनातून अनेक सन्माननीय सदस्य बोलले की, भिवंडी महापालिकेमध्ये, आपल्या उल्हासनगर महापालिकेमध्ये अशा पध्दतीने एवढ्या मोठ्या प्रमाणावर बांधकामे असतील तर तोडणार काय ? तोडणे हा कायदा असेल तर तोडू या. पूर्ण महाराष्ट्रामध्ये किती बांधकामे तोडली जातात ते बघू या. अनधिकृत बांधकाम तोडणे हाच कायदा आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या संदर्भात असलेल्या ज्या ज्या महापालिका असतील, तत्कालीन ज्यांचे राज्य असेल त्या ठिकाणी किती बांधकामे तोडली ? औरंगाबाद महापालिकेमध्ये तेथील महापौरांचा काहीच रोल नाही काय ? तेथे असलेल्या वॉर्ड ऑफिसर्सनीच केले पाहिजे काय ? माझे असे म्हणणे आहे की, आज काही गोष्टी प्रॅक्टीकली शक्य होत नाही. ते केलेच पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय जे बोलत आहेत ते चुकीचे आहे. कायद्याच्या संदर्भात आता माननीय मंत्रिमहोदय जे बोलले ते चुकीचे आहे. समर्थ रामदास स्वामींनी असे सांगितले आहे की, "अभ्यासोनी प्रकट व्हावे, ना तरी झाकोनी असावे, प्रकटोनी नासावे, हे बरे नव्हे." माननीय मंत्रिमहोदय, आपण असे म्हणाला की, त्या महापौरांनी काय केले ? कायद्यातील तरतुदीप्रमाणे महापौराला काही करता येत नाही. कायद्यातील तरतुदीप्रमाणे नगरसेवकालाही काही करता येत नाही. कायद्यातील तरतूद एवढी ॲटॉनॉमस आहे की, त्यांनी तक्रार करावयाची परंतु अंमलबजावणी त्यांनीच करावयाची आहे. आता तोही विषय नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

श्री. दिवाकर रावते ......

आता बेकायदेशीर बांधकामावर जर आयुक्तांनी एखादी कारवाई करावयाची ठरविली आणि नगरसेवक मध्ये पडला तर त्याचे नगरसेवक पद रद्द होते. त्याचा अर्थ असा की, त्यांनी ते बिनधोक करावयाचे. कृपाकरुन तुमची आमची सत्ता असेल त्या ठिकाणी आपण काही करीत नाही. आपण नेमलेले अधिकारी हे काम करीत आहेत. राज्यकर्ते मध्ये येतात त्याबाबत आपण बंदी घातली. त्यांनी नुसते फोनवर जरी सांगितले की, हे बघा आणि त्यांनी जर अहवालामध्ये लिहून कळविले की, अमूक नगरसेवकाने मला यासंदर्भात फोन कला तर त्यांचे नगरसेवकपद रद्द होते. त्यामुळे निवडून आलेला लोकप्रतिनिधी कोणत्याही पदावर असला तरी ते हतबल आहेत. कायद्याची शास्तीच अशी निर्माण झालेली आहे की, त्यांनीच ते करावयाचे आहे. औरंगाबादमध्ये काय होते, मुंबईमध्ये काय होते, आणखी कोठे काय होते याबाबत आपण म्हणाला. तुमचे अधिकारी हे काम करु शकत नाहीत, ते करु इच्छित नाहीत. हा सर्वात महत्वाचा भाग आपण लपवून ठेऊ नका.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी या ठिकाणी राजकारणात जाणार नाही असे सांगितले. महापालिकेचे जे अधिकारी असतात, ज्यांची जबाबदारी असते त्यांच्या बाबतीत सभागृहामध्ये निर्णय घेतला जाऊ शकतो. या बिलाचा जो दुसरा चांगला परिणाम काय होऊ शकतात ते मी सांगू इच्छितो. अनेक अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणी सेटबॅक सोडलेला नाही, सामासिक अंतर सोडलेले नाही या ज्या काही बाबी आहेत त्या वर्षानुवर्षे तशाच ठेवल्या जातात. एम.आर.अँड टी. पी. मध्ये त्याला रेग्युलराईज करण्यासाठी सुध्दा तरतूद आहे. किती हद्दीपर्यंत आपल्याला हे नियमित करता येते याबाबत टाऊन प्लॅनिंगचे डायरेक्टर, असिस्टंट डायरेक्टर यांच्याकडे अधिकार दिलेले आहेत. अशा पध्दतीने प्रॉपर्टी टॅक्सच्या दुप्पट शास्ती किंवा दंड लावणार असू तर ते भरण्याची गरज पडू नये या कारणासाठी का होईना

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे ...)

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

अनेक लोक बेकायदेशीर कामे रेग्युलराईज करण्यासाठी पुढे येतील. एक सकारात्मक काम या सुधारणेच्या माध्यमातून होत असेल तर अनेक लोक नियमित करता येतील. आपण एफ.एस.आय. नियमित करीत नाही. एफ.एस.आय.चे उल्लंघन केले असेल तर तेथील बांधकाम तोडले पाहिजे अशी कायद्यामध्ये तरतूद आहे. जेथे 1 ऐवजी 2 एफ.एस.आय. वापरला असेल तर तो रेग्युलराईज करावा अशी कायद्यामध्ये तरतूद नाही. सामासिक अंतरे असतील, बांधकामाला परवानगी घेतली नसेल तर पोस्ट फॅक्टो परवानगी घेता येऊ शकेल. अनेक सन्माननीय सदस्यांनी निष्कासनाची कारवाई करावी असे सांगितले. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी प्रश्न विचारला होता की, 21 क्रमाकावर असलेल्या व्यक्तीला नोटीस दिली, 19 क्रमांकावर असलेल्या व्यक्तीला काढून टाकले, मग 2 क्रमांकावर असलेल्याला का काढले नाही ? 2 क्रमांकावरच्या व्यक्तीने स्टे घेतलेला होता. यू.एल.सी. कायद्याच्या बाबतीतही मी सांगितले की, जेवढ्या जमिनी एक्सेस म्हणून घोषित केलेल्या आहेत त्यासंदर्भात प्रकरणे कोर्टामध्ये गेलेली आहेत. अगदी वाडीया पासून सर्व लोक कोर्टामध्ये गेलेले आहेत आणि सर्वांना कोर्टाने स्टे दिलेला आहे. ..

श्री. दिवाकर रावते : कोर्टाने 30-30 वर्षे स्टे दिलेला आहे काय ?

श्री. राजेश टोपे : जमिनीच्या प्रकरणी किती कोर्टबाजी चालते हे देखील लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. शेवटी जोपर्यन्त अनधिकृत बांधकाम राहील तोपर्यन्त त्या बांधकामाच्या बाबतीत दंड करण्याची तरतूद यामध्ये आहे. एखादी बाब कोर्टामध्ये गेली आणि कोर्टामध्ये दोन वर्षे लागली तर त्या दोन वर्षामध्ये आपण त्या बाबतीत शास्ती किंवा दंड लावण्याची तरतूद केलेली आहे. या तरतुदीमुळे अनधिकृत बांधकामाबाबत दंड घेणे शक्य होईल. कोर्टाच्या प्रकरणामुळे अनधिकृत बांधकाम तसेच राहिले तरी सुध्दा त्याबाबतीत दंड घेणे शक्य होणार आहे. जर कोर्टाने अनधिकृत बांधकाम तोडण्याचे आदेश दिले तर ते तोडण्याची कारवाई सुध्दा लगेच होऊ शकते. हा अधिनियम केव्हा पासून अमलात आणला जाईल अशी विचारणा सन्माननीय सदस्यांनी केली. बॉम्बे जनरल क्लॉज ॲक्ट 1904 मध्ये अशी स्पष्ट तरतूद आहे की, जेव्हा एखादा अधिनियम केव्हा



01-08-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3Z-2

MSS/ MAP/ SBT/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे.....)

लागू होईल यासंबंधीचा उल्लेख नसेल त्यावेळी तो अधिनियम ज्या दिवशी विधेयक राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून अमलात येईल. त्यामुळे हा अधिनियम केव्हा लागू होईल या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी प्रॉपर्टी टॅक्सशी या अधिनियमातील तरतुदींची तुलना केली. प्रॉपर्टी टॅक्सला धरुन दंड कसा काय घेता येईल अशी त्यांनी विचारणा केली. यानुषंगाने मला आपणास अनेक उदाहरणे देता येतील. एखाद्याने जर ऑक्ट्राय चुकवून शहरामध्ये प्रवेश केला असेल तर बीएमसी, बीपीएमसी कायद्यातील तरतुदीप्रमाणे त्याला त्या गुड्सवर जो काही ऑक्ट्राय भरावा लागेल त्याच्या 10 पटीने आकार त्याच्याकडून घेता येतो. महसूल कायद्याप्रमाणे एखाद्याने अकृषिक कर भरला नसेल तर अकृषिक कराच्या 40 पट कर त्याच्याकडून वसूल केला जातो.सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चवहाण यांनी कशाच्या किती पट अशी विचारला केली. त्यांना मी सांगू इच्छितो की, नियमाचे उल्लंघन झाले असेल तर त्या पटीने आपल्याला दंड घेता येऊ शकतो. त्यामुळे ते सुध्दा बेकायदेशीर आहे अशा पध्दतीचा कुठलाही विषय नाही. काही सन्माननीय सदस्यांनी अफझलपूरकर समिती, अग्रवाल समिती यांनी केलेल्या शिफारशी शासन अंमलात आणणार आहे की नाही अशी विचारणा केली. काकोडकर समिती ही देखील कल्याण-डोंबिवली मधील अनधिकृत इमारतींची तपासणी करण्यासाठी नेमलेली होती.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MAP प्रथम श्री.शिगम एम . .......... 17:25

श्री.राजेश टोपे.........

या ठिकाणी त्या समितीने एखादी शिफारस केलेली असेल आणि त्याची अंमलबजावणी झाली नाही तर सन्माननीय सदस्य म्हणतात की, तुम्ही केवळ कमिटयाच बसवितात आणि त्या कमिटयांच्या शिफारशी मात्र स्वीकारत नाहीत. आता एखादी कमिटी नेमली आणि त्या कमिटीने शिफारस केल्यानुसार एखादे बिल जर आणले तर त्यावेळी सुध्दा सांगितले जाते की, ते बिल संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे. काकोडकर समितीने ज्या काही चांगल्या शिफारशी केल्या त्यातील ही एक शिफारस एका विधेयकाच्या माध्यमातून आता या ठिकाणी आणलेली आहे. सभापती महोदय, या ठिकाणी मी एवढेच सांगू इच्छितो की, महानगरपालिकेच्या संदर्भातील जे बिल आज जॉईंट सिलेक्ट कमिटीकडे आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी सातत्याने उल्लेख केला. त्या अनुषंगाने मी एवढेच सांगू इच्छितो की, या विधेयकाच्यासंदर्भात त्यांची आणि विधी व न्याय विभागाचे सचिव यांची सुध्दा चर्चा घडवून आणली, त्यांनी सुध्दा या विधेयकाच्या संदर्भात स्पष्ट सांगितले की, ते कॅपिटल व्हॅल्यू बेस्ड बिल आहे आणि त्यातील तरतूद मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात आहे. त्याचे आणि याचे कुठेही लिंकअप् करता कामा नये. त्यामुळे तरी हे थांबवावे असे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले. मी मान्य करीन सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला ती गोष्ट योग्य आहे, येथे जी चर्चा होईल त्यासाठी त्यांची देखील मदतच होईल. यापुढेही काहीतरी करता येणे शक्य आहे पण यासाठी ही चर्चा तहकूब करण्याबाबत जी विनंती काहीं सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे ती कायदेशीर नाही, हे मी अत्यंत जाणीवपूर्वक आणि नम्रपणे याठिकाणी सांगू इच्छितो. अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केले की, मुंबईच्या महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या पाईपलाईनवरील झोपडपट्टया कधी उठविणार? झोपडपट्टयांकडून सुध्दा कर आकारता का ? बी.एम.सी.ॲक्टमध्ये कोणत्या बांधकामावर कर आकारण्याची तरतूद त्यामध्ये आहे. कोणताही कर कोणीही स्वत: ठरवून आकारु शकत नाही. संबंधित बांधकाम कधीचे आहे किंवा ते बांधकाम कोणत्या प्रकारचे आहे, या सगळया गोष्टी प्रॉपर्टी टॅक्स आकारतांना बघितल्या जातात. मी एवढेच सांगू इच्छितो की, प्रामुख्याने हे बिल काही कोणतेही अनधिकृत बांधकाम रेग्युलराईज करण्यासाठी आणलेले नाही. फक्त या ठिकाणी दंड भरुन जी चूक त्यांनी केलेली आहे,

4A इ 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.........

यामध्ये मी पुन्हा सभागृहाला सांगू इच्छितो की, कुठल्याही परिस्थितीत या कायद्यामध्ये बांधकामे तोडण्याची जी तरतूद आहे त्या तरतूदीला बाधा येणार नाही. असा अत्यंत स्पष्ट उल्लेख या विधेयकामध्ये केलेला आहे. अशा प्रकारे काम करणारे वर्षानुवर्षे कोर्टात येऊन थकतात तर त्यांनी केलेल्या चुकीच्या संदर्भातील दंडाची रक्कम देखील त्यांनी भरली पाहिजे, असा या बिलाचा हेतू आहे. आणि त्यामुळे सभागृहाला सुध्दा विनंती करतो की, या विधेयकाला मंजूरी देण्यात यावी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, एखाद्या प्रश्नाचे उत्तर राहिले असेल तर मी द्यावयाला तयार आहे. समजा एखाद्या बिल्डरने 50 इमारतींचा समूह बांधला आणि प्रत्येक इमारतींवर पाच माळे बेकायदेशीर बांधले. अशा प्रकारे एकूण 250 माळे त्या ठिकाणी बेकायदेशीर बांधण्यात आले. 250 माळे इन टू प्रत्येक माळ्यावर दहा फ्लॅट अशा प्रकारे एकूण 2500 फ्लॅट त्या ठिकाणी बेकायदेशीर होतील. तुम्ही त्याला बेकायदेशीर बांधकामाची नोटीस देणार. ज्याप्रमाणे उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामाला मान्यता देण्यासाठी मानवतेच्या दृष्टीकोनातून काहीतरी करा, असे सांगितले तेही या सभागृहामध्ये मानवतेच्या आधारावर केले. तसेच, या समूहातील रहिवासी म्हणतील मालकांनी बेकायदेशीर बांधकाम केले म्हणून त्यांनी दंड भरला असेल परंतु आम्हाला त्यासंबंधीची माहिती नाही. आमची ही घरे आता रेग्युलराईज करण्यात यावी, या परिस्थितीत शासन कोणता निर्णय घेईल ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अशा प्रकारची कोणतीही बेकायदेशीर बाब या विधेयकामध्ये आणलेली नाही किंवा अशा पध्दतीची कोणतीही तरतूद या विधेयकामध्ये नाही, असे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो. या विधेयकातील उद्देश व कारणे यापूर्वी सदनामध्ये वाचून दाखविलेली आहेत, परंतु सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत साहेबांना मी सांगू इच्छितो की, या विधेयकामध्ये परंतु शब्दानंतर जे आहे ते मी वाचून दाखवितो." परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे यांचा, असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेल तोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही. असे अत्यंत स्पष्टपणे यात म्हटलेले आहे.

यानंतर श्री.कानडे.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ...

याचा अर्थ शास्ती लावली म्हणजे अनधिकृत बांधकाम नियमित झाले असा होत नाही. मला वाटते या उत्तरानंतर माननीय सदस्यांचे समाधान झाले असावे. मी सदनाला विनंती करतो की, हे बिल मंजूर करावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कायदा करीत आहात त्यामध्ये भाषा अशी वापरली आहे की, "इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील " म्हणजे ही सगळी भविष्यकाळातील गोष्ट आहे. प्रत्यक्षात आजपर्यंत जे झालेले आहे त्याच्यावर शास्ती आकारणार नाही. याच्यापुढे अवैध बांधकामावर शासन शास्ती आकारणार आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांचा पूर्ण आदर ठेऊन त्यांना विचारु इच्छितो की, येथून पुढे अनधिकृत बांधकाम होणारच नाही असे आपण सांगू शकता काय? अनधिकृत बांधकाम होणार नाही याची आपण 100 टक्के गॅरंटी देणार असाल तर मी जरुर तो शब्द वगळण्यास तयार आहे. या बिलाचा हेतू असा आहे की अनधिकृत बांधकाम डिस्करेज करण्यासाठी हे बिल आणलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, जो कायदा अस्तित्वात आहे त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी हे बिल मांडलेले आहे असे मंत्रीमहोदय सांगत आहेत. ही सुधारणा म्हणजे काय ? कायद्यामध्ये परिवर्तन करुन नवीन कायदा आणतो त्याला सुधारणा म्हणतो. आता फक्त आहे त्या कायद्यामध्ये शास्ती लावण्याची तरतूद शासन करीत आहे. बेकायदेशीर कामांना शास्ती लावणे ही सुधारणा होऊ शकते काय ? मुंबईमध्ये लाखो लोक झोपडपट्टयांमध्ये राहतात त्या लोकांकडून शासन मालमत्ता कर वसूल करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, बेकायदेशीर बांधकामांना शास्ती लावणे ही सुधारणाच आहे. झोपडपट्टी धारकांना सुध्दा राज्यामध्ये आपण कर लावू शकतो आणि कर आकारतोही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कायद्याचा उद्देश चुकला आहे. कायद्याची ताकद तुम्हांला निर्माण करावयाची होती. बेकायदेशीर बांधकाम तोडायला नोटीस दिलेली आहे आणि संबंधित लोक कोर्टात गेले तर जोपर्यंत कोर्टाचा निकाल येत नाही तोपर्यंत दुप्पट/तिप्पट शास्ती लावून तुम्ही तेथे रहा. लोकांना पैशाचा प्रश्न नाही. लोक पैसे द्यावयाला तयार आहेत. दुप्पट आणि तिप्पट जरी रक्कम आकारली तरी लोकांना फरक पडत नाही. त्यांना राहण्याची व्यवस्था झाली हे

........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्यांच्या दृष्टीने महत्वाचे आहे. आपण व्यवस्था निर्माण करीत आहोत. म्हणून माझी विनंती आहे की ही विधेयक चिकित्सा समितीकडे पाठवावे. त्यामध्ये अमेंडमेंड करुन बिल पुन्हा सभागृहाला सादर करा. जेवढया म्हणून कोर्टात केसेस असतील त्यांचा स्टे उठवून दुप्पट आणि तिप्पट रक्कम आकारुन सुखाने रहा असे होईल. कोर्टाचा निर्णय लागेल तेव्हा लागेल. म्हणजे ही वाऱ्यावरची वरात असा प्रकार झाला. म्हणून माझी विनंती आहे की, चिकित्सा समितीकडे हे बिल पाठवा. समितीच्या एकाच बैठकीत यावर चर्चा करुन बिल पाठवू.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रावते यांनी ज्या काही सूचना केल्या त्यानुसार यामध्ये सुधारणा करता येत असतील तर करु.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.......

परंतु आज माझी सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक मंजूर करावे.

**उपसभापती** : जकात कर बुडविणारे सापडले तर 10 पट दंड करता येतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना माननीय मंत्रीमहोदयांनी विनंती केल्यानुसार आपला प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे का?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे. आवश्यकता असल्यास एकाच बैठकीमध्ये योग्य त्या सुधारणेसह मंजूर करता येईल. हे विधेयक विधानपरिषदेत मांडण्यात आले आहे. पूर्ण विचारांती, ताकदीचा कायदा बनवून विधानसभेत पाठविला पाहिजे. या सभागृहाने हे विधेयक मंजूर केले तरी खालच्या सभागृहात यापेक्षा ताकदीचे सदस्य आहेत. कशा प्रकारचे विधेयक विधानपरिषदेने मंजूर करुन पाठविले अशी त्यांची भावना होऊ नये. या सभागृहाची प्रतिष्ठा राखली गेली पाहिजे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना भेटून विनंती केली होती की, कायद्याची ताकद वाढली पाहिजे. परिषदेचे विधेयक असल्यामुळे ते चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी उदाहरण देऊ इच्छितो. स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठाचे विधेयक या सभागृहाने मंजूर केल्यानंतर ते खालच्या सभागृहात मांडण्यात आले. त्या सभागृहातून ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. तसे या विधेयकाचे होऊ नये, या सभागृहातच ठोस निर्णय व्हावा एवढीच आमची विनंती आहे.

श्री.राजेश टोपे : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विनंती करतो की, त्यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा त्यांचा प्रस्ताव मागे घ्यावा. सन्माननीय सदस्य म्हणाले होते की, आम्ही फक्त चर्चा करु. मी मोठ्या मनाने मान्य करतो की, ज्यांच्या संदर्भात लिटिगेशन झाले, त्यांना तीनपट कर लावावा एवढ्यापुरते आपल्याला मान्य करता येईल. परंतु अशी सुधारणा यापुढच्या काळात आणता येईल आणि ती जरुर आणू.

श्री.मधुकर चव्हाण : हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मंजूर करु.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : शासनाने हे विधेयक मंजूर करुन घ्यावे परंतु आम्ही मान्य करणार नाही. परिषदेकडून असे विधेयक खालच्या सभागृहात जाणे योग्य नाही. विधानपरिषदेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. माझी सभागृहाला मनापासून विनंती आहे. सरकारच्या आणि या विधेयकाच्या विरोधात मी नाही. परंतु ताकदीचा कायदा केला पाहिजे. हे परिषदेचे विधेयक आहे.

डॉ.दीपक सावंत : शासन बहुमताच्या जोरावर विधेयक मंजूर करु शकते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे काय?

श्री.दिवाकर रावते : नाही.

**उपसभापती** : आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे ("होय" चे आवाज) प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" म्हणावे ("नाही" चे आवाज)...........

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी विभाजन मागतो.

**उपसभापती** : ठीक आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

( विभाजनाची घंटा वाजल्यानंतर आणि अनुकूल / प्रतिकूल सदस्यांची मोजणी झाल्यानंतर )

**सभापती** : विभाजनाचा निकाल असा आहे,

अनुकूल : 17

प्रतिकूल : 17

दोन्ही बाजूकडील मते समान आहेत. तेव्हा मी माझे मत ठरावाच्या विरुध्द बाजूने देत आहे. त्यामुळे हा प्रस्ताव असंमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य पोलची मागणी करतात. )

**सभापती** : खंड 2 ते 4 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 5 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

**सभापती** : प्रस्ताव असा आहे की, सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 5--मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2007, संमत करावे. अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे. ("होय" चे आवाज) प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" म्हणावे.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला विभाजन हवे आहे.

**सभापती** : "होय"चे बहुमत "होय"चे बहुमत. "होय"चे बहुमत असल्यामुळे विधेयक संमत झ ाले.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन विभाजन मागितल्याचे सांगतात.)

**सभापती** : मी सन्माननीय विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण विनंती केल्याप्रमाणे मी पोल दिला होता, त्यानंतर काउंटींगही झालेली आहे.

श्री.नितीन गडकरी (वेलमधून) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा जो प्रस्ताव मांडला, त्यावर काउंटींग झाली. परंतु आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रस्तावावर आम्ही परत पोल मागत आहोत. त्यामुळे आपण पोल दिला पाहिजे.

**सभापती** : मी माझा निर्णय दिलेला आहे. विधेयक संमत झालेले आहे.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : आता आपण विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 43--महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधीग्राहयीकरण) विधेयक,2007 चर्चेस घेऊ.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : मी मघाशी पोल दिला होता, त्यावेळी काउंटींग झालेली आहे. मी माझा निर्णय दिलेला आहे.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

नंतर श्री.रोझेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या ठिकाणी एक पोल आपण घेतलेला आहे. एकदा मतदान घेतल्यामुळे पुन्हा पोल देण्याची गरज मला वाटली नाही, म्हणून मी माझा निर्णय दिलेला आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहातून बर्हिगमन करतात.)

--------------

.2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधीग्राहीकरण) विधेयक

L.A. BILL NO. XLIII OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 43-महाराष्ट्र राज्यात लागू असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 43-महाराष्ट्र राज्यात लागू असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 22 (दोन्ही सम्मिलित), अनुसूची, विधेयकाचे भाग झाले.

खंड, 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.43 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 43 संमत झाले आहे.

--------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. XXXV OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS,NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIP ACT,1965.)

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.35-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.35-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्र.-35 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक-35 संमत झाले आहे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XXXVIII OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)**

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे विधानसभा विधेयक क्रमांक 38- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे विधानसभा विधेयक क्रमांक 38- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...

<u>**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**.</u>

**सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये अनुक्रमांक 12 वर विरोधी पक्षाच्यावतीने म.वि.प. नियम 259 अन्वये "अंतिम आठवडा प्रस्ताव" दाखविण्यात आलेला आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी अशी विनंती केली होती की, अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा उद्या, गुरुवार, दिनांक 2 ऑगस्ट, 2007 रोजी सकाळी 9.45 वाजता घेण्यात यावी. अंतिम आठवडा प्रस्तावावर उद्या सकाळी 9.45 ते 12.15 वाजेपर्यंत चर्चा करण्यात येईल. तसेच, आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये अनुक्रमांक 13 वर "महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण धोरण" दाखविण्यात आलेले आहे. आता आपण महाराष्ट्र राज्याच्या गृहनिर्माण धोरणावरील चर्चा सुरु करु या.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण धोरण

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण धोरण चर्चेसाठी सभागृहासमोर ठेवतो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आम्हाला गृहनिर्माण धोरणाची प्रत मिळाली नाही, त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी याबाबत सभागृहाला थोडक्यात माहिती द्यावी अशी मी विनंती करतो.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, गृहनिर्माण धोरणाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

**सभापती** : गृहनिर्माण धोरणाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे मंत्री महोदयांनी या धोरणावर बोलणे बंधनकारक नाही. यानंतर माननीय सदस्य श्री.सय्यद जामा हे त्यांचे विचार मांडतील.

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार की हाउसिंग पॉलिसी का समर्थन करने के लिए मैं खड़ा हूँ. हमारी सरकार ने बहुत प्रोग्रेसिव पॉलिसी बनाई है इस को माननीय मंत्री महोदय ने सभागृह के पटल पर रखा है. इसके बारे में मैं एक छोटा सा सुझाव पेश करना चाहता हूँ. इसके प्रिएम्बल में लिखा है : ".... and ensure affordable houses to Lower Income Group (LIG) especially the Socially and Economically Weaker Sections (EWS) in urban and rural areas." मेरा सुझाव है कि इसमें वर्कर्स को भी शामिल किया जाए. इसमें लोअर इनकम ग्रुप तो दिया गया है, लेकिन वर्कर्स को शामिल नहीं किया गया है. इस बारे में मैंने माननीय मुख्य मंत्री महोदय को सुझाव दिया था. इसलिए मेरा एक छोटा सा सुझाव यह है कि इसमें वर्कर्स को शामिल किया जाए, ताकि उनके लिए विशेष प्रावधान हो सके. मुझे आशा है कि माननीय मंत्री महोदय मेरे इस सुझाव पर गंभीरता से विचार करेंगे.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याने जे नवीन गृहनिर्माण धोरण आपाल्यासमोर आणले आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे. सभापती महोदय, गृहनिर्माण हा जनतेच्या निकडीचा विषय आहे. गेल्या 25 वर्षांमध्ये हे क्षेत्र धनदांडग्यांच्या अमर्याद नफेखोरीचे कुरण बनले होते त्यामुळे सामान्य माणसाची लुबाडणूक चालली आहे. राज्यात गृहनिर्माणासंबंधात काही धोरण आहे की नाही अशी शंका सर्वसामान्यांच्या मनामध्ये उत्पन्न व्हावी अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. घरासंबंधी सर्वसामान्य माणसाच्या गरजा, त्यांचे घराविषयीचे स्वप्न यांना काहीच किंमत राहिलेली नव्हती. महाराष्ट्र सरकारने त्याची दखल घेऊन गोरगरीब, मध्यमवर्गीयांना केंद्रबिंदू मानून हे नवे धोरण आखले आहे त्याबद्दल राज्य सरकारचे मी अभिनंदन करते. या धोरणाचे सर्वात मोठे वैशिष्ट म्हणजे घरांची खरेदी-विक्री ही चटई क्षेत्रानुसार म्हणजेच कार्पेट एरियानुसार होणार आहे. सध्या बिल्टप किंवा सुपर बिल्टप क्षेत्रफळावर घरांच्या किंमती आकारल्या जात आहेत. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक करण्याचे ते एक साधन बनले होते. यापुढे घरांच्या किंमती या चटईक्षेत्रानुसार असणार आहेत. त्यामुळे घर घेणाऱ्या गा्रहकांना प्रत्यक्षात आपण किती जागा वापरतो त्याप्रमाणे त्या घराची किंमत द्यावी लागणार आहे. या निर्णयानेदेखील मुंबई शहर आणि अन्य महानगरातील घरांच्या किंमती 25 ते 30 टक्क्यांनी कमी होतील असा अंदाज आहे. त्याचबरोबर कार्पेट एरियावर आधारित किंमतीमुळे घर खरेदी विक्रीच्याए व्यवहारात पूर्णपणे पारदर्शकता येणार आहे. आज घरांच्या किंमती आभाळाला भिडलेल्या असल्याने स्वत:चे, हक्काचे घर घेण्याचे स्वप्न सर्वसामान्य माणूस विसरूनच गेला होता. पण या सरकारच्या या नव्या धोरणामुळे, निर्णयामुळे मोठ्या शहरांमध्ये घर घेणे सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यात येणार आहे. परंतु जे विकासक, जे बिल्डर्स कार्पेट एरियानुसार दर आकारणार नाहीत त्यांच्या विरूद्ध कोणती कारवाई केली जाणार आहे, याबाबतचा उल्लेख या धोरणामध्ये कोठेही पहावयास मिळत नाही. त्याबद्दल तरतूद यात करावी असे मला या निमित्ताने सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, गृहनिर्माण क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला मुभा, मुंबईसह 49 शहरात भाडेतत्त्वावर घरे उपलब्ध करणे, जुन्या इमारतींची आणि बीडीडी चाळींची पुनर्बांधणी, स्पर्धात्मक निविदा मागवून झोपडपट्टी पुनर्विकास योजनेची अंमलबजावणी, 40 हेक्टरवरील झोपडपट्ट्यांचा धारावीच्या धर्तीवर पुनर्विकास, महापालिका क्षेत्राच्या बाहेर चटईक्षेत्र निर्देशांक वाढविणे, मुंबईच्या

....... 4जे 2 ...

श्रीमती सुधा जोशी ....

बाहेर टीडीआरचा वापर आदी अनेकविध तरतुदींचा या नव्या धोरणात समावेश करण्यात आलेला आहे. लहान लहान गावांमध्ये देखील बिकट होऊ लागलेल्या घरबांधीच्या प्रश्नाचा सर्वसामान्य माणसाच्या गरजांचा अभ्यास करून हे सर्वंकष धोरण ठरविण्यात आलेले आहे. यापुढे नव्याने तयार होणाऱ्या गृहनिर्माण संकुलात किंवा वसाहतींमध्ये किमान पाच ते 10 टक्के घरे 450 ते 500 चौ.फूट क्षेत्रफळाची असावीत असे कायदेशीर बंधन घालण्याचे सूतोवाच या धोरणात करण्यात आलेले आहे. त्यामुळे महानगरात मध्यमवर्गीय आणि अल्पउत्पन्न गटातील लोकांसाठी निवारा उपलब्ध होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात अशी 450-500 चौ.फूटांची घरे मुबलक प्रमाणात उपलब्ध झाली तरी त्याचा लाभ किती मध्यमवर्गीय घेऊ शकतील या विषयी शंका वाटते. मोठ्या शहरातील घरांच्या किंमती लक्षात घेता, उच्च मध्यमवर्गीयांनादेखील 500 चौ. फूटाचे घर घेणे जमत नाही, परवडत नाही आणि भाड्याने घरे मिळत नाहीत. .....

( यानंतर श्री.सरफरे ....4के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी..

कमाईचा मोठा भाग घर आणि रोजचा प्रवास खर्च यावर होतो. त्याऐवजी अडीचशे, तीनशे फूटाचे आटोपशीर घर बांधण्याची अट घातली तर मुंबईसारख्या महानगरातील जागा आणि नोकरदारांची घरासाठीची गुंतवणूक करण्याची ऐपत अशा दोन्ही दृष्टीने त्यांना सोईचे होईल. मुंबईसह मोठया शहरामध्ये गरीब आणि मध्यमवर्गीयांना आपला संसार थाटण्यासाठी परवडतील अशा किंमतीत हक्काच्या घराची सोय होईल. शेवटी घर किती ऐसपैस आहे, यापेक्षा डोक्यावर छत, चार भिंतीचे संरक्षण हे सर्वसामान्यांसाठी अधिक महत्वाचे आहे. त्या खालोखाल अपेक्षा असते ती चांगली वस्ती, वीज, पाणी शाळा बाजारपेठ आदी आवश्यक सुविधांची. मुंबईसारख्या मोठया शहरामध्ये दर पाच वर्षांनी घरांच्या किंमतींचा फेरविचार करण्याची गरज आहे. इमारत उभारणीमधील सध्याच्या अडीअडचणी व भ्रष्टाचार दूर करण्यासाठी "इमारत परवाना" व्यवस्थेमध्येच आमूलाग्र सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

भाडे पट्टीला पुन्हा उत्तेजन देण्याचा निर्णय स्तुत्य आहे. घरांच्या समस्येवर खरे उत्तर भाडे तत्वावर भरपूर घरे उपलब्ध होणे, हेच असल्याचे जगभरातला अनुभव आहे. परदेशामध्ये 80 टक्के घरे भाडयाने उपलब्ध होतात. परंतु आपल्याकडे तसे होत नाही. औद्योगिकीकरणामुळे नागरीकरणाचा वेग वाढला आहे. औद्योगिक विकासात आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रात नागरीकरणसुध्दा अन्य राज्यांच्या तुलनेमध्ये अधिक गतीने होत आहे. तामिळनाडूनंतर महाराष्ट्र हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 43 टक्के लोक महापालिका, पालिका क्षेत्रामधून रहातात. मुंबई शहराची रचना ही 35 लाख लोकांसाठी झालेली असताना आज मुंबईची लोकसंख्या दीड कोटीवर पोहोचलेली आहे.आणि देश-विदेशातून हजारोंच्या झुंडी दररोज येऊन मुंबईमध्ये धडकत आहेत. झोपडपट्टयांना संरक्षण देऊन, जुन्या चाळींची पुनर्बांधणी करुन किंवा नव्या घर बांधणीला प्रोत्साहन देऊन काही लोकांचा प्रश्न काही काळापुरता सोडविता येईल, पण ती समस्या संपणार नाही. नगररचनेचा बट्टयाबोळ होऊन नव्या समस्या मात्र उभ्या राहतील. याचा जीवघेणा प्रत्यय मुंबईकरांनी गेल्या दोन वर्षातील पावसाळयात घेतला आहे. अतिवृष्टीने कोलमडणारी वाहतूक व्यवस्था आणि घराघरात शिरणारे महापुराचे, सागरी भरतीचे पाणी एवढी एकच पावसाळी समस्या नाही तर ती संकटे परवडली अशा समस्यांचा सामना दररोज करावा लागतो. मुंबईतच नव्हे तर सर्वच नागरी क्षेत्रात अनधिकृत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्रीमती सुधा जोशी..

बांधकामे, अतिक्रमणे, झोपडपट्ट्या, नियोजनशून्य विस्तार, बकालपणा या समस्या वाढत आहेत. हे वर्षभरापूर्वी उल्हासनगरमधील आंदोलनातून स्पष्ट झालेले आहे. मुंबई, नासिक, पुणे, औरंगाबाद हा औद्योगिक चतुष्कोण मानला जातो. नागरी भागात म्हणजे महापालिका, पालिका क्षेत्रात सरकारी, निमसरकारी कार्यालये, उद्योगधंदे, व्यवसाय यामुळे नोकऱ्या रोजगार उपलब्ध करुन देणे गरजेचे आहेत. पण तेवढे पुरेसे नाही. घराबरोबर अत्यावश्यक नागरी सुविधा आणि नगररचनेचाही विचार करावा लागेल.

निवारा संकुले उभारतांना परिसरामध्ये शाळा, बागा, खेळांची मैदाने, मार्केट, दवाखाने, हॉस्पिटल्स, रस्ते, ड्रेनेज, पाणी या समाजाला आवश्यक असलेल्या सुविधा निर्माण करण्यासाठी सक्ती करणे गरजेचे आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

विशेषत: शहरामध्ये पाळणाघराची सोय ही सुध्दा नागरी सुविधामध्येच येते. ही सुविधा देखील उपलब्ध होणे महत्वाचे आहे. या सुविधा जी संकुले उपलब्ध करुन देणार नाहीत किंवा परिसरामधील सामायिक सुविधांसाठी कॉट्रीब्युट करणार नाहीत अशा संकुलांवर किंवा त्यांच्या बिल्डर्सवर काय कडक कारवाई केली जाईल याचाही उल्लेख या धोरणात असणे आवश्यक आहे. सद्या या सुविधांचा अभाव जिथे जिथे आहे तो अनुशेष कसा भरुन काढता येईल आणि त्यासाठी काय उपाय योजना करणार ते धोरणामध्ये स्पष्ट करावे. प्रत्येक धोरणाला मानवी चेहरा आणि सामाजिक आशय असावा लागतो. तो अधिक स्पष्टपणे या धोरणात पुढे यावा. राज्यामध्ये वीज, पाण्याची टंचाई 12 महिने सुरु आहे. स्वच्छता, सार्वजनिक आरोग्याची स्थिती पाहिली तर मोठया शहरांपेक्षा ग्रामपंचायतीचा कारभार बरा असे वाटते. पाय मोकळे करण्यापुरती मोकळी जागा आणि पोटभर मोकळा श्वास घेण्याइतकी स्वच्छ हवा लाभणे सुध्दा महानगरामध्ये दुरापास्त आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था पहाता ग्रामीण भागाची दूरवस्था आणि झपाटयाने वाढणारे नागरीकरण या दोन्ही समस्या नजिकच्या काळात अधिकाधिक उग्र होतील असे दिसते, याचाही विचार गृहनिर्माणासारखे महत्वाचे धोरण ठरविताना करणे आवश्यक आहे. त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. याबाबत हे धोरण थोडेसे अपुरे आहे असे वाटते, त्यामध्ये स्पष्टता आणणे आवश्यक आहे.

झोपडपट्टी पुनर्विकास योजनेसाठी 2.5 पेक्षा अधिक चटईक्षेत्र देणे योग्य ठरणार नाही. त्याचबरोबर फुकट घरे देण्याच्या प्रवृत्तीलाही कोठेतरी लगाम घालण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर प्रभागनिहाय सुधारित विकास आराखडा तयार करुन मगच इमारत बांधण्यासाठी परवानगी देणे गरजेचे आहे.अनधिकृत झोपडपट्टीवासियांना पुनर्रचित इमारतीमध्ये मालकी हक्काची घरे न देता, भाडयाने घरे द्यावीत. जादा चटई क्षेत्रामुळे उपनगरामध्ये उभ्या राहणाऱ्या उंच इमारतींना पाणी व वीजेची टंचाई जाणवणार आहे. ही बाबही विचारात घेणे आवश्यक आहे. राज्यामध्ये पहिल्यांदाच गृहनिर्माण क्षेत्र नियामक आयोगाची स्थापना करण्यात येत असल्यामुळे घर खरेदी विक्री किंवा त्या संबंधातील काही प्रश्न असतील तर ते सोडविले जातील. त्याबरोबरच या आयोगाला कोणते अधिकार असणार आहेत याबाबतची स्पष्टता समोर आलेली नाही. या आयोगाने वीज नियामक आयोगाप्रमाणे घरांच्या खरेदी-विक्रीमध्ये शिस्त आणि सुसूत्रता आणली तर त्याचा

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/

श्रीमती सुधा जोशी...

उपयोग होऊ शकेल. बिल्डरकडून आकारण्यात येणाऱ्या अव्वाच्या सव्वा किंमती, भिकार बांधकाम कन्वेअन्सचे हस्तांतरण न करणे, बांधकाम करण्यास दिरंगाई करणे या तक्रारी घेऊन आयोगाकडे दाद मागता येईल अशी अपेक्षा आहे.

मुद्रांक शुल्काविषयी या धोरणात काहीच उल्लेख करण्यात आलेला नाही. या धोरणामध्ये गरीब आणि मध्यमवर्गीयांना मुद्रांक शुल्कात सवलत देणे आवश्यक आहे. या धोरणामध्ये घरबांधणी व्यवसायातील विकासक, एनजीओ तसेच इतर जे या व्यवसायामध्ये कार्यरत आहेत त्यांच्या कामांची तपासणी करण्यासाठी क्रिसिल व इक्रा यासारख्या संस्थांमार्फत दर्जा व विश्वासार्हता तपासण्यात येणार आहे ही स्तुत्य बाब आहे. राज्यामध्ये एकच विकास नियंत्रण नियमावली केल्यामुळे सगळीकडे एकसंधता येईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ...

भाडे तत्वावरील घरांना चालना व शहरामध्ये नव्याने येणाऱ्यांसाठी डॉर्मेटरीज बांधण्याच्या तरतुदीमुळे जी जनता बाहेरगावावरुन नोकरी, शिक्षण किंवा तत्सम कारणासाठी शहरात येते त्यांच्यासाठी हे सोयीचे होईल परंतु या तरतुदीमुळे काही समाजविघातक कारवाई करणारे लोक फायदा घेणार नाहीत यासाठी काही कडक नियमावली करुन शासनाने त्यावर लक्ष ठेवले पाहिजे.

सभापती महोदय, बांधकाम व्यावसायिक, विकासक आणि झोपडपट्टीवासियांमध्ये जो काही करार एसआरअे अंतर्गत होईल त्याचे व्हीडीओ चित्रीकरण करण्यात येईल, असे आश्वासन यापूर्वी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आहे आणि ते या योजनेत अंतर्भूत करण्यात आले आहे. हे एक परिवर्तन आहे असे म्हणावे लागेल.

या धोरणानुसार घरबांधणी क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीला चालना देण्याचे प्रयत्नही होणार आहेत. यातून अत्याधुनिक तंत्रज्ञान येऊन घरांच्या किंमती कमी होतील असे गृहीत धरण्यात येत आहे. तरी देखील विदेशी कंपन्या घरबांधणी व्यवसायच आपल्या पंखाखाली घेऊन गिळंकृत करणार नाही ना याकडे ध्यान दिले पाहिजे.

सभापती महोदय, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत काही बदल सुचविण्यात आले आहेत. ज्यात सरकारी मालकीच्या जागेवरील झोपड्यांचे पुनर्वसन करताना 70 टक्के लाभार्थींच्या मान्यतेची अट रद्द करण्यात आलेली आहे आणि स्पर्धात्मक निविदा मागविण्यात येणार आहेत. तसेच म्हाडा आणि महानगरपालिका झोपडपट्टी पुनर्विकासासाठी पुढाकार घेतील अशी अपेक्षा आहे. लाभार्थींच्या गृहनिर्माण संस्थांना प्राधान्य दिले जाणार आहे. या तरतुदींमुळे बांधकाम व्यावसायिक, विकासक यांची मक्तेदारी संपुष्टात येईल, ही चांगली बाब आहे. मी पुन्हा एकदा या नवीन गृहनिर्माण धोरणाबद्दल शासनाचे अभिनंदन करते आणि या गृहनिर्माण धोरणाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. सुरेशदादा देशमुख ( परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, शासनाने महाराष्ट्राचे गृहनिर्माण धोरण जाहीर केल्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रात ज्या ठिकाणी गावठाण क्षेत्रामध्ये झोपडपट्टयांमध्ये वाढ झालेली आहे त्यांचे पुनर्वसन करुन त्या ठिकाणी त्या गोरगरीब जनतेला स्वत:चे घर बांधता येईल. याबद्दल या धोरणात नमूद केले आहे. अतिशय महत्वाकांक्षी निर्णय या राज्याच्या माननीय मुख्यमत्र्यांनी घेतला त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि या धोरणाबद्दल महाराष्ट्र शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. यावर बोलण्यासारखे बरेच मुद्दे आहेत. तसेच वातावरण अतिशय चांगले आहे. असे चांगले वातावरण कधीच मिळणार नाही. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय उपस्थित आहेत त्यांना किती आनंद वाटत असेल. कारण या ठिकाणी कोणी विचारणारे नाही. सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. या गृहनिर्माण धोरणाचे मी स्वागत करतो. सर्वसामान्य माणसाला, मध्यमवर्गीयांना, गरिबातील गरीब माणसाला या गृहनिर्माण धोरणाचा फायदा मिळणार आहे याबद्दल परत एकदा शासनाचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आता साडेसहा वाजलेले आहेत. आता या ठिकाणी जी चर्चा सुरु आहे ती आपण उद्या घ्यावी. आज सकाळी 9.45 पासून कामकाज सुरु झालेले आहे....

**उपसभापती** : आता ही चर्चा संपलेली आहे. यानंतर अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील.

----

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

**पृ. शी.** : मुंबईत हमरस्त्यावरुन मद्यधुंद लक्ष्मीपुत्रांनी भरधाव वेगाने गाडी चालवून गरीब लोकांना चिरडून मारण्याच्या प्रकारात झ ालेली वाढ

**मु. शी.** : मुंबईत हमरस्त्यावरुन मद्यधुंद लक्ष्मीपुत्रांनी भरधाव वेगाने गाडी चालवून गरीब लोकांना चिरडून मारण्याच्या प्रकारात झालेली वाढ यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-----

**पृ. शी.** : दूरचित्रवाणी वाहिन्यांवरुन प्रक्षेपित केले जाणारे अश्लिल व हिंसाचाराने भरलेले चित्रपट व दृश्ये, अन्य अश्लिल कार्यक्रम यामुळे समाजावर होणारे अनिष्ट परिणाम

**मु. शी.** : दूरचित्रवाणी वाहिन्यांवरुन प्रक्षेपित केले जाणारे अश्लिल व हिंसाचाराने भरलेले चित्रपट व दृश्ये, अन्य अश्लिल कार्यक्रम यामुळे समाजावर होणारे अनिष्ट परिणाम यासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----

**उपसभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 2 ऑगस्ट, 2007 रोजी सकाळी 9.45 वाजता पुन्हा भरेल. उद्या सकाळी 9.45 ते 12. 15 पर्यंत विशेष बैठक होईल व त्यात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 34 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 2 ऑगस्ट 2007 च्या सकाळी 9.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही